महाराष्ट्र राज्य परिचय

प्रसिद्धि विभाग महाराष्ट्र सरकार मुंबई

महाराष्ट्र राज्य परिचय

किंमत एक रुपया

पहिली आवृत्ति, ऑक्टोबर १९६०

अनुक्रमणिका

पद्धति – पब्लिक सर्व्हिस कमिशन – स्थानिक स्वराज्य – ग्रामपंचायत – न्यायपंचायती – जनतेचें सहकार्य.

शेतकी अर्थव्यवस्था

जमिनीचा उपयोग – शेतकी उत्पन्न – जमीनसुधारणा – जमिनींच्या तुकड्यांचें एकत्रीकरण – भूमिहीनांना जमीन – पाणीपुरवठ्याच्या छोट्या योजना – बियाण्याची वाढ – शिक्षण – संशोधन – कांहीं खास योजना – जमीनसंरक्षण – दुग्धोत्पादन व दूधपुरवठा – इतर दूधयोजना – गुरांची जोपासना – मच्छीमारी – अंतर्गत भागांतील मच्छीमारी – पंचवार्षिक योजनांखालील प्रगति – मच्छीमारी धंद्यांतील अन्य उत्पादन – मच्छीमारीचें शिक्षण देणाऱ्या शाळा – जंगलें – जंगलवाढीच्या योजना – अभयस्थानें व उद्यानें – जंगल उत्पादन – प्रमुख उत्पादन – किरकोळ जंगलमाल – प्राणिज व खनिज उत्पन्न – औषधी झाडें.

पाटबंधारे

पावसावर हवाला – कृष्णा नदीचें खोरें – कोयना प्रकल्प – इतर प्रकल्प – गोदावरी खोरें – मुळा व इतर प्रकल्प – तापी खोरें – मध्यम व लहान प्रकल्प – तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रम – पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग.

औद्योगिक विकास

खास उद्योगधंदे – साखरेचें उत्पादन – रासायनिक उत्पादन – तेल-गिरण्या – गठ्ठे बांधण्याचे कारखाने – खाणकाम – मास्टर प्लॅन – विशिष्ट शिफारसी – सुप्त सामर्थ्य – औद्योगिक वसाहती – उद्योगधंद्यासाठीं वीजपुरवठा – इतर योजना – विद्युत् उत्पादन आणि पुरवठा – उद्योगपतींना मार्गदर्शन – कोळशाचा सांठा – चांदा येथील खाणी – कामठी येथील खाणी – मँगनीज – लोखंड – चांदा जिल्हा – रत्नागिरी – बॉक्साइटचे सांठे – चुनखडीचे सांठे – क्रोमाइट – अभ्रक – इल्मेनाईट – सिलिका सँड आणि चिकण माती – गेरु – फेल्सपर व क्वार्टझ्.

कामगारविषयक कायदे व कामगार कल्याण

मालक नोकर संबंध – प्रशिक्षणासाठीं कारखाने – कल्याणविषयक कार्य – नोकरवर्ग व्यवस्था सल्लागार योजना – उद्योगधंद्यांतील शिस्त – औद्योगिक शांतता.

वाहातूक आणि दळणवळण

सुधारलेली योजना – मागासलेल्या प्रदेशांचा विकास – विदर्भ विभागासाठीं रस्त्यांचा जादा कार्यक्रम – पश्चिम किनारा रस्ता इस्टर्न एक्स्प्रेस हाय वे – वेस्टर्न एक्सप्रेस हाय वे – नद्यांवरील पूल – आंतरविभागीय रस्ते – बंदरांचा विकास – कार्याची प्रगति – रेल्वे-मार्ग – विमानमार्ग – स्टेट ट्रान्स्पोर्ट कॉर्पोरेशन.

शिक्षण

मूलोद्योग शिक्षणावर भर – माध्यमिक शाळांचें रूपांतर – तांत्रिक शिक्षण – विविध कार्यकारी शाळांची वाढ – नवबौद्धांना सवलती.

आरोग्य

क्षयरोग्यांसाठीं मोफत उपचार – देशी उपचारपद्धतीचा विकास – मलेरियाचें निर्मूलन – कुटुंबनियोजन – प्रशिक्षण कार्यक्रम – नर्सिंग कॉलेज – कुष्ठरोग नियंत्रण – जन्ममृत्यू-च्या नोंदी – पाणीपुरवठा योजना – पोषण – हाफ्कीन इन्स्टिट्यूटमधील कार्य.

समाज कल्याण योजना

भिकाऱ्यांचा प्रश्न – समाज कल्याण विस्तार प्रकल्प – बालमार्गदर्शन केंद्रें – अपंगांसाठीं कल्याण कार्य – सांस्कृतिक संस्थांना मदत – अनेक अडचणी – जोराचा प्रचार – शैक्षणिक सवलती – दारुबंदीचे फायदे – घरबांधणी – बांधकामाची प्रगति – औद्योगिक कामगारांसाठीं घरें – अल्पमिळकतीच्या लोकांसाठीं घरबांधणी योजना – मध्यम उत्पन्नाच्या लोकांसाठीं घरें – जमीन विकास – झोपड्यांत राहणाऱ्या लोकांसाठीं योजना – प्रश्नांची सोडवणूक.

सहकारी चळवळ

ग्रामीण पत – दीर्घ मुदतीची आर्थिक मदत – मार्केटिंग आणि प्रोसेसिंग सोसायट्या – धान्याचें वांटप – नियंत्रित मार्केट – सहकारी साखर कारखाने – सहकारी शेती – सहकारी पाणीपुरवठा संस्था – दूध पुरवठा आणि मच्छीमारी – मागासलेल्या वर्गासाठीं कल्याणकारी योजना – नागरी बँका आणि गृहनिर्माण – सेवा सहकारी संस्था – जिल्हा

बँका – सहकारी शिक्षण – औद्योगिक सहकारी संस्था – खादी आणि ग्रामोद्योग – हातमागाचा धंदा – जंगल कामगार सहकारी संस्था – कुटिरोद्योग आणि ग्रामोद्योग.

आर्थिक पाहाणी

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मूलाधार – समृद्धीचा मूलमंत्र – सहकार व बँका – पाटबंधारे व विद्युत् – उद्योगधंदे – जंगलें व. खजिनसंपत्ति – दळणवळण व वाहातूक – रोजगाराच्या सोयी – योजनेची प्रगति.

प्रेक्षणीय स्थळें

प्रसिद्ध स्मृतिचिन्ह – प्राचीन स्मारकांचा वारसा – जातककथांतील दृश्यें – ब्राह्मणकाळांतील पुनरुत्थानाचे अवशेष – ज्योतिर्लिंगें – ऐतिहासिक अवशेष – भारताचें प्रवेशद्वार – संत्र्यांचें शहर – सफरींना उत्तेजन – थंड हवेचीं ठिकाणे – सुटींतील विश्रामस्थानें.

नैसर्गिक रचना

द्वीपकल्पाकृति भारतामध्यें महाराष्ट्र राज्यानें मोठा भाग व्यापला असून पश्चिमेस त्यास समुद्रकिनारा लाभला आहे. हें राज्य २२·१ आणि १६·४ उत्तर अक्षांश आणि ७२·६ आणि ८०·९ पूर्व रेखांश यांमध्यें वसलें आहे. राज्याच्या सीमा अशा आहेत–पश्चिमेस अरबी समुद्र; वायव्य दिशेस गुजरात; उत्तरेस मध्य प्रदेश; आग्नेय दिशेस आंध्र प्रदेश; आणि दक्षिणेस म्हैसूर आणि गोवा. राज्याचें एकूण क्षेत्रफळ १,१८,४५९ चौरस मैल आहे, म्हणजेच भारताच्या क्षेत्रफळाच्या १० टक्क्यांपेक्षां थोडें जास्त आहे. ऐतिहासिकदृष्ट्या पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा हे राज्याचे तीन घटक आहेत. राज्यकारभारासाठीं हें राज्य २६ जिल्ह्यांमध्यें विभागलें आहे: पश्चिम खानदेश, पूर्व खानदेश, नासिक, अहमदनगर, पुणें, उत्तर सातारा, दक्षिण सातारा, सोलापूर, कोल्हापूर, ठाणें, कुलाबा, रत्नागिरी आणि मुंबई उपनगर (पश्चिम महाराष्ट्र); नागपूर, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, बुलढाणा, चांदा आणि भंडारा (विदर्भ); औरंगाबाद, परभणी, बीड, उस्मानाबाद आणि नांदेड (मराठवाडा).

दख्खनचा प्रदेश

महाराष्ट्र प्रदेशाची नैसर्गिक रचना अतिशय चित्तवेधक आणि अभ्यसनीय आहे. भूगर्भशास्त्रज्ञांच्या मतें ७ कोटी वर्षांपूर्वी जवळजवळ सपाट असलेल्या ह्या प्रदेशांतील जमिनींत भेगा पडल्या आणि त्यामधून उकळता ज्वालामुखी रस बाहेर पडला आणि तो २ लक्ष चौ. मैल क्षेत्रावर पसरला. रसाचा पहिला थर थंड होऊन जमिनीवर स्थिरावत नाहीं तोंच उकळत्या रसाची दुसरी लाट येई. अशा तऱ्हेनें लाव्हा रसाचे थरावर थर बसत जाऊन जो प्रदेश निर्माण झाला त्यालाच दख्खन लाव्हा किंवा दख्खनचा प्रदेश म्हणतात. ह्या प्रदेशांत दिसणारे मोठमोठे खडक हे ज्वालामुखीचा उकळता

रस घट्ट झाल्यामुळें, रसाच्या वरच्या थरामुळें व राखेमुळें आणि जमीन दबल्यामुळें निर्माण झाले आहेत. सर्वसाधारणपणें दख्खनचा हा प्रदेश २,००० ते ५,००० फूटांपर्यंत जाड असून त्याचे हें एकसंध स्वरूप खालीं १०,००० फूटांपर्यंत तसेंच आहे. दख्खन लाव्हाचें टोकावरील परिणत रूप पश्चिम घाटामध्यें दिसून येतें.

कोंकण विभाग

सह्याद्रि म्हणजे पश्चिम घाटाच्या रांगा पश्चिम किनाऱ्याच्या अगदीं लगत असून त्याशीं समांतर आहेत. समुद्र आणि पर्वताच्या रांगांमध्यें जमिनीची एक अरुंद पट्टी असून तिची रुंदी जास्तींत जास्त ६० मैल इतकी आहे.

दमण ते वेंगुर्ल्यापर्यंतची ही ३५० मैल लांबीची अरुंद पट्टी म्हणजे कोंकण. कडे आणि खोरीं यांमुळें निर्माण झालेल्या टेकड्या आणि शिखरें मोठीं विलोभनीय आहेत. समुद्र आणि पर्वत ह्यांच्या दरम्यान कोंकणचा प्रदेश असल्यामुळें तेथें घाटावरील आणि समुद्रकिनाऱ्याच्या प्रदेशांतील हवा-मानाचा मिलाफ झाल्याचें दिसून येतें. येथील हवामान अतिशय दमट असून पावसाचें प्रमाण फार आहे. ह्या भागांतील नद्या आणि उपनद्यांना पावसाळ्यांत पूर येत असला तरी इतर वेळीं त्या कोरड्या राहतात. हा भाग डोंगराळ असल्यामुळें येथील जमीन उंचसखल असून सुपीक नाहीं. ही जमीन भात-लागवडीसाठीं योग्य आहे. परंतु खोऱ्यांत दडून बसलेल्या जमिनींत आणि डोंगराच्या उतारावरच भातशेती करतां येते. डोंगरावरील हिरव्यागार वनश्रीमुळें मात्र कोंकणाला निसर्गसौंदर्य प्राप्त झालें आहे.

उत्तर कोंकणांत किनाऱ्यालगत जो सपाट जमिनीचा पट्टा तयार झाला आहे तो उल्हास आणि वैतरणा नदीच्या प्रवाहाबरोबर वाहून आलेल्या गाळाचा आहे. हा पट्टा १० मैलांपेक्षां अधिक रुंद नाहीं. त्याच्या एका बाजूस टेकड्यांच्या रांगा आहेत. घाट आणि माथेरानच्या मध्यें, उल्हास नदी आणि तिच्या उपनद्यांमुळें, दीर्घ वर्तुळाकार भू-प्रदेश निर्माण झाला आहे. मुंबईच्या दक्षिणेस हें स्वरूप बदलतें. वाशिष्ठी आणि सावित्री नद्यांमुळें दीर्घवर्तुळाकृति प्रदेश निर्माण झाला असला तरी येथें नद्यांची लांबी लहान असून त्या आडव्या वाहतात. समुद्रकिनाऱ्यावर रेवस, हर्णै, दाभोळ, रत्नागिरी आणि वेंगुर्लें यांसारखीं जुनीं बंदरें आहेत.

सह्याद्रीच्या पूर्वेस लांबपर्यंत पसरलेल्या पठारांत सह्याद्रींत उगम पावलेल्या नद्या पूर्वेकडे वाहत जातात. उत्तरेस सातपुड्याच्या रांगा असून त्या पूर्व-पश्चिम एका रेषेंत पसरल्या आहेत. सह्याद्रि आणि सातपुड्याचे डोंगर उत्तर-दक्षिण आणि पूर्व-पश्चिम पसरलेले आहेत आणि शेवटीं त्यांचा मिलाप प. खानदेशच्या वायव्येस होतो. ह्या दोन पर्वतांमधील विस्तृत प्रदेशास दख्खनचें पठार म्हणतात. पर्वताच्या आडव्या आणि उभ्या रांगा पाहिल्यावर, रहदारी-नियंत्रणासाठीं रस्त्यावर हात लांब करून उभ्या असणाऱ्या पोलीसाची आठवण आल्याशिवाय राहात नाहीं. सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून पूर्वपश्चिम अनेक छोट्यामोठ्या रांगा पसरल्या आहेत. नासिकच्या उत्तरेस आणि बालाघाटपर्यंत पसरलेल्या सातमाळाच्या रांगा आहेत. बालाघाटाच्या रांगा विदर्भ आणि मराठवाड्याच्या पूर्वेकडील

सीमेपर्यंत पसरल्या आहेत. नासिकच्या दक्षिणेस पसरलेल्या आडव्या रांगा फारच लहान असून कमी महत्त्वाच्या आहेत.

तापीचा प्रदेश

दख्खनच्या पठाराची कल्पना नद्यांच्या विस्तृत खोऱ्यांमुळें येईल. उत्तरेस सातपुडा आणि दक्षिणेस बालाघाट ह्यांमधील प्रदेशास तापीचा प्रदेश म्हणतात. तापीचें खोरें दख्खन आणि मध्य हिंदुस्थान ह्यांच्यामधलें अवस्थांतर होय. तापी नदी सातपुड्याच्या डोंगरांत उगम पावते आणि पश्चिमेकडे वाहात जाते. तिच्या वरच्या अंगास पूर्णा नदी तिला येऊन मिळते. तापीचें खोरें विदर्भाचा पश्चिम भाग आणि खानदेशाचे दोन जिल्हे मिळून झालें आहे. तापीच्या खोऱ्यांतील जमीन काळी कपाशीची असून अत्यंत सुपीक आहे.

आणखी पुढें पूर्वेस वैनगंगा आणि वर्धा नदीचें खोरें असून त्यांतील भूरचना अगदीं वेगळी आहे. वर्धा नदी ही दख्खनच्या पठाराची पूर्वेकडील सीमा आहे. वर्धा आणि वैनगंगा ह्या नद्या गोदावरीला मिळण्यापूर्वी आग्नेय दिशेनें वाहात जातात. या प्रदेशांत पुष्कळ तळीं असून त्यांपैकीं बरींच मानवनिर्मित आहेत. ह्या तलावांमुळें प्रदेशाच्या सौंदर्यांत भर पडली आहे. ही जमीन उंचसखल असल्यामुळें सखल भागांत बांध घालण्यांत आले आहेत व तलावांचें पाणी पाटबंधाऱ्या-करितां उपयोगांत आणण्यांत आलें आहे. ह्या भागांत पाऊस पुष्कळ पडतो व त्यामुळें तळ्यांत पाणी पुष्कळ सांचतें. या पाणीपुरवठ्यामुळें या भागांतील शेतें व जंगलें वर्षांतील बराच काळ हिरवींगार असतात. महाराष्ट्राच्या पूर्व सीमेवरील हा भूप्रदेश हिरव्या वनराजींतून बहरलेल्या तांबड्या-भडक पळसाच्या फुलांनीं अतिशय शोभिवंत झाला आहे.

विस्तीर्ण त्रिकोणी पठार

सह्याद्रि पर्वताची मुख्य रांग (उत्तर–दक्षिण) व बालाघाट डोंगर (पूर्व–पश्चिम) ह्यांमुळें एक मोठें त्रिकोणाकृति पठार तयार झालें असून, त्यानें पश्चिम महाराष्ट्राचे सात जिल्हे व संपूर्ण मराठवाडा व्यापला आहे. या भागांत गोदावरी, भीमा व कृष्णा या तीन मुख्य नद्या वाहतात. बालाघाट डोंगराच्या दक्षिणेस नासिक ते नांदेडपर्यंत गोदावरीचें खोरें असून या भागांतच मराठी संस्कृतीचा उदय झाला. ब्रह्मगिरी पर्वतांतून त्र्यंबकेश्वराजवळ गोदावरीचा उगम होतो. त्र्यंबकेश्वर हें बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक ज्योतिर्लिंग आहे. त्र्यंबकेश्वरपासून पंधरा मैल अंतरावर नासिक शहर आहे. नासिक हें गोदावरीच्या तीरावर वसलें असून तें हिंदु लोकांचें एक पवित्र क्षेत्र आहे. मराठ-वाड्यांतील पैठण हें एके काळीं शिक्षणाचें व संस्कृतीचें केंद्र समजलें जात होतें. त्या पलीकडे पूर्वेकडील भागांत नांदेड हें गांव आहे. तेथें गोदावरीच्या तीरावर शीखांचें सुप्रसिद्ध गुरुद्वार आहे.

नासिक व पुणें जिल्ह्यांच्या मध्यें असलेल्या अहमदनगरच्या मोठ्या पठारामुळें ‘देशा’चे दोन भाग झाले आहेत. गोदावरीचें खोरें व कृष्णा नदीचें खोरें हे ते दोन भाग होत. गोदावरीच्या खोऱ्याला वर्धा व वैनगंगा या नद्यांचें खोरें जोडलें गेलें असून या नद्या त्या भागांत वाहतात. हा भाग म्हणजे महाराष्ट्राचें प्रमुख केंद्रच होय. दक्षिणेकडचें कृष्णा नदीचें खोरें ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचें असून महाराष्ट्राची ती बलिष्ठ भुजाच होय. उत्तर व दक्षिण सातारा, सोलापूर व कोल्हापूर या जिल्ह्यांचा या भागांत समावेश होतो. या भागांतील चपळ घोड्यांची फार ख्याति आहे. या भागां-

तील शूर लोकांनीं या घोड्यांच्या साहाय्यानें भारताच्या उत्तरेकडे अटकपर्यंत स्वारी केली होती. कृष्णा नदीच्या खोऱ्यांतील कांहीं भागांत सुपीकतेचें प्रमाण फारच कमी असून कांहीं भाग तर नापीक व दुष्काळी परिस्थितीचा आहे.

कमीअधिक पर्जन्यमान

राज्यांतील निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या प्रमाणांत पाऊस पडतो. घाट आणि ठाणें, कुलाबा व रत्नागिरी या किनाऱ्यालगतच्या जिल्ह्यांत फार जास्त प्रमाणांत पाऊस पडतो. घाटावरील कांहीं भागांत १२० इंचांपेक्षां जास्त पाऊस पडतो. या भागांत पावसाची वार्षिक सरासरी ८० इंच आहे. राज्यांतील बहुतांश इतर भागांत पावसाचें प्रमाण फार कमी आहे. त्या भागांत २५ ते ३० इंचांच्या दरम्यान पाऊस पडतो, तर त्यांपैकीं कांहीं भागांत पावसाचें प्रमाण २० इंचांपेक्षांही कमी आहे. या भागांत, 'देशां'तील नासिक, पुणें, अहमदनगर, पश्चिम खानदेश, पूर्व खानदेश, उत्तर सातारा, दक्षिण सातारा, सोलपूर हे जिल्हे व कोल्हापूर जिल्ह्याच्या कांहीं भागाचा समावेश होतो. मराठवाड्यांतील जिल्ह्यांमध्यें ३० ते ४० इंचांच्या दरम्यान पाऊस पडतो. पावसाच्या प्रमाणांत फरक कसा पडतो याचें एक उदाहरण म्हणजे महाबळेश्वर येथें १५० इंच पाऊस पडतो, तर तेथून केवळ वीस मैलांवर घाटाच्या पायथ्याशीं असलेल्या वाई या ठिकाणीं फक्त ३० इंच पाऊस पडतो.

पूर्णा व वैनगंगा नद्यांच्या खोऱ्यांत भंडारा, चांदा व नागपूर या जिल्ह्यांचा समावेश आहे. बंगालच्या उपसागराकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळें या भागांत ४० इंचांपेक्षां जास्त पाऊस पडतो, तर अकोला येथें ३१ इंच पाऊस पडतो. चांदा येथील जंगल विभागाकडे पावसाचें प्रमाण वाढत गेलें असून तेथील कांहीं भागांत ६० इंच पाऊस पडतो.

पावसाच्या प्रमाणावर ह्या भागांतील वनसंपत्तीही अवलंबून आहे. मुंबईच्या दक्षिणेस पश्चिम घाटावर, उष्ण कटिबंधांतील नेहमीं हिरवीं असलेलीं जंगलें आढळतात. अंदाजें १२० इंच पावसाचें प्रमाण असून जेथें पावसांत कांहीं काळच खंड पडतो अशा भागांत हीं जंगलें बरींच वाढतात. या जंगलांत पुष्कळ प्रकारचीं झाडें आहेत. हीं जंगलें दाट असून येथील वृक्ष उंच असतात.

घाटावरील उष्ण कटिबंधांतील नेहमीं हिरव्या असलेल्या या जंगलांच्या आजूबाजूला साधारण हिरवीं जंगलें पसरलेलीं आहेत. त्या भागांतील कोंकणच्या प्रदेशांत नारळी व बांबू विपुल प्रमाणांत आढळतात. घाटाच्या पूर्वेकडील भागास हीं जंगलें पानझडीचीं (डेसिड्युअस) होत गेलीं आहेत.

पानझडीचीं व कांटेरी झाडांचीं जंगलें

पश्चिम घाटापलीकडील लांब पट्ट्यावर दमट, पानझडीचीं जंगलें आहेत. या जंगलांच्या बाबतींत पानें गळण्याचा अवधि सहा ते आठ आठवडेपर्यंत असतो व वृक्षांच्या जातीप्रमाणें हा अवधि कमीअधिक होत जातो. म्हणून हीं जंगलें क्वचितच पर्णहीन स्थितींत आढळतात. उन्हाळ्यांतील एप्रिल व मे हे महिने सोडून बाकी सर्व काळ झाडेंझुडपें हिरवीं असतात. दमट पानझडीच्या जंगलांच्या जागीं पुढें कोरडी पानझडींचीं जंगलें दिसूं लागतात व त्यांचा एक विस्तृत मध्यवर्ती पट्टा तयार

होतो. या दोन्ही भागांतील हवामान जवळपास सारखेंच असतें. फरक इतकाच कीं, पहिल्या प्रकारच्या जंगलांत दमटपणा अधिक काळ टिकतो, तर दुसऱ्या प्रकारच्या जंगलांच्या बाबतींत तो कमी काळ राहतो.

कोरड्या पानझडीच्या पट्ट्यापलीकडे कांटेरी झाडांचीं जंगलें आहेत. महाराष्ट्राच्या पूर्वप्रदेशामधील मोठा भाग या कांटेरी झाडांच्या जंगलांनीं व्यापला आहे. ३० इंचांपेक्षां कमी पाऊस असलेल्या भागांत हीं जंगलें आहेत. येथील झाडेंझुडुपें खुरटीं असलेलीं आढळतात. झाडांची उंची कमी असून जंगल विरळ झालेलें आढळून येतें. तसेंच येथें झाडें विखुरलेलीं दिसतात. मुख्यतः बाभुळ व खैर या जातींचीं झाडें येथें सांपडतात. या भागांत गुरें, बकऱ्या व मेंढ्या चरण्यासाठीं येत असल्यामुळें येथील जंगलांची वाढ खुंटली आहे. बाभळीचें लाकूड घरगुती सर्पणासाठीं उपयोगी पडतें आणि खैराच्या लाकडांत रासायनिक गुण सांपडतात व तें उद्योगधंद्यांच्या दृष्टीनें उपयुक्त असतें.

येथें चांदा जिल्ह्यांतील जंगलांचा विशेषेंकरून उल्लेख केला पाहिजे. हें जंगल घनदाट असून येथें विपुल वनसंपत्ति आहे. या जंगलांत सागवान, बांबू, धावडा, आंजन, हिर्डा, टेंभुर्णी व इतर प्रकारचीं व्यापारीदृष्ट्या व औषधीदृष्ट्या उपयुक्त असलेलीं झाडें आहेत.

मुंबईच्या उत्तरेस समुद्रकिनारा व पश्चिम घाट यांमधील भागांत राज्यांतील उत्कृष्ट कुरणाची जमीन आहे. या भागांत अंदाजें १०० इंच पाऊस पडतो. येथें किनाऱ्यालगतच्या भागांत होणाऱ्या गवतापैकीं मोशी नांवाचें उत्कृष्ट गवत होतें. राज्यामध्यें ज्या भागांत ४० इंचांहून कमी पाऊस पडतो अशा ठिकाणीं मारवेल गवताची निपज होते व असे भाग राज्यांत इतस्ततः विखुरलेले आहेत. कृष्णा नदीच्या किनाऱ्यावर मुख्यत्त्वेंकरून या गवताची निपज चांगल्या प्रमाणांत होते.

लोकजीवन

महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या, १९५१ च्या खानेसुमारीप्रमाणें ३,२०,०३,०८६ म्हणजे सुमारें ३.२० कोटीइतकी म्हणजे भारतीय संघराज्याच्या लोकसंख्येच्या ९ टक्क्यांहून थोडी अधिक आहे. ही लोकसंख्या राज्याच्या २६ जिल्ह्यांमधील २३२ तालुक्यांतील ३५,५२६ खेड्यांमध्यें व ३७३ शहरांत वसलेली आहे. शहर विभागांतील लोकसंख्या २८·८२ टक्के असून भारतीय संघराज्याशीं तुलना करतां हें प्रमाण १७·३४ टक्के आहे. बृहन्मुंबई वजा करतां राज्याच्या इतर शहरांतील लोकसंख्या १९·५४ टक्के आहे.

१९५१ च्या खानेसुमारीप्रमाणें एक लाखाहून अधिक लोकवस्ती असलेलीं सहा शहरें राज्यांत असून तीं पुढीलप्रमाणें आहेत: बृहन्मुंबई, नागपूर, पुणें, सोलापूर, कोल्हापूर आणि अहमदनगर. ५०,००० ते १ लाख लोकवस्ती असलेल्या शहरांची संख्या १५ आहे. ५०० पेक्षां कमी लोकवस्ती असलेल्या गांवांची संख्या २०,०२८ इतकी म्हणजे लोकवस्ती असलेल्या गांवांच्या ५५·७६ टक्के इतकी आहे. भारतीय संघराज्यांतील हेंच प्रमाण ६७·७३ इतकें आहे.

राज्याच्या लोकवस्तीची घनता दर चौरस मैलास २७० इतकी आहे. भारतीय संघराज्यांत हेंच प्रमाण ३०३ आहे. बृहन्मुंबईत ही घनता सर्वांत जास्त असून ती दर चौरस मैलास १६,१०९ आहे. राज्यांतील स्त्रीपुरुषांचें प्रमाण दर १,००० पुरुषांमागें ९४१ स्त्रिया असें आहे. भारतीय संघराज्यांत हेंच प्रमाण १,००० पुरुषांमागें ९४७ स्त्रिया असें आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत स्त्रियांचें प्रमाण जास्त असून, तें दर १,००० पुरुषांमागें १,२२४ स्त्रिया इतकें आहे. बृहन्मुंबईत तें सर्वांत कमी म्हणजे १,००० पुरुषांमागें ६०३ स्त्रिया इतकें आहे.

शेतकरी वर्ग हा लोकसंख्येचा सर्वांत मोठा भाग असून तो एकूण लोकसंख्येच्या ६३·९७ टक्के एवढा आहे. व्यवसायानुसार लोकसंख्येची वांटणी पुढीलप्रमाणें झाली आहे :

प्रकार	महाराष्ट्र राज्य	भारतीय संघराज्य
१. संपूर्णपणें किंवा प्रामुख्यानें जमिनीचे मालक असलेले शेतकरी व त्यांच्यावर अवलंबून असलेले	३९·५८	४६·९१
२. पूर्णपणें अथवा प्रामुख्यानें जमिनीचे मालक नसलेले शेतकरी व त्यांच्यावर अवलंबून असलेले	७·५९	८·८७
३. शेतमजूर व त्यांच्यावर अवलंबून असलेले	१४·७९	१२·५६
४. प्रत्यक्ष जमीन न कसणारे जमीनमालक.	२·०२	१·४९
एकूण : शेतकरी वर्ग	६३·९७	६९·८३
५. उत्पादन (शेतकीशिवाय इतर)	१३·१०	१०·५६
६. व्यापार	६·९९	५·९८
७. वाहतूक	२·२५	१·५८
८. इतर सेवा	१३·६८	१२·०५
एकूण : बिगर शेतकरीवर्ग	३६·०३	३०·१७
एकूण लोकसंख्या	१००·००	१००·००

महाराष्ट्रांतील साक्षरतेचें प्रमाण २०·९६ इतकें असून भारतीय संघराज्यांत हेंच प्रमाण १६·६१ इतकें आहे. साक्षरतेचें सर्वांत जास्त प्रमाण बृहन्मुंबईंत असून तें ४९·३० इतकें आहे. औरंगाबाद विभागांत हें प्रमाण सर्वांत कमी म्हणजे १३·९६ इतकें आहे. उरलेल्या विभागांतील साक्षरतेचें प्रमाण पुढीलप्रमाणें आहे : मुंबई शहर वगळून मुंबई विभाग २०·७१, नागपूर विभाग १९·००, आणि पुणें विभाग १९·३६.

लोकसंख्येची वर्गवारी

लोकसंख्येच्या वर्गवारीवरून असें दिसून येते कीं, महाराष्ट्रांत निरनिराळ्या धर्मांचे व पंथांचे लोक राहतात. त्यामध्यें हिंदु, मुसलमान, ख्रिश्चन, पार्शी, जैन, बौद्ध, शिख आणि लिंगायत या धर्मपंथांच्या लोकांचा समावेश होतो. संख्यामानानें पाहतां हिंदु व मुस्लिम या महाराष्ट्रांतील दोन प्रमुख जमाती असून इतर जमाती कांहीं विशिष्ट भागांत केंद्रित झालेल्या आहेत.

महाराष्ट्रांतील अफाट हिंदु समाज अनेक जाती-पोटजातींनीं बनलेला असून या जाती परंपरागत भेदभावावर आधारलेल्या अशा आहेत. आधुनिक कल्पनांच्या प्रभावामुळें व औद्योगीकरणाची गति वाढल्यामुळें जातीजातींमधील हे भेदभाव हळूहळू नाहींसे होऊं लागले आहेत. समाजसुधारकांच्या अविरत प्रयत्नांमुळें आणि अलीकडील कांहीं वर्षांत सरकारकडून करण्यांत आलेल्या उपाययोजनांमुळें या प्रक्रियेस आणखी गति मिळाली.

हिंदु समाजांत मराठे बहुसंख्य असून ते बव्हंशी शेतकरी आहेत. ते कष्टाळू, कल्पक व काळजीपूर्वक शेती करणारे असून जुन्या परंपरागत कृषिपद्धतिऐवजीं ते हळूहळू शेतकीच्या आधुनिक

तंत्राचा अवलंब करीत आहेत. व्यक्ति म्हणून ते सदैव आनंदी स्वभावाचे व निर्मळ असे आहेत व त्यामुळें त्यांची परकीय लोकांवर छाप पडते. त्यांना प्रदीर्घ अशी लष्करी परंपरा असून त्यांनीं भारताच्या संरक्षण दलांत योग्य तो वांटा उचललेला आहे. एवढेंच नव्हे, तर राज्याच्या पोलीस दलांतहि मुख्यत्वेंकरून त्यांचाच भरणा अधिक आहे. त्यांच्यांत असलेल्या चिवटपणा, काटक वृत्ति व कल्पकता इत्यादि गुणांना वरील दलांत योग्य तो वाव मिळालेला आहे.

वरिष्ठ जातींच्या वर्चस्वाखालीं अनेक शतकें राहिलेल्या अनुसूचित जाती अथवा हरिजन हे आतां जागृत झाले असून त्यांना आपल्या हक्कांची जाणीव झाली आहे. जीवनांतील सुधारणेच्या संपर्कानें व या वर्गाच्या उन्नतीसाठीं म. गांधी व डॉ. भीमराव आंबेडकर ह्यांसारख्या महान् नेत्यांनीं केलेल्या चळवळींमुळें ही जागृति घडून आली आहे. ग्रामीण जीवनांतील बलुत्यांची जुनी पद्धति नष्ट झाल्यामुळें हरिजनांनीं मोठमोठीं गांवें व शहरें यांकडे धांव घेतली व तेथें ते उद्योगधंद्यांतून कामगार म्हणून स्थायिक झाले. यामुळेंच मुंबईच्या कापडगिरण्यांतून हरिजन कामगारांचें प्रमाण जास्त आढळून येतें. 'महार' जमातीचे लोक महाराष्ट्राचे मूळचे रहिवाशी असून ते इतिहासकाळापासून आपल्या लढवय्येपणाबद्दल विशेष प्रसिद्ध आहेत आणि भारताच्या संरक्षक दलांतहि त्यांच्या संख्येचें प्रमाण बरेंच आहे. 'चांभार' ही हरिजनांपैकीं आणखी एक महत्त्वाची जात असून त्यांच्यापैकीं बऱ्याच लोकांनीं आपल्या वंशपरंपरागत कातडी कमाविण्याच्या व चामड्याच्या वस्तु तयार करण्याच्या व्यवसायाला आधुनिक पद्धतींना अनुरूप असें वळण दिलें आहे आणि शहरांतून ते चांगल्या प्रकारें धंदा चालवीत आहेत. कुंभार, मातंग, बुरूड इत्यादि इतर जमाती आजहि आपल्या परंपरागत पद्धतीनें आपली उपजीविका चालवीत असल्याचें दिसतें. अगदीं अलीकडच्या काळांत सहकार्याचें लोण त्यांच्यापर्यंत पोहोंचलें असून या मागासलेल्या जातींतील कारागिरांनीं आपल्या सहकारी संस्था स्थापन केल्या आहेत व त्यांचें कार्य उत्कृष्टरीत्या चालू आहे.

वेगवेगळीं प्रादेशिक वैशिष्ट्यें असलेले ब्राह्मण, कायस्थ व सुशिक्षित मराठे या प्रमुख पुढारलेल्या जाती असून त्यांचा पांढरपेशा वर्गामध्यें समावेश होतो. शिक्षण, वैद्यक, कायदा, स्थापत्य इत्यादि व्यवसायांत त्यांचें प्रमाण बरेंच आहे.

जाती-उपजातींनीं बनलेल्या या समाजाचें जुनें चित्र द्रुतगतीनें बदलत चाललें आहे. शिक्षणाच्या व वहातुकीच्या सतत वाढत्या सोयींमुळें, सर्वांना समान संधि मिळण्याची प्रक्रिया फार जोरांत सुरू झाली असून तिनें बरीच मजल मारली आहे. हिंदु समाजाचें ऐक्य हें आतां दूरचें ध्येय राहिलेलें नाहीं.

इतर जाती

महाराष्ट्रांतील लहानमोठ्या गांवांमध्यें मुस्लिम जमात पसरलेली असून, बहुतांश खेड्यांमध्यें मुसलमान लोकवस्ती बहुधा आढळून येतेच. व्यापारी केंद्र असलेल्या मोठमोठ्या गांवांमध्यें ते व्यापारधंदा, विशेषतः चाकूसुऱ्या व इतर लोखंडी सामानाचा व्यवसाय करतात आणि ग्रामीण भागांत घरगुती उपयोगाच्या लहान लहान वस्तु बनविण्याचा उद्योग करीत असतात. हिंदु आणि मुसलमान हे दोन्ही समाज शतकानुशतकें गुण्यागोविंदानें व शांततेनें महाराष्ट्रांत नांदत आले आहेत, ही गोष्ट दोन्ही समाजांच्या दृष्टीनें भूषणावह आहे.

पारशी समाज हा अतिशय धाडसी आहे. त्यांची वस्ती मुख्यत्त्वेंकरून मुंबई शहरांत फार आहे. पारशी समाजापैकीं कांहीं थोडेबहुत लोक दुसऱ्या लहानमोठ्या शहरांतहि राहतात. ते वरच्या मध्यम

वर्गांत मोडत असून शहरी व्यवसाय करतात. या लहानशा जमातीनें देशाला अनेक नामवंत वकील, डॉक्टर, इंजिनियर पुरविले आहेत आणि याशिवाय भारतीय उद्योगधंद्यांना त्यांनीं फार मोठा हातभार लावला आहे. त्याचा पुरावा म्हणजे टाटा हे होत. पारशी जमातीप्रमाणेंच खिश्चन हेहि बव्हंशीं शहरांतच वस्ती करून आहेत व ते विशेषतः कुशल व तांत्रिक स्वरूपाच्या धंद्यांत काम करतांना आढळतात.

महाराष्ट्रांत वाणिज्य व्यवसाय फार मोठ्या प्रमाणावर गुजराती व मारवाडी करतात, ही एक उल्लेखनीय गोष्ट आहे. दूरवरच्या एखाद्या खेड्यांत सुद्धां कापडाचा व्यापारी हा बहुतेक गुजराती असतो, तर वाण्याचा धंदा हा बहुधा मारवाडी करीत असतो; आणि ते आपले हे व्यवसाय स्थानिक लोकांचा कोणत्याहि प्रकारचा रोष ओढवून न घेतां वर्षानुवर्षें करीत आहेत. ऐतिहासिक दंतकथेनुसार असें सांगण्यांत येतें कीं, महाराष्ट्रीय लोक धंद्याच्या बाबतींत मागासलेले असल्याचें शिवाजी महाराजांना दिसून आलें; म्हणून त्यांनीं महाराष्ट्रांत व्यापार-उद्योगधंदा करण्यासाठीं गुजरात्यांना मुद्दाम बोलावून घेतलें आणि ते स्थानिक जनतेंत संपूर्णपणें समरस होऊन शतकानुशतकें व्यापार करीत आहेत.

महाराष्ट्रांत अनेक आदिवासी जमाती असून त्या दाट जंगलांमध्यें अथवा सह्याद्रि आणि सातपुडा पर्वतांच्या दऱ्याखोऱ्यांतून राहातात. ठाणें व कुलाबा जिल्ह्यांतील आगरी, वारली, कातकरी व ठाकुर, पश्चिम खानदेशांतील भिल्ल आणि विदर्भांतील कोरकू आणि गोंड या कांहीं त्यांच्या प्रमुख जमाती होत. शेजारच्या सुसंस्कृत जगामध्यें मोठमोठे बदल झालेले असले तरी हे आदिवासी अजूनहि पूर्वीप्रमाणेंच पुरातन काळांतील जीवन जगतात. त्यांच्या देवता, त्यांचे सण आणि करमणुकीच्या त्यांच्या पद्धति – विशेषतः त्यांचीं लोकनृत्यें आणि लोकसंगीत – हें सुधारलेल्या लोकांना भुरळ पाडणारें असेंच आहे. परंतु दारिद्र्य व अज्ञानांत खितपत पडल्यामुळें त्यांची स्थिति अतिशय करुणाजनक झाली आहे. या बाबत दुर्दैवाची गोष्ट म्हणजे त्यांच्यांत प्राचीन युगाची जडता इतकी खोलवर रुजली आहे कीं, त्यांच्या जीवनाविषयीं हितकारक अशी एखादी गोष्ट असली तरी ते आपल्या पुरातन तऱ्हा बदलण्यास कांहीं वेळां प्रतिकार करतात. म्हणून, त्यांच्या ग्रामीण संस्कृतीस कसल्याहि प्रकारचा बाध न येतां त्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याबाबत सरकार व सामाजिक कार्यकर्ते प्रयत्न करीत आहेत.

सामाजिक घडण

महाराष्ट्रीय समाजरचनेसंबंधीची एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट अशी कीं, महाराष्ट्रामध्यें अतिशय मोठे उद्योगपति किंवा व्यापारी यांचा वर्ग इतका लहान आहे कीं तो जवळजवळ नाहींच असें म्हणतां येईल. अशा प्रकारें हा समाज मोठ्या प्रमाणांत कामकरी लोकसंख्येचा बनलेला असून त्यामध्यें शेतकरी आणि औद्योगिक कामगार यांचा समावेश होतो. तसेंच, या समाजामध्यें शहरी मध्यमवर्गीयांचा प्रामुख्यानें भरणा असून या वर्गानें महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर बराच मोठा प्रभाव पाडलेला आहे. त्याचप्रमाणें जमिनीसंबंधांतहि विदर्भाशिवाय इतर ठिकाणीं मोठमोठे जमीनदार असे नाहींतच. तसेंच, जमिनीची प्रत्यक्ष कसवट न करणाऱ्या जमीनमालकांचें उच्चाटन करण्यासंबंधीं सरकारनें केलेल्या उपाययोजनांमुळें जमिनीची प्रत्यक्ष वहिवाट करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यांची मालकी मिळत आहे.

गेल्या कांहीं वर्षांतील झालेली महत्त्वाची सुधारणा म्हणजे दक्षिण महाराष्ट्रामध्यें स्थापन झालेले छोट्या व मध्यम प्रमाणावरील उद्योगधंदे हे होत. "महाराष्ट्रांतील औद्योगिक मोहोळ" असें त्यांचें

वर्णन करतां येईल. कोयनेसारख्या जल-विद्युत् योजना पुऱ्या झाल्यावर या उद्योगधंद्यांस आणखी चालना मिळेल. वरील माहितीवरून असें दिसून येईल कीं, महाराष्ट्रांतील अर्थव्यवस्थेंत सहकारी प्रयत्नांना बराच वाव आहे. राज्याच्या ऊंस-उत्पादनक्षेत्रांत स्थापन झालेले अनेक सहकारी साखर कारखाने या गोष्टीचा पुरावाच होत.

सामाजिक व सांस्कृतिक बाजू

उत्तर भारताप्रमाणेंच महाराष्ट्रांतील कुटुंबपद्धति पितृप्रधान आहे. तथापि, महाराष्ट्रांतील स्त्रियांना उत्तर भारतांतल्यापेक्षां अधिक प्रमाणांत स्वातंत्र्य आहे. दक्षिण भारतांत ही गोष्ट सर्व-साधारण अशीच आहे. एवंच, महाराष्ट्रांतील कुटुंबपद्धति ही पितृप्रधान असली तरी कुटुंबामध्यें स्त्रियांचें वर्चस्वहि बरेंच असतें. वस्तुतः माता ही कुटुंबाचें केंद्रस्थान आहे आणि यामुळेंच लोकगीतांमध्यें तिच्यावर अनेक गीतें रचण्यांत आलीं आहेत. महाराष्ट्रामध्यें पडदापद्धति ही कधींच प्रचलित नव्हती. ऐतिहासिक कालांत मुस्लीम राज्यकर्त्यांचें अनुकरण केल्यामुळें सरंजामी सरदार घराण्यांतील देशमुखांनीं तेवढी ही पद्धत चालू केली होती. थोडक्यांत म्हणजे महाराष्ट्रांतील कुटुंबपद्धति ही उत्तरेकडील पितृप्रधानपद्धति आणि दक्षिणेकडील मातृप्रधानपद्धति यांचें संमिश्रण आहे. विशेषतः कामगार वर्गांतील स्त्रियांना उच्चवर्गीय स्त्रियांपेक्षां अधिक स्वातंत्र्य असून त्या शेतांत किंवा कारखान्यांमध्यें पुरुषांच्या बरोबरीनें कामें करतात. मराठे लोकांत व इतर कित्येक जातींत विधवाविवाह प्रचलित आहे. ब्राह्मण व कायस्थ या वर्गांमध्यें विधवा-विवाहाला अगदीं अलीकडच्या काळापर्यंत मान्यता नव्हती. तथापि, आधुनिक शिक्षणाच्या प्रसारामुळें या वर्गांतही आतां विधवाविवाह होऊं लागले आहेत.

महाराष्ट्रांतील मध्यमवर्गीय अथवा बुद्धिमान लोकांनींच पूर्वीपासून संस्कृति व कला यांचें जतन व संवर्धन केलें आहे. याच वर्गानें महाराष्ट्राची ज्ञानसंपत्ति परंपरागत राखून ठेवली व वाढविली. याच वर्गानें एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सामाजिक जागृति निर्माण केली व सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांतील निरनिराळ्या चळवळींत पुढाकार घेऊन महाराष्ट्राला पुढें आणलें. लोकशाहीचा विकास झाल्याकारणानें कला व संस्कृतीच्या बाबतींत मध्यम व कनिष्ठ वर्गांतील लोकांमधील अंतर बरेंच कमी झालें आहे. मध्यमवर्गीय लोकांमधील नाट्यासारख्या विशिष्ट कलांसंबंधीं खालच्या वर्गांतील लोकांना आवड उत्पन्न झाली असून खालच्या वर्गामध्येंच केवळ चालू असलेले तमाशे आतां सुशिक्षित लोकांनाही करमणुकीच्या दृष्टीनें अपरिहार्य वाटूं लागले आहेत.

संतकवींनीं निर्माण केलेलें महान् वाङ्मय हा महाराष्ट्राला मिळालेला फार मोठा सांस्कृतिक वारसा होय. मराठी माणसाच्या मनावर या वाङ्मयाचा गाढ परिणाम झालेला आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम व रामदास हीं नांवें महाराष्ट्रांत घरोघरीं नित्य परिचयाचीं आहेत. आजही महाराष्ट्रांत या ख्यातनाम संतकवींचीं भजनें, टाळ व मृदंगांवर मोठ्या आवडीनें गाइलीं जातात.

महाराष्ट्रीय माणसाला या संतांइतकाच श्रीशिवाजी महाराजांचाही अभिमान आहे. छत्रपति शिवाजी महाराजांबद्दल मराठी माणसाच्या मनांतील भावना सर्वत्र अत्यंत आदराची व ज्वलंत स्वरूपाची आहे. शिवाजी महाराजांनीं मराठी माणसाच्या ठिकाणीं धार्मिक एकतेची भावना जागृत केली व त्याच्यांतील शौर्य व धैर्य जागवून त्याला कार्यप्रवृत्त केलें. श्रीशिवाजी महाराजांचें थोर

नि उदात्त कर्तृत्व मराठी लोकांना नेहमींच स्फूर्ति देत आलें आहे. महाराष्ट्रीय लोक आपल्या मुलाबाळांसमोर श्रीशिवाजींचा आदर्श ठेवतात. शिवाजीमहाराज घोड्यावर बसून शत्रूचा निःपात करीत आहेत, अशा प्रकारचा खेळ या प्रदेशांतील मुलें खेळतात.

उत्सव आणि लोकसाहित्य

उत्सव व लोकसाहित्य यांमध्यें येथील लोकांची संस्कृति स्पष्टपणें दृष्टोत्पत्तीस येते. महाराष्ट्रांत कित्येक उत्सव साजरे करण्यांत येतात. त्यांपैकीं होळी पौर्णिमेचा उत्सव फार मोठ्या उत्साहानें पार पडतो. होळीच्या दिवशीं लोक थट्टा-मस्करी करण्यांत दंग झालेले दिसतात. या दिवशीं नित्याचे व्यवहार बंद असतात आणि वागणूक व बोलण्याचालण्याचे नेहमींचे निर्बंध या दिवसापुरते सैल झालेले असतात. होळीच्या दुसऱ्या दिवशीं धुळवड असते. या दिवशीं मुलें धूळमाती खेळतात व त्यांच्या या खेळापासून कुणालाही स्वतःचा बचाव करणें मोठें कठीण असतें. रंगपंचमीच्या दिवशीं लोक एकमेकांवर रंग टाकतात, पिचकारीनें रंग उडवतात. या दिवशीं तर जो कोणी दिसेल त्याच्यावर कुणीही रंग उडवावा, असा प्रघात आहे. होलिकोत्सव हा वसंत ऋतूचा प्रारंभ होय.

दसरा किंवा विजयादशमी या दिवसाला महाराष्ट्रांत विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. या दिवशीं सीमोल्लंघन करतात. पूर्वी या दिवशीं मराठे वीर दिग्विजयासाठीं म्हणजे मुलुखगिरी करण्यासाठीं बाहेर पडत असत. या दिवशीं आपट्याच्या पानांची बरीच मागणी असते. दसऱ्याच्या दिवशीं या पानांना लोक सोनें समजून तीं पानें एकमेकांना देतात. दसऱ्यानंतर दिवाळीचा सण येतो. दीपावली हा लोकांचा राष्ट्रीय सण समजला जातो. दिवाळी जवळ आली कीं खेड्यांतील कुंभार पणत्या तयार करण्यांत दंग झालेले दिसतात. खेड्यांतील छोट्यामोठ्या प्रत्येक झोपडीसमोर या वेळीं पणत्या उजळलेल्या दिसतील. या सणाच्या दिवसांत अत्यंत गरीब माणूसही आपल्या झोपडीसमोर पणत्या लावून घर सुशोभित करतो. दिवाळीच्या दिवसांत स्त्रिया निरनिराळीं रुचकर पक्वान्नें तयार करण्यांत गर्क असतात व मुलें मौजेनें फटाके उडवतात.

पोळा अथवा ' बैलांचा सण ' हा आणखी एक उत्सव असून या सणांत अनेक लोक भाग घेतात. ह्या दिवशीं बैलांना त्यांच्या नेहमींच्या कामापासून संपूर्ण सुट्टी देण्यांत येते व त्यांना सजविण्यांत येतें. सायंकाळीं खुल्या मैदानावर बैलांची अथवा बैलगाड्यांची शर्यत घेण्यांत येते. गांवच्या पाटलाचा इषारा मिळतांच हे दणकट बैल खुल्या मैदानांत धावत सुटतात. सूंसाट धावणाऱ्या ह्या बैलांना पाहून प्रेक्षकांच्या हृदयांत धडधड सुरू होते. दौड जिंकलेल्या बैलाचा गौरव करण्यांत येतो व त्याची गांवांत मिरवणूक काढण्यांत येते.

भाद्रपद महिन्यांत गणेशोत्सव साजरा करण्यांत येतो. महाराष्ट्रांतील हा एक लोकप्रिय सण असून, बंगालमधील दुर्गापूजेप्रमाणेंच महाराष्ट्रांत गणेशोत्सव सार्वजनिक रीत्या साजरा करण्यांत येतो. गणेशोत्सवाचा सार्वजनिक उत्सव पहिल्या प्रथम लोकमान्य टिळकांनीं सुरू केला. राजकीय दास्यामुळें हतोत्साह झालेल्या लोकांना या सामाजिक उत्सवांत एकत्र येऊन आपल्या समस्यांची चर्चा व विचार करतां आला. हा उत्सव दहा दिवस चालतो. ह्या कालावधींत अनेक प्रकारचे करमणुकीचे कार्यक्रम करण्यांत येतात व ह्या सर्व कार्यक्रमांत लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व लोक मोठ्या उत्साहानें भाग घेतात. अकराव्या दिवशीं मिरवणूक काढण्यांत येऊन गणेशाच्या मूर्तीचें नदींत अथवा समुद्रांत विसर्जन करतात.

गोकुळाष्टमी हा कृष्णाचा जन्मदिवस म्हणून साजरा करण्यांत येतो. ह्या दिवशीं तरुण मंडळी खेळ खेळतात व मौज करतात. कृष्ण हा एक खट्याळ व खोडसाळ मुलगा! गोकुळांतील स्त्रियांच्या त्यानें काढलेल्या खोड्या व त्या स्त्रियांच्या दूध व दहीं–हंड्यांची त्यानें केलेली लूट याबाबत सर्व आबालवृद्धांना अतिशय आकर्षण वाटते. ह्या दिवशीं बाळकृष्णाच्या जीवनांतील ह्या लीलांचे कार्यक्रम सार्वजनिक जागीं करण्यांत येतात. ह्या दिवसांतील विशेष करमणुकीचा कार्यक्रम म्हणजे सार्वजनिक रस्त्यावर उंचावर बांधलेली दहीहंडी फोडण्याचा कसरतीचा कार्यक्रम होय.

भारतांतील इतर भागांप्रमाणें महाराष्ट्रांतही मोहरमचा सण मोठ्या थाटामाटांत साजरा करण्यांत येतो. इस्लाम धर्मांतील थोर व्यक्ती हसन व हुसेन यांच्या स्मरणार्थ मुसलमान लोक हा सण साजरा करतात. हसन व हुसेन यांना हुतात्म्यांचें मरण आलें होतें. ह्या सणाचें वैशिष्ट्य म्हणजे हिंदुलोकहि ह्या सणांत भाग घेतात. उपवास संपतो त्या दिवशीं ताबूत मोठ्या समारंभानें पाण्यांत बुडविण्यांत येतात. ह्या दोन हुतात्म्यांच्या कागदी शवपेट्यांना 'ताझिये' म्हणतात. हिंदुलोक मुसलमान बंधूंबरोबर ह्या दिवशींहि भाग घेतात.

ग्रामीण स्नेहसंमेलनें

'हुरडा' खाण्याच्या कार्यक्रमाचा उल्लेख केल्याशिवाय महाराष्ट्रांतील आमोदप्रमोदाची माहिती पूर्ण होणार नाहीं. हुरडा हे ज्वारीच्या रसरसलेल्या ताज्या भाजलेल्या दाण्यांचें खरपूस खाद्य होय. ज्वारीचें पीक तयार होण्याच्या वेळीं शेतकरी आपल्या नातेवाइकांना व मित्रांना हुरडा खाण्याला बोलावितात. हा कार्यक्रम शेतावरच साजरा करण्यांत येतो. ज्वारीचीं ताजीं हिरवीं कणसें तोडून आगटींत भाजण्यांत येतात व नंतर हातावर मळून ह्या कणसांतील दाणे अलग काढण्यांत येतात. त्यानंतर हे दाणे, चटण्या व दहीं यांसोबत पाहुण्यांना देण्यांत येतात. हुरडा खाण्याच्या निमित्तानें सुगीचा समारंभ म्हणून गांवांतील लोकांचें एक स्नेहसंमेलनच भरतें.

लोकगीतें हा साधारणतः उत्सवांचाच एक भाग आहे. हे आनंदाचे प्रसंग, परंपरागत चालत आलेलीं समूहगीतें गाऊन व नृत्यें करून लोक साजरे करतात. ह्या लोकगीतांपैकीं ओव्या व गवळण हे प्रकार सर्वत्र रूढ असून, हीं गीतें आनंदाच्या प्रसंगीं बहुधा स्त्रिया गातात. ओव्यांमध्यें घरगुती जीवनांतील सुखदुःखांचे सोप्या व सुबोध भाषेंत वर्णन केलेलें असतें. घरांतील बालकाचा जन्म, मातेची आपल्या मुलांवरील ममता, बहिणीचें भावावरील प्रेम, नवविवाहित मुलीची माहेरची ओढ, तिचें पतीवरील लज्जाशील प्रेम आणि नवीन घरांतील जीवनाशीं जुळवून घेण्यामधील अडचणी हे ओव्यांचे विषय असतात. या गीतांचे लेखक अज्ञातच राहिले; पण त्यांचीं हीं गीतें एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत आलीं. त्यांची संख्या हजारांनीं मोजतां येईल. अनेक स्थानिक व प्रादेशिक बोलींमध्यें हीं गीतें रचलेलीं असतात. या गीतांचें साधें सौंदर्य आणि मोहकता यांना मराठी लोकवाङ्मयामध्यें तोड नाहीं. गौळण-गीतें हीं राधेचीं असून तीं कृष्णाच्या खोड्यांसंबंधीचीं, तसेंच गोकुळच्या राजाविषयीं तिच्या प्रेमाबाबतचीं आहेत.

लोकरंजनाच्या प्रकारांत तमाशा हा आपल्या परी एकच! महाराष्ट्राच्या लोककलेंत तमाशाला सर्वश्रेष्ठ स्थान आहे. मराठी मनाला तमाशाविषयीं वाटणाऱ्या आकर्षणाची तुलना नाटकाविषयीं वाटणाऱ्या आकर्षणाबरोबरच करतां येईल. तमाशांत लावण्या, अभिनय आणि नाच हे सर्व प्रकार

एकवटले असतात व ह्या सर्वांना ग्रामीण पार्श्वभूमि असते. तमाशाचे गौरी-गवळण आणि वग असे दोन भाग असतात. पहिल्या भागांत लावण्या आणि नाच असतो, तर दुसऱ्या भागांत कथानकावर आधारलेला विनोदी संवाद असतो. तमाशांतील स्त्री-पुरुष पात्रांची संख्या ६ ते ८ असते. स्त्री नर्तकीच तमाशांतील प्रमुख भूमिकेचें काम करते आणि आपल्या हजरजवाबीपणानें व विनोदानें लोकांना हसविण्याचें काम सोंगाड्या करीत असतो.

लावण्या हीं प्रेमगीतें आहेत, तर पोवाड्यांत मराठी योद्धे आणि सैनिक ह्यांच्या पराक्रमांचीं वर्णनें आहेत आणि तीं डफ आणि तुणतुण्याच्या साथीवर गातात. लोकांत जागृति निर्माण करणें आणि त्यांना कार्यास उद्युक्त करणें हा पूर्वी पोवाड्याचा उद्देश होता. गतेतिहासांतील वीर स्त्रीपुरुषांच्या या पराक्रमगाथा ऐकल्यावर आजहि लोकांत नवचैतन्य निर्माण होतें.

भारूड, ललित आणि गोंधळ हे महाराष्ट्राच्या लोकगीतांचे आणखी कांहीं प्रकार आहेत. भारुडांतून माणसाच्या आध्यात्मिक जीवनाविषयींच्या गोष्टी पद्यांत कथन केलेल्या असतात आणि त्यांत मधूनमधून विनोदहि असतो. ललित हा नाटकाचा ओबडधोबड प्रकार असून त्यांत पौराणिक कथा सांगितलेल्या असतात. गोंधळामध्यें गोंधळी निरनिराळ्या प्रकारचीं गाणीं म्हणतात आणि ह्या गाण्यांतून देवदेवतांची स्तुति आणि पौराणिक गोष्टींचें कथन असतें.

खेळ आणि सामने

महाराष्ट्रांतील ग्रामीण विभागांतून जे सामने आणि खेळ खेळले जातात त्यांत कुस्ती ही, विशेषतः महाराष्ट्राच्या दक्षिण भागांत, सर्वांत लोकप्रिय आहे. प्रत्येक मोठ्या खेड्यांत साधारणपणें एक तरी तालीमखाना असतो. तरुण वर्ग दंड, बैठक व मलखांबाच्या साह्यानें आपलें शरीर कमावतो. कुस्त्यांचे सामने हे खेड्यांतील जत्रांचें एक सर्वांत मोठें आकर्षण असतें. अशा सामन्यांतून सभोंवतालच्या खेड्यांतील तरुण पहेलवान आपली शक्ति अजमावतात. विजेत्यांना बक्षिस म्हणून शेला आणि चांदीचें कडें देण्यांत येतें. अशा तऱ्हेनें ते आपल्या गांवाचा आणि आपला नांवलौकिक वाढवितात.

हुतुतू (उत्तरेंत ह्यास कबड्डी म्हणतात), आट्यापाट्या, खोखो आणि लेझीम हे सर्वसाधारणपणें पुरुषांचे खेळ आहेत, तर झिम्मा आणि फुगडी हे स्त्रियांचे वेगळे खेळ आहेत. झिम्मा हा एक साधा नाच असून त्यांत पांचसहा मुली भाग घेतात. ह्यांत सर्व मुली उभ्या राहून एक गोल तयार करतात आणि पायांचा लयबद्ध आवाज करीत, टाळ्या वाजवीत, आणि गाणें म्हणत भरभर गोलाकार फिरतात. फुगडी हा दोघी-दोघींनीं मिळून खेळायचा खेळ असून त्यांत एकमेकांचे हात घट्ट गुंफून टांचेवर जोरांत गोल फिरतात.

नवीन नवीन शास्त्रीय शोधांमुळें आणि सुधारणांमुळें जुन्या गोष्टी जाऊन त्यांच्या जागीं नव्या गोष्टी येत आहेत. दळणवळणाच्या साधनांचा झपाट्यानें विकास होत असून राज्यांतील बसगाड्या आतां खेड्यापाड्यांतहि जाऊं लागल्या आहेत. प्रौढ मतदानाद्वारें निर्माण झालेल्या लोकशाहीमुळें लोकांच्या जीवनावर परिणाम झाला आहे. विधानमंडळ आणि स्थानिक संस्था ह्यांच्या निवडणुकांमुळें जनतेंत नवीन चैतन्य आणि नवीन आकर्षणें निर्माण झालीं आहेत, जीवनाला नवीन अर्थ आला आहे, नवभारताच्या निर्मितीबरोबरच नवमहाराष्ट्राचीहि निर्मिति होत आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमि

सामाजिक व राजकीय दृष्टया स्वयंपूर्ण घटक या नात्यानें महाराष्ट्राच्या उत्क्रांतीची कहाणी भारताच्या प्राचीन इतिहासांत अतिशय चित्तवेधक ठरणारी आहे. महाभारतांत महाराष्ट्राचा उल्लेख नसला तरी या महाकाव्यांत विदर्भाचा निर्देश अनेक प्रसंगीं आलेला आहे व त्यावरून असें दिसून येतें कीं, दक्षिणेकडे जात असतांना आर्य लोकांनीं प्रथमतः या भागांत वास्तव्य केलें. अशा प्रकारें महाराष्ट्राच्या इतर भागांपेक्षां विदर्भाचा भूतकाळ बराच प्राचीन आहे. या महाकाव्यांतील प्रमुख पौराणिक स्त्रियांमध्यें बऱ्याचशा स्त्रिया विदर्भांतून आलेल्या होत्या. श्रीकृष्णाची पत्नी रुक्मिणी, अजाची पत्नी इंदुमती, नळराजाची पत्नी राणी दमयंती, या सर्व विदर्भांतील राजकन्या होत. त्याचप्रमाणें नाग व आर्य अशांसारख्या देशांतर करणाऱ्या जातींची अपरान्त येथील वसाहतहि फार जुनी होती. या भूप्रदेशाच्या पश्चिमेकडील हा भाग असल्यामुळें त्याला अपरान्त हें नांव पडलें. अपरान्त भागाचाहि उल्लेख महाभारतांत असून तेंच हल्लीचें कोंकण होय. शूर व स्वाभिमानी अशा परशुरामानें अपरान्त भागांत वास्तव्य केलें होतें. या भागांत वसाहत केलेल्या पहिल्या आर्यांपैकीं तो होता. त्या काळच्या उत्तरेंतील राजांबरोबर व क्षत्रियांबरोबर केलेल्या युद्धानंतर तो निवृत्त झाला आणि नंतर तो सध्यांच्या चिपळूणजवळील महेंद्र पर्वतांत राहावयास गेला अशी महाभारतांत कथा आहे. ह्याच कारणामुळें संपूर्ण पश्चिम किनाऱ्याचा उल्लेख प्राचीन ग्रंथांत परशुरामक्षेत्र असाहि करण्यांत आलेला आहे.

राजवाड्यांची भूमिका

या संपूर्ण प्रदेशाला महाराष्ट्र हें नांव कसें पडलें यासंबंधीं इतिहासकार श्री. विश्वनाथ

काशिनाथ राजवाडे यांचें असें मत आहे कीं, प्राचीन हिंदुस्थानांत अनेक राज्यें शेजारीं शेजारीं नांदत होतीं. या राज्यांना 'राष्ट्रें' अथवा 'महाराष्ट्रें' असें म्हणत व हीं नांवें तेथील सत्ताधारी राजांची सत्ता व त्यांच्या अंमलाखालील प्रदेशांचा विस्तार यांवर अवलंबून होतीं. अशा प्रकारें महाराष्ट्राच्या राजाला 'महाराजा' म्हणत व त्याच्या प्रजेला 'महाराष्ट्रिक' या नांवानें संबोधण्यांत येई, तर राष्ट्राच्या राजाला 'राजा' असें म्हणत व त्याच्या प्रजेला 'राष्ट्रिक' या नांवानें ओळखण्यांत येई. महाबलाढ्य अशा मौर्यांचा ज्यावर अंमल होता तें मगध ह्या स्वरूपाचें 'महाराष्ट्र' होतें; या राज्याचा विस्तार उत्तरेकडे हिमालयापर्यंत व दक्षिणेकडे विंध्य पर्वतराजींच्याही पलीकडे होता. संपूर्ण उत्तर हिंदुस्थानाचा भाग जेव्हां बौद्ध मताच्या वर्चस्वाखालीं आला तेव्हां बौद्ध धर्माशीं तादात्म्य पावूं न शकणारे जुन्या वेदमताचे शेंकडो अनुयायी विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडे निघून गेले व आपल्याला अनुकूल अशा भूमींत त्यांनीं वसति केली. परंतु आपल्या नवीन प्रदेशांतही त्यांनीं "महाराष्ट्रिक" हें आपलें जुनें राष्ट्रीयत्व कायम टिकविलें.

तथापि, दक्षिणापथाकडे जाणारे हे एवढेच लोक नव्हते. अशाच प्रकारच्या परिस्थितीमुळें इतरांशीं तादात्म्य न पावूं शकलेले कुरुपांचाळ व विराष्ट्र येथील लोकही दक्षिणेकडे निघून गेले. नवीन प्रदेशामध्यें उत्तर व पश्चिम भागांत महाराष्ट्रिकांनीं वसति केली, तर कुरुपांचाळांतील राष्ट्रिकांनीं व विराष्ट्रांतील वैराष्ट्रिकांनीं अनुक्रमें मध्य व दक्षिण भागांत आपलें वास्तव्य केलें. बाहेरून आलेल्या या लोकांच्या नवीन वसाहतीला त्रिमहाराष्ट्रक या नांवानें संबोधण्यांत येऊं लागलें. तथापि, या तिघांपैकीं महाराष्ट्रिक हेच सर्वांत बलाढ्य होते व कालांतरानें या प्रदेशानें त्यांचेंच म्हणजे महाराष्ट्र हें नांव धारण केलें व येथील लोकांची भाषा "महाराष्ट्री" झाली. तथापि ही महाराष्ट्री जरी मराठीची जननी असली तरी ती मराठी नव्हती हें आपणांला पुढें दिसून येईल.

मूळ रहिवाशांशीं मुकाबला

या नवीन स्थलांतरितांना त्यांच्या या नव्या वसतिस्थानांत कोणाशीं सामना द्यावा लागला? या प्रदेशांत गोंड, भिल्ल, वारली, कोळी, ठाकूर, वध्र, मल्ल, काथोडी, कातकरी इ. मूळ रहिवासी अर्थात् होतेच. डोंगरउतारावरील जंगलांतून या लोकांचें बहुतांशीं वास्तव्य होतें. परंतु फार प्राचीन काळापासून या प्रदेशांत बाहेरून येऊन राहात आलेल्या दुसऱ्या कांहीं कडव्या लोकांशीं या नवीन आलेल्या लोकांना सामना द्यावा लागला. हे लोक फार पूर्वीपासूनच वर्धा, पूर्णा व गोदावरी नद्यांच्या खोऱ्यांमध्यें स्थायिक झालेले होते. वस्तुतः हे नाग लोक असून यांनीं सुधारणेचा एक विशिष्ट दर्जा गांठलेला होता. उत्तरेकडे आर्यांचा राजा जनमेजय यानें त्यांच्याविरुद्ध सतत सत्र सुरू करून त्यांना त्यांच्या उत्तरेंतील भागांतून हांकून लाविलें होतें. अर्थातच महाराष्ट्रिकांपेक्षां नाग लोक सुधारणेच्या कनिष्ठ अवस्थेंत होते. वस्तुतः त्यांची सुधारणा ही मूलतः आदिम स्वरूपाची होती. प्राध्यापक कृ. पां. कुळकर्णी यांनीं नमूद केल्याप्रमाणें इसवी सनापूर्वीच्या सातव्या शतकानंतरच आर्य लोकांनीं दक्षिणेकडे स्थलांतर करण्यास सुरुवात केली. अर्थातच तोंपावेतों नाग लोक या विभागांत दृढपणें स्थायिक झालेले होते. या दोन लोकांचें पूर्ण तादात्म्य होण्यासाठीं सुमारें १,००० वर्षांचा प्रदीर्घ कालावधि लोटावा लागला व नंतरच म्हणजे इसवी सनाच्या सुमारें पांचव्या शतकांत मराठा या नांवानें ओळखण्यांत येणारे

नवीन लोक उदयास आले. त्यांच्या भाषेला मराठी म्हणण्यांत येऊं लागलें. अशा प्रकारें मराठी ही महाराष्ट्री भाषा व नागांची बोलभाषा यांच्या संयोगानें तयार झाली.

तथापि, एवढ्यानेंच हा वृत्तांत संपत नाहीं. ग्रीस व मध्य आशिया यांसारख्या लांबलांबच्या भूभागांतूनही निरनिराळ्या वंशांच्या लोकांचा ओघ या भूमीकडे सतत वहात येत होता. अशा प्रकारें भोज, सात्यपूत, पेठनिक, केवलपुतल, पांड्य इ. लोक उत्तरेंतून आले, तर शक, यवन, ग्रीक आणि नंतरच्या काळांत मोंगल हे बाहेरील देशांतून आले. मराठ्यांच्या भूमीवर व संस्कृतीवर या सर्व गोष्टींचा ठसा उमटला आणि त्यामुळेंच मराठीवर अर्धमागधी, शौरसेनी, महाराष्ट्री, अपभ्रंश, मागधी, पाली व फारसी यांसारख्या निरनिराळ्या भाषांचा निश्चित परिणाम झाल्याचें दिसून येतें. यांपैकीं महाराष्ट्री व अपभ्रंश या भाषांतूनच मराठीचा उद्गम झाला.

निरनिराळे राजवंश

या सुरुवातीच्या काळांत मराठा समाज हा संघटित नव्हता. तो निरनिराळ्या गणांत विखुरलेला असून प्रत्येक गण हा एका सामर्थ्यवान पुरुषाच्या नेतृत्वाखालीं असे. सामर्थ्यवान व्यक्तीकडेच गणाचें नेतृत्व येई. त्याकाळीं महाराष्ट्र (इ. स. पूर्वीं ३२१ ते १८४) हा मौर्य साम्राज्याचा एक भाग होता. सोपारा (सौपार्यम् अथवा शूर्पारक) व चौल (चंपावती) हीं दोन्हीं गांवें मुंबईच्या सरहद्दीवर असून, हीं व्यापाराचीं व बौद्ध तत्त्वज्ञानाचीं केंद्रें होतीं. उत्तरेकडे मौर्य साम्राज्याचा ऱ्हास झाल्यानंतर, महाराष्ट्र हा निरनिराळ्या आक्रमकांच्या अंमलाखालीं आला आणि त्यांची कारकीर्द एकूण अंदाजें १,००० वर्षांची होती. या कारकिर्दींतील स्थित्यंतरें पुढीलप्रमाणें :—

(१) सातवाहन अथवा आंध्रभृत्य यांनीं अदमासें ३०० वर्षें म्हणजे इ. स. च्या दुसऱ्या शतकापर्यंत राज्य केलें. त्यांची राजधानी प्रतिष्ठान (मराठवाड्यांतील पैठण) येथें होती आणि तेच महाराष्ट्रांतील पहिले महाराष्ट्रीय राज्यकर्ते होते. यांचा माळवा येथील क्षात्र राजांनीं पराभव केला.

(२) सातवाहनानंतर इ. स. २४९ पासून त्रैकुटक यांच्याकडे पश्चिम महाराष्ट्राचें राज्य आलें. त्यांनीं स्वतःची कालगणना सुरू केली. त्यांचा उल्लेख कान्हेरी लेण्यांतील शिलालेखांत आलेला आहे.

(३) वाकाटक (इ. स. ३०० ते ६०० पर्यंत) राज्यकर्ते हे फार पराक्रमी होते व त्यांनीं महाराष्ट्रांतील तीनहि भाग आपल्या अमलाखालीं आणले. त्यांची राजधानी विदर्भांत भांदक (चांद्याजवळ) येथें होती. ते कलेचे थोर आश्रयदाते होते व अजंठ्याचीं लेणीं हीं पहिल्या प्रवरसेन वाकाटकाच्या कारकिर्दींत खोदलीं गेलीं. अजंठा येथील १६ व्या लेण्यांत वाकाटक घराण्यांतील सात राजांचीं नांवें कोरलीं आहेत.

(४) कलचुरी घराण्याच्या अल्प कारकिर्दीनंतर, महाराष्ट्रांत चालुक्यांचें राज्य आलें व त्यांनीं इ. स. ७६० पर्यंत सतत राज्य केलें. पुन्हा त्यांनीं इ. स. ९७३ ते ११८० सालापर्यंत राज्य केलें.

(५) मध्यंतरीच्या काळांत म्हणजे इ. स. ९६० ते ९७३ पर्यंत राष्ट्रकुटांनीं राज्य केलें; त्यांची राजधानी मान्यखेट (हैद्राबादनजीक मालखेड) येथें होती आणि त्यानंतर चालुक्यांनीं पुन्हां राज्य परत मिळविलें.

(६) इ. स. ११८९ मध्यें उत्तरकालीन चालुक्यांचा शेवट व देवगिरीच्या (दौलताबाद) यादवांचा उदय झाला. यादवांचें राज्य इ. स. १३०७ पर्यंत टिकलें.

या मध्यवर्ति सत्ता, करवीरचे (कोल्हापूरचे) शिलहार, अपरांताचे भोज (उत्तर कोंकण) व गोमंतकाचे (गोवा) कदंब या मांडलिकांच्या मार्फत सीमालगतच्या प्रदेशांचा कारभार पाहत असत. या सरदारांना जेव्हां जेव्हां संधि मिळे तेव्हां तेव्हां ते मध्यवर्ति सत्ता झिडकारून देत असत व स्वतंत्र राज्यकर्त्यांची भूमिका घेत असत.

संस्कृतीचा बहर

या प्रदेशावरील सत्ता जरी मधूनमधून एका घराण्याच्या हातांतून दुसऱ्या घराण्याच्या हातांत जात राहिली व महाराष्ट्राच्या सीमांमध्यें थोडाफार बदल होत राहिला तरी या प्रदेशांत तुलनात्मकरीत्या बरीच शांतता नांदत होती आणि यामुळें या काळांत महाराष्ट्राच्या संस्कृतीला आणि कलेला मोठाच बहर आला. शालीवाहन, वाकाटक व चालुक्य यांच्या वेळीं सांचे घडविण्याची कला कळसास पोहोंचली होती. या घराण्यांतील कलाप्रिय राज्यकर्त्यांकरवीं सह्याद्रि पर्वतांतील असंख्य लेणीं आणि जगप्रसिद्ध अशीं अजंठा आणि वेरूळ येथील लेणीं कोरण्यांत आलीं.

सुमारें ९ व्या शतकांत जनतेची बोली असलेली मराठी भाषा ही प्रथमच लिखित साहित्याचें माध्यम म्हणून वापरण्यांत आली. महानुभाव पंथाच्या संस्थापकांनीं मराठी भाषेंतील साहित्यनिर्मितीला चालना दिली व १३ व्या शतकांत मुकुंदराज, ज्ञानेश्वर व नामदेव या श्रेष्ठ कवींनीं आपलीं अमर काव्यें लिहून मराठी भाषेला प्रौढत्व प्राप्त करून दिलें. याच काळीं देवगिरीच्या यादवांनीं मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त करून दिला. राजकीय दृष्ट्या, सुद्धां महाराष्ट्राच्या सीमांचा स्पष्ट उल्लेख महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर याचा शिष्य महींद्र व्यास यानें लिहिलेल्या लीळाचरित्रांतील पुढील उताऱ्यावरून होऊं शकेल:—

" साठी लक्ष देश महाराष्ट्र. तेथिचे शिहाणे सुभटूः वेदशास्त्रचातुर्याची पेठूः भरली तिये देशी. ऐसे ते महाराष्ट्रराये सुंदरु : वरी महाराष्ट्रभाषाचतुरु : तेहीं वसविलें गंगातीरु : क्षेत्र त्र्यंबकूवे-हीं : पश्चिमे त्र्यंबकूपूर्वे सागरवे-हीं : द्वादश योजनें उभय गंगातीरीं : ऐसें तें गंगातट महाराष्ट्रीं : वसिजे पुण्यातन. तिये महाराष्ट्रीं गंगातीरी महंतुः तेथ सदां ईश्वरावतारु क्रीडतु. देश म्हणजे खंडमंडळ : जैसें फले- ठाणापासौनि दक्षिणेसि मऱ्हाटी भाषा जेतुलां ठाई वर्ते तें एक मंडळ : तयासि उत्तरे बालेघाटाचा सेवट असें : ऐसें एक खंडमंडळ : मग उभय गंगातीर तेंहि एक खंडमंडळ : आन तयापासौनि मेघकर- घाट तें एक मंडळः तयापासौनि आवघें वराडः तेहि एक मंडळःपर आघवीचि मिळौनि महाराष्ट्रचि बोलिजे."

महत्त्वाच्या घडामोडी

१२९४ सालीं देवगिरीच्या यादवांचा पाडाव झाल्यानंतर महाराष्ट्र मुसलमानी सत्तेखालीं आला व लागोपाठ अनेक मुसलमानी घराण्यांच्या राजवटीखालीं राहिला. यांपैकीं बहामनी घराणें हें पहिलें

असून, त्याची राजधानी गुलबर्गा येथें होती. बहामनी घराण्यांतील अनेक राज्यकर्ते मोठे विद्वान व कला आणि विद्येचे भोक्ते होते. मराठी भाषेबाबत बोलावयाचें झाल्यास बहामनी घराण्याच्या कारकीर्दीत या भाषेच्या बाबतींत एक अतिशय महत्त्वाची घटना घडली. बहामनी न्यायालयांत फारशी भाषेला मानाचें स्थान मिळाल्यानें त्याचा मराठी भाषेवर दूरगामी परिणाम झाला. फारशी भाषेंतील बराचसा शब्दसंग्रह मराठीनें आत्मसात् केला. तथापि मराठींतील वाङ्मयीन कार्य विनाअडथळा चालूच राहिलें व एकनाथ व दासोपंत यांसारख्या अनेक महान् कवींनीं मराठींतील भाषेचा झेंडा अविरत फडकत ठेवला. ह्या कालखंडांतील आणखी एक महत्त्वाची घटना म्हणजे संत भानुदासांनीं विजयनगर येथून विठ्ठलाची मूर्ति परत आणून तिची पंढरपूर येथें पुन्हा प्रतिष्ठापना केली ही होय. तसेंच भानुदासांनीं वारकरी संप्रदायाची स्थापना केली. ह्या संप्रदायानें नंतरच्या काळांत महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनांवर फार मोठा प्रभाव गाजविला.

बहामनी घराण्याची राजवट दोनशें वर्षें म्हणजे १६ व्या शतकाच्या मध्यापर्यंत चालू होती आणि त्यानंतर त्यांची सत्ता विस्कळित होऊन महाराष्ट्राचे तुकडे पडले व विजापूर, गोवळकोंडा, बऱ्हाणपूर, बिदर व अहमदनगर येथें स्वतंत्र राज्यकर्ते राज्य करूं लागले. मराठे सरदारांनीं ह्या राज्यकर्त्यांकडे नोकरी पत्करली. ते वरचेवर एका राजाकडून दुसऱ्या राजाकडे जात व आपल्या मालकांसाठीं अथवा आपापसांत सतत लढाया करीत. याचा परिणाम म्हणजे अनेक वर्षें महाराष्ट्रांत गोंधळ व अराजकता माजली होती. परंतु राष्ट्रांच्या इतिहासांत जसें वारंवार घडतें त्याप्रमाणें ह्या अशांततेच्या पोटींच, अराजकता व गोंधळ नष्ट करून सुव्यवस्था स्थापन करण्यासाठीं आणि राजकीय दृष्ट्या मोडकळीस आलेल्या व सामाजिक दृष्ट्या नष्ट होत चाललेल्या मराठ्यांना एकछत्राखालीं आणण्यासाठीं एका महान् पुरुषाचा जन्म झाला.

छत्रपति शिवाजीमहाराजांचा उदय

छत्रपति शिवाजीमहाराजांचा उदय होण्यापूर्वी महाराष्ट्राचे राजकीय दृष्ट्या तुकडे पडले असले तरी ज्ञानेश्वरांपासून तुकाराम व रामदासांपर्यंतच्या संतकवींनीं स्वदेशीय अथवा परकीय लोकांच्या धार्मिक कडवेपणाला जोरदार विरोध करून सामाजिक व सांस्कृतिक ऐक्य कायम राखलें. यामुळेंच शिवाजीमहाराजांचा मार्ग मोकळा झाला. छत्रपति शिवाजीमहाराज पूर्वीच्या अथवा तत्कालीन राजां-प्रमाणें केवळ एक राजे होते असें नव्हें, तर सध्याच्या कल्पनांप्रमाणेंसुद्धां ते जनतेचे अभिजात नेते होते. त्यांची माता जिजाबाई व गुरु दादाजी कोंडदेव यांनीं त्यांना तशाच रीतीनें तयार केलें होतें. शिवाजीनें मावळे व हेटकरी यांसारख्या सर्वसामान्य जनतेच्या सहाय्यानें मराठी स्वराज्याचें मंदिर उभारलें. त्यांचें अष्टप्रधान मंडळ, देश बळकावून बसलेल्यांविरुद्ध त्यांनीं चालविलेलें धर्मयुद्ध, मुलकी व लष्करी अधिकाऱ्यांकरतां त्यांनीं घालून दिलेले नीतिनियम यावरून त्यांची राज्यव्यवहारपटुताच दिसून येते असें नव्हें तर, लोकसेवेची उच्च ध्येय बाळगणारी त्यांची वृत्ति दिसून येते. या कारभार-विषयक उपाययोजनांद्वारां त्यांना प्रस्थापित करावयाच्या परंपरांत लोकशाहीचीं बीजें होतीं हा दृष्टिकोन सहजासहजीं बाजूस सारतां येणार नाहीं.

पेशव्यांचा अंमल

छत्रपति शिवाजीमहाराजांनंतर मराठी राज्याचीं सूत्रें, कायदेशीर रीत्या नव्हे, पण प्रत्यक्ष व्यवहारांत, हातीं घेणाऱ्या पेशव्यांना शिवाजीमहाराजांच्या राज्यकारभाराच्या प्रगतशील तत्त्वांचें

आकलन झालेलें नव्हतें असें मत बहुधा सर्वच इतिहासकारांनीं व्यक्त केलें आहे. तथापि, पेशव्यांच्या कारकीर्दीतच मराठी सत्तेची झपाट्यानें वाढ झाली. विशेषतः पराक्रमी पहिला बाजीराव आणि त्याचा मुलगा बाळाजी यांच्या कारकीर्दीत तर ही वाढ विशेषच जलद गतीनें झाली. या वेळीं मराठी राज्याच्या सीमा उत्तरेस ग्वाल्हेरपर्यंत व दक्षिणेस तंजावरपर्यंत पोचल्या होत्या. १७६१ सालीं अहंमदशहा अबदाली या अफगाण राजानें पानिपत येथें मराठ्यांचा सपशेल पराभव करून या सत्तेस जबरदस्त तडाखा हाणला. पण तरुण माधवराव पेशव्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाखालीं, मराठ्यांनीं आश्चर्यकारक रीतीनें थोडक्याच काळांत स्वतःला सावरून आपलें गेलेलें स्थान परत मिळविलें. ग्वाल्हेरहून हुकमत चालविणाऱ्या महादजी शिंदे या शूर मुत्सद्द्यामार्फत दिल्लीच्या बादशाहीस नमविलें. पण हें वैभव अल्पकाळच टिकलें; कारण ब्रिटिशांनीं बंगाल, मद्रास आणि खुद्द मुंबईंत आपला जम बसवून हळूहळू आपले हातपाय पसरावयास सुरुवात केली होती. इ. स. १८०० सालीं पेशव्यांचा मुख्य कारभारी आणि त्या काळांतील नामांकित मुत्सद्दी नाना फडणीस याच्या मृत्यूनंतर मराठी स्वराज्याचा जवळजवळ अंत झाला. नाहीं म्हणावयास शेवटचा पेशवा १८१८ सालापर्यंत ब्रिटिशांचें बाहुलें म्हणून राज्य करीत होता.

तुरळक उठाव

१९व्या शतकाच्या पूर्वार्धांत, आपल्या गेलेल्या सत्तेची आठवण अगदीं ताजी असल्यामुळें, मराठ्यांना परकीय राजवटीशीं जुळवून घेणें शक्य झालें नाहीं. त्यामुळें महाराष्ट्रांतील निरनिराळ्या भागांत सन १८४० च्या सुमारास तुरळक उठाव झाले. त्यांचें नेतृत्व उमाजी नाईक, रघू भांगरा, भाऊ खेर, चिमणाजी जाधव व नाना दरबारे यांच्याकडे होतें. बदललेल्या परिस्थितींत ज्यांची परिस्थिति फारच वाईट होती अशा मागासलेल्या जातींतील ते होते. वासुदेव बळवंत फडके यांनीं रांकट रामोश्यांच्या सहाय्यानें किंचित् मोठ्या आणि संघटित स्वरूपांत परकीय राजसत्तेवर प्रहार करण्याचा प्रयत्न केला. तथापि हे सर्व उठाव अयशस्वी ठरले. शक्तिमान राज्यकर्त्यांसमोर त्यांचा टिकाव लागणें शक्य नव्हतें.

रेल्वे, पोस्ट व टेलिग्राफ, वर्तमानपत्रें, छापलेलीं पुस्तकें व शाळाकॉलेजें सुरू झाल्यामुळें ज्ञानाचें नवीन युग सुरू झालें व त्याबरोबर सुशिक्षितांचा एक वर्ग महाराष्ट्रांत निर्माण झाला. ब्रिटिश राज्यकर्त्यांची थोरवी केवळ त्यांच्या लष्करी सामर्थ्यांत नाहीं तर त्याचबरोबर त्यांचे प्रागतिक विचार व औद्योगिक प्रगति हें त्याचें कारण आहे ही गोष्ट या नवीन पिढीनें तावडतोब ओळखली. या आधुनिक विचारसरणीचे महाराष्ट्रांतील पहिले पुरस्कर्ते बाळशास्त्री जांभेकर हे होत. मराठी वृत्तव्यवसायाचे संस्थापक म्हणून ते ओळखले जातात. त्यांनीं 'दर्पण' हें पहिलें मराठी साप्ताहिक व 'दिग्दर्शन' हें पहिलें मराठी मासिक १८३६ मध्यें सुरू केलें आणि सनातनी कर्मठ विचारसरणीला विरोध करून, विधवाविवाहासारख्या सामाजिक सुधारणांचा निर्भयपणें पुरस्कार केला.

सामाजिक सुधारणा

बाळशास्त्री जांभेकरांनीं उजळलेली समाज-सुधारणेची ज्योत लोकहितवादी या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या गोपाळ हरी देशमुख आणि न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांनीं तेवत ठेवली. त्यांनीं पुरोहितवर्गाचा पुराणमतवाद व जुन्यापुराण्या धार्मिक रूढींशी लढा देऊन सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला. पाश्चिमात्य उदारमतवादाच्या ते इतके आहारीं गेलेले होते

कीं, पाश्चात्य कल्पना भारतांत आणणाऱ्या भारतांतील ब्रिटिश राजवटीस ते परमेश्वरी देणगी समजत. तथापि, ब्रिटिश कारभारांतील उणीवा दाखवून देण्यासहि ते कचरले नाहींत. लोकहितवादींनीं १८४८ च्या सुमारास भारतांत कायदे मंडळावर आधारलेल्या लोकशाही सरकारचें चित्र डोळ्यां-पुढें ठेवलें होतें. आपण प्रतिपादलेल्या सामाजिक सुधारणांची न्याय्यता रानडे, नेहमीं प्राचीन धर्मग्रंथांतून साधार दाखवीत.

सुशिक्षित लोकांमध्यें आधुनिक कल्पनांचा लोकहितवादी व रानडे लेख लिहून प्रचार करीत असतां एक व्यक्ति उदयास आली. रूढींचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या पुण्यांतील सनातनी लोकांच्या तीव्र विरोधाला न जुमानतां आपल्या सुधारणावादी कल्पनांप्रमाणें आपलें जीवन व्यतीत करणारी ही व्यक्ति म्हणजे ज्योतिबा फुले हे होत. पुरोहितवर्गाच्या समाजांतील उरलेल्या वर्गावरील धार्मिक वर्चस्वामुळें निर्माण झालेल्या सामाजिक विषमतेविरुद्ध त्यांनीं हल्ला केला. शंभर वर्षांपूर्वी जेव्हां स्त्रियांना स्वातंत्र्य देणें व हरिजनांबरोबर समाजांत मिसळणें हें समाजविघातक व पावित्र्याची विटंबना करणारें कृत्य मानण्यांत येत असे तेव्हां मुलींसाठीं अथवा हरिजनांसाठीं शाळा सुरू करणें हा केवढा मोठा गुन्हा आहे ह्याची आपणांस कल्पना करतां येईल. परंतु ज्योतिबांनीं हें कार्य केलें व त्याचे परिणामहि भोगले. त्यांनीं अवनत स्त्रियांसाठीं आपल्या घरीं एक प्रसूतिगृह सुरू केलें. ज्योतीबांना त्यांच्या ह्या कार्यांत प्रामुख्यानें त्यांच्या पत्नीची मदत होत असे. त्यांच्या पत्नी मुलींची शाळाहि चालवीत असत व त्याबद्दल पुण्यांतील रस्त्यांवर त्यांच्यावर दगडफेक करण्यांत आली. कोणत्याहि प्रसंगीं आलेल्या विरोधांना न भितां ज्योतिबांनीं आपलें सामाजिक सुधारणेचें कार्य चालू ठेवलें. कारण त्यांना माहीत होतें कीं भावी काल आपल्याबरोबरच आहे.

आगरकरांचा बुद्धिवादी दृष्टिकोन

सामाजिक सुधारणेच्या अजूनहि अमूर्त स्वरूपांत असलेल्या कल्पना व आदर्श, महाराष्ट्रांतील थोर समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांनीं स्पष्ट व तर्कशुद्ध पद्धतीनें मांडले. आगरकरांचा दृष्टिकोन मूलतःच बुद्धिवादी होता. जातीयता, लोकभ्रम, अर्थहीन धार्मिक आचार व जुनाट व बुरसटलेले धार्मिक विचार, म्हणजे थोडक्यांत हिंदु समाजाच्या प्रगतीच्या आड जें जें येईल त्या त्या विरुद्ध त्यांनीं हल्ला चढविला व विधवाविवाह, हरिजनोद्धार, स्त्रीस्वातंत्र्य, आधुनिक शास्त्रीय शिक्षण इत्यादींचा पुरस्कार केला. व्यक्तीची प्रतिष्ठा वाढविणें हें त्यांचें ध्येय होतें. त्यांचा संपूर्ण दृष्टिकोनच इतका प्रगतीशील होता कीं त्यांनीं आपल्या एका लेखांत आज आपण जिला समाजवादी पद्धतीची समाजरचना म्हणतों तिचा पाठपुरावा केला आहे. आगरकरांनीं जॉन स्टुअर्ट मिल व हर्बर्ट स्पेन्सर यांच्यासारख्या उदारमतवादी विचारवंतांकडून स्फूर्ति घेतली. इतर समाजसुधारक आगरकरांनाहि त्यांच्या शिकवणुकीबद्दल समाजाचा उपहास व रोष सहन करावा लागला. इतकेंच नव्हें तर आपल्या विरोधकांकडून स्वतःची प्रेतयात्रा काढलेलीहि त्यांना पहावी लागली.

अशा तऱ्हेनें समाजसुधारकांना एका दिशेनें नेण्याचा प्रयत्न करीत असतां एक नवीन विचार-प्रवाह निर्माण होऊन भारताच्या प्राचीन वैभवाचें दिग्दर्शन करून लोकांना उलट दिशेनें नेण्याचेहि प्रयत्न होऊं लागले. विष्णु कृष्ण चिपळूणकर हे या विचारप्रवाहाचे स्फूर्तिदाते होते. त्यांनीं ब्रिटीश राजवट ही परमेश्वराची देणगी समजण्याऱ्या कल्पनेविरुद्ध जोरदार हल्ला चढविला. चिपळूणकर हे आधुनिक मराठी गद्याचे जनक समजले जातात. मराठी भाषेचे शिवाजी असें म्हणवून घेण्यास त्यांना सार्थ अभिमान वाटे. आपली महान् वाङ्मयीन प्रतिभा त्यांनीं लोकांमध्यें देशभक्तीची भावना निर्माण

करण्यांत खर्च केली. ब्रिटीश राजकर्त्यांच्या सामर्थ्यामुळें भयभीत झालेल्या लोकांना त्यांचें इतिहासकालीन वैभव आणि भारताची प्राचीन संस्कृति यांची त्यांनीं आठवण करून दिली. तसेंच, भारताची प्राचीन संस्कृति ही पाश्चात्य संस्कृतीपेक्षां बऱ्याच बाबतींत अधिक श्रेष्ठ दर्जाची असून शतकानुशतकांच्या अयोग्य नेतृत्वामुळेंच भारतीय संस्कृतीची हेळसांड झाली व त्यामुळेंच हिंदुस्थानाला अवनत दशा प्राप्त झाली, असेंहि मत त्यांनीं प्रतिपादन केलें. चिपळूणकरांच्या विचारप्रणालीला लोकमान्य टिळकांनीं मोठ्या प्रमाणावर पाठिंबा दिला.

ऐतिहासिकदृष्ट्या हे दोन मतप्रवाह जरी एकमेकांना खंडित करणारे असे त्याकाळीं भासले, तरी वस्तुतः ते, आधुनिक महाराष्ट्राचें स्वरूप घडविण्यास पूरक असेच ठरले. चिपळूणकरांच्या विचारप्रणालीच्या लोकांनीं स्वाभिमान आणि देशभक्ति यांवर जोर देऊन मराठी लोकांच्या परकियांच्या श्रेष्ठत्वाविषयींच्या कल्पना दूर केल्या, तर समाजसुधारकांनीं त्यांना बुद्धिवादी दृष्टिकोन दिला.

टिळकांच्या युगांत

फक्त महाराष्ट्राच्याच नव्हे तर सबंध भारताच्या राजकारणांत १८९० ते १९२० हा काळ 'टिळक युग' म्हणून संबोधण्यांत येतो. लोकमान्यांनीं ब्रिटीश राजवटीविरुद्ध अगदीं अखेरच्या क्षणांपर्यंत जो लढा दिला, तो भारताच्या स्वातंत्र्यमुक्तीच्या इतिहासांत एक गौरवशाली असेंच पर्व आहे. आपल्या समकालीन लोकांपेक्षां टिळक हे अनेक दृष्टींनीं अतिशय श्रेष्ठ होते. तरी महाराष्ट्राच्या या घडामोडीच्या काळांत अनेक मतप्रवाह होते. गोपाळ कृष्ण गोखले यांच्यासारख्या महान व्यक्तींच्या नेतृत्वाखालील नेमस्तवाद्यांनीं वरच्या वर्गातील सुशिक्षित लोकांवर अधिक प्रभाव पाडला, तर जहाल पक्षाचें नेतृत्व करणाऱ्या टिळकांनीं खालच्या वर्गातील म्हणजे शेतकरी-कामकरी वर्गाचा पाठिंबा मिळविला. अगदीं पराकोटीला श्री. वि. दा. सावरकरांच्या नेतृत्वाखालील उतावळ्या युवकांनीं, परकीय सत्तेचा शीघ्रतेनें शेवट करण्यासाठीं म्हणून क्रांतिकारी राजकारणाचा मार्ग अनुसरला. तथापि, या काळांतील टिळक व गोखले यांच्यासारख्या महान पुरुषांनीं अनेक संस्था नि चळवळी यांच्या द्वारें महाराष्ट्राच्या सामाजिक तसेंच सांस्कृतिक जीवनावर कायमचा ठसा उमटविला. शिक्षणाच्या बाबतींत, निस्वार्थ सेवेबाबत त्यांनीं जो एक आदर्श घालून दिला, त्यास चांगलें यश मिळालें. त्याचें एक मूर्तिमंत उदाहरण म्हणजे महिला विद्यापीठाचे संस्थापक श्री. धोंडो केशव कर्वे हे होत. या विद्यापीठाच्या स्थापनेसाठीं महाराष्ट्रीय व गुजराती या दोन्हीं समाजाचे सतत प्रयत्न कारणीभूत झाले. याचसारखें आणखी दुसरें उदाहरण म्हणजे रयत शिक्षणसंस्था ही होय. ग्रामीण शिक्षणाच्या क्षेत्रांत प्रथमच कार्य करणारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनीं ही संस्था स्थापन केली व आज दक्षिण महाराष्ट्रांत तिच्या अनेक शाखा आहेत.

१९ व्या शतकांतील शेवटच्या २५ वर्षांचा आणि २० व्या शतकांचा पहिल्या २५ वर्षांचा काळ हा खऱ्याअर्थी, महाराष्ट्रांतील पुनरुज्जीवनाचाच असा काळ होता. तो काळ प्रस्थापकांचा – आपआपल्या क्षेत्रांत निष्णात असलेल्या अशा – प्रस्थापकांचा काळ होता. समाजसुधारक फुले, रानडे आणि आगरकर, संशोधन तज्ज्ञ राजवाडे व भांडारकर, राजकीय पुढारी टिळक आणि गोखले, निबंधकार चिपळूणकर, कादंबरीकार हरि नारायण आपटे, कवि केशवसुत, नाटककार किर्लोस्कर, देवल व गडकरी यांसारख्या सर्व महान बुद्धिवन्तांनीं भावी पिढ्यांसाठीं अत्यंत उदात्त व अनुकरणीय

अशी भूमि निर्माण करून अंधारांत चांचपडणाऱ्या लोकांसाठीं त्यांनीं प्रकाशाचा मार्ग दाखवून दिलेला आहे.

गांधीजींच्या नेतृत्वाखालीं

१९२० या सालानें भारतांत, एका नव्या युगाचा संदेश दिला. जागृत झालेली जनता आतां साऱ्या जगाला सत्य व अहिंसा या शास्त्रांचें महत्त्व पटवून देणाऱ्या एका महान् नेत्याच्या नेतृत्वाखालीं आगेकूच करीत होती आणि या शस्त्रांचें महत्त्व नंतरच्या घडामोडींनीं सिद्ध झालें. त्यानंतर पुढील २५ वर्षांत महात्मा गांधींनीं परकीय सत्तेविरुद्ध अभूतपूर्व लढा दिला व त्यामुळें १९४७ सालीं भारतास स्वातंत्र्य लाभलें. ह्या लढ्यांत महाराष्ट्र नेहमींच आघाडीवर होता.

ह्या पंचवीस वर्षांत महाराष्ट्रांतील सर्व सामाजिक व राजकीय चळवळी गांधीजींच्या मार्गदर्शनाखालीं एका महान राष्ट्रीय कार्यासाठीं एकत्रित झाल्या. भारताची राजकीयदृष्ट्या मुक्तता करण्याचेंच हें केवळ कार्य नव्हतें, तर भारतीय जीवनास नवीन स्वरूप देण्याच्या कामाचा यांत समावेश होता. हरिजनांच्या उन्नतीच्या खास कार्यामुळें हरिजनांमध्यें नवीन प्रकारची जागृति झाली व ह्याच कार्यांत महान हरिजन पुढारी डॉ. बी. आर्. आंबेडकर यांनीं दुसऱ्या एका दृष्टिकोनांतून मदत केली. डॉ. आंबेडकर यांनीं हरिजनांमध्यें त्यांच्या मानवी हक्कांची जाणीव निर्माण केली. स्वतंत्र भारताच्या घटनेचे निर्माते म्हणून डॉ. आंबेडकरांचें नांव अजरामर राहील.

प्रशासन व्यवस्थेचें स्वरूप

राज्यकारभाराच्या दृष्टीनें, राज्याचे चार विभाग पाडण्यांत आले असून त्यांचीं मुख्य ठाणीं मुंबई, पुणें, नागपूर आणि औरंगाबाद येथें आहेत. सदरहू विभाग आणि त्यांतील जिल्हे पुढील-प्रमाणें आहेत —

मुंबई विभाग – बृहन्मुंबई, कुलाबा, रत्नागिरी, ठाणें, नाशिक, पूर्व खानदेश आणि पश्चिम खानदेश.

पुणें विभाग – पुणें, अहमदनगर, कोल्हापूर, उत्तर सातारा, दक्षिण सातारा व सोलापूर.

नागपूर विभाग – नागपूर, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चांदा, वर्धा व यवतमाळ.

औरंगाबाद विभाग – औरंगाबाद, बीड, नांदेड, उस्मानाबाद आणि परभणी.

हे विभाग मूलतः महसूलविभाग आहेत. सर्वसाधारणपणें सरकारच्या इतर खात्याच्या कारभार-विषयक विभागांचीं मुख्य ठिकाणें महसूलविभागांच्या मुख्य ठाण्याच्या जागींच असून त्यांच्या प्रादेशिक कक्षा बहुतांशीं महसूलविभागाइतक्याच आहेत.

प्रत्येक जिल्ह्याचे सब-डिव्हिजनमध्यें भाग पाडण्यांत आले असून सब-डिव्हिजनचे तालुका अगर तहसिलीमध्यें भाग पाडण्यांत आले आहेत. प्रत्येक तालुक्यांत अगर तहसिलींत बऱ्याच (म्हणजे शंभर अगर त्याहून जास्त) गांवांचा समावेश होतो. गांव हा कारभाराचा प्राथमिक घटक आहे.

राज्यपाल आणि मंत्रीमंडळ

भारतीय राज्यघटनेंमध्यें संसदीय स्वरूपाच्या सरकारची योजना करण्यांत आलेली असून हें सरकार प्रौढ मतदानाच्या तत्त्वानुसार निवडण्यांत येतें. राज्याचे प्रमुख, म्हणजे राज्यपाल, ह्यांची

नेमणूक भारतीय संघराज्याचे राष्ट्रपति करतात. राज्यपाल मुख्य मंत्र्यांची नेमणूक करतात आणि त्यांच्या सल्ल्यानुसार इतर मंत्र्यांची नेमणूक करतात. जे ३५ वर्षें अगर त्याहून अधिक वयाचे आहेत आणि जे मध्यवर्ती अगर राज्य कायदेमंडळांचे सदस्य नाहींत, अशा केवळ भारतीय नागरिकांचीच राज्यपाल म्हणून नेमणूक करतां येते.

राज्यपालांना आपलें काम पार पाडण्याच्या कामीं मदत व सल्ला देण्यासाठीं मंत्रीमंडळ असतें. मुख्य मंत्र्यांच्या नेतृत्वाला सुस्पष्ट मान्यता असते. मुख्य मंत्री मंत्रीमंडळ व राज्यपाल यांच्यामधील दुवा आहेत. मंत्रीमंडळाचे सर्व निर्णय ते राज्यपालांना कळवतात, व राज्यपालांना लागणारी इतरहि माहिती वेळोवेळीं देत असतात. महाराष्ट्र राज्यांत मुख्य मंत्र्यांसकट १४ मंत्री व १२ उपमंत्री आहेत.

कायदेमंडळ

भारतीय संघराज्याची लोकसभा व राज्यसभा ह्यांतील प्रतिनिधित्वाखेरीज महाराष्ट्र राज्याच्या कायदेमंडळची विधान-सभा व विधान-परिषद अशीं दोन सभागृहें आहेत. महाराष्ट्र राज्याला लोकसभेंत ४४ जागा व राज्यसभेंत १९ जागा आहेत. महाराष्ट्राच्या विधान-सभेचे २६४ सभासद आहेत. विधान-परिषदेचे ७८ सभासद आहेत.

विधान-सभेची निवडणूक प्रौढ मतदानाच्या तत्त्वानुसार होते आणि सर्वसाधारणपणें तिची मुदत पांच वर्षें असते. विधान-परिषद ही कायम स्वरूपाची संस्था असून तिचे एक-तृतीयांश सभासद प्रत्येक दुसऱ्या वर्षाच्या अखेरीस निवृत्त होतात. तिचे सभासद विविध क्षेत्रांतून निवडण्यांत येतात. तिचे एक-तृतीयांश सभासद हे नगरपालिका, जिल्हा बोर्डें आणि पार्लमेंट ठरवून देईल अशा राज्यांतील अन्य स्थानिक संस्था, ह्यांच्या मतदारसंघांनीं निवडलेले असतात. सुमारें एक-बारांश सभासद तीन वर्षांइतक्या जुन्या पदवीधरांच्या मतदारसंघांतून निवडलेले असतात. तसेंच एक-बारांश सभासद राज्यांतील किमानपक्षीं माध्यमिक शाळांतून कमींत कमी तीन वर्षें शिक्षकाचें काम करणाऱ्या शिक्षकांनीं निवडलेले असतात. एक-तृतीयांश सभासद हे विधान-सभेच्या सदस्यांनीं, विधान-सभेचे सदस्य नसलेल्या व्यक्तींमधून निवडलेले असतात. उरलेले सदस्य राज्यपालांनीं नियुक्त केलेले असतात. राज्यपालांनीं निवडलेल्या व्यक्ति ह्या वाङ्मय, शास्त्र, कला, सहकारी चळवळ व समाजकार्य ह्या क्षेत्रांतील खास ज्ञान असणाऱ्या अगर व्यावहारिक अनुभव असलेल्या अशा असतात.

विधान-सभेचे स्पीकर आणि विधान-परिषदेचे अध्यक्ष यांनीं त्या त्या सभागृहाच्या हक्कांची आणि विशेषाधिकारांची जपणूक करावयाची असते. तसेंच अल्पसंख्य पक्षांतील सभासदांना संरक्षण देण्याचें खास कर्तव्य त्यांच्यावर सोपविलें असून आपल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यास आवश्यक असलेले सर्व अधिकार त्यांना देण्यांत आलेले आहेत. विधान-सभेचे स्पीकर आणि विधान-परिषदेचे अध्यक्ष यांच्या अनुपस्थितींत त्यांचीं कामें अनुक्रमें डेप्युटी स्पीकर व उपाध्यक्ष यांनीं करावयाचीं असतात.

विधान-सभेचे स्पीकर व डेप्युटी स्पीकर यांची, तसेंच विधान-परिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक त्या त्या सभागृहांतील सभासदांतून केली जाते.

राज्यकारभारावरील नियंत्रण

कायदेमंडळाच्या सदस्यांना कायदे करण्याखेरीज, राज्याच्या कारभारावर आणि खर्चावर नियंत्रण ठेवण्यास पूर्ण वाव आहे. राज्यघटनेमध्यें कायदेकानूंच्या संघराज्याची यादी, राज्य यादी

आणि समान यादी अशा तीन याद्यांत विभागणी करण्यांत आली आहे. संघराज्याच्या यादींत संरक्षण, युद्ध व शांतता, अणुशक्ति, परराष्ट्रीय धोरण, रेल्वे, जल–वाहतूक, हवाई–वाहतूक, परदेशाशीं व्यापार आणि जकात वगैरेसारख्या अखिल भारतीय महत्त्वाचे ९७ विषय आहेत. राज्याच्या यादींत पोलीस, न्यायदान, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, शेती, जंगलें, राज्यांतील व्यापारउदीम वगैरे ६६ विषय आहेत. समान यादींत क्रिमिनल लॉ आणि क्रिमिनल प्रोसीजर, सिव्हिल प्रोसीजर, कारखाने कामगार कल्याण, वीज, वृत्तपत्रें, पुस्तकें आणि छापखाने, छोटे बंधारे वगैरे संबंधीचे ४७ विषय आहेत.

राज्याचें कायदेमंडळ राज्याच्या व समान यादींतील सर्व विषयासंबंधी कायदे करूं शकते. विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर भरणाऱ्या पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीला आणि प्रत्येक वर्षी पहिल्या अधिवेशनाच्या सुरुवातीला राज्याचे प्रमुख ह्या नात्यानें राज्यपाल दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीपुढें भाषण करतात आणि अधिकारावर असलेल्या सरकारचा त्या त्या वर्षाचा कार्यक्रम व धोरण ह्यासंबंधीं रूपरेखा सांगतात.

न्यायदान

सुसंघटित, कार्यक्षम व स्वतंत्र असें न्यायखातें हें लोकशाहीस पोषक आहे. भारतीय संघ-राज्यासारख्या फेडरल स्वरूपाच्या राज्यव्यवस्थेंत हें खातें राज्यघटनेचें रक्षक म्हणूनहि कार्य करतें. भारतांतील न्यायखात्यांत सर्वोच्चपदीं सुप्रीम कोर्ट आहे. राज्यघटनेंत प्रत्येक राज्यासाठीं हायकोर्टची तरतूद केलेली आहे. हायकोर्ट हें राज्यांतील सर्वोच्च न्यायमंडळ आहे. हायकोर्टास मूळ अर्जांचा तसेंच अपीलाचाहि (ओरिजिनल अँड अपेलेट) विचार करण्याचा अधिकार आहे. तसेंच हायकोर्टाला पुढील अधिकार आहेत: (१) मूलभूत हक्कांची अंमलबजावणी करण्यासाठीं व अन्य कारणासाठीं हुकूम (रिट) काढणें, (२) राज्यांतील सर्व कोर्टांवर व न्यायमंडळांवर देखरेख ठेवणें आणि (३) राज्यघटनेचा अर्थ लावण्याचा प्रश्न जेथें अंतर्भूत आहे अशीं प्रकरणें कनिष्ठ कोर्टांकडून घेणें. हायकोर्टाचें स्वातंत्र्य अबाधित रहावें म्हणून प्रत्येक हायकोर्टाचा नोकरवर्ग नेमणें, तसेंच त्यांच्या नोकरीसंबंधीच्या परिस्थितीसंबंधी नियम तयार करणें ह्याबाबतचा अधिकार मुख्य न्यायाधिशांचा अगर ते सांगतील त्या न्यायाधिशांचा अगर कोर्टाच्या अधिकाऱ्यांचा आहे.

मुंबई येथील महाराष्ट्राच्या हायकोर्टाला महाराष्ट्रांत समाविष्ट झालेल्या भूप्रदेशांतील मूळ अर्ज अगर अपिलें व अन्य बाबींसंबंधीं निर्णय देण्याचा अधिकार आहे. हायकोर्टाचें एक कायम बेंच नागपूर येथें असून ह्या बेंचमध्यें कमीत कमी तीन न्यायधीश असतात. ह्या बेंचला बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, चांदा आणि राजुरा ह्या जिल्ह्यांत उद्भवलेल्या प्रकरणांच्या बाबतींत हायकोर्टाचे अधिकार आहेत. ह्या जिल्ह्यांत उद्भवलेल्या एखाद्या प्रकरणाची सुनावणी, मुख्य न्यायाधिशांनीं तसा हुकूम केला तर, मुंबईंतहि होऊं शकेल.

स्वतंत्र न्यायखातें हें महाराष्ट्र राज्याचें एक वैशिष्ट्य आहे. दिवाणी प्रकरणांतील न्यायदानाच्या बाबतींत, न्यायखातें व अंमलबजावणी खातें ह्यांचीं कामें कधींहि एकमेकांत गुंतलेलीं नव्हतीं. फौजदारी प्रकरणांतील न्यायदानाच्या बाबतींत, ढोबळ मानानें, दोन प्रकारचे मॅजिस्ट्रेट आहेत. ते म्हणजे ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट आणि एक्झिक्युटिव्ह मॅजिस्ट्रेट. पहिल्या वर्गांतले मॅजिस्ट्रेट नेहमींची न्यायदानाचीं कामें पहातात, तर दुसऱ्या वर्गांतील मॅजिस्ट्रेट कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरतीच

आपल्या अधिकारांचा वापर करतात. हायकोर्टाला राज्यघटनेप्रमाणें सिव्हिल जज्जांच्या बाबतींत जे अधिकार आहेत तेच ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेटच्या बाबतींत आहेत.

कारभारविषयक यंत्रणा

मुंबई येथील सचिवालय हें कारभाराचें मध्यवर्ति केंद्र आहे. सचिवालयामधील खात्यांच्या प्रमुखांना सेक्रेटरी म्हणून संबोधण्यांत येतें. चीफ सेक्रेटरी हे सर्व खातेंप्रमुखांच्या शिरोभागीं आहेत.

महाराष्ट्राच्या सचिवालयांत १२ खातीं असून तीं पुढीलप्रमाणें आहेत: सर्वसाधारण कारभार-विषयक खातें, गृह खातें, महसूल खातें, शेतकी खातें व जंगल खातें, शिक्षण व समाज कल्याण खातें, नागरी विकास आणि सार्वजनिक आरोग्य खातें, अर्थ खातें, इमारती व दळणवळण खातें, पाटबंधारे व वीज खातें, कायदा व न्यायदान खातें, उद्योगधंदे व कामगार खातें आणि सहकार व ग्रामीण विकास खातें.

सचिवालयानंतर निरनिराळे कारभारविषयक खात्यांचे प्रमुख येतात. ते म्हणजे विभागांचे कमिशनर, जिल्ह्यांचे कलेक्टर, जिल्ह्यांतील सब्-डिव्हिजनचे प्रमुख असलेले असिस्टंट व डेप्युटी कलेक्टर आणि तालुका व तहसिलीचे प्रमुख असलेले मामलेदार. पाटील हे महसूल व पोलिस अशा दोन्ही कामासाठीं गांवाचे प्रमुख आहेत आणि तलाठी अगर कुळकर्णी हे कारकून–हिशेबनीस आहेत.

शेतकी, शिक्षण, सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय मदत, सहकार, पशुवैद्यक, जंगल, सार्वजनिक बांधकाम, पोलिस आणि कित्येक कारभारविषयक शाखांसाठीं विभागीय, जिल्हा व तालुक्यांतून संघटना आहेत.

राज्याचा महसूलविषयक कारभार प्रामुख्यानें कलेक्टरांमार्फत चालविला जातो. जमीनमहसूल वसूल करण्याखेरीज अबकारी व इतर खास कर वसूल करण्याचा कारभार पाहण्याचीं व स्टँपबाबतच्या महसुलावर देखरेख करण्याची जबाबदारी जिल्ह्याचे प्रमुख ह्या नात्यानें कलेक्टरांवर आहे. तसेंच जिल्ह्यांतील सरकारच्या इतर खात्यांच्या कामकाजांत एकसूत्रीपणा आणण्याचें कार्यहि कलेक्टरांना करावें लागतें.

कारभाराचें विकेंद्रीकरण

कमिशनर हा प्रत्येक विभागाचा प्रमुख असून त्याला विस्तृत व व्यापक अधिकार दिलेले आहेत. आपल्या विभागांतील महसूल व सर्वसामान्य प्रशासनविषयक सर्व बाबींच्या बाबतींत तो प्रमुख नियंत्रण अधिकारी असून शिवाय सर्व प्रादेशिक कार्यालयांच्या कार्यावर, विशेषतः नियोजन व विकासांच्या बाबतींत, देखरेख करण्याची व त्याच्या कार्यांच्या एकसूत्रीकरणाची जबाबदारी त्याचेवर सोपविलेली आहे. या व्यवस्थेमुळें लोकांची गैरसोयहि बऱ्याच प्रमाणांत दूर झालेली आहे. कारण आतां त्यांना लहानसहान कामांकरितां सचिवालयाकडे धाव घ्यावी लागत नाहीं.

विभागीय कमिशनरांची नियुक्ति हेंच मुळांत विकेंद्रीकरणाच्या दृष्टीनें टाकलेले महत्त्वाचें पाऊल असलें तरी, खातेंप्रमुखांना व प्रादेशिक व जिल्हा अधिकाऱ्यांना अधिकार देण्याचें प्रमाण वाढविलेलें आहे. विशेषतः समाजविकास कार्यक्रमाच्या बाबतींत कलेक्टर व प्रकल्प अधिकारी यांना विस्तृत अधिकार देण्यांत आले आहेत. वास्तविक विकेंद्रीकरणाच्या व अधिकाऱ्यांकडे अधिक अधिकार देण्याच्या प्रश्नावर सतत विचार चालू असतो व त्याप्रमाणें वेळोवेळीं अधिकार सोपविण्यांत येतात. हे अधिकार देण्याचा उद्देश सफल व्हावा म्हणून सर्व पातळींवरील अधिकाऱ्यांना

त्यांनीं आपले अधिकार स्वतःच्या वैयक्तिक जबाबदारीवर परिणामकारकपणें वापरावेत व आपल्या वरिष्ठांकडे अनावश्यक विचारणा करण्याचें टाळावें अशा सूचना देण्यांत आल्या आहेत.

एकसूत्रीकरण

सरकारी कामकाजाची गति वाढविण्याच्या दृष्टीनें आणि श्रम वायां जाऊं न देण्याच्या दृष्टीनें, तसेंच पत्रव्यवहारांतील विलंब टाळण्याकरितां निरनिराळ्या खात्यांच्या कार्यांत एकसूत्रीपणा आणण्यावर आणि चर्चा व वैयक्तिक संबंधाद्वारें प्रश्नाची सोडवणूक करण्यावर सरकारनें विशेष भर दिला आहे. सरकारच्या मुख्य कचेरींत, प्रत्येक पंधरवड्याला निरनिराळ्या खात्यांचे सेक्रेटरी एकत्र येतात आणि महत्त्वाच्या प्रश्नावर चर्चा करून निर्णय घेतात. तसेंच विभागीय कमिशनर, खात्यांचे प्रमुख आणि कलेक्टरांच्याहि परिषदा भरविण्यांत येतात. अशा परिषदांतून सर्वसाधारण हिताच्या प्रश्नावर चर्चा आणि विचारांची देवाणघेवाण केली जाते. महत्त्वाच्या प्रश्नावर विचार करण्यासाठीं आणि सरकारनें विचारलेल्या प्रश्नासंबंधीं सल्ला आणि मत देण्यासाठीं विभागीय कमिशनर ठराविक कालानंतर एकत्र येतात. विभागीय कमिशनर, कलेक्टर, प्रादेशिक प्रमुख आणि जिल्हा अधिकारी यांच्या विभागाच्या आणि जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणीं एकसूत्रीकरणाच्या हेतूनें घेण्यांत यावयाच्या अशा बैठकी ठराविक कालानंतर नेहमीच भरत असतात.

संघटना व कार्यपद्धति

महाराष्ट्र राज्याच्या कारभारयंत्रणेंत बदलत्या परिस्थितीनुसार संघटना, कार्यपद्धति व कामकाज ह्यामध्यें आवश्यक तर बदल करून कार्यक्षमता कायम ठेवण्यासाठीं व ती सुधारण्यासाठीं लक्ष पुरविणारें असें एक खास साधन असणें आवश्यक आहे. तसेंच सर्व पातळीवर कामामधील विलंब टाळण्यासाठीं एकसूत्रित अशी मोहीम अंमलांत आणण्यासाठींहि अशा साधनाची आवश्यकता असते. त्याप्रमाणें १९५४ सालीं प्रथम स्थापन केलेल्या तपासणी व संघटना आणि कार्यपद्धति विभागाचे संघटना व कार्यपद्धति अधिकारी (ऑर्गनायझेशन ॲंड मेथड्स ऑफिसर्स) सचिवालयांतील प्रत्येक खात्यांत आहेत. जिल्ह्यामध्यें, कलेक्टर हे ह्या विभागाचे प्रतिनिधि म्हणून काम पाहतात. तसेंच संघटना व कार्यपद्धति विभागाचें कार्य सचिवालयाबाहेरील कचेऱ्यांतून सुरू करण्याची आवश्यकता मान्य करण्यांत आली असून कांहीं मोठ्या कचेऱ्यांतून त्या बाबतींत या अगोदर उपाययोजनाहि करण्यांत आल्या आहेत. कचेऱ्यांतील कामाच्या पद्धतींत सुधारणा करण्याच्या बाबतींतहि अनेक इलाज योजण्यांत आलेले आहेत. कचेऱ्यांची अंतर्गत तसेंच वरिष्ठ अधिकाऱ्यांकरवीं तपासणी करण्यावर भर देण्यांत येत आहे.

कारभाराची कार्यक्षमता पुष्कळशी ट्रेन्ड व लायक नोकरवर्गावर अवलंबून असते. ह्यासाठीं सरकार कांहीं विशिष्ट जागांसाठीं स्पर्धा-परीक्षा आणि खात्यांतील वरच्या जागांवर बढती देण्यासाठीं खातेवार परीक्षा घेते, तसेंच कांहीं निवडक वर्गांतील नोकरवर्गाला शिक्षण देण्याबाबतहि सुरुवात करण्यांत आलेली आहे.

राज्यकारभाराची भाषा म्हणून मराठीचा उपयोग करण्यास सुरुवात करण्यासाठीं सरकारनें आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत. तथापि हा बदल घडवून आणतांना कारभाराची कार्यक्षमता व कामाचा उरक कमी होणार नाहीं अशी काळजी घेण्यांत येत आहे. ह्या बाबतींत कामाला सुरुवात करण्यासाठीं एक डायरेक्टोरेट ऑफ लँग्वेजेस् स्थापन करण्यांत आलेलें आहे. त्या डायरेक्टोरेटकडे शब्दकोष तयार करणें, खात्यांची नियमावलि, मार्गदर्शिका व संदर्भ ग्रंथ ह्यांचे भाषांतर करणें, लघुलेखक आणि टंकलेखक ह्यांना शिक्षण देणें आणि कारभारांत मराठीचा उपयोग करण्यास सुरुवात करण्यासाठीं आवश्यक अशीं मूलभूत स्वरूपाचीं कामें

सोंपविण्यांत आलीं आहेत. तसेंच जिल्ह्यांतून व कनिष्ठ कचेऱ्यांतून मराठींतून सरकारी कारभार चालू करण्याच्या कामाकडे लक्ष देण्याचें कामहि डायरेक्टरांवर सोंपविण्यांत आलें आहे.

पब्लिक सर्विस कमिशन

नोकऱ्यांमधून नेमण्यासाठीं उमेदवारांची शिफारस करणें व आवश्यक तेथें स्पर्धात्मक व खातेवार परीक्षा घेणें हें पब्लिक सर्विस कमिशनचें प्रमुख कार्य आहे. सरकारला पुढील बाबतींत कमिशनचा सल्ला घ्यावा लागतो. मुलकी सेवा (सिव्हिल सर्विस) व जागा यांसाठीं भरती करण्याच्या पद्धतीसंबंधीच्या सर्व बाबी ; मुलकी सेवा (सिव्हिल सर्विस) व जागांवर नेमणूक करणें या बाबतींत अमलांत आणावयाचीं तत्त्वें ; एका नोकरींतून दुसऱ्या नोकरींत बदली करणें व बढती देणें ; आणि नेमणूक, बढती व बदली करण्यासाठीं उमेदवाराची पात्रता, आणि सरकारच्या मुलकी सेवेंत असलेल्या व्यक्तींच्या बाबतींतील शिस्तीसंबंधींच्या बाबी—यांत अशा बाबींसंबंधींच्या अर्जांचा अथवा विनंतिअर्जांचा समावेश होतो.

राज्य पब्लिक सर्विस कमिशनचे अध्यक्ष व इतर सदस्य यांची नेमणूक राज्यपालांतर्फें केली जाते.

स्थानिक स्वराज्य

स्थूलमानानें, महाराष्ट्रांत चार प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. त्या अशा—म्युनिसिपल कार्पोरेशन, म्युनिसिपल बरोज, जिल्हा म्युनिसिपालिट्या, ग्रामपंचायती आणि जिल्हा लोकल बोर्डें. ह्या स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रमुख कर्तव्यें म्हणजे रस्ते, वैद्यकीय मदत, पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षण वगैरे सार्वजनिक उपयोगाच्या आवश्यक अशा सोयींची तरतूद करणें आणि त्यांची व्यवस्था पाहणें हीं आहेत. त्यांना प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष कर बसवून पैसा उभा करण्याचा अधिकार असतो. तसेंच त्यांना सार्वजनिक उपयोगाच्या भांडवली कामासाठीं सरकारकडून अगर सरकारच्या आगाऊ परवानगीनें खुल्या बाजारांत कर्जें उभारण्याचाहि अधिकार असतो. नगरपालिका, महानगरपालिका व ग्रामपंचायत ह्यांचें अधिकारक्षेत्र गांव, शहर किंवा खेडें ह्यांच्यापुरतें मर्यादित असतें तर जिल्हा लोकल बोर्डांचा जिल्ह्यांतील सर्वसाधारण उपयोगाच्या बाबींशीं संबंध येतो.

ग्रामपंचायत

ग्रामपंचायत हा गांवांतील गरजा भागविणारा सर्वांत छोटा असा घटक आहे. लोकशाहीचा पाया भक्कम रहावा ह्यासाठीं गांवांतून स्वयंशासित अशा लोकशाही संस्था असणें आवश्यक आहे. भारताच्या राज्यघटनेच्या ४० व्या कलमांत, ग्रामपंचायती स्थापन करण्याबाबत आणि स्वयंशासित संस्था म्हणून कार्य करण्यासाठीं त्यांना आवश्यक ते अधिकार देण्याबाबत सूचना आहेत. त्या दृष्टीनें ग्रामपंचायती ह्या कारभाराच्या खऱ्याखुऱ्या विकेन्द्रित अशा लोकशाही संस्था बनाव्या आणि त्यांची साधनसामुग्री, कार्यक्षेत्र व अधिकार पुरेसे असावेत असे कसोशीनें प्रयत्न करण्यांत येत आहेत.

महाराष्ट्रांत १३,१४५ ग्रामपंचायती असून त्यांनीं ग्रामीण भागांत ७८·२१ टक्के लोकसंख्या व्यापलेली आहे. राज्यांतील सर्व गांवांसाठीं ग्रामपंचायती स्थापन करणें हें उद्दिष्ट आहे. १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत कायद्याखालीं ग्रामपंचायतींना अधिक अधिकार व कामें देण्यांत आलीं आहेत. सदरहू कायद्याच्या ४५ व्या कलमांत पंचायतींचीं जीं कामें दिलेलीं आहेत त्यांत पुढील

बाबींचा समावेश होतो : स्वच्छता व आरोग्य, सार्वजनिक बांधकामें, शिक्षण, स्वसंरक्षण व ग्राम-रक्षण, कारभार, गांवकऱ्यांचे कल्याण, शेतकी, जंगलें टिकविणें, गुरांची पैदास व रक्षण, ग्रामोद्योग आणि जमीन महसूल जमा करणें. ग्रामपंचायतींना आर्थिक व अन्य स्वरूपाच्या मदतीखेरीज जमीन महसुलाचा किमान २५ टक्के व जास्तीत जास्त ३० टक्के अशा समान दरानें वांटा देण्यांत येतो. पंचायतींचे चिटणीस आणि सरपंच व पंच ह्यांच्यासाठीं शिक्षणाच्या सोयी करण्यांत आलेल्या आहेत.

न्यायपंचायती

ग्रामपंचायतींच्या कारभाराचें एक महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे पांच अगर अधिक गांवांसाठीं न्यायपंचायती अगर न्यायमंडळें स्थापन करणें आणि त्यांना न्यायदानाचे अधिकार देणें हें होय. सुरुवातीला, न्यायपंचायतींना छोट्या गुन्ह्याबाबतचे खटले चालविण्याचे व सामान्य स्वरूपाचे तंटे मिटविण्याचे अधिकार देण्यांत येतात. मात्र पंचायतींना जसजसा ह्याबाबतचा अनुभव मिळेल तसतसे त्यांना अधिक व्यापक अधिकार देण्याबाबत तरतूद करण्यांत आली आहे. अगदीं साधे तंटे सोडविण्यासाठीं सुद्धां गांवकऱ्यांना तालुक्याच्या ठिकाणीं असलेल्या मॅजिस्ट्रेटच्या अगर सिव्हिल जज्जच्या कोर्टांत जाण्यासाठीं खूप दूरवर जावें लागतें, हें सर्वांना माहीत आहेच. शिवाय तंटा मामुली असला व वस्तुस्थिति स्पष्ट असली तरी कोर्टांतील कामाची पद्धत गुंतागुतीची व दीर्घसूत्री असते. न्यायपंचायती स्थापन झाल्यामुळें ह्या अडचणी दूर झालेल्या आहेत. आतां पंचांमुळें गांवकऱ्यांच्या समक्ष खटला चालविण्यांत येतो आणि सर्वसाधारणपणें गांवकऱ्यांना वस्तुस्थिति माहीत असते.

जनतेचें सहकार्य

प्रत्येक खात्याच्या कारभारामध्यें जनतेचा संबंध यावा ह्यासाठीं विचारविनिमय करणारीं मंडळें स्थापन करणें हें आजच्या कारभाराचें एक वैशिष्ट्य समजलें पाहिजे. पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रम आंखण्याच्या व ते अंमलांत आणण्याच्या बाबतींत तर ही बाब अधिक प्रकर्षानें दिसून येते. या बाबतींत असें मार्गदर्शक तत्त्व गृहीत धरण्यांत आलें आहे कीं, जनतेच्या सहकार्यावर आधारलेल्या कार्यक्रमांत जनतेवर लादलेल्या कार्यक्रमापेक्षां चिरस्थायी यश मिळण्याची अधिक शक्यता आहे. अर्थात् लोकांची परिस्थिति सुधारण्याची जबाबदारी प्रामुख्यानें लोकांवरच आहे आणि तें योग्यच होय.

लोकांना मार्गदर्शन करणें व साहाय्य करणें आणि कारभाराच्या प्रत्येक पातळीवर कामामध्यें एकसूत्रता आणणें हें सरकारी यंत्रणेचें प्रमुख कार्य आहे. समाजविकास योजनांच्या बाबतींत, लोकांच्या गरजा व अग्रहक्क ह्यांच्या दृष्टीनें सरकारी अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठीं राज्य विभाग व जिल्हा पातळीवर आणि विकास गटांच्या पातळीवर अनौपचारिक विचारविनिमय समिति, विभागीय विकास मंडळें, जिल्हा विकास मंडळें आणि गट सल्लागार समित्या ह्यांसारख्या बिन–सरकारी समित्या स्थापन करण्यांत आलेल्या आहेत.

तसेंच, नगरपालिका व ग्रामपंचायती ह्यांसारख्या स्थानिक संस्था, सहकारी संस्था, खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि समाज कल्याण मंडळ ह्यांसारख्या स्वायत्त संस्था, भारत सेवक समाज, सर्व सेवा संघ ह्यांसारख्या स्वयंसेवक संघटना, विश्वस्त निधि आणि शैक्षणिक संस्था ह्यांचेहि विकास-कार्यासाठीं साहाय्य घेण्यांत येत आहे.

शेतकी अर्थव्यवस्था

शेती हा महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून येथील बहुसंख्य लोक शेतकरी आहेत. राज्यांतील एकूण लोकसंख्येपैकीं ६४ टक्के लोक शेतीव्यवसायांत गुंतले आहेत. राज्यांतील जमिनीपैकीं ५८ टक्के जमीन लागवडीखालीं आहे, तर भारतांत हें प्रमाण ४४½ टक्के आहे. हें प्रमाण लक्षांत घेतलें म्हणजे राज्याची अर्थव्यवस्था शेतीवर कशी अवलंबून आहे हें दिसून येईल.

जमिनीचा उपयोग

एखाद्या भागांतील लागवडीखालीं जमिनीचें लागवडीखालीं नसलेल्या जमिनीशीं असलेलें प्रमाण मुख्यतः तेथील जमीन व हवामान यांवर अवलंबून असतें. जेथील जमीन कमी प्रतीची आहे अशा ठाणें, कुलाबा व रत्नागिरी या समुद्रकिनाऱ्यावरील जिल्ह्यांतील लागवडीखालील जमिनीचें क्षेत्र एकूण जमिनीच्या ⅓ पेक्षां कमी असून ⅕ हिस्सा जमीन पडीत आहे. या भागांतील कांहीं जमीन जंगलांनीं व्याप्त आहे. पुणें, नासिक, उत्तर व दक्षिण सातारा, कोल्हापूर व सोलापूर या पठारांवरील जिल्ह्यांत हें प्रमाण बरेंच मोठें असून विशेषतः घाटाखालील भागांत बरेंच जंगल आहे. नासिक, कोल्हापूर व सोलापूर जिल्ह्यांत चांगलीं व कायम कुरणें व गवताळ जमिनी आहेत.

पश्चिम व पूर्व खानदेश आणि मराठवाडा यांचा समावेश असलेल्या दख्खनच्या भागांत लागवडीखालील जमिनीचें प्रमाण ६० ते ७५ टक्क्यांच्या दरम्यान आहे. या भागांत कांहीं जंगल असून बरेंच क्षेत्र पडित आहे. विदर्भांत लागवडीखालील जमिनीचें प्रमाण ५० ते ७० टक्के असून जंगलाचें क्षेत्रहि बरेंच आहे. विशेषतः चांदा जिल्ह्यांत जंगलव्याप्त क्षेत्र फार मोठें आहे.

राज्यांतील लागवडीखालील व इतर जमिनीचें प्रमाण पुढील तक्त्यांत दिलें आहे :—

जमिनीच्या उपयोगाची एकूण क्षेत्राशीं टक्केवारी

प्रकार	महाराष्ट्र	भारतीय संघराज्य (अंदाजें)
जंगल	१७·४९	१७·४३
पडित व लागवडीस योग्य नसलेली जमीन	६·०३	११·८४
बिगर शेतकी कामांसाठीं उपयोगांत आणलेली जमीन	२·२१	४·५३
लागवडीयोग्य पडित जमीन	३·०१	७·४५
झाडांच्या पिकांखालीं व फळबागांखालीं असलेली जमीन	४·८८	१·९४
कायम कुरणें व चराऊ जमीन	०·७०	४·०९
चालू पडित जमीन	३·१५	४·०९
इतर पडित जमीन	४·६१	४·०७
लागवडीखालील एकूण जमीन	५७·९२	४४·५६
एकूण क्षेत्र	१००·००	१००·००

पिकांखालील एकूण ४६३·८ लाख एकर जमिनीपैकीं फक्त २६ लाख एकर जमिनीस म्हणजे स्थूलमानानें फक्त ५ टक्के जमिनीस पाणीपुरवठ्याच्या सोयी उपलब्ध आहेत. सरकारी कालव्याद्वारें २१·८२ लाख एकर जमिनीस पाणीपुरवठा करण्यांत येतो व बाकीच्या क्षेत्रास खाजगी मालकीच्या विहिरी, तळीं व पाट यांच्याद्वारें पाणीपुरवठा होतो.

शेतकी उत्पन्न

अन्नपिकें व इतर पिकें यांखालील क्षेत्राचें परस्पराशीं प्रमाण ७:३ असें आहे. अन्नपिकांखालील व इतर पिकांखालील जमिनीचें एकूण जमिनीशीं प्रमाण पुढीलप्रमाणें आहे :—

पिकांखालील एकूण क्षेत्राशीं टक्केवारी

अन्नपिकें	
प्रमुख अन्न-धान्यें व डाळी	६७·९०
ऊंस	०·५५
फळें व भाजीपाला	०·६८
मसाल्याचीं पिकें	१·०४
इतर धान्यपिकें	०·०१
एकूण-अन्नपिकें	७०·१८
बिगर अन्नपिकें	
गळिताचीं धान्यें	१०·५७
कापूस व इतर तंतुमय पिकें	१४·५७
औषधी व मादक पदार्थ	०·१९
वैरणीचीं पिकें	४·५५
संकीर्ण अन्नपिकें	०·०४
एकूण—बिगर-अन्नपिकें	२९·८२
पिकांखालील एकूण क्षेत्र ...	१००·००

ठाणें, कुलाबा व रत्नागिरी हे किनाऱ्यांवरील जिल्हे व विदर्भातील भंडारा व चांदा हे जिल्हे तांदळाच्या उत्पन्नाचें मुख्य क्षेत्र आहे. तथापि, इतर अनेक जिल्ह्यांतहि कांहीं प्रमाणांत तांदळाचें पीक घेण्यांत येतें. किनाऱ्यावरील तीन जिल्ह्यांत तांदळाच्या पिकाखालीं १०.२१ लाख एकर जमीन असून वार्षिक उत्पादन ४.६९ लाख टन आहे. विदर्भातील तांदळाच्या उत्पन्नापैकीं ९३ टक्के उत्पादन भंडारा आणि चांदा या जिल्ह्यांत होत असून तेथील १०.५० लक्ष एकर जमीन तांदळाच्या पिकाखालीं आहे व एकूण वार्षिक उत्पादन ४ लाख टन आहे.

गळिताचीं धान्यें व कापूस हीं राज्यांतील प्रमुख व्यापारी पिकें होत. भारतांतील गळिताच्या पिकांखालील एकूण क्षेत्रांपैकीं १/६ महाराष्ट्रांत आहे. तसेंच भारतांतील कापसाखालील एकूण जमिनीपैकीं १/४ क्षेत्र या राज्यांत आहे.

राज्यांतील निरनिराळ्या जिल्ह्यांत घेण्यांत येणाऱ्या अनेक गळितांच्या पिकांत भुईमूग व जवस हीं प्रमुख आहेत. पूर्व खानदेश धरून मराठवाड्याच्या जिल्ह्यांत सुमारें ११.७५ लाख एकर जमीन गळिताच्या पिकांखालीं असून वार्षिक उत्पन्न २.९० लाख टन आहे. विदर्भातील ७ लाख एकर जमीन ह्या पिकांखालीं असून वार्षिक उत्पन्न १.२५ लाख टन आहे. बाकीच्या पश्चिम महाराष्ट्रांतील जिल्ह्यांत १५ लाख एकर जमीन गळितांच्या पिकांखालीं असून वार्षिक उत्पन्न ३.७५ लाख टन आहे. या तेलबियांच्या पिकाच्या आंकड्यामध्यें सरकीचा समावेश नाहीं. कापूस पिकणाऱ्या भागांत सरकीचें उत्पन्न बरेंच असतें.

कापसाच्या पिकाबाबत सांगायचें म्हणजे या व्यापारी पिकाखालीं विदर्भात ३५ लाख एकर जमीन असून वार्षिक उत्पादन ७ लाख गांठी (प्रत्येक गांठ –३९२ पौंड) आहे; तर मराठवाड्याच्या बाबतींत हे आंकडे अनुक्रमें १९.५० लाख एकर व २.५० लाख गांठी असे आहेत. पश्चिम महाराष्ट्रांत कापूस फारच कमी प्रमाणांत पिकत असला तरी पश्चिम व पूर्व खानदेश हा कापूस पिकविणारा मुख्य भाग आहे. येथें ८.७५ लाख एकर जमीन कापसाखालीं असून वार्षिक उत्पादन २ लाख गांठी आहे.

कोंकणांत अन्नपिकांचें उत्पन्न फार कमी होत असलें तरी, फळपिकांच्या बाबतींत मात्र हा भाग समृद्ध आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत आंब्याच्या लागवडीखालीं ८५०० एकर जमीन असून वार्षिक उत्पादन २२,७०० टन आहे. तसेंच येथील आंब्यांचा दर्जाहि सर्वोत्कृष्ट आहे. या जिल्ह्यांतील दुसरें प्रमुख उत्पादन म्हणजे काजूचें होय. येथें ४९०० एकर क्षेत्र काजूखालीं असून वार्षिक उत्पादन ६७०० टन आहे. ठाणें जिल्हा केळ्याच्या पिकाचें माहेरघर असून तेथें या पिकाखालीं २७०० एकर जमीन आहे व वार्षिक उत्पादन ३६,००० टन होतें.

नागपुरी संत्रीं सर्वांच्या परिचयाचीं आहेत. नागपूर, अमरावती व वर्धा या जिल्ह्यांत संत्र्यांची लागवड होते. २४,१०० एकर जमिनींत संत्र्यांचें पीक घेण्यांत येत असून वार्षिक उत्पादन जवळ जवळ एक लाख टन आहे.

राज्यांत उंसाखालीं इतर पिकांच्या मानानें फार कमी क्षेत्र असलें तरी तें राज्यांतील एक महत्त्वाचें व्यापारी पीक आहे. दख्खनमध्यें होणारे साखरेचे दर एकरीं उत्पादन जसें उत्तरेपेक्षां अधिक आहे तसेंच उंसांतील साखरेचा उतारा उत्तरेंतील उंसांतील साखरेपेक्षां अधिक असतो. कोंकणांतील जिल्हे सोडल्यास बहुतेक सर्व जिल्ह्यांत ऊंस पिकतो. तथापि, अहमदनगर, कोल्हापूर, पुणें, नासिक, उत्तर व दक्षिण सातारा, सोलापूर व औरंगाबाद हे प्रमुख ऊंसउत्पादक जिल्हे होत. या

आठ जिल्ह्यांत उंसाखालीं एकूण २ लाख एकर क्षेत्र असून सुमारें ६३ लाख मेट्रिक टन उंसाचें (गुळाच्या मापांत) उत्पादन होतें.

महाराष्ट्र राज्यांतील अन्नधान्यांचें एकूण उत्पादन सुमारें ६२ लाख टन असून हें उत्पादन दर दिवशीं दर माणशीं १६·६५ औंस पडतें. इतर पिकांमध्यें कापूस व भुईमूग यांचें उत्पादन चांगलें होत असून तें भारतांतील या पिकांच्या अनुक्रमें २६·१ व १७·९ टक्के इतकें आहे.

जमीनसुधारणा

राज्यांत अनेक जमीनविषयक सुधारणा करण्यांत आल्या आहेत. योग्य त्या कायदेशीर उपाययोजनांद्वारें मध्यस्थ, निरनिराळ्या प्रकारचीं इनामें व खास रयतवारी पद्धतींचें उच्चाटन करण्यांत आलें आहे. जेथें रेकॉर्ड ऑफ राइटसूची पद्धति नाहीं तेथें ती सुरू करण्याच्या योजना, जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण आणि पडित व खार जमिनी लागवडीखालीं आणणें ह्या जमीन-विकास कार्यक्रमांतील कांहीं महत्त्वाच्या बाबी होत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत महाराष्ट्र राज्याकरितां १८२·४२ लाख रुपयांची तरतूद असून पहिल्या चार वर्षांत (१९५६–६०) त्यापैकीं १४२·२२ लाख रुपयांचा खर्च झाला आहे.

१९५५ चा मुंबई कूळवहिवाट व शेतजमिनी (दुरुस्ती) कायदा हा राज्यांतील कूळ कायद्याच्या इतिहासांतील एक युगप्रवर्तक घटना होय. या कायद्यानुसार 'कसणाऱ्याचा दिवस' म्हणजेच ता. १ एप्रिल १९५७ या दिवशीं कुळांना ते कसत असलेल्या जमिनीबाबत सक्तीनें कब्जेहक्क मिळण्याबाबत तरतूद करण्यांत आली. 'कसेल त्याची जमीन' हें राज्यांतील सर्व जमीन-सुधारणांचे उद्घोषित उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीनें टाकण्यांत आलेलें हें पहिलें प्रत्यक्ष पाऊल होतें. १९५५ च्या दुरुस्ती कायद्याखालीं १९४८ च्या कूळ कायद्यास जोडण्यांत आलेल्या दुरुस्त्या फार महत्त्वाच्या असून त्या दूरगामी परिणाम करणाऱ्या अशा आहेत.

क्रमाक्रमानें सर्व मध्यस्थांचें उच्चाटन करून जमीन कसणाराला जमिनीचा कब्जेदार बनविण्याच्या धोरणानुसार एक कार्यक्रम आंखण्यांत आला असून त्याकरितां नेमलेल्या यंत्रणेद्वारें तो अमलांत आणण्यांत येत आहे. मराठवाड्याच्या बाबतींत, तेथें चालू असलेला १९५० चा हैद्राबाद कूळ व शेतजमिनीबाबतच्या कायद्यांत कांहीं उणीवा आढळून आल्या. त्यांतील विशेष उणीव म्हणजे या कायद्यांत सामान्य कुळाला कब्जेदाराचे हक्क बहाल करण्याची तरतूद नाहीं. ही व इतर उणीवा दूर करण्याच्या दृष्टीनें या कायद्यांत आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यांत येऊन दुरुस्त कायदा जून १९५८ पासून लागू करण्यांत आला.

विदर्भांतील कूळ कायद्यांतसुद्धां कुळांना कब्जेदाराचे हक्क बहाल करण्याची अथवा जमीन-मालकाची कमाल मर्यादा ठरविण्याची कोणतीहि तरतूद नव्हती. म्हणून विदर्भासाठीं योग्य असा कायदा (सध्यां गुजरातमध्यें समाविष्ट झालेल्या कच्छलाहि तो लागू होता) तयार करण्यांत आला. हा नवीन १९५८ चा मुंबई कूळ व शेतजमीन कायदा ३० डिसेंबर १९५८ पासून अमलांत आला.

राज्यांत अमलांत असलेल्या निरनिराळ्या जमीन रद्द करण्याबाबतच्या कायद्यांची अंमल-बजावणी करणें सोईचें व्हावें म्हणून भरपाईचे रोखे देण्यासंबंधीची तपशीलवार कार्यपद्धति निश्चित करण्यांत आली आहे. भरपाईची रक्कम रोख्यांच्या स्वरूपांत देण्याचें काम आधींच सुरू झालें

आहे. भरपाई देण्याचीं कामें त्वरित व योग्य प्रकारें निकालांत काढतां यावींत म्हणून मुंबई जमीन-वहिवाट रद्द करण्याबाबतचा (दुरुस्ती) कायदा, १९५८, व मुंबई जमीन रद्द करण्याबाबतचा कायदा (दुरुस्ती), १९५८, हे कायदे करण्यांत आले. तथापि, सरकारनें केलेली सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे राज्याच्या कारभारांत ज्यांची आतां मुळींच गरज उरलेली नाहीं अशीं कनिष्ठ गांववतनें रद्द करण्याची उपाययोजना ही होय.

जमिनीच्या तुकड्यांचे एकत्रीकरण

जमिनीच्या तुकड्यांचें एकत्रीकरण करण्यासाठीं नवीन राज्याच्या तिन्ही भागांत म्हणजे (१) जुन्या मुंबई राज्यांतील प्रदेश, (२) विदर्भ व (३) मराठवाडा या भागांत कायद्यानें तरतूद करण्यांत आली आहे. जुन्या मुंबई राज्याच्या व मराठवाड्याच्या कायद्यान्वयें सरकार तुकडे जोडण्यासाठीं कोणतेंही क्षेत्र घेऊं शकतें; परंतु विदर्भामध्यें मात्र ज्या खेड्यांतील $\frac{2}{3}$ किंवा अधिक वहिवाटदार तुकडे जोडण्यासाठीं अर्ज करतील अशाच खेड्यांत ही योजना हातांत घेतां येते. जुन्या मुंबई राज्यांतील प्रदेशांत तुकडे जोडण्याचें कार्य १९४७ च्या तुकडेबंदी व तुकडे जोडण्या-बाबतच्या कायद्यानुसार १९४८ पासून सुरू झालें. हा कायदा आतां नवीन क्षेत्रांनासुद्धां लागू करण्यांत आला असून तो १ एप्रिल, १९५९ पासून अमलांत आला आहे.

तुकडे जोडण्याच्या योजनांमुळें झालेल्या फायद्याचें मूल्यमापन करण्याच्या दृष्टीनें पुरेसा अवधि लोटलेला नसला, तरी ज्या खेड्यांत ह्या योजना पूर्ण झाल्या आहेत त्या खेड्यांतील पाहणी-वरून शेतकी व सामाजिक संबंधांत बरीच सुधारणा झाल्याचें आढळून आलें आहे. विहिरीद्वारें पाणीपुरवठा, बांधबंदिस्ती व ड्रेनेजेस् इत्यादिमुळें शेतीचें उत्पन्न २० टक्क्यांनीं वाढलें.

महाराष्ट्राच्या समुद्र किनाऱ्यावरील भागांत खार व खाजण जमिनी बऱ्याच आहेत. ह्या जमिनी लागवडीयोग्य करणें शक्य आहे. याकरितां १९४८ च्या खार जमिनीबाबतच्या कायद्या-नुसार स्थापन करण्यांत आलेलें खार जमीन विकास मंडळ, सार्वजनिक बांधकाम खात्याच्या कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखालीं खाऱ्या जमिनी लागवडीयोग्य करण्याचें कार्य करतें. समुद्राचें पाणी आंत शिरल्यामुळें ज्या जमिनी कृषियोग्य राहिल्या नाहींत त्या, नवीन बांध घालून आणि जुने मोडकळीस आलेले बांध दुरुस्त करून लागवडीयोग्य करण्याचें काम या योजनेनुसार हातीं घेण्यांत आलें आहे.

भूमिहीनांना जमीन

सरकारनें हातीं घेतलेलें दुसरें एक अतिशय महत्त्वाचें कार्य म्हणजे सरकारी पडित जमिनींचें भूमिहीनांना वाटप हें होय. हें कार्य द्रुतगतीनें पार पाडण्याच्या दृष्टीनें जमिनी देण्याबाबतची कार्यपद्धति अतिशय सोपी करण्यांत आली असून पश्चिम खानदेश, पूर्व खानदेश, नाशिक, पुणें, अहमदनगर व कोल्हापूर या सहा जिल्ह्यांत प्रारंभिक योजना सुरू करण्यांत आली आहे. या सहा जिल्ह्यांत गरजूंना सुमारें ६२,००० एकर जमीन वाटण्यांत आली असून त्याखेरीज त्यांना जमीन लागवडीयोग्य करण्यासाठीं बैल, अवजारें, रासायनिक खतें खरेदी करण्याकरितां आर्थिक सवलती व कर्जें देण्यांत आलीं आहेत.

पाणीपुरवठ्याच्या छोट्या योजना

पाणीपुरवठ्याच्या छोट्या योजनांमध्यें सार्वजनिक बांधकामखात्याकडून अमलांत आणण्यांत येणाऱ्या लहान पाटबंधाऱ्यांच्या व नलिकाकूपांच्या योजना, शेतकी खात्याकडून अमलांत

येणाऱ्या विहिरी, तळीं, रहाट, पर्शिअन व्हील्स इत्यादि बाबतच्या योजना आणि सहकारी संस्था-द्वारें अमलांत येणाऱ्या लिफ्ट इरिगेशन योजना यांचा समावेश होतो. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत या कामांसाठीं महाराष्ट्राकरितां ४६३·६१ लाख रुपयांची तरतूद असून १९५९–६० पर्यंतच्या चार वर्षांत ५२८·३५ लाख रुपये खर्च झाला आहे.

योजनेच्या चार वर्षांच्या अवधींत जुन्या मुंबई राज्यांत पाणीपुरवठ्याच्या अनेक छोट्या योजना पूर्ण करण्यांत आल्या आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत या कामासाठीं विदर्भासाठीं २४·२९ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. या भागांत १९५८–५९ च्या अखेरपर्यंत ४२ कामें पूर्ण करण्यांत आलीं असून १९५९–६० करितां २०·११ लाखांची तरतूद करण्यांत आली आहे. योजनेंत मराठवाड्याकरितां फक्त ८०·६८ लाख रुपयांची तरतूद आहे. योजनेच्या सुरुवातीच्या वर्षांत मराठवाड्यांत फक्त प्राथमिक कार्यच करणें शक्य झालें; कारण त्यावेळेपर्यंत पाटबंधाऱ्यांच्या छोट्या योजनांकरितां पाहणी करण्यांत आलेली नव्हती. १९५८–५९ मध्यें ८ योजनांचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला होता. या विभागाकरितां १९५९–६० सालासाठीं १९·९२ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

सार्वजनिक बांधकाम खात्याकडून हातीं घेण्यांत येणाऱ्या पाटबंधाऱ्यांच्या लहान योजनां-खेरीज, पंचवार्षिक योजनेमध्यें विहिरींची वाढ, रहाट, ऑईल इंजिन्स व पम्पिंग सेटस्, इलेक्ट्रिक मोटर्स यांचा पुरवठा करण्याचीहि तरतूद करण्यांत आली आहे. राज्याच्या निरनिराळ्या भागांत चालू असलेल्या तगाई संबंधीच्या योजनांचें एकसूत्रीकरण करण्यांत येऊन ती एकसूत्रित योजना १९५७-५८ पासून लागू करण्यांत आली. या योजनेनुसार नवीन विहीर बांधण्यासाठीं २,५०० रु. पर्यंत व जुनी विहीर दुरुस्त करण्याकरितां १,००० रु. पर्यंत कर्ज मिळूं शकतें. सरकारकडून देण्यांत येणाऱ्या कर्जाशिवाय, जमीन तारण बँकाहि या कामासाठीं कर्ज देतात.

बियाण्याची वाढ

शुद्ध आणि सुधारलेल्या बियाण्याचें किती महत्त्व आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं. वास्तविक तो शेतीचा खरा पाया आहे. सुधारलेल्या बियाण्यांच्या खास वाणांची वाढ करून त्यांचें शेत-कऱ्यांना वांटप करण्याची योजना राज्यांत गेल्या दहा वर्षांपासून सुरूं आहे. चालू वर्षी राज्यांतील सर्व म्हणजे २३३ तालुक्यांत बियाण्याची वाढ करण्याचीं केंद्रें राहतील व त्यांपैकीं बहुतेक केंद्रें शेतीचीं कामें सुरूं करतील आणि पुढील वर्षाच्या अखेरीस हीं सर्व केंद्रें हें कार्य हातीं घेतील.

शिक्षण

महाराष्ट्रांत ५ शेतकी महाविद्यालयें आहेत. तीं पुणें, नागपूर, धुळें, अकोला व परभणी येथें आहेत. याशिवाय राज्यांत अनेक शेतकी शाळा असून ह्या शाळा-कॉलेजांत शेतकी व इतर संबंधित विषय शिकविण्यांत येतात. अकोला व परभणी येथील महाविद्यालयें अलिकडेच स्थापन झालेलीं असून आतां तीं सर्व साधनांनीं सुसज्ज झालेलीं आहेत. धुळें येथील महाविद्यालय नुकतेंच जून, १९६० मध्यें उघडण्यांत आलें. पुणें व नागपूर येथील शेतकी महाविद्यालयांत आशियांतील सर्व भागांतून विद्यार्थी येतात. हीं महाविद्यालयें भारतांतील सर्वांत जुनीं विद्यालयें होत. या ठिकाणीं एम्. एस्सी. (कृषि) व पीएच्. डी. (कृषि) या पदवीपरीक्षांचेंहि शिक्षण देण्यांत येतें. राज्यांतील चारहि शेतकी महाविद्यालयांत नुकतेच विस्तार-कक्ष उघडण्यांत आले आहेत.

शेतकी शाळांचें मुख्य वैशिष्ट्य हें कीं, त्या ग्रामीण भागांत स्थापन करण्यांत आल्या प्रत्येक शाळेकडे ७५ एकर शेतजमीन असून विद्यार्थ्यांना सुधारलेल्या पद्धतीनें शेती करण्याचें देण्याकरितां त्या त्या जिल्ह्यांतील सर्व मुख्य पिकांची व्यापारी तत्त्वावर लागवड करण्यांत शाळांत शेतीचीं अवजारें दुरुस्त करण्याच्या दृष्टीनें सुतारकामाचें व लोहारकामाचें शिक्षण येतें. याशिवाय दूधदुभतें, कुक्कुट-पालन, मधमाशा पाळणें इत्यादि शेतीला पूरक होणाऱ्या सायांचेंहि शिक्षण देण्याची व्यवस्था या शाळांतून करण्यांत आली आहे. शेतकी शाळेचा अ क्रम दोन वर्षांचा असून सातवी इयत्ता पास झालेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यांत येतो. विद्या शिक्षणकालांत दरमहा २० रु. प्रमाणें विद्यावेतन देण्यांत येतें व शिक्षण फी आकारण्यांत येत वसतीगृहाची मोफत सोय व दोन गणवेश मोफत मिळतात.

सामूहिक विकासाच्या कार्यक्रमाच्या वाढीबरोबर अधिक ग्रामसेवक तयार करण्याचीहि भासूं लागली आहे. म्हणून आवश्यक तें शिक्षण देऊन ग्रामसेवक तयार करण्यासाठीं मां कोल्हापूर, सिंदेवाही, थारसा व परभणी येथें विकास प्रशिक्षण केंद्रें सुरू करण्यांत आलीं अ याखेरीज सिंदेवाही, अमरावती, परभणी व बुलढाणा येथें मूलोद्योग शिक्षण शाळा आहेत.

संशोधन

कृषिविज्ञानाच्या विविध शाखांतील मूलभूत त्याचप्रमाणें व्यावहारिक क्षेत्रांतील संशोधन योजनापूर्व कालापासून सुरू आहे. योजनाकाळांत संशोधनकेंद्रांत अधिक सोयी करून राज्यां संशोधनकार्याचा पाया बळकट करण्यांत आला आहे. पिकांबाबतच्या संशोधनाद्वारें अधिक चांग प्रतीच्या व अधिक उत्पन्न देणाऱ्या जाती तयार करण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. त्याचप्रम कृषिअर्थशास्त्रविषयक बाबींकडेहि लक्ष पुरविण्यांत येत असून ज्यांमुळे अधिक उत्पन्न होईल अ शेतीच्या पद्धति उत्क्रांत करण्यात येत आहेत. वनस्पति रोगनिदानशास्त्र, कृषिविषयक कीटकशा वनस्पतिशास्त्र, कृषिविषयक इंजिनिअरिंग, कृषिरसायनशास्त्र व भूविषयक पदार्थविज्ञान यासंबंधीं शाखांमध्यें आवश्यक साधनांनीं सुसज्ज प्रयोगशाळा स्थापन करण्यांत आल्या आहेत. कृषिअर्थशास्त्र आणि आंकडेशास्त्रज्ञ हेहि कृषिअर्थशास्त्र व आंकडेवारी यांबाबत संशोधन करीत आहेत.

राज्यांतील सर्व भागांमध्यें संशोधन केंद्रें व प्रायोगिक शेतें असून तेथें गहूं, ज्वारी, बाजर भात, कांदे, तेलबिया इत्यादि पिकांवरील रोग व कीड यांचा प्रतिबंध करण्यासंबंधी व या पिकांच दर्जा सुधारण्याबाबत संशोधन करण्यांत येतें. यांखेरीज संशोधनाच्या कार्यक्रमांतील एक नवीन बा म्हणजे नव्यानेंच ओलिताखालीं आणलेल्या क्षेत्रांत कोरडवाहू शेती ओलिताखालीं आणतांना निर्मा होण्याऱ्या प्रश्नांचा अभ्यास करण्याकरितां कृषिसंशोधन प्रात्यक्षिक केंद्रें स्थापन करण्यांत आल आहेत ही होय.

कांही खास योजना

जानेवारी १९५७ मध्यें भिवंडी (ठाणें), कर्जत–कोल्हापूर (कुलाबा), मावळ–मुळशी– भोर (पुणें) व करवीर (कोल्हापूर) या चार निवडक गटांमध्यें भाताच्या सघन शेतीची प्रारंभिक योजना सुरू करण्यांत येऊन १९५८–५९ मध्यें अहमदनगर, नाशिक, उत्तर सातारा, चांदा व भंडारा या जिल्ह्यांतील चार नवीन गटांना ती लागू करण्यांत आली. या योजनेखालीं पत नसलेल्या शेतकऱ्यांना सुद्धां सहकारी संस्थामार्फत कर्ज देण्यांत येतें व अमोनियम सल्फेट व सुपर फॉस्फेट यांसारख्या रासायनिक खतांचा त्वरित व पुरेसा पुरवठा करण्यांत येतो. या शेतकऱ्यांकडून

विक्रीयोग्य शिलकी माल विकत घेऊन त्याची रक्कम त्यांना दिलेल्या कर्जांत वळती करून घेण्यांत येते. ही योजना परिणामकारक होत असल्याचें आढळून आल्यामुळें ती नंतर ठाणें, कुलाबा, कोल्हापूर, रत्नागिरी, दक्षिण सातारा, भंडारा व चांदा या जिल्ह्यांतील आणखी अनेक गटांत सुरू करण्यांत आली.

पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेल्या इतर खास योजनांपैकीं फळपिकें व कापूस, ऊंस व तेलबिया यांच्या विकासाच्या योजना महत्त्वाच्या आहेत. राज्याच्या निरनिराळ्या भागांत फळ-पिकांबाबतच्या ज्या योजना चालू होत्या त्या एकत्रित करून एकसूत्रित अशी एक योजना राज्यांत १९५८–५९ पासून सुरू करण्यांत आली. फळपिकांची विस्तृत प्रमाणावर लागवड करण्यास व काजूच्या लागवडीस उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें, या योजनेखालीं शेतकऱ्यांना कर्जें देण्याची तरतूद करण्यांत आली आहे. तसेंच कापूस, ऊंस व तेलबिया यांच्या लागवडीसंबंधीच्या निरनिराळ्या बाबींबद्दल संशोधनाचीहि तरतूद या योजनेंत आहे. धान्योत्पादन वाढविण्यास अप्रत्यक्षपणें मदत करणारी दुसरी योजना म्हणजे पीकसंरक्षण योजना ही होय. या योजनेनुसार कीड व रोग यांपासून पिकांचें संरक्षण करण्यासाठीं उपाययोजना करण्यांत येतात. नासिक येथें एक प्रादेशिक पीकसंरक्षण डेपो स्थापन करण्यांत आला आहे. शेतकऱ्यांना पीकसंरक्षण साधनें आर्थिक सवलतीनें पुरविण्यांत येतात. डस्टर्स, स्प्रेअर्स, बियाण्याला औषध लावण्याचे ड्रम्स, कीटकनाशकें व जंतुनाशकें यांचा शेतकऱ्यांना पुरवठा करण्यासाठीं प्रत्येक तालुक्यांत त्यांचा सांठा ठेवण्यांत आला आहे. किडीचा अथवा एखाद्या रोगाचा मोठ्या प्रमाणावर उपद्रव होत असल्यास पिकांवर विमानांतून औषधें फवारण्यांत येतात.

जमीनसंरक्षण

बांधबंदस्तीद्वारें जमीनसंरक्षणाचा कार्यक्रम सुरुवातीला दुष्काळीं कामें म्हणून हातीं घेण्यांत आला होता. परंतु त्याचें महत्त्व व उपयुक्तता लक्षांत घेऊन आतां त्याचा शेतकी विकास कार्यक्रमांत कायमचा समावेश करण्यांत आला आहे. महाराष्ट्राच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जमीनसंरक्षणा-साठीं २८०·५५ लाख रुपयांची तरतूद असून पहिल्या चार वर्षांत ३२१·५९ लाख रुपये खर्च झाला आहे.

अधिक धान्य पिकवा मोहिमेच्या संदर्भात जमीन संरक्षण कार्यक्रमावर खास भर देण्यांत येत आहे. नापिक व लागवडीस योग्य पडित जमीन राज्यांत सर्वत्र विखुरलेली आहे. ह्या जमिनींच्या तसेंच कमी पावसाच्या भागांतील जमिनींच्या संरक्षणाच्या उपाययोजना त्वरित हातीं घेणें आवश्यक आहे. त्याशिवाय शेतकी उत्पादनांत पुरेशी वाढ होऊं शकणार नाहीं. बांध घातलेल्या जमिनींतील पिकांच्या आढाव्यावरून असें दिसून येतें कीं, बांधबंदस्तीमुळें एकरीं उत्पादनांत २० ते २५ टक्के कायमची वाढ होते. बांधामुळें, बांध घातलेल्या भागांतील विहिरींचें पाणीहि वाढतें व त्यामुळें या भागांत अधिक विहिरी खणून पिकांना पाणी देण्याचीहि शक्यता वाढते. शेतकऱ्याला बांध घालण्या-साठीं एकरीं फक्त ४० रु. खर्च येतो.

बांध घातल्यामुळें वरील फायदे होत असूनहि, सुरुवातीच्या काळांत शेतकऱ्यांचा या कार्य-क्रमाला विशेष पाठिंबा मिळाला नाहीं. शेतकऱ्यांनीं या कार्यक्रमांत उत्साहानें भाग घ्यावा म्हणून संपूर्ण कार्यक्रमाची पुनर्रचना करण्यांत आली व सरकारी अधिकाऱ्यांच्या साह्यानें बांधबंदस्तीचें काम करण्यासाठीं खेडें व तालुक्याच्या पातळीवर शेतकऱ्यांचे संघ स्थापन करण्यांत आले. हा प्रयोग अहमदनगर जिल्ह्याच्या कर्जत व पारनेर तालुक्यांत फार यशस्वी झाला. एका वर्षांत १½

लाख एकर जमिनीस बांध घालण्याचें उद्दिष्ट पूर्ण करण्यांत आलें. कर्जत व पारनेर तालुक्यांचें उदाहरण इतरांनाहि स्फूर्तिदायक ठरलें. पश्चिम खानदेशांतील धुळें व सिंदखेडा हे तालुके, पुणें जिल्ह्यांतील सिरूर तालुका, सोलापूर जिल्ह्यांतील उत्तर व दक्षिण सोलापूर हे तालुके, दक्षिण सातारा जिल्ह्यांतील जत तालुका यांनीं हजारों एकर जमिनीस बांध घालून प्रशंसनीय कार्य केलें आहे. उत्तर सोलापूर तालुक्यानें जुलै १९५९ मध्यें ११,१३५ एकर जमिनीस बांध घालण्याचें काम पूर्ण करून कर्जत-पारनेर तालुक्यांनाहि मागें टाकलें, तर सप्टेंबर १९५९ मध्यें १५,८३४ एकर जमिनीस बांध घालण्याचें काम पूर्ण करून जत तालुक्यानें त्याच्याहि पुढें मजल मारली.

मराठवाड्याच्या औरंगाबाद व नांदेड या जिल्ह्यांतील कोरडी व धुपलेली जमीन सुधारण्यासाठीं ५००० एकरांच्या क्षेत्रांत धूप-प्रतिबंधक व जंगल लावण्याचें काम हातीं घेण्यांत आलें असून त्यासाठीं अंदाजें ३.५६ लाख रुपये खर्च येईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत ७७,७५३ रु. खर्च करून २६६८ एकर क्षेत्रांत झाडें लावण्याचें काम व १९८३ एकर क्षेत्रांत पावसाळ्यापूर्वींचीं कामें करण्यांत आलीं. जून १९५९ पर्यंत १,५०५ एकर क्षेत्रांत झाडें लावण्यासाठीं व जुन्यांची निगा राखण्यासाठीं १५,०५५ रु. खर्च करण्यांत आला. १९५९-६० चा इष्टांक ४५० एकर होता. १९६०-६१ सालीं आणखी ७०० एकर जमिनींत झाडें लावण्यासाठीं ४९,२८० रु. ची तरतूद केली आहे.

याच प्रकारच्या योजना विदर्भांतहि हातीं घेण्यांत आल्या आहेत. योग्य अशा जागीं लहान धरणें व बांध घालून जमिनीची धूप थांबविण्याच्या योजनेमध्यें १,१०,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. या योजनेनुसार बांधण्यांत यावयाचीं ५ धरणें व १५ बांध यांपैकीं १ धरण, ३ बांध व २ तळीं यांचें काम पूर्ण झालें आहे. चालू वर्षी आणखी ३ बांध व २ बंधारे यांसाठीं तरतूद करण्यांत आली आहे. याशिवाय विदर्भांतील जंगलांतील १०५० एकर क्षेत्रांत झाडें लावण्यासाठीं २.१९ लाख रुपयांची तरतूद योजनेंत करण्यांत आली आहे. योजनेच्या सुरवातीच्या तीन वर्षांत या योजनेनुसार ६२५ एकरांत झाडें लावण्यांत आलीं व १०० एकर क्षेत्रांत पावसाळ्यापूर्वींचीं कामें करण्यांत आलीं. यासाठीं ३६,९६३ रु. खर्च करण्यांत आला असून चालू वर्षी ७०० एकरांत झाडें लावण्यासाठीं व ६०० एकरांत पावसाळ्यापूर्वींचीं कामें करण्यासाठीं ७४,१३१ रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

रत्नागिरी जिल्ह्यांतील २२,२३४ एकर क्षेत्रांत जंगलाची लागवड करण्याचा व जमिनीची धूप थांबविण्याचा विस्तृत कार्यक्रम हातीं घेण्यांत आला असून या कामासाठीं जमीन ताब्यांत घेतां यावी म्हणून १५ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. जमीन ताब्यांत घेण्याचें व तेथें जंगलाची लागवड करण्याचें काम एकाच वेळीं करण्यांत येत आहे.

जमिनीची धूप थांबविण्याच्या दृष्टीनें बांध घालतां येण्याजोग्या क्षेत्रांत संरक्षक उपाययोजनांना अतिशय महत्त्व आहे हें उघड आहे. १९६०-६१ मध्यें महाराष्ट्रांत ६.७५ लाख एकर क्षेत्रास बांध घालण्याचें ठरविलें आहे. राज्यांत सोलापूर, औरंगाबाद व केळापूर या तीन ठिकाणीं जमीन संरक्षणासंबंधीचें शिक्षण देणाऱ्या संस्था असून त्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतहि चालू राहतील.

दुग्धोत्पादन व दूधपुरवठा

पौष्टिक व शुद्ध दुधाचा आहारांत समावेश केल्यास जनतेच्या आरोग्यावर फार चांगला परिणाम होतो. म्हणून दूधदुभत्याच्या व्यवसायाला व शुद्ध दुधाच्या पुरवठ्यास उत्तेजन देणें हें

सरकारचें धोरण आहे. महाराष्ट्र राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत यासाठीं ४०७·९७ लाख रुपयांची तरतूद केली आहे. या रकमेपैकीं ३०० लाख रुपये मुंबई येथील दूधपुरवठा योजना पूर्ण करण्यासाठीं असून बाकीची राज्यांतील इतर महत्त्वाच्या शहरीं दूध योजना सुरू करण्यासाठीं व ग्रामीण दूध केंद्रें चालू करण्यासाठीं आहे.

मुंबई येथील दूध योजनेसाठीं पुढीलप्रमाणें खर्च करण्यांत येणार आहे :—

	रुपये
(१) आरे मिल्क कॉलनींतील कामें	११३ लाख
(२) वरळी येथील दुसरी डेअरी	१०० लाख
(३) दुसरी मिल्क कॉलनी योजना	७० लाख
(४) बोरिवली येथील कृष्णगिरी उपवनांतील कामें	१७ लाख
	रु. ३०० लाख

सबंध आशिया खंडांत एकमेव असलेल्या आरे मिल्क कॉलनींतील बहुतेक कामें पूर्ण झालीं आहेत अथवा पूर्ण होण्याच्या मार्गावर आहेत. या कार्यक्रमानुसार १९६०-६१ या वर्षी हातीं घेण्यांत आलेलें महत्त्वाचें काम म्हणजे वरळी येथील दूध योजना होय. या योजनेसाठीं ९६,००० चौ. यार्ड जागा संपादित करण्यांत आली आहे. इमारतीच्या बांधकामासहि सुरुवात झाली असून ती १९६० च्या अखेरीस पूर्ण होऊन एप्रिल १९६१ मध्यें दूध उत्पादन सुरू करतां येईल अशी अपेक्षा आहे. वरळी येथील ही योजना आरे येथील योजनेपेक्षां दीडपट मोठी राहणार असून त्यामुळें संपूर्ण मुंबई शहराची शुद्ध दुधाची मागणी पूर्ण करतां येईल अशी आशा आहे.

वरळी येथील डेअरीसाठीं मुंबईच्या आसपास रोजीं २०० ते ४०० मण दूध गोळा करणारीं दूध केंद्रें उघडण्याचाहि विचार आहे. या केंद्रांना दूधपुरवठा करण्यासाठीं नवीन दूधउत्पादक क्षेत्रांचा विकास करावा लागेल. त्या दृष्टीनें आटलेलीं जनावरें ठेवण्याच्या पालघर येथील केंद्राच्या आजूबाजूचे क्षेत्र विकसित करण्याचें ठरविलें आहे.

मुंबईच्या उपनगरांतील दुभत्याचीं २५,००० जनावरें ठेवण्यासाठीं मुंबईमध्यें आरे मिल्क कॉलनीसारखी दुसरी मिल्क कॉलनी सुरू करण्याचें ठरलें असून तीकरितां जागेची निवड करण्याबाबत विचार चालू आहे.

इतर दूध योजना

पुणें येथील दूध योजनाहि फार चांगल्या प्रकारें चालू असून रोजीं २५० मण दुधाचा पुरवठा करण्याचें उद्दिष्ट या वर्षी पूर्ण होऊं शकेल अशी आशा आहे. १९५९–६० मध्यें या योजनेनुसार घरीं दूध पोचविण्याचें कामहि हातीं घेण्यांत आलें आहे. नासिक, सोलापूर व कोल्हापूर येथें प्रारंभिक दूध योजना सुरू करण्यांत आल्या आहेत. धुळें व औरंगाबाद येथेंहि त्या सुरू करण्यांत येत आहेत. १९६०–६१ मध्यें नासिक, सोलापूर व कोल्हापूर येथील डेअऱ्यांसाठीं पक्क्या इमारती बांधण्याची तरतूद करण्यांत आली आहे. तसेंच मिरज येथें कृष्णा व्हॅली मिल्क प्रोजेक्ट या नांवाची एक नवीन योजना सुरू करण्यासंबंधी विचार चालू आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतर आजूबाजूच्या गांवाना, तसेंच मुंबई व पुणें या शहरांना १५०० ते २००० मण दुधाचा पुरवठा करतां येईल. ही योजना फार मोठी असल्यामुळें ती टप्प्याटप्प्यानें पूर्ण करण्यांत येईल. १९६०–६१ मध्यें हें काम हातीं घेण्यांत येईल.

नागपूर येथें १९५९–६० मध्यें सुरू करण्यांत आलेल्या योजनेनें द्रुतगतीनें प्रगति केलेली असून दुधाची मागणी सारखी वाढत आहे. डेअरीच्या पक्क्या इमारतीचें काम सुरू झालें आहे. या डेअरीचें काम सुरू झाल्यानंतर रोजीं २५० मण दूध पुरवठा करण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. अकोला व अमरावतीकरतांहि प्रारंभिक दूध योजना सुरू करण्याचें व डेअरीच्या पक्क्या इमारती बांधण्याचें ठरलें आहे.

गुरांची जोपासना

पशुसंवर्धनाच्या कार्यक्रमांत गुरांच्या वैद्यकीय मदतींत वाढ, गुरांच्या सांसर्गिक रोगांचा प्रतिबंध, सेरा व व्हॅक्सीन यांचें उत्पादन, गुरांची निपज व सुधारणा आणि तांत्रिक कार्यासाठीं कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण या गोष्टींचा समावेश होतो. महाराष्ट्राच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत यासाठीं १७४.७४ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली असून १९५६-६० या चार वर्षांच्या कालावधींत ५६.९९ लाख रुपये खर्च करण्यांत आले.

गुरांसाठीं वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याच्या योजनेनुसार विदर्भांत व मराठवाड्यांत, त्या भागाची गरज लक्षांत घेऊन, पूर्णपणें सुसज्ज असलेले गुरांचे दवाखाने तसेंच लहान शाखा उघडण्यांत आल्या आहेत. पश्चिम महाराष्ट्रांतील स्थानिक संस्थांच्या नियंत्रणाखालीं असलेले गुरांचे दवाखाने सरकारनें स्वतःकडे घेण्याचें ठरविलें असून त्याप्रमाणें अनेक दवाखाने सरकारनें आपल्या ताब्यांत घेतले आहेत. बुळकांडी रोगांचें निर्मूलन करण्याची योजना विदर्भ व मराठवाडा या भागांना लागू करण्यांत आली आहे.

गुरांच्या विकासासाठीं व त्यांचा दर्जा सुधारण्यासाठीं कृत्रिम गर्भधारणा, ग्रामकेंद्र योजना, पशुनिपज केंद्रें, वळू योजना, गोशाळा विकास योजना इत्यादि अनेक योजना हातीं घेण्यांत आल्या असून राज्यांतील सर्व भागांत त्यांचें कार्य चांगल्या प्रकारें सुरू आहे.

मच्छीमारी

महाराष्ट्र राज्याला सुमारें ४५० मैल लांबीचा समुद्रकिनारा असून या किनाऱ्यावर सागरी मच्छीमारी चांगल्या पुढारलेल्या अवस्थेंत चालू आहे. राज्यांतील नद्या, सरोवरें व तळीं यांत-सुद्धां माशांचा विपुल सांठा असून मत्स्योत्पादनाच्या वाढीस तेथें भरपूर वाव आहे.

ठाणें, बृहन्मुंबई, कुलाबा आणि रत्नागिरी या चार जिल्ह्यांत सुमारें ३०,७०० लोक समुद्रावर प्रत्यक्ष मच्छीमारी करतात. या धंद्यावर उपजीविका करणाऱ्यांची एकूण लोकसंख्या जवळजवळ १·३ लक्ष इतकी आहे. महाराष्ट्रांत समुद्रावर मच्छीमारी करणाऱ्या ९००० बोटी असून त्यांपैकीं ३९०० बोटींवर यंत्रें बसविलेलीं आहेत. यांपैकीं ११५७ बोटींवर गेल्या पंधरा वर्षांतच यंत्रें बसविण्यांत आलीं आहेत. महाराष्ट्रखेरीजकरून भारतांतील बाकीच्या सर्व राज्यामध्यें मच्छीमारी करण्यासाठीं यंत्रें बसविलेल्या एकूण जितक्या बोटी आहेत त्यापेक्षांहि ही संख्या मोठी आहे. महाराष्ट्रांतील कोळी प्रामुख्यानें चार पद्धतींचीं जाळीं वापरतात–डोल; वाघरा अगर बुडी; वावरी, दालडी किंवा जाळें; खांडा किंवा वावळ आणि रंपान. महाराष्ट्रांतील मच्छीमार प्रामुख्यानें खालील प्रकारचीं मासळी मिळवतात–बॉम्बे डक, ईल, घोल, दारा, मॅकेल, सार्डिन, सुरमई, मांडेली इत्यादि. याशिवाय भिंग-पाला, खेकडे, लॉबस्टर इत्यादि लहान प्रकार आहेतच. शार्क आणि राय जातीचे

मासेहि फार मोठ्या प्रमाणावर पकडण्यांत येतात आणि त्यांच्यापासून जीवनसत्त्वयुक्त अशीं तेलें काढण्यांत येतात. महाराष्ट्रांत समुद्रांतून दरसाल अंदाजे १·६ लक्ष टन मासे पकडण्यांत येतात.

अंतर्गत भागांतील मच्छीमारी

प्रामुख्यानें नागपूर, पुणें आणि औरंगाबाद या विभागांत अंतर्गत मच्छीमारीचा धंदा चालतो. सांठलेल्या पाण्याचें एकूण क्षेत्र ३,००,००० एकर आहे. यांत धरणांचाहि समावेश होतो. यापैकीं आतांपर्यंत ८०,००० एकर क्षेत्राची पाहणी करण्यांत आली असून त्यापैकीं ६५,००० एकर क्षेत्राचा मच्छीमारीच्या विकासासाठीं उपयोग करण्यांत येत आहे. या पाण्यांत माशांची पैदास करण्यासाठीं रोहू, मृगळ आणि काटला या बंगाली जातीच्या सुमारे ४० लाख बियाण्याचे मासे मच्छीमारी खात्याकडून दरवर्षी आयात करण्यांत येतात. गोड्या पाण्यांत या माशांची झपाट्यानें वाढ होते आणि दहा महिन्यांतच ते बाजारांत पाठविण्याइतके मोठे होतात. याशिवाय 'टिलापी', 'गौरामी' आणि 'पर्लस्पॉट' या जातीच्या माशांचीहि कांहीं तळ्यांत पैदास करण्यांत येते. तळीं व नद्यांमध्यें स्थानिक जातीचे मासेहि पकडण्यांत येतात. महाराष्ट्रांत गोड्या पाण्यांतील माशांची दरसाल पैदास सुमारे १०,००० टन इतकी आहे.

पंचवार्षिक योजनांखालील प्रगति

दोन पंचवार्षिक योजनांमध्यें महाराष्ट्रांत मच्छीमारीची खूपच प्रगति झाली आहे. सध्यां यंत्रें बसविलेल्या बोटी जवळ जवळ ११०० आहेत. या सर्व बोटी पूर्वी शिडांवर चालत असत. दोन पंचवार्षिक योजनांच्या काळांत या बोटींवर यंत्रें बसविण्यांत आलीं असून त्यामुळें समुद्रकिनाऱ्यापासून आंत दूरपर्यंत मासे पकडतां येतात आणि पूर्वीपेक्षां अधिक काळहि मच्छीमारी करतां येते. राज्य सरकारनें मदत आणि कर्जरूपानें दिलेल्या सढळ आर्थिक सहाय्यामुळेंच हें शक्य झालें आहे. गेल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्यें राज्य सरकारनें अशा प्रकारें सुमारे ८०,००,००० रु. ची मदत केली आहे. या काळांत सुमारे १०० मच्छीमार सहकारी संस्था स्थापन झाल्या. मच्छीमारीसाठीं लागणाऱ्या सर्व वस्तूंची विक्री करणें, किफायतशीर भावानें धान्य विकणें, माशांची ने-आण करण्यासाठीं मालमोटारींची वाहतूक करणें, मासळीची विक्री करणें वगैरे कामें या संस्था करतात. अलिकडे, बहुतेक संस्था बर्फाचे कारखाने चालवूं लागल्या असून त्यांतून माशांसाठीं शीतगृहाची सोय करण्यांत आली आहे. सरकारनें नेहमीं प्रोत्साहन देऊन आर्थिक मदत केल्यामुळें सहकारी चळवळीची मच्छीमारी उद्योगधंद्यांतही प्रगति झाली आहे. गेल्या बारा वर्षांत राज्य सरकारनें या सहकारी संस्थाना सुमारें ५०,००,००० रु. ची. आर्थिक मदत केली आहे. परदेशांतून मच्छीमारीसाठीं लागणारें साहित्य मागविण्यासाठीं फक्त मच्छीमार सहकारी संस्थांनाच परवाने देण्याची शिफारस करण्यांत येते. त्यामुळें या सहकारी संस्थांना, मरीन इंजिनें, जाळ्यांसाठीं लागणारा दोर, जाळ्यांसाठीं लागणारें नायलॉन वगैरे साहित्य अधिक प्रमाणांत आयात करतां आलें आणि त्यामुळें त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारली.

अंतर्गत भागांतील मासेमारीच्या बाबतींतहि गेल्या कांहीं वर्षांत प्रगति झाली असून तळ्यांतून आणि तलावांमधून मच्छीमारी करण्यांत येत आहे. यासाठीं या भागांत मच्छीमारी करणाऱ्यांना

६

माशांचीं पिलें वांटण्यांत येतात आणि तळ्यांतून तीं टाकण्यांत येऊन त्यांची जोपासना करण्यांत येते. समुद्रकिनाऱ्यापासून दूरच्या अंतर्गत भागांत मच्छीमारी करण्याची ही पद्धत मच्छीमार लोकांमध्यें वाढत्या प्रमाणांत लोकप्रिय होऊं लागली असून त्यामुळें त्यांची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासहि मदत होणार आहे.

मच्छीमारी धंद्यांतील अन्य उत्पादन

मासळी आणि खारावलेल्या माशांव्यतिरिक्त मच्छीमारीच्या उद्योगधंद्यांतून इतरहि अनेक पदार्थ मिळतात. जवळजवळ ६० टक्के मासे वाळविण्यांत येतात किंवा खारावण्यांत येतात. मच्छीमारींतील हें प्रमुख उत्पादन आहे. याशिवाय अन्य उत्पादनेंहि आहेत – उदाहरणार्थ, कोंबड्यांना खाण्यासाठीं उपयोगांत येणारें व खत म्हणून वापरण्यांत येणारें फिश मील, भोत, शार्क माशांपासून मिळणारें तेल, फोटोग्राफीच्या धंद्यांत उपयोगांत येणारें गोंदासारखें द्रव्य वगैरे. मच्छीमारी खात्याच्या सुसज्ज लॅबोरेटरींतून दरवर्षी सुमारें ५,००० गॅलन 'शार्क लिव्हर ऑईल' तयार करण्यांत येतें. या तेलापासूनच 'शार्कोव्हिट,' 'इलॅस्मिन पर्ल्स,' 'इलॅस्मिन लिक्विड' वगैरे औषधें तयार करण्यांत येतात आणि तीं लोकांना व इस्पितळांना विकण्यांत येतात. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जवळजवळ दुप्पट उत्पादन होईल या दृष्टीनें वरील कारखान्याची वाढ करण्याची योजना तयार करण्यांत येत आहे.

मच्छीमारी उद्योगधंद्यांतील या पदार्थांची परदेशांतहि बरीच निर्यात केली जाते आणि त्यामुळें दरवर्षी सुमारे ४० लाख रुपयांचें उत्पन्न होतें. विशिष्ट प्रकारच्या माशांना आणि खेकड्यांनाहि पाश्चिमात्य देशांत खूप मागणी असून त्यांचीहि निर्यात केली जाते. सध्या अशा माशांच्या निर्याती-पासून दरवर्षी सुमारे २ लक्ष रु. मिळतात. या उत्पन्नांत बरीच वाढ होईल असा अंदाज आहे.

मच्छीमारीचें शिक्षण देणाऱ्या शाळा

महाराष्ट्रांत जेथें सागरी मच्छीमारीचा धंदा चालतो अशा गांवांत मच्छीमारी खात्याकडून सहा शाळा चालविण्यांत येतात. या शाळांचा दर्जा वरच्या प्रायमरी शाळांच्या दर्जाइतका आहे. या शाळां-मधून नेहमीच्या विषयांव्यतिरिक्त सुतारकाम, जाळीं विणणें, मासे साठविण्याच्या पद्धति, यांचेंहि शिक्षण दिलें जातें. बृहन्मुंबईत वरसोवा येथें एक मच्छीमारी शिक्षणकेन्द्र चालविण्यांत येतें. या केन्द्रां-तून यांत्रिक पद्धतीच्या मच्छीमार बोटी चालविणें, सागरी पर्यटन वगैरे गोष्टी शिकविण्यांत येतात.

जंगलें

महाराष्ट्र राज्यांत विपुल जंगलसंपत्ति आहे. राज्यांतील एकूण जंगलक्षेत्र १५७·१५ लाख एकर म्हणजे राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २०·७ टक्के असून यापैकीं जवळजवळ $\frac{२}{३}$ म्हणजे १०२·६३

लाख एकर राखीव जंगल आहे. जंगलक्षेत्र सर्वच जिल्ह्यांत आढळतें; मात्र चांदा, अमरावती, यवतमाळ, भंडारा, नागपूर, पश्चिम खानदेश, ठाणें व नाशिक या जिल्ह्यांत दाट जंगलें आहेत.

जंगलवाढीच्या योजना

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत जंगलाकरितां १६०·४९ लाख रुपयांची तरतूद असून, योजनेच्या पहिल्या चार वर्षांच्या काळांत (१९५६–६०) ५८·५९ लाख रुपयांचा खर्च करण्यांत आला आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत, राज्याच्या जंगलसंपत्तीची वाढ करण्याकरितां समाविष्ट केलेल्या योजनांमध्यें १६,००० एकरांवर क्षेत्रांत चराऊ जमिनीचा विकास करणें व गवताळ जमिनी अथवा कुरणांच्या सभोवतीं २०० मैलांवर कांटेरी कुंपण घालणें या योजनांचा समावेश आहे. या योजनेची बरीच प्रगति झालेली असून चराऊ जमिनीच्या विकासाबाबत ठरविण्यांत आलेला इष्टांक बऱ्याच प्रमाणांत गांठण्यांत आला आहे.

जंगलसंपत्ति पद्धतशीरपणें काढण्यासाठीं कामाच्या नवीन योजना आखण्यांत आल्या आहेत व जुन्यांची फेरतपासणी करण्यांत येत आहे. या योजनेनुसार, विदर्भ प्रदेशाच्या चांदा व भंडारा जिल्ह्यांतील, सरकारने आपल्याकडे घेतलेल्या खाजगी मालकीच्या जंगलांसाठींहि कामाच्या योजना तयार करण्यांत आल्या आहेत.

निरनिराळ्या जंगल विकास योजनांत समाविष्ट करण्यांत आलेल्या क्षेत्रांसाठीं व विशेषतः जे जंगल कूप्स तोडण्यांत आले आहेत त्यांच्यासाठीं चांगल्या प्रतीचीं रोपटीं मिळावींत म्हणून रोपट्यांच्या बागा तयार करून त्यांची निगा राखण्यांत येते. त्याचप्रमाणें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें, विशेष उपयुक्त असणाऱ्या वृक्षप्रकारांची लागवड करण्याच्या विविध योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत. जंगलांची सीमा दर्शविण्यासाठीं घायपाताची लागवड करण्यांत येते; तसेंच दोर तयार करण्याच्या कामींही घायपाताचा चांगला उपयोग होतो. याशिवाय, साग, काजू, थांबू व औषधी झाडांची लागवड करण्यांत येते. लाखेसाठीं लागवड करणें, डिंक गोळा करणें, बिया वगैरे पासून तेल काढणें इत्यादि किरकोळ उद्योगधंद्यांच्या विकासाच्या योजना आंखण्यांत येत आहेत.

अभयस्थानें व उद्यानें

कोल्हापूर जिल्ह्यांतील राधानगरी येथें पशुपक्षांसाठीं एक अभयस्थान स्थापन करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें चांदा जिल्ह्यांत ताडोबा येथें जंगली पशुपक्षांना त्यांच्या नैसर्गिक वातावरणांत संरक्षित ठेवण्यासाठीं सुप्रसिद्ध ताडोबा सरोवराच्या सभोंवतालच्या ४५ चौरस मैलांच्या टापूंत एक राष्ट्रीय उद्यान तयार करण्यांत येत आहे.

अजंठा व वेरूळ येथील लेणीं पाहण्यासाठीं दरवर्षी अनेक प्रवासी येत असतात. अशा या जगप्रसिद्ध लेण्यांच्या भोंवतालच्या टेकड्यांवर झाडें लावण्याची एक खास योजना हातीं घेण्यांत आली

कोळसा इत्यादि किंमती खनिज पदार्थांचे साठेहि आहेत. राज्याच्या जलद औद्योगीकरणासाठीं या साठ्यांचा चांगलाच उपयोग होणार आहे.

औषधी झाडें

जंगलांत विपुलप्रमाणांत औषधी झाडें मिळतात. हिरडा, बेहडा आणि आवळा ही आपल्याला माहीत असलेलीं औषधी झाडें असून या झाडांच्या फळांपासून त्रिफळा चूर्ण तयार करण्यांत येते. अनेक विकारांवर हे चूर्ण गुणकारी आहे. आंवेवर बेल ही वनस्पती गुणकारी आहे. आपटा आणि टेंभुर्णीच्या पानांचा उपयोग विड्या तयार करण्यासाठीं होतो. या झाडांपासून सरकारला चांगलेंच उत्पन्न मिळतें. शिकेकाई आणि रिठ्यांचा साबणाप्रमाणें उपयोग होतो.

गुरांना खाण्याजोगीं झाडें जंगलांत सर्वत्र ठिकाणीं सांपडतात. दुष्काळांत अंजन, नीम आणि सिरिस या झाडांच्या पानांचा उपयोग चाऱ्यासारखा होतो.

शहरांतील मुख्य ठिकाणीं, सार्वजनिक उद्यानांत, करमणुकीच्या स्थळीं आणि सडकेच्या दोन्ही बाजूंनीं झाडें लावण्यासाठीं शोभेच्या आणि फुलांच्या झाडांची जी निवड करण्यांत येत असते त्यांत अशोक, क्वीन्स फ्लॉवर आणि गुलमोहर या झाडांचा समावेश होतो.

पाटबंधारे

महाराष्ट्र राज्यामध्यें एकूण ७६० लक्ष एकर विभागापैकीं ५२० लक्ष एकर जमीन लागवडी-योग्य आहे. नद्यांच्या बाबतींत हें राज्य भाग्यशाली असून राज्यांतील सर्व नद्यांतून मिळून दर वर्षाला सरासरी १३५ दशलक्ष एकर फूट पाणी वाहतें. यापैकीं सध्या केवळ शेकडा ३·५ पाण्याचाच उपयोग करून घेण्यांत येत असून, त्यामुळें सुमारें ८ लक्ष एकर जमिनीस पाटाचें पाणी मिळतें. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्यें जीं पाटबंधाऱ्याचीं पुष्कळशीं बांधकामें हातीं घेण्यांत आलीं आहेत तीं पूर्ण झाल्यानंतर आणि त्यांच्या पूर्ण विकासामुळें पाण्याचा हा वापर शेकडा १० पर्यंत वाढेल अशी अपेक्षा आहे.

ह्या राज्यांत विहिरींपासून जमिनीला पाटाचें पाणी देण्याची पद्धति मोठ्या प्रमाणांत प्रचारांत आहे. विहिरींच्या साहाय्यानें होणारें हें जलसिंचन हिशेबांत घेतां, पाटबंधाऱ्याखालील एकूण क्षेत्र सुमारें २६ लक्ष एकर होतें. परंतु हें क्षेत्र एकूण लागवडीयोग्य विभागाच्या फक्त शेकडा ५ आहे. यावरून हें दिसून येतें कीं महाराष्ट्राला जरी विपुल अशा जलसंपत्तीचें वरदान लाभलेलें असलें तरीसुद्धां, अजून या साधनांचा पूर्ण उपयोग करून घेण्यांत आलेला नाहीं आणि अन्नाच्या बाबतींतील स्वयंपूर्णता प्राप्त करून घेण्यासाठीं व उद्योगधंद्यांना पुरेशा विद्युत्‌शक्तीचा पुरवठा करण्यासाठीं नवीन राज्यामध्यें आणखी कितीतरी पाटबंधाऱ्याच्या व विद्युत्-पुरवठ्याच्या योजना हातीं घेण्याची आवश्यकता आहे.

पावसावर हवाला

राज्यांतील संपूर्ण प्रदेशाला मुख्यत्वेंकरून नैर्ऋत्येकडील मोसमी वाऱ्यापासून पाऊस मिळतो व हा पाऊस जून ते ऑक्टोबरपर्यंत पडतो. तथापि, राज्याच्या संपूर्ण प्रदेशांत हा पाऊस सर्वत्र सारखा

पडत नाहीं. पश्चिम किनाऱ्यांवर व पश्चिम घाटांत तो अतिशय जास्त म्हणजे १००″ ते २५०″ पडतो. नंतर त्याचें प्रमाण कमी कमी होत जातें व घाटाच्या पूर्वेला सुमारें १०० ते १५० मैलांच्या अंतरांतच तो २०″ ते २५″ पडतो. नंतर आणखी पूर्वेकडे त्याचें प्रमाण सरासरीनें थोडेंसें वाढतें. राज्याच्या ईशान्य भागांत सरासरीनें ५०″ पाऊस पडतो. कारण या भागाला ईशान्येकडील मोसमी वाऱ्यांपासूनही थोडा पाऊस मिळतो. पावसाळा हंगामी असल्यामुळें राज्यांतील नद्या फक्त मोसमी वाऱ्यांच्या हंगामांत वहातात व नंतर उन्हाळ्यांत त्या जवळपास कोरड्या होतात.

पूर्वेला घाटालगतच्या प्रदेशांत वर्षाला २०″ ते २५″ पर्यंतच पाऊस पडतो. हा पाऊस सर्वत्र सारखा पडत नाहीं; एवढेंच नव्हे, तर तो अतिशय अनिश्चित असल्यामुळें या भागांत तुटवड्याची व दुष्काळी परिस्थिति निर्माण होते. यामुळें केवळ पावसावर करण्यांत येणारी लागवड अतिशय अनिश्चित होते व म्हणून या भागांत पाटबंधाऱ्यांची अतिशय आवश्यकता आहे. तथापि, या भागांतून वहाणाऱ्या नद्या, त्या पश्चिम घाटाच्या जास्त पाऊस पडणाऱ्या प्रदेशांत उगम पावत असल्यामुळें, पावसाळ्यांत विपुल पाणी वाहून नेतात. पावसाळ्यांत या नद्यांमध्यें असलेल्या पाण्याचा कांहीं भाग कृत्रिमरीत्या सांठवून ठेवण्यांत येतो व पाऊस नसणाऱ्या महिन्यांमध्यें त्याचा सिंचनासाठीं उपयोग करण्यांत येतो.

महाराष्ट्र राज्याची जलसंपत्ति ज्यांत समाविष्ट झालेली आहे अशा मुख्य नद्या खालीलप्रमाणें :—

कृष्णा, व तिला मिळणाऱ्या महत्त्वाच्या नद्या म्हणजे कोयना, नीरा, मुळा-मुठा, भीमा, घोड व कुकडी;

गोदावरी, व तिला मिळणाऱ्या महत्त्वाच्या नद्या म्हणजे मुळा, प्रवरा, दारणा, पूर्णा (मराठवाड्यामध्यें), मांजरा, मानार व विदर्भ प्रदेशांतून वाहून गोदावरीला मिळणाऱ्या मोठाल्या नद्या म्हणजे पैनगंगा, वर्धा, पेंच, वैनगंगा इ.;

तापी व तिला मिळणाऱ्या महत्त्वाच्या नद्या म्हणजे पूर्णा (विदर्भांत), वाघूर, गिरणा, पांझरा, बोरी व बुरे आणि अरुणावति;

कोंकणांतील पश्चिमेकडे वहाणाऱ्या नद्या.

कृष्णा नदीचें खोरें

कृष्णा नदीचा उगम पश्चिम घाटांत होतो. ९७,००० चौरस मैलांच्या एकूण विभागापैकीं सुमारें २७,००० चौरस मैल विभाग महाराष्ट्रांत मोडतो. नदीच्या उगमाजवळील पाणलोटाचा भाग हा जास्त पाऊस पडणाऱ्या पट्ट्यांत वसलेला आहे. या पट्ट्यांत मान्सूनच्या चार महिन्यांमध्यें २७० इंचांपर्यंतही पाऊस पडतो. या राज्यांतील या नदीच्या खोऱ्यामध्यें नदीच्या पाण्याच्या शेकडा ७५ प्रमाणें २१·७ दशलक्ष एकर फूट पाण्याचा हमखास उपयोग करतां येणें शक्य आहे. परंतु त्यापैकीं केवळ ३ दशलक्ष एकर फूट पाण्याचा पाटबंधाऱ्यांसाठीं उपयोग करण्यांत येतो व

त्याच्या साहाय्यानें एकूण १५० लक्ष एकर लागवडीयोग्य जमिनीपैकीं फक्त ४ लक्ष एकर क्षेत्राला पाटाचें पाणी देण्यांत येतें.

या खोऱ्यांतील पाटबंधाऱ्यांच्या जुन्या प्रमुख कामांपैकीं मुठा कालवे पद्धति हें एक काम आहे. १८७४–७५ मध्यें ही पद्धति अंमलांत आली. खडकवासला येथील जलाशय व कालवे ६५ लक्ष रुपये खर्चून बांधण्यांत आले. अगदीं खालच्या पायाच्या पातळीपासून धरणाची उंची सुमारें ११० फूट आहे. तलावाची पाणी सांठविण्याची क्षमता ३,०९१ दशलक्ष घनफूट आहे. सांठविलेल्या पाण्यापैकीं बराचसा भाग पुणें शहर व पुणें लष्कर विभाग आणि खडकी यांना पाणी-पुरवठा करण्यासाठीं उपयोगांत आणला जातो. उरलेलें पाणी पाटबंधाऱ्यासाठीं उपयोगांत आणलें जातें व त्यामुळें १६,६०० एकर जमिनीला पाटाचें पाणी मिळतें.

या खोऱ्यांतील दुसरें एक पाटबंधाऱ्याचें महत्त्वाचें काम म्हटलें म्हणजे भाटघर येथील लॉईड धरण हें होय. १९२८ मध्यें जेव्हां हें बांधकाम पूर्ण झालें तेव्हां देशांतील तें सर्वांत मोठें दगडी धरण आहे असें मानण्यांत येत होतें. अगदीं खालच्या पायाच्या पातळीपासून धरणाची जास्तींत जास्त उंची १९० फूट आहे. पाणी सोडण्याचे दरवाजे इ. धरून धरणाची लांबी ५,३३३ फूट आहे व धरणाच्या जलाशयाची पाणी सांठविण्याची क्षमता २४,१९८ दशलक्ष घनफूट आहे. या धरणांत २१$\frac{३}{४}$ दशलक्ष घनफूट दगडी बांधकामाचा समावेश होतो. राईट बँक कॅनॉलसह हें धरण १७२ लक्ष रु. खर्चून बांधण्यांत आलें. जुन्या धरणाऐवजीं हें नवीन धरण बांधण्यांत आलें. कारण जुन्या धरणाच्या जलाशयाची पाणी सांठविण्याची क्षमता फक्त ५,३१३ दशलक्ष घनफूट होती व तें १८९२ मध्यें पूर्ण झालें होतें. लेफ्ट बँक कॅनालखालील पाटबंधाऱ्याच्या क्षेत्राला पाटाचें पाणी पुरविण्यासाठीं हें धरण बांधण्यांत आलें. लॉईड धरणानें अडवून सांठविलेलें पाणी हें नीरा राईट व नीरा लेफ्ट बँक कालव्यांत वापरण्यांत येतें. धरणाच्या पूर्वेला सुमारें १७ मैलांवरील वीर येथें बांधलेल्या धरणांतून हें पाणी घेण्यांत येतें. या दोन कालव्यांमुळें सुमारें १,७०,००० एकर क्षेत्राला पाटाचें पाणी मिळतें. या क्षेत्रांत उंसासारखीं रोख पैसा देणारीं पिकें, फळबागा, नेहमीं वाढणारें गवत आणि गहूं, ज्वारी, बाजरी व हरभरा यासारखीं हंगामीं पिकें यांचा समावेश होतो.

कोयना प्रकल्प

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत कोयना जल-विद्युत् प्रकल्प हातीं घेण्यांत आला व सध्यां त्याचें काम चालू आहे. या प्रकल्पाची क्षमता पहिल्या टप्प्यांत शेकडा ६० लोड-फॅक्टरवर २,४०,००० किलोवॅट असून, दुसऱ्या टप्प्यांत ती ४,८०,००० किलोवॅटपर्यंत वाढविण्यांत येईल. अगदीं सरतेशेवटीं ही क्षमता ५,७०,००० किलोवॅटपर्यंत वाढविण्यांत येईल. या विभागाचा औद्योगिक विकास झपाट्यानें होईल अशी अपेक्षा असल्यामुळें पहिल्या टप्प्याला जोडूनच दुसऱ्या व तिसऱ्या टप्प्याचें काम हातीं घेण्यांत येण्याचा संभव आहे. विकासाच्या दुसऱ्या टप्प्यांत पाटबंधाऱ्यांची योजनाही अंतर्भूत असून सांठविण्यांत येणाऱ्या एकूण ७३,००० दशलक्ष घनफूट पाण्यापैकीं १६,००० दशलक्ष घनफूट पाणी पाटबंधाऱ्यांसाठीं राखून ठेवण्याची योजना आहे. अगदीं खालच्या पायाच्या पातळीपासून धरणाची उंची जेव्हां ३१० फुटांपर्यंत वाढविण्यांत येईल तेव्हां ७३,००० दशलक्ष घनफूट पाणी सांठवितां येईल अशी अपेक्षा आहे. तिसऱ्या टप्प्यांत जलाशयाची आणखी वाढ करण्याचें योजिलें असून त्यामुळे खोडशी बंधाऱ्याखालीं कृष्णेच्या खोऱ्यांत पाटबंधाऱ्यांसाठीं दरवर्षीं

४३,००० दशलक्ष घनफूट पाण्याचा उपयोग करतां येईल. पाटबंधाऱ्यांसाठीं उपलब्ध होणाऱ्या पाण्यामुळें महाराष्ट्रांतल्या उत्तर सातारा व दक्षिण सातारा या जिल्ह्यांतील एकूण १·६१ लक्ष एकर जमिनीचा फायदा होईल अशी अपेक्षा आहे. या जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणावर ऊंस पिकविण्यांत येतो.

राधानगरी प्रकल्प – हा मुख्यत्त्वेंकरून जलविद्युत् प्रकल्प असून भोगावती नदीवर ७,२२५ दशलक्ष घनफूट पाणी त्यासाठीं सांठविण्यांत येणार आहे. येथून ४,५०० किलोवॅट विजेची निर्मिति होईल. सोडण्यांत येणारें पाणी नदीच्या खालच्या बाजूस अनेक ठिकाणीं पाटबंधाऱ्यांसाठीं उपयोगांत आणण्यांत येतें. या ठिकाणीं लहान लहान धरणें बांधण्यांत आलीं असून लिफ्ट-इरिगेशनच्या पद्धतीनें जमिनीला पाटाचें पाणी देण्यांत येतें. १५,००० एकर उंसाच्या पिकाखालील जमिनीला पाणी पुरविण्यांत येत असून, हा विभाग १८,००० एकरांपर्यंत वाढवितां येणें शक्य आहे.

घोड प्रकल्प – पुणें जिल्ह्याच्या सिरूर तालुक्यांतील चिंचणी येथें घोड नदीवर मातीचें धरण बांधण्याची ही योजना आहे. येथून दोन कालवे काढण्यांत येतील. लेफ्ट बँक कॅनॉलमुळें ४३,६०० एकर जमीन भिजेल व राईट बँक कॅनॉलमुळें १७,२०० एकर जमीन भिजेल. धरणाच्या जागेवरील पाणलोटाचें क्षेत्र १,४०० चौरस मैल आहे. १९५४ मध्यें हें काम सुरू झालें व तें बहुतांशीं पूर्ण झालें आहे. फक्त पाणी सोडण्याचे दरवाजे बसविणें व राईट बँक कॅनॉल बांधणें हीं कामें सध्यां चालू आहेत. या योजनेचा एकूण खर्च रु. ४·८ कोटी आहे.

इतर प्रकल्प

वीर धरण प्रकल्प – नीरा खोऱ्यांतील जलसंपत्तीचा सर्वंकष विकास करण्याच्या योजनेचा हा प्रकल्प म्हणजे एक भाग आहे. लॉईड धरण बांधल्यानंतर नीरा कालवे पद्धतीवरील पाटबंधाऱ्यांचा झपाट्यानें विकास झाला व सध्याच्या जलाशयाच्या क्षमतेपेक्षां पाण्यासाठीं होणारी मागणी आतां कितीतरी वाढली आहे. ही मागणी भागविण्यासाठीं नीरा नदीवरील सध्यांच्या धरणाच्या खालीं वीर येथें वीर धरण प्रकल्पाचें काम हातीं घेण्यांत आलें आहे. हें धरण पूर्ण झाल्यानंतर ९,८३५ दशलक्ष घनफूट पाण्याचा सांठा करतां येईल व सध्यांच्या नीरा राईट बँक कॅनॉल पद्धतीखालील पाटबंधाऱ्याच्या क्षेत्रांत त्यामुळें ६,६०० एकरांनीं वाढ होईल. या प्रकल्पाला रु. ५·४ कोटी खर्च येईल असा अंदाज आहे.

खडकवासला येथील जलाशयांतील पाण्याचा कांहीं भाग पुणें शहरास पाणीपुरवठा करण्याकडे उपयोगांत आणण्यांत येतो. परंतु पाण्यासाठीं सतत वाढती मागणी होत असल्यामुळें मुठा कालवे पद्धतीखालील पाटबंधाऱ्यांमध्यें बरीच कपात करावी लागली. दुष्काळी परिस्थिति नेहमीं निर्माण होणाऱ्या या प्रदेशांतील जमिनींना पूर्ववत् पाणी पुरविण्यासाठीं व पाटबंधाऱ्यांखालील विभागांत वाढ करण्यासाठीं वरसगांव व पानशेत येथें दोन मातीचीं धरणें बांधण्याचा एक प्रकल्प आंखण्यांत आला. मुठा नदीला मिळणाऱ्या दोन नद्यांवर हीं दोन धरणें बांधण्यांत येणार आहेत. सध्यांचें खडकवासला धरण मुठा नदीवर आहे. नवीन धरणाच्या जागा सध्यांच्या खडकवासला धरणाच्या पलीकडे वरच्या बाजूस १३ मैलांवर आहेत. पानशेत धरणाचें काम अगोदरच सुरू झालें असून, त्याची बरीच प्रगति झाली आहे. या धरणांमुळें निर्माण होणारे जलाशय (रिझरव्हॉयर्स) प्रत्येकीं ८,००० दशलक्ष घनफूट क्षमतेचे राहातील. या दोन जलशयांतून उपलब्ध

होणाऱ्या पाण्यामुळें ८०,००० एकर जमिनीस पाटाचे पाणी मिळेल. तथापि, आणखी तपशीलवार पहाणीवरून असें आढळून आलें आहे कीं, या जलाशयांतून सुमारें ३६,००० दशलक्ष घनफूट पाण्याचा उपयोग करतां येईल. म्हणून या जलाशयांची क्षमता अनुक्रमें ११,००० दशलक्ष घनफूट व १३,००० दशलक्ष घनफूट वाढविण्याचें योजिलें आहे. दुसऱ्या टप्प्यांमध्यें हा विकास करण्यांत येणार आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें वारणा व कर्नूर हे आणखी दोन लहान प्रकल्प समाविष्ट आहेत.

पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सुरू करण्यांत आलेल्या मोठ्या, मध्यम व लहान प्रकल्पांचा पूर्ण विकास झाल्यानंतर या खोऱ्यांतील पाण्याचा उपयोग आणखी ३ दशलक्ष एकर फुटांनीं वाढेल व अशा रीतीनें एकूण ६ दशलक्ष एकर फूट पाण्याचा उपयोग करण्यांत येईल अशी अपेक्षा आहे. या प्रकल्पांमुळें पाटबंधाऱ्याखालीं येणारी अधिक जमीन ४ लक्ष एकर राहील अशी अपेक्षा आहे. या खोऱ्यांतील जल-संपत्तीचा आणखी उपयोग करण्यासाठीं विस्तृत वाव असून कृष्णा खोऱ्याकरितां तयार केलेल्या मास्टर प्लॅनवरून असें दिसून येतें कीं, या खोऱ्यांतील संपूर्ण पाणीपुरवठ्याचा, राज्यामध्यें असा निश्चित उपयोग करतां येण्यासाठीं वापर करतां येणें शक्य आहे. हें पाणी दुष्काळी व तुटवड्याच्या विभागांना उपयुक्त ठरेल. निरनिराळ्या उपनद्यांवर धरणाच्या योग्य अनेक जागा उपलब्ध असून त्यांपैकीं कांहींबाबत पाहणीचें काम अगोदरच चालू आहे. ज्या कांहीं जागांवर योजना सुरू करण्याचें योजिलें आहे त्या जागा खालीलप्रमाणें :—

नीरा नदीवर नातंवी, गुंजवणी नदीवर माहोरी, भीमा नदीवर चास कमान, घोड नदीवर महाळुंगी, कुकडी नदीवर माणिकडोह, कोयना नदीवर पाडळी इत्यादि.

गोदावरी खोरें

गोदावरी नदीचा उगम त्र्यंबकेश्वर येथें होतो. त्र्यंबकेश्वर हें ठिकाण नाशिक जिल्ह्यांतील सुप्रसिद्ध यात्रेचें क्षेत्र आहे. गोदावरी नदी महाराष्ट्र व आंध्र राज्यांतून वाहात जाऊन सरतेशेवटीं बंगालच्या उपसागराला मिळते. तिच्या पाणलोटाचें एकूण क्षेत्र १,१६,३०० चौ. मैल इतकें असून यापैकीं ६०,००० चौ. मैल महाराष्ट्र राज्यांत आहे. नदीपासून दर वर्षाला ७५ टक्के म्हणजे ४५·४४ दशलक्ष एकर फूट हमखास पाण्याचा पुरवठा या खोऱ्यामध्यें होतो. परंतु त्यापैकीं प्रत्यक्षतः फक्त १·५ दशलक्ष एकर फूट पाणीच उपयोगांत आणण्यांत येत असून त्यामुळें ३,२५,००० एकर जमीन ओलिताखालीं येते. अतिशय पाऊस पडणाऱ्या विभागांत जरी ही नदी उगम पावत असली तरी तीमध्यें पावसाळ्यांतील फक्त ४ महिन्यांतच भरपूर पाणी असतें. वर्षाच्या उरलेल्या काळांत ती बहुतांशीं कोरडी पडते. ज्या प्रदेशांतून ही नदी वहाते तो बहुतेक प्रदेश कमी पावसाचा असून त्यामुळें पाण्याचा हमखास पुरवठा होऊं शकत नाहीं. याचा परिणाम असा कीं, या खोऱ्यांतील बऱ्याच जिल्ह्यांमध्यें अधूनमधून दुष्काळ पडतो. फक्त जेथें पाटबंधाऱ्याच्या सोयी आहेत अशा भागांत दुष्काळी परिस्थिति निर्माण होत नाहीं.

दुष्काळ पडणाऱ्या विभागांचें संरक्षण करण्याच्या दृष्टीनें गोदावरी कालवे प्रकल्पाचें काम हातीं घेण्यांत आलें. हें काम १९०७ मध्यें सुरू झालें आणि १ कोटी रुपये खर्चून तें १९१५–१६ मध्यें पूर्ण करण्यांत आलें. या कालव्यांना लेक–बीले या नांवानें संबोधण्यांत येणाऱ्या जलाशयांतून

पाण्याचा पुरवठा होतो. हा जलाशय गोदावरीला मिळणाऱ्या दारणा नदीवर असून त्याचें ठिकाण नाशिकपासून सुमारें २० मैलांवर आहे. कालव्यामध्यें पाण्याचा ओघ वळविण्यासाठीं गोदावरीवर नांदूर–मधमेश्वर येथें एक धरण बांधण्यांत आलें आहे. या कालव्यामुळें मिश्र पिकें काढणाऱ्या सुमारें ६० हजार एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होतो. या पिकांमध्यें उंसाचें पीक मोठ्या प्रमाणांवर काढण्यांत येतें.

प्रवरा नदीवरील भंडारदरा येथील विल्सन धरणामुळें ११,२०० दशलक्ष घनफूट पाण्याचा सांठा तयार होतो. नदीच्या पात्रांतील सर्वांत खोल जागेपासून वर धरणाची उंची २७० फूट आहे. धरण बांधण्यांत आलें त्यावेळीं भारतांतील सर्वांत उंच धरण म्हणून तें ओळखण्यांत येत असे. या जलाशयांतून दोन कालव्यांना पाण्याचा पुरवठा होतो. त्याच्या खालील बाजूस ५३ मैलांवर ओझर येथें बांधलेल्या धरणांतून हें पाणी घेण्यांत येतें. या कालव्यांमुळें मिश्र पिकांखालील ८० हजार एकर जमिनीला पाण्याचा पुरवठा होतो. दक्षिणेंतील इतर प्रमुख पाटबंधाऱ्यांच्या कालवे-पद्धतीप्रमाणेंच कालव्याची ही योजना आहे.

गोदावरीला मिळणाऱ्या उपनद्या पैनगंगा, वर्धा, वैनगंगा, पेंच व कन्हान या असून त्या विदर्भ प्रदेशांतून वाहात जातात. राज्याच्या या भागांतील पाटबंधाऱ्याखालील प्रदेश १·२७ लक्ष एकर आहे आणि हा प्रदेश मुख्यत्त्वेंकरून भंडारा व चांदा जिल्ह्यांत आहे. या विभागांत पाटबंधाऱ्यासाठीं कांहीं तळीं असून, त्यांपैकीं रामटेक, चांदपूर, चोरखमारा, बादलकासा, खैरबांदा, असोलमेंढा, घोडाझरी व नळेश्वर येथील तलाव महत्त्वाचे आहेत. या तलावांतील पाण्याच्या साहाय्यानें मुख्यत्त्वेंकरून तांदूळ व कापूस हीं पिकें काढण्यांत येतात व त्याहून थोड्या कमी प्रमाणांत ज्वारीचेंही पीक काढण्यांत येतें. नागपूर जिल्ह्यांत चांगलीं फळपिकें काढण्यांत येतात. नागपूर जिल्हा विशेषेंकरून उत्कृष्ट संत्र्यांबद्दल प्रसिद्ध आहे.

गोदावरी कालवे पद्धतीवरील पाटबंधाऱ्यांचा विकास फार जलद गतीनें झाला आणि दारणा धरण बांधल्यानंतरच्या २० वर्षांत पाणी सांठविण्यासाठीं जादा जलाशय बांधण्याची आवश्यकता भासूं लागली. तथापि, गोदावरी कालव्यांना जादा पाण्याचा पुरवठा करण्याच्या दृष्टीनें गंगापूर प्रकल्पाचें काम स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच हातीं घेण्यांत आलें. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत ५,५०० दशलक्ष घनफूट पाणी सांठवितां येईल एवढा जलाशय बांधण्यांत आला. पाणी सोडण्याच्या सर्वांत उंच धरणावर दरवाजे बसवून पाणी सांठविण्याची ही क्षमता ७,२०० दशलक्ष घनफुटांपर्यंत वाढविण्याची एक योजनाहि तयार आहे. नाशिक जिल्ह्याला पाटबंधाऱ्याचा फायदा देण्यासाठीं जलाशयापासून दोन सरळ कालवेहि बांधण्यांत आले आहेत. प्रकल्पाचें काम पूर्ण झाल्यानंतर, ६४,००० एकर जादा जमीन पाटबंधाऱ्यांखालीं येईल.

मुळा व इतर प्रकल्प

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत हातीं घेण्यांत आलेल्या मुळा खोरें विकास प्रकल्पांत ३०,००० दशलक्ष घनफूट पाणी सांठविण्याची योजना असून या जलाशयाच्या साहाय्यानें मिश्र पिकांखालील १,३२,००० एकर जमिनीला पाटाचें पाणी देतां येईल. सध्या तयार केलेल्या आराखड्यानुसार यासाठीं एक कालवा बांधण्यांत येणार असून त्याच्या सुरुवातीची पाणीपुरवठ्याची क्षमता १,३५०

क्युसेक्स एवढी राहील. या कालव्याची लांबी सुमारें ४४ मैल ठेवण्याचें योजिलें आहे. या कालव्यांतील पाण्याचा फायदा ज्या भागाला मिळणार आहे तो भाग नेहमीं टंचाई असणारा व दुष्काळी परिस्थितीचा आहे. म्हणून शक्य तेवढ्या जास्तींत जास्त प्रदेशाला संरक्षण देण्याच्या दृष्टीनें पिकें घेण्याच्या पद्धतींत सुधारणा करण्याचें योजिलें आहे. या पद्धतीमुळें या कालव्याच्याद्वारें मुख्यतः हंगामांत पिकांना पाणी देतां येईल व तें सततच्या पिकांपैकीं शेंकडा ११ पिकांना मिळेल. मूळच्या प्रकल्पांत शेंकडा २० पिकांना पाणी देण्याची योजना होती. सुमारें १,९५,००० एकर जमिनीला पाटाचें पाणी देणें हें या सुधारलेल्या प्रकल्पाचें उद्दिष्ट असून, त्यासाठीं कालव्याच्या सुरुवातीस पाणीपुरवठ्याची त्याची क्षमता २,००० क्युसेक्सनीं वाढविण्याचें योजिलें आहे. तसेंच कालव्यांची लांबीही ९० मैलांनीं वाढविण्यांत येणार आहे. सध्यां ह्या योजनांवर विचार चालू आहे.

पूर्णा नदी सातमाळा रांगांमधील अजंठा टेकड्यांत उगम पावते आणि मराठवाडा प्रदेशांतून वाहात जाऊन सरतेशेवटीं गोदावरीला मिळते. पूर्णेच्या खोऱ्यांत पाटबंधाऱ्याचा प्रकल्प हातीं घेण्या-साठीं पाहणीचीं कामें पूर्वीच्या हैद्राबाद सरकारनें १९२१ मध्यें सुरू केलीं. या विभागांतील नेहमीं निर्माण होणाऱ्या तीव्र दुष्काळी परिस्थितीला तोंड देण्याच्या दृष्टीनें ही प्रकल्पाची योजना होती. अंतिम पाहणी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत करण्यांत आली आणि अंतिम प्रकल्प दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत हातीं घेण्यांत आला. या प्रकल्पामध्यें ३४,१२९ द. ल. घनफूट एवढें पाणी सांठवितां येईल या दृष्टीनें येलदरी येथें एक धरण बांधण्यांत येणार असून या पाण्याचा उपयोग पाटबंधाऱ्यासाठीं व जल-विद्युत् निर्मितीसाठीं करण्यांत येईल. पाण्याचा ओघ वळविणारें आणखी एक धरण येलदरीच्या खालच्या बाजूस ४० मैलांवर सिद्धेश्वर येथें बांधण्यांत येईल. या जलाशयांतून कालवे काढण्यांत येतील आणि त्यामुळें १,५२,००० एकर जमिनीला पाटाचें पाणी देतां येईल. येलदरी धरणा जवळील विद्युत्–निर्मितिगृह सुमारें १५,००० कि. वॅ. विजेची निर्मिति करील.

या विभागांत आणखीहि एक महत्त्वाचा प्रकल्प असून त्याला मानार प्रकल्प असें म्हणतात. या प्रकल्पान्वयें पहिल्या टप्प्यांत २,४०० द. ल. घनफूट पाणी सांठविण्याची योजना असून त्यामुळें २५ हजार एकर जमिनीला पाणीपुरवठा होईल. दुसऱ्या टप्प्यामध्यें पाणी सांठविणाऱ्या जला-शयाची क्षमता ४,९०० द. ल. घनफुटांपर्यंत वाढविण्यांत येईल व त्यामुळें ४१,००० एकर क्षेत्राला पाटबंधाऱ्यांचा फायदा मिळेल. याशिवाय या विभागांत २४ मध्यम आकाराच्या प्रकल्पांचें बांधकाम चालू असून पूर्ण विकास झाल्यानंतर व त्यांचें बांधकाम पूर्ण झाल्यानंतर १ लक्ष एकर जमीन त्यामुळें पाटबंधाऱ्यांखालीं येईल अशी अपेक्षा आहे.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें विदर्भ विभागांतील बोर, दिना, वाघ व इतियाडोह हे प्रकल्प समाविष्ट करण्यांत आले आहेत. पहिल्या प्रकल्पाचें काम अगोदरच सुरू झालें असून सध्यां तें झपाट्यानें चालू आहे. या योजनेनुसार ३,४०० द. ल. घनफूट क्षमतेचा एक जलाशय बांधण्याचें योजिलें असून त्यामुळें २६,२५० एकर जमिनीला पाटबंधाऱ्यांचा फायदा मिळेल. उरलेले तीन प्रकल्प नियोजनाच्या प्रगत अवस्थेंत असून चालू वर्षांत त्यांचें बांधकाम सुरू होईल अशी अपेक्षा आहे. या तीन प्रकल्पांमुळें १,३०,००० एकर जमीन पाटबंधाऱ्यांखालीं येईल अशी अपेक्षा आहे.

गोदावरी खोऱ्यांत पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्यें सुरू करण्यांत आलेल्या प्रमुख, मध्यम व लहान प्रकल्पांमुळें ३.५ द. ल. एकर फूट जादा पाण्याचा उपयोग करून घेतां येईल व

अशा रीतीनें एकूण ५ द. ल. एकर फूट पाण्याचा उपयोग करून घेण्यांत येईल. या प्रकल्पांमुळें पाटबंधाऱ्यांखालीं येणारा जादा विभाग ७ लक्ष एकर राहील. या खोऱ्यांतील जलसंपत्तीचा उपयोग करून घेण्यासाठीं भरपूर वाव असून याबाबत कित्येक उत्कृष्ट जागा उपलब्ध आहेत. या विभागांत ज्या कांहीं योजना हातीं घेण्याचें योजिलें आहे त्या पुढीलप्रमाणें – कडवा नदीवर करंजवन, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा विभागांतील गोदावरीच्या वरच्या बाजूकडील प्रकल्प, विदर्भांतील वर्धा, पेंच, पेणगंगा व कन्हान नद्यांवरील योजना आदि.

तापी खोरें

तापी नदी ही शेजारच्या मध्यप्रदेश राज्यांत उगम पावते आणि या राज्यांतून पश्चिमेकडे वाहात जाऊन अरबी समुद्राला मिळते. तिच्या जलाशयाचें एकूण क्षेत्र २३,४०० चौ. मैल असून त्यापैकीं १९,५०० चौ. मै. क्षेत्र या राज्यांत आहे. तीपासून दरवर्षी शें. ७५ प्रमाणें ८.० द. ल. एकर फूट पाण्याचा निश्चित पुरवठा होऊं शकतो. परंतु यापैकीं आतांपर्यंत फक्त ०.२५ द. ल. एकर फूट पाण्याचाच उपयोग करून घेण्यांत आलेला असून त्यामुळें सरतेशेवटीं ७५,००० एकर जमिनीला पाटाच्या पाण्याचा फायदा मिळेल.

या खोऱ्यांतील सर्वांत महत्त्वाचा प्रकल्प म्हणजे गिरणा प्रकल्प असून तो गिरणा नदीवरच बांधण्यांत येणार आहे. पूर्व खानदेश जिल्ह्यांतील या नदीच्या संपूर्ण पाण्याचा उपयोग करून घेण्याचें या प्रकल्पांत योजिलें आहे. गिरणेवरील पंझाण येथें एक जलाशय बांधण्यांत येणार असून त्याची पाण्याची क्षमता २४,००० द. ल. घनफूट एवढी राहील. त्याला जोडूनच १,५०० द. ल. घनफूट पाण्याचें आणखी एक दुय्यम जलाशय मन्याड येथें बांधण्यांत येणार आहे. सध्यांची जामडा धरण कालवेपद्धति पुनर्रचित करण्याचें योजिलें असून आणखी एका नवीन कालव्याला पाणी पुरविण्यासाठीं दहिगांव येथें आणखी एक धरण बांधण्याचें योजिलें आहे. या प्रकल्पामुळें १,४२,००० एकर जमीन पाटबंधाऱ्याखालीं येईल.

विदर्भांत तापीला मिळणाऱ्या नळगंगा नदीवर एका प्रकल्पाचें काम हातीं घेतलें असून या प्रकल्पांत २,००० द. ल. घनफूट पाण्याचा सांठा करण्यांत येईल व त्यामुळें २४,५०० एकर जमीन पाटबंधाऱ्याखालीं येईल. या प्रकल्पाचें काम सध्यां चालू आहे.

विदर्भामध्यें आणखी एक प्रकल्प असून त्याला कांटेपूर्णा प्रकल्प असें नांव आहे. या प्रकल्पान्वयें १८ हजार एकर जमिनीला पाटाचें पाणी देण्याची योजना आहे. या प्रकल्पाच्या बांधकामाचा आराखडा तयार होत असून बांधकाम लौकरच सुरू होईल अशी अपेक्षा आहे.

या खोऱ्यांत सुद्धां, त्यांतील जलसंपत्तीचा उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें चांगल्या जागा उपलब्ध असून त्यांपैकीं महत्त्वाच्या जागा नावठा व हातनूर येथें आहेत.

मध्यम व लहान प्रकल्प

राज्याच्या विकासामध्यें मध्यम व लहान पाटबंधाऱ्याच्या प्रकल्पांनाहि महत्त्वाचें स्थान आहे.

या प्रकल्पांतील दर युनिटमागें खर्च जरी पुष्कळदां जास्त वाटला तरी एकूण भांडवली खर्च कमी लागतो. मध्यम व लहान प्रकल्प हे बांधावयास सोपे असून ते जलद बांधतां येतात आणि त्यामुळें त्यांच्यापासून लौकर फायदा घेतां येतो. असे अनेक विभाग आहेत कीं, ज्यांना मोठ्या पाटबंधाऱ्यांच्या प्रकल्पांचा फायदा मिळूं शकत नाहीं. म्हणून अशा विभागांसाठीं मध्यम व लहान प्रकल्प अतिशय योग्य असून त्या कारणासाठींच राज्याच्या विकासाच्या योजनेंत त्यांना महत्त्वाचें स्थान देण्यांत आलें आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत १६ मध्यम प्रकल्प सुरू करण्यांत आले. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आणखी १६ प्रकल्प हातीं घेण्यांत आले आहेत. राहिलेलीं बांधकामें पूर्ण करण्यासाठीं व नवीन कामें हातीं घेण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत दीड कोटि रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. या योजनांबाबतचें बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व त्या कामांचा पूर्णपणें विकास झाल्यानंतर आणखी २,१६,००० एकर जादा क्षेत्र पाटबंधाऱ्याखालीं येईल अशी अपेक्षा आहे.

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत ८८.५० लक्ष रुपये खर्चून ३३६ कामें पूर्ण करण्यांत आलीं. या कामांमुळें ६४,७०० एकर जादा विभाग पाटबंधाऱ्याखालीं आला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ४५५ कामें हातीं घेण्यांत येत असून त्यामध्यें पहिल्या पंचवार्षिक योजनेंतील प्रकल्पांच्या राहिलेल्या बांधकामांचाहि समावेश होतो. या सर्व कामांना १२४० लक्ष रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. हीं कामें पूर्ण झाल्यानंतर व त्यांचा पूर्णपणें विकास झाल्यानंतर ३,५०,००० एकर जादा जमीन पाटबंधाऱ्याखालीं येईल अशी अपेक्षा आहे.

सुनियोजित विकासाच्या युगामध्यें आपण प्रवेश करण्यापूर्वी नवीन राज्यानें व्यापलेल्या विभागांतील पाटबंधाऱ्याखालील प्रत्यक्ष जमीन फक्त ८ लक्ष एकर होती. पहिल्या व दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेंत हातीं घेतलेले सर्व प्रकल्प जास्तीची सुमारें १५ लक्ष एकर जमीन पाटबंधाऱ्याखालीं आणतील अशी अपेक्षा आहे.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील कार्यक्रम

अशा प्रकारें पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्यें हातीं घेतलेलीं कामें पूर्ण झाल्यानंतर त्यांच्यामुळें नवीन राज्यांतील पाटबंधाऱ्यांची क्षमता तिपटीनें वाढेल. स्वातंत्र्यापूर्वी असलेल्या ओलिता-खालील जमिनींच्या तिप्पट जमीन ओलिताखालीं आणतां येईल. अशा रीतीनें अन्नोत्पादनाच्या बाबतींत स्वयंपूर्णतेचा पाया घातला जात आहे. शक्य तेवढा जास्तींत जास्त पाटबंधाऱ्यांचा उपयोग केला तरीहि महाराष्ट्रांतील लागवडीयोग्य जमिनीपैकीं १८ ते २० टक्के जमिनीपेक्षां जास्त जमिनीला पाणी मिळण्याची शक्यता नाहीं. म्हणून भूसंरक्षणाच्या आणि कोरडवाहू शेतीच्या पद्धति महाराष्ट्रांतील शेतीच्या दृष्टीनें अनिवार्य आहेत. कारण कमींत कमी ८० टक्के लागवडीयोग्य जमिनीला यांचाच सदासर्वकाळ उपयोग होणार आहे.

पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग

पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग कसा करतां येईल या प्रश्नाचा सरकार गंभीर विचार करीत आहे. पाण्याचा उपयोग होण्याची सर्व शक्यता अजमावण्याच्या दृष्टीनें प्रत्येक नदीच्या खोऱ्याचा

अभ्यास केला जात आहे आणि दीर्घ मुदतीच्या योजनेंत बसूं शकेल अशा रीतीनें प्रत्येक योजना तयार करण्यांत येत आहे. त्यामुळें पाण्याचा वापर ताबडतोब केला तरी तो पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करण्याच्या आड येणार नाहीं. दोन वर्षांपूर्वी सरकारनें जलसंपत्ती संशोधन विभाग स्थापन केला. प्रत्येक नदीच्या खोऱ्यांतील जलसंपत्तीचा सखोल अभ्यास करणें हें त्या विभागाचें काम आहे. नुकतीच भीमा नदीच्या खोऱ्याची अशा प्रकारची पाहणी पूर्ण करतां आली. कृष्णा, तापी आणि गोदावरी नद्यांच्या खोऱ्यांची पाहणी करण्याचें काम बऱ्याच प्रगत अवस्थेपर्यंत आलें असून येत्या कांहीं महिन्यांत तें पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत हातीं घ्यावयाच्या सर्व योजना वरील सर्व नद्यांच्या खोऱ्यांतील पाण्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेण्याच्या दृष्टीनें तयार करण्यांत आल्या आहेत.

पश्चिम महाराष्ट्रांतील, त्याचप्रमाणें मराठवाडा आणि विदर्भ विभागांतील पाटबंधाऱ्यांच्या योजनांची फेरतपासणी केली पाहिजे. वस्तुतः यापैकीं प्रत्येक योजनेंत सुधारणा करावी लागली व नवीन योजना आणि खर्चाचे अंदाज तयार करावे लागले. या सर्व योजनांची क्षमता जास्तींत वाढविणें हा यामागील हेतु होता. तें काम पूर्वी झालेलें नव्हतें. गेल्या दोन वर्षांतील चिकाटीच्या प्रयत्नामुळें बरेंच काम झालें आहे आणि महत्त्वाकांक्षी असा कार्यक्रम या राज्यानें हातीं घेतला आहे.

औद्योगिक विकास

महाराष्ट्राच्या सध्यांच्या उद्योगधंद्यांमध्यें महत्त्वाचे उद्योगधंदे म्हणजे सुती कापड, सर्वसाधारण व विजेसंबंधीचे इंजिनिअरिंग, रसायनें, साखर, वनस्पतिजन्य पदार्थ, कागद व कागदाचे पुट्ठे आणि साबण हे होत.

या सर्व उद्योगधंद्यांमध्यें सुती कापडाचा उद्योगधंदा सर्वांत मोठा व पुढारलेला असून, राज्यांतील ८,०३६ कारखान्यांत असलेल्या ७ लक्ष कामगारांपैकीं सुमारें ३ लक्ष कामगार या उद्योगधंद्यांत कामावर आहेत. सध्यां असलेल्या ९७ कापड गिरण्यांत ४१,२५,५४० चात्या आणि ८२,८२९ माग असून त्यापैकीं ६५ गिरण्या बृहन्मुंबईंतच आहेत. बृहन्मुंबईंतील या गिरण्यांमध्यें ३१,६८,६३८ चात्या आणि ६३,४०९ माग बसविण्यांत आले असून त्या ठिकाणीं २,४९,६०० कामगार रोज काम करीत असतात. उरलेल्या गिरण्यांपैकीं ६ औरंगाबाद विभागांत, ९ नागपूर विभागांत, १६ पुणें विभागांत, १ पश्चिम खानदेशमध्यें आहे. औरंगाबाद विभागांतील गिरण्यांमध्यें १,६१,७६० चात्या आणि ३,६२१ माग आहेत, तर नागपूर विभागांत ३,१६,६२८ चात्या व ५,८५४ माग आहेत. पुणें विभागांतील गिरण्यांत ४,२९,३६६ चात्या व ८,९४५ माग आहेत तर पश्चिम खानदेश जिल्ह्यांत ४९,१४८ चात्या व १,०४० माग आहेत. १९७·७ कोटी रुपयांच्या उत्पादक भांडवलापैकीं केवळ सुती कापडाच्या उद्योगधंद्यांतच जवळपास शें. ५० म्हणजे रु. ९७·१ कोटींचें भांडवल गुंतलेलें आहे.

कृत्रिम रेशमाच्या विणकामाच्या धंद्यांतील एक उल्लेखनीय विकास म्हटला म्हणजे मखमल, भरगच्च असें जरतारी काम, उत्कृष्ट दर्जाचे क्रेपचें कापड, क्रिंकल्स यांसारख्या नवीन प्रकारच्या कापडाचें उत्पादन हा होय.

रेयॉन उद्योगधंदा हा अलिकडेच विकास पावलेला उद्योगधंदा आहे. परंतु तो वैशिष्ट्यपूर्ण आणि अतिशय महत्त्वाचा आहे. कल्याण येथें व्हिस्कोज रेयॉनचे दोन कारखाने असून दरवर्षाला २८·८ दशलक्ष पौंड एवढी त्यांची उत्पादनक्षमता आहे. संपूर्ण देशांतील याबाबतची एकूण उत्पादनक्षमता ६८·३ दशलक्ष पौंड आहे.

मुंबई–ठाणें विभागांत लोकरीच्या नऊ गिरण्या असून यांमध्यें ५५,७७२ चात्या व ४२६ माग चालू असतात.

खास उद्योगधंदे

इंजिनिअरिंगच्या उद्योगधंद्याच्या क्षेत्रांत या राज्यांमध्यें अलीकडील वर्षांत अनेक प्रकारची उल्लेखनीय वाढ झालेली आहे. विशेषेंकरून मुंबई प्रदेशांमध्यें हा विकास बराच झालेला आहे. यापैकीं कांहीं वैशिष्ट्यें म्हटलीं म्हणजे यंत्रांना लागणारीं हत्यारें, उदा० लेथ, शेपिंग मशिन, पिलर ड्रील्स, शक्तीवर चालणारे हातोडे, धातू कापावयाच्या करवती, पोलाद व लोखंड यांचें ओतकाम, वेल्डिंग इलेक्ट्रोड्स, इलेक्ट्रिकल स्टॉम्पिंग्ज, दुच्याच्या सांखळ्या, धातू वितळविण्याच्या मुशी, छत्रीच्या काड्या, पोलादी फर्निचर, तिजोऱ्या व रोकड ठेवण्याच्या पेट्या, पोलादाचे गोळे व सुती कापडाच्या उद्योगधंद्यासाठीं तांब्याचे रोलर एन्ग्रेव्हिंग, हीं होत. उद्योगधंद्यांतील आणखी एक स्वागतार्ह बाब म्हटली म्हणजे पुढील प्रकारच्या आधुनिक उपकरणांचें व वस्तूंचें उत्पादन करण्यास झालेला प्रारंभ ही होयः– टाइपरायटर्स, रेफ्रिजरेटर्स, बिनतारी संदेश घेणारे सेटस्, लाकडी व प्लॅस्टिकचे कॅबिनेट, घरांतील इलेक्ट्रिकल उपरकणें इत्यादि. रोपांचें संरक्षण करण्यासाठीं आधुनिक प्रकारची सामुग्री, प्रेशर स्टोव्हज् व दिवे, स्टेनलेस स्टीलचीं भांडीं व साधनसामुग्री, कापड व रासायनिक उद्योगधंद्यांची औद्योगिक यंत्रसामुग्री, ट्रान्समिशन पॉवर व पाईपलाईन, क्रेन्स इत्यादींची जुळणी यांच्या उत्पादनांतहि हल्लीं बरीच वाढ झाली आहे. ट्वीस्ट ड्रील्स, कटर्स, नळ, इंजिनियरिंग फाईल्स व ग्राइंडिंग व्हील्स यांचें उत्पादन करणारे खास उद्योगधंदे हें एक वैशिष्ट्य आहे.

किर्लोस्करवाडी, पुणें, सातारा हीं शहरें तेथील इंजिनियरिंगचे उद्योगधंदे, शेतीचीं उपकरणें, इंजिनें व इतर सामान यासाठीं सबंध देशभर प्रसिद्ध आहेत. दक्षिण महाराष्ट्रांतील उद्योगधंद्याच्या इतिहासाला २५–३० वर्षांपूर्वी प्रारंभ झालेला आहे. त्याकाळीं सातारा येथें एक छोटासा कारखाना स्थापन करण्यांत आला होता. आतां डिझेल इंजिनें, ऑइल इंजिनें, साखर कारखान्याची यंत्रसामुग्री, जीप ट्रेलर्स व ट्रॅक्टर्स, नॉन फेरस युटेन्सिल्स, शेतकी उपकरणें, विद्युत्माग इत्यादींचें उत्पादन करणारे २७ उद्योगधंदे पुणें विभागांतच आहेत. साखरेचें उत्पादन करण्यासाठीं लागणारी कारखान्यांतील संपूर्ण यंत्रसामुग्री तयार करणारे कारखाने स्थापन करण्यांत आले आहेत ही उद्योगधंद्याच्या क्षेत्रांतील अतिशय महत्त्वाची बाब होय, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. साखरेचा उद्योगधंदा हा महाराष्ट्रांतील प्रमुख उद्योगधंदा होय ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे ह्या विकासाला अधिकच महत्त्व प्राप्त होतें.

इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या क्षेत्रांत इलेक्ट्रिकल मोटर्स, ट्रान्सफॉर्मर्स, ट्रान्समिशन व स्विच गियरसाठीं लागणाऱ्या तारा यांचें उत्पादन उल्लेखनीय आहे.

धातुविषयक (मेटॅलर्जिकल) उद्योगधंद्याच्या बाबतींत सबंध देशांत फक्त मुंबईतच

ॲन्टिमनीचा शुद्धीकरण कारखाना आहे. सायकल फ्री व्हील्स व सेल्फ ल्युब्रिकेटिंग गनमेटल बुशीस् तयार करणारा मेटॅलर्जीचा एक कारखाना हल्लींच स्थापन करण्यांत आला आहे.

साखरेचें उत्पादन

देशांतील साखरेचें उत्पादन करणाऱ्या प्रमुख राज्यांपैकीं महाराष्ट्र हें एक राज्य आहे. महाराष्ट्रांत साखरेचे २६ कारखाने असून त्यांची ऊस गाळण्याची क्षमता दरदिवशीं २६,८०० टन इतकी आहे. हे कारखाने पुढील भागांत वसलेले आहेत :- अहमदनगर जिल्हा (११), कोल्हापूर जिल्हा (४), पुणें जिल्हा (३), उत्तर सातारा जिल्हा (२), दक्षिण सातारा जिल्हा (१), सोलापूर जिल्हा (२), नासिक जिल्हा (२) व उरलेला एक कारखाना औरंगाबाद विभागांत गंगापूर येथें आहे.

दख्खनच्या पट्ट्यांतील जमीन ऊंस लागवडीसाठीं अत्यंत योग्य म्हणून प्रसिद्ध आहे. निरा आणि गोदावरी या नद्यांवरील कालव्याच्या पद्धतींमुळें देखील ऊंस-वाढीला मदत झाली आहे. लिफ्ट इरिगेशनमुळें तशाच प्रकारची सोय कोल्हापूर आणि दक्षिण सातारा या जिल्ह्यांमध्यें देखील झालेली आहे. भारतातील उंसाच्या उत्पादनाचें एकरीं सरासरी प्रमाण फक्त सुमारें १३ टन इतकें आहे, तर दख्खन पट्ट्यांत तेंच प्रमाण सर्वांत जास्त म्हणजे ३१ टन आहे. यावरून उपरोक्त पट्टा ऊंस लागवडीकरितां किती योग्य आहे हें दिसून येईल.

या उद्योगधंद्याचें एक महत्त्वाचें वैशिष्ट्य म्हणजे सहकारी साखर कारखान्यांची संघटन ही होय. या संघटनेला राज्य सरकारकडून सक्रिय सहाय्य मिळतें. महाराष्ट्रांमधील एकूण २६ कारखान्यांपैकीं १३ कारखाने सहकारी तत्त्वांवर चालविण्यांत येतात.

मुंबई राज्याच्या औद्योगीकरणासाठीं तयार करण्यांत आलेल्या मास्टर प्लॅनमध्यें नाशिक जिल्ह्यांत एक साखर कारखाना चालू करण्याबाबत शिफारस करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें अहमदनगर जिल्ह्यांत श्रीगोंदें तालुक्यामध्यें (हा विभाग घोड धरणाच्या पाटबंधाऱ्याखालील क्षेत्रांत आहे) दोन, आणि वीर धरणाचें काम पूर्ण झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यांतील माळशिरस येथें एक, अशा प्रकारें साखर कारखाने काढण्याबाबतहि योजनेंत शिफारस करण्यांत आली आहे. अहमदनगर जिल्ह्यांतील मुळा-पाटबंधाऱ्याची योजना पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणीं २ अथवा ३ साखर कारखाने निघण्याची शक्यता आहे.

साखरेच्या धंद्याला जोडून असलेला उद्योगधंदा म्हणजे औद्योगिक मद्यार्काचा उद्योगधंदा हा होय. साखर कारखान्यांतून उपलब्ध होणाऱ्या मळीपासून या उद्योगधंद्याचा विकास करतां येतो. एथिल अल्कोहोल हें निरनिराळ्या प्रकारच्या उद्योगधंद्यांसाठीं प्रारंभिक सामुग्री म्हणून वापरण्यांत येते. तथापि, सध्या पॉवर अल्कोहोल म्हणून त्याचा मोठ्या प्रमाणांवर उपयोग करण्यांत येतो व तो औद्योगिक कामांसाठीं मर्यादित प्रमाणांत वापरण्यांत येतो. देशांत उंसाच्या मळीपासून तयार होणाऱ्या १८ दशलक्ष गॅलन मद्यार्कापैकीं १२,६५,००० गॅलन मद्यार्क पुणें विभागांत वसलेल्या ५ भट्ट्यांमधून तयार करण्यांत येते. औद्योगिक कामासाठीं पॉवर अल्कोहोलला वाढती मागणी आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन नाशिक येथील जुन्या भट्टीऐवजीं अहमदनगर जिल्ह्यांतील चितळी येथें ७१ लक्ष रुपये खर्चून एक नवीन मोठी भट्टी स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारनें घेतला आहे. या

नवीन भट्टीची क्षमता दर दिवसाला सुमारें ९,००० गॅलन राहील. भट्टीची इमारत व राहाण्यासाठीं घरें बांधून झालीं आहेत. परदेशांतून मागविण्यांत आलेली यंत्रसामुग्री येऊन पोचली असून ती उभारण्यांत येत आहे.

रासायनिक उत्पादन

महाराष्ट्रांतील रासायनिक धंद्याची वेगानें प्रगति होत असून, ह्या धंद्यांत अनेक प्रकारचे पदार्थ तयार होतात. उदाहरणार्थ, हेवी केमिकल्समध्यें ॲसिड, सॉल्ट, सुपरफॉस्फेट आणि कॉस्टिक सोडा यांचा समावेश होतो, तर फाईन केमिकल्समध्यें हायड्रोजन पेरॉक्सॉईड, फोटोग्राफीचीं रसायनें, थोरियम व सिलीनियमचे नायट्रेटस् व पाऱ्याचे पदार्थ यांचा समावेश होतो. फॉस्परिक ॲसिड, टेट्राक्लोरेथेन, पॉलिस्ट्रायरीन आणि प्लॅस्टिकचे पदार्थ, जंतुनाशकें इत्यादि इतर महत्त्वाचीं रसायनें आहेत.

त्याचप्रमाणें फार्मास्युटिकलमध्यें व्हिटॅमिन्स, सॅलिसिलिक ॲसिड, हर्मोन्स, ॲन्टीबायॉटिक्स, बायॉलॉजिक प्रॉडक्टस् व व्हॅक्सिन आणि बिस्मथचे पदार्थ यांचा समावेश होतो.

मुंबई व ठाणें हीं रंग तयार करणारीं प्रमुख केंद्रें असून तीं अनेक प्रकारचा माल तयार करतात. चिनी मातीचीं भांडीं व कांच, वायू, तेलें व साबण, रंग, रंगद्रव्यें आणि वार्निश, खाद्य पदार्थ, रबराच्या वस्तु आणि रासायनिक पदार्थ तयार करणारे इतर उद्योगधंदेहि याच पद्धतीचा अवलंब करीत आहेत.

मुंबईतील मोटारच्या धंद्यांत सुरुवातीला केवळ मोटारींची आयात करण्यांत येत असे. क्रमाक्रमानें मोटारींचें उत्पादन, उपयुक्ततेचीं वाहनें व स्कूटर्स यांचें उत्पादन करण्याचें काम तीन मोठ्या कारखान्यांमध्यें होत आहे. मोटारींच्या उद्योगधंद्यांच्या आश्रयानें मोटारींचे निरनिराळे सुटे भाग तयार करण्याच्या अनुषंगिक उद्योगधंद्याची झपाट्यानें प्रगति होत आहे.

सायकली तयार करण्याच्या उद्योगधंद्याची प्रगति होत असून दरवर्षी २,२०,००० सायकली तयार करण्याची या धंद्याची क्षमता आहे.

महाराष्ट्रांमध्यें कागदाच्या चार गिरण्या असून त्या पुणें विभागांत दोन पुणें व ओगलेवाडी येथें व नागपूर विभागांत एक बल्लारपूर येथें आहेत आणि एक मुंबई विभागांत खोपोली येथें आहे. बल्लारपूर गिरणीची क्रमाक्रमानें वाढ करण्याची योजना तयार करण्यांत आली आहे.

तेल-गिरण्या

नागपूर व औरंगाबाद विभागांत भुईमूग हे रोख पैसे देणारें पीक असून या विभागांत अनेक तेल-गिरण्या आहेत. एकट्या औरंगाबाद विभागांतच ९४ स्वतंत्र तेल-गिरण्या असून पाचोरा व अंमळनेर येथें ऑईल हायड्रोजनेशनचे कारखाने आहेत. नागपूर विभागांत सुमारें ७० स्वतंत्र तेल-गिरण्या आहेत. या विभागांतील अकोला व शेगांव येथें प्रत्येकीं एक ऑईल हायड्रोजनेशनचा कारखाना आहे. मुंबई विभागांत तेल-गिरण्यांचा उद्योगधंदा हा मुख्यत्वेंकरून पश्चिम खानदेश जिल्ह्यांत केंद्रित झालेला असून तेथें १५ तेल-गिरण्या आहेत. याखेरीज कापूस पिकविणाऱ्या

विभागांत कापूस दाबून त्याचे गठ्ठे बांधण्याचे कारखाने आहेत. या प्रदेशांत कापसाबरोबरच भुई-मुगाचें उत्पादन होतें आणि म्हणून कापसाच्या हंगामाव्यतिरिक्त या कारखान्यांना जोडून तेल-गिरण्याहि चालू असतात.

गठ्ठे बांधण्याचे कारखाने

कापूस पिकविणाऱ्या भागांत, कापसावर प्रक्रिया करून त्याचे गठ्ठे बांधण्याबाबतचा एक महत्त्वाचा उद्योगधंदा आहे. राज्यांत अशा प्रकारचे ६०० कारखाने सर्वत्र असून पैकीं बरेच म्हणजे २८० कारखाने नागपूर विभागांत आहेत. कापूस साफ करून त्याचे गठ्ठे बांधण्याचे २०० हून अधिक कारखाने औरंगाबाद विभागांतील कापूस पिकविण्याऱ्या संपूर्ण विभागांत विखुरलेले आहेत. मुंबई विभागांत पश्चिम खानदेश जिल्ह्यांत कापूस साफ करून त्याचे गठ्ठे बांधण्याचे ४७ कारखाने आहेत, तर पुणें विभागांत अशा प्रकारचे ६९ कारखाने आहेत.

खाणकाम

विदर्भांतील खाणकामाचा धंदा हा अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असा आहे. भंडारा व नागपूर जिल्ह्यांच्या उत्तरेकडील भागांत मँगेनीजचे भरपूर सांठे आहेत. कनिष्ठ दर्जाचें अशुद्ध मँगेनीज चांगलें करून दर दिवसाला ६०० टन उत्पादन काढूं शकणारा एक कारखाना भंडारा जिल्ह्यांतील डोंगरी-बुद्रुक येथें नुकताच स्थापन करण्यांत आला आहे. चांदा जिल्ह्यांत कोळशाच्या १० खाणी चालू असून नागपूर जिल्ह्यांतील कामठी येथें कोळशाची एक खाण चालू आहे. या खाणींमधून दरवर्षी ४ ते ५ लक्ष टन कोळसा बाहेर काढण्यांत येतो. यवतमाळ जिल्ह्यांतील वणी–मांजरीच्या भोंवतालच्या विभागांत व चांदा जिल्ह्यांतील कांहीं भागांत खाणीमधून चुनखडी बाहेर काढण्याचें काम मोठ्या प्रमाणावर चालू असतें.

मास्टर प्लॅन

राज्यांतील सर्व विभागांचा समतोल असा औद्योगिक विकास साधावयाचा असेल तर ज्या साधनसामुग्रीचा व सोयींचा अधिक विकास करणें आवश्यक आहे त्याबाबतींत अधिक बारकाईनें अभ्यास करणें आवश्यक आहे आणि त्याच उद्देशानें मुंबई राज्याच्या औद्योगीकरणासाठीं मास्टर प्लॅन तयार करण्यांत आला. सदरहू योजनेचा मसुदा अत्यंत महत्त्वाचा असून औद्योगिक विकासाशीं संबंधित असलेल्या संस्था आणि व्यक्ति यांचे अनुभव जमेस धरून तो निश्चित करण्यांत आला.

जुन्या द्विभाषिक मुंबई राज्यासाठीं हा प्लॅन तयार केलेला असला तरी त्यांतील माहिती व शिफारशी महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही नवीन राज्यांना उपयुक्त ठरणाऱ्या आहेत. मास्टर प्लॅनमध्यें सध्यांची औद्योगिक साधनसामुग्री व त्याबाबतींत भावी कालांत वाढ होण्याची शक्यता ह्यासंबंधी तपशीलवार माहिती देण्यांत आली आहे. मास्टर प्लॅनमध्यें भौगोलिक रचना, हवामान, पाऊस आणि लोकसंख्या, तांत्रिक शिक्षणाच्या सोयी, औद्योगिक विकासाची सध्याची पातळी आणि औद्योगिक साधनसामुग्रीची माहिती देण्यांत आली आहे. साधनसामुग्रीमध्यें शेतीक्षेत्रांतील कपाशी व कपाशीच्या

बिया, तेलबिया, तंबाखू, फळें, ऊंस वगैरे माल; निरनिराळ्या प्रकारचें लाकूड, बांबू, हिरडा, लाख यांसारखा जंगलमाल; कोळसा, मँगेनीज, लोखंड, बॉक्साईट, क्रोमाईट, चुनखडी, वाळू, वगैरे खनिज पदार्थ; मासे, मीठ, रसायनें; सडका व रेल्वे, बीज व पाणीपुरवठा वगैरे गोष्टींचा समावेश होतो.

विशिष्ट शिफारसी

उद्योगधंदे स्थापन करण्याबाबत ह्या प्लॅनमध्यें विशिष्ट शिफारसी करण्यांत आल्या आहेतच, पण उपलब्ध साधनसामुग्री व सवलती विचारांत घेऊन ते कोठें स्थापन करावे तीं ठिकाणेंहि सर्वसाधारणपणें सुचविलीं आहेत. या उद्योगधंद्यांची रोजगार पुरविण्याची क्षमता तर वरील प्लॅनमध्यें सुचविण्यांत आलीच आहे, पण त्याचबरोबर त्यांना लागणारें भांडवल, वीज, पाणी वगैरेंची गरजहि सांगितली आहे. तथापि, या शिफारसी लवचिक स्वरूपाच्या असून त्या म्हणजे या बाबतींतील अखेरचा शब्द आहेत असें नाहीं.

शहराजवळ औद्योगिक केंद्रें स्थापन करून तेथील सोयींचा फायदा घेण्याच्या सर्वसाधारण वृत्तीसंबंधींहि मास्टर प्लॅनमध्यें विस्तारानें विचार करण्यांत आला आहे. अशा वृत्तीमुळें शहरांतून अतिशय गर्दी होते आणि मालाची वाहतूक, घरें ह्यासंबंधीच्या प्रश्नांबरोबर निरनिराळे सामाजिक प्रश्न उपस्थित होतात. औद्योगीकरण जलद गतीनें होईल अशी अपेक्षा असल्यामुळें इतर शहरापुढें अशा स्वरूपाचे प्रश्न उद्भवूं नयेत म्हणून अवलंबित अशा वसाहतीसाठीं व औद्योगिक वसाहतीसाठीं सदरहू प्लॅनमध्यें निरनिराळ्या जागा सुचविल्या आहेत.

सुप्त सामर्थ्य

मास्टर योजनेंत राज्यांतील सुप्त सामर्थ्याकडे आणि उपलब्ध असलेल्या सोयींकडे लक्ष वेधण्यांत आलें आहे. कच्चा माल आणि वीज, पाणी, वाहतूक ह्यांसारख्या सोयीसंबंधीं गुणात्मक व प्रमाणात्मक अशी दोन्ही प्रकारची तपशीलवार माहिती, तसेंच आर्थिक क्षमता, कामधंद्याबाबतच्या शक्यता, भांडवलाबाबतच्या गरजा, वीज, पाणी व धंद्याचीं ठिकाणें ह्याबाबत सर्वसाधारणपणें अचूक सूचना मिळाल्यास नव्या योजना सुरू करणें सुलभ जाईल अशी अपेक्षा आहे.

कांहीं विशिष्ट भागांत उद्योगधंद्याचे अतिशय केंद्रीकरण झाल्यामुळें तेथील लोकसंख्येंत वाढ होऊन वाहतुकीमधील दाटी, खुल्या जागांची आणि शाळांसाठीं क्रीडांगणांची कमतरता, गलिच्छ वस्त्यांची वाढ असे अनंत प्रश्न निर्माण होतात. शिवाय लोकसंख्येंत वाढ झाल्यामुळें त्या भागांतील स्वच्छतेच्या व्यवस्थेवर आणि सार्वजनिक उपयुक्ततेबाबतच्या कामधंद्यावर अनिष्ट ताण पडतो. महाराष्ट्रांत बृहन्मुंबईत आणि सोलापूर, नागपूर भंडारा, पुणें, अहमदनगर आणि ठाणें अशा कांहीं शहरांतच मुख्यत: उद्योगधंदे केंद्रित झालेले आहेत.

औद्योगिक वसाहती

पूर्वीच्या मुंबई राज्यानें छोटे कारखानदार एकत्र आणून त्यांना जमीन, पाणीपुरवठा, वीज, वाहतूक वगैरे समान सोयी पुरविण्याच्या दृष्टीनें राज्यांतील निरनिराळ्या भागांत औद्योगिक वसाहती

स्थापन करण्याचा कार्यक्रम हातीं घेतला होता. त्याप्रमाणें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत महाराष्ट्र विभागांत ११ औद्योगिक वसाहती स्थापन करण्याचें योजिलें होतें. ह्या वसाहती कुर्ला, बाप्टी रोड (मुंबई), अटाळें (कल्याण), कोल्हापूर, हडपसर (पुणें), मालेगांव (नाशिक), कराड, नागपूर, परळी वैजनाथ ह्या ठिकाणीं व्हावयाच्या होत्या. त्यापैकीं कुर्ला येथील वसाहत बृहन्मुंबई औद्योगिक विकास सहकारी संस्था लिमिटेड ह्या संस्थेमार्फत विकसित करण्यांत यावयाची असून बाप्टी रोड येथील वसाहत मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनतर्फे संघटित करून चालविण्यांत यावयाची आहे. तसेंच कोल्हापूर येथील वसाहत कोल्हापूर उद्यम सहकारी संस्थेमार्फत वाढविण्यांत येत आहे. हडपसर येथील वसाहत पुणें म्युनिसिपल कॉर्पोरेशन संघटित करणार आहे. कराडची वसाहत सरकार स्थापन करणार असून नांदेडच्या वसाहतीचें काम नांदेड म्युनिसिपल बरो पाहील. कल्याणजवळ अटाळें येथील वसाहत ही रेयॉन, भारी रसायनें ह्यांसारख्या मूलभूत आणि अवजड उद्योगधंद्याच्या विकासासाठीं राहील.

मास्टर प्लॅनमध्यें धुळें (पश्चिम खानदेश), नाशिक रोड, कर्जत, खोपोली (कुलाबा) आणि चिपळूण – पोफळी भाग (रत्नागिरी) येथें औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची शिफारस केली आहे. त्याचप्रमाणें पाताळगंगा व कुंडलिका खोऱ्यामध्यें मोठ्या उद्योगधंद्याची स्थापना होऊन त्यांचा विकास झाला म्हणजे या विभागांत औद्योगिक वसाहती स्थापन करण्याची शिफारसहि ह्या प्लॅनमध्यें केलेली आहे. यामुळें संबंधित छोट्या धंद्यांचा विकास होईल. ठाणेंविभाग बृहन्मुंबईस जवळ असल्यानें त्याचा औद्योगिक दृष्ट्या जलद विकास होत आहे. म्हणून मास्टर प्लॅनमध्यें ठाणें जिल्ह्यांत भिवंडी येथें एक औद्योगिक वसाहत स्थापन करण्यासंबंधी शिफारस असून त्यामुळें छोटे उद्योगधंदे स्थापन करण्यास व त्यांचा विकास करण्यास सवलती देण्याच्या बाबतींत चालना मिळून हे उद्योगधंदे ह्या भागांत स्थापन होणाऱ्या मोठ्या उद्योगधंद्यांच्या शाखा, उपशाखा बनण्यास त्यामुळें मदत होईल.

त्याचप्रमाणें नागपूर, अकोला वगैरेसारख्या ठिकाणीं होणाऱ्या जोरदार औद्योगिक घडामोडीं-बद्दल मास्टर प्लॅनमध्यें काळजी व्यक्त करण्यांत आली असून नागपूरजवळ कामठी-कन्हान व बडनेरा येथें औद्योगिक नगरें स्थापण्याची शिफारस करण्यांत आली आहे. पाणी वापरणाऱ्या उद्योगधंद्यांसाठीं चांदा हें उत्कृष्ट ठिकाण आहे असें सुचविण्यांत आलें आहे. छोट्या उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत, शेगांव, खामगांव, गोंदिया आणि कळमेश्वर येथें उद्योगधंदे स्थापन होण्याची शक्यता दिसत असून त्यांचा विकास करण्याची सूचना करण्यांत आली आहे. पुणें विभागांत इचलकरंजी येथें वीजमाग केंद्रित झाल्यामुळें तेथें एक औद्योगिक वसाहत स्थापन करण्याची शिफारस करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणें दक्षिण सातारा जिल्ह्यांत बुधगांव येथें एक ग्रामीण औद्योगिक केंद्र स्थापन करण्याबाबत शिफारस करण्यांत आलेली आहे. औरंगाबाद विभागांत नांदेड व परळी-वैजनाथ खेरीज जळगांव, लातूर, हिंगोली आणि जालना येथेंहि औद्योगिक वसाहती स्थापन कराव्यात असेंहि मास्टर प्लॅनमध्यें म्हटलें आहे.

उद्योगधंद्यांसाठीं वीजपुरवठा

वीज हा औद्योगीकरणाचा पाया आहे. एखाद्या उद्योगधंद्याच्या विकासामध्यें स्वस्त विजेच्या पुरवठ्याला अतिशय महत्त्वाचें स्थान असतें. पाण्यापासून व कोळशापासून अशी दोन्ही प्रकारची वीज निर्माण करणारे अनेक विद्युत् प्रकल्प महाराष्ट्र राज्यांत असून त्यापासून ६ लक्ष कि. वॅ. पेक्षां

अधिक वीज तयार होते. महाराष्ट्रांतील वीज निर्मिती व विजेचा वापर यांचें प्रमाण फार मोठें असून महाराष्ट्रांमधील विद्युत् निर्मितीचें दरडोई प्रमाण सुमारें ७१·१ कि. वॅ. आहे. भारतीय संघराज्यामध्यें हें प्रमाण फक्त २७·१ कि. वॅ. आहे.

महाराष्ट्रांत निर्माण होणाऱ्या ६ लक्ष किलोवॅट विजेपैकीं बरीचशी वीज मुंबई-पुणें भागांत निर्माण होते. त्यापैकीं १,३६,००० किलोवॅट वीज चोला वीज केंद्रांत, १,२५,००० किलोवॅट वीज तुर्भे येथील केंद्रांत आणि २,७४,००० किलोवॅट वीज खोपोली, भिवपुरी व भिरा येथील वीजकेंद्रांत निर्माण होते. विदर्भांतील खापरखेडा आणि बल्लारशा ह्या दोन्ही केंद्रांत मिळून सुमारें ५०,००० किलोवॅट वीज आणि उरलेली वीज पुणें विभागांतील छोट्या वीजकेंद्रांत व भाटघर व राधानगरी येथें निर्माण होते.

अशीं हीं निरनिराळीं विद्युत् केंद्रें असून देखील मुंबई-पुणें विभागांतील उद्योगधंदे झपाट्यानें वाढत असल्यानें विजेचा पुरवठा सतत कमी पडतो. हा तुटवडा भरून काढण्यासाठीं तुर्भे व चोला येथें जादा थर्मल युनिटस् उभारून वीज पुरविण्याचे प्रयत्न करण्यांत आले. परंतु कोयना योजनेची सांगता ह्राच या सर्व समस्यांवर चिरंतन उपाय आहे. कोयना योजनेचें काम सध्या जलद गतीनें चालू आहे. मुंबई–पुणें विभागांतील उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं या योजनेमुळें विजेचा भरपूर पुरवठा होईल. एवढेंच नव्हें तर त्यामुळें लौकरच निरनिराळ्या प्रकारचे उद्योगधंदे स्थापन करण्यांत येणाऱ्या दक्षिण महाराष्ट्रांतील विभागांतहि विजेचा भरपूर पुरवठा करतां येईल. कोयना प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर पांच लक्ष किलोवॅट वीज तयार करतां येईल असा अंदाज आहे. ही योजना ३ टप्प्यांमध्यें पूर्ण करण्यांत येणार असून, पहिल्या टप्प्यांत २,४०,००० कि. वॅ. वीज तयार करण्याचें योजिलें आहे. पहिल्या टप्प्यांतील वीज १९६१ ऑक्टोबरच्या सुमाराला मिळेल अशी अपेक्षा आहे; दुसरा टप्पा पूर्ण झाल्यावर १,१०,००० कि. वॅ. वीज निर्माण करण्यांत येईल. तिसऱ्या टप्प्यामध्यें यासंबंधी आणखी विकास करण्याचा विचार आहे. या वेळीं वाया जाणाऱ्या पाण्यापासून आणखी ६०,००० कि. वॅ. वीज तयार करण्यांत येईल. यामध्यें पाटबंधाऱ्याच्या कालव्यापासून मिळणाऱ्या ३०,००० कि. वॅ. हंगामी विजेचा समावेश होत नाहीं.

इतर योजना

महाराष्ट्र राज्यांत विजेसंबंधीच्या इतर योजनाहि अंमलांत आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं विदर्भांतील खापरखेडा, बल्लारशा व पारस या केंद्रांहून सुमारें १,१०,०० कि. वॅ. वीज निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. तसेंच या विभागांतील पेंच योजना आणि चांदा जिल्ह्यांत दिना नदीवरील जल-विद्युत् योजना यांचेंहि बांधकाम खात्यातर्फें चालू आहे. औरंगाबाद विभागांतील पूर्णा जल-विद्युत् योजनेच्या कामाची पाहाणी चालू आहे. या योजनेपासून १५,००० कि. वॅ. वीज तयार होऊं शकेल. त्याचप्रमाणें तुर्भे येथील केंद्राची कुवतहि वाढविण्यांत येत असून तेथें ६२,५०० कि. वॅ. वीज तयार करणारा एक जादा सेट तेथें बसविण्यांत येत आहे. औरंगाबाद विभागांत, सध्या अस्तित्वांत असलेल्या विद्युत्-केंद्रांची औद्योगिक क्षमता अतिशय अपुरी असून पूर्णा नदीवरील १५,००० किलोवॅट वीजनिर्मितीची कुवत असलेल्या योजनेबाबत विचार चालू आहे. ह्या योजनेद्वारा पूर्णा जलविद्युत्-केंद्र पारस येथील केंद्राला जोडण्याचा विचार आहे. पारस थर्मल केंद्राची उत्पादन-क्षमता ३०,००० किलोवॅटवरून ६०,००० किलोवॅटपर्यंत वाढविण्यांत येणार असून अशा रीतीनें

वाढलेल्या विजेचा उपयोग खानदेश व मराठवाड्यांतील जिल्ह्यांना होणार आहे. तसेंच भुसावळ येथें ६०,००० किलोवॅट वीज निर्मितीचें केंद्र स्थापन करण्याच्या योजनेबाबत विचार चालू आहे. कोयना योजना पुरी झाल्यावर पुणें विभागांतील विजेचा पुरवठा बराच वाढणार आहे. तसेंच कोयना–टाटा रेल्वे वीजपुरवठा वाढविण्यांत येणार असून कोयना–सोलापूर भागांतील ट्रान्स्मिशन तारामुळें त्या भागांतील वीजपुरवठा वाढणार आहे.

खर्चाच्या दृष्टीनें थर्मल केंद्राद्वारें मिळणाऱ्या विजेपेक्षां कोळशापासून मिळणारी वीज अधिक स्वस्त असते हें सर्वांना माहीत आहेच. विदर्भांतील कोळशाचा टापूनजिकचा कांहीं भाग वगळल्यास महाराष्ट्राच्या बहुतेक प्रदेशांत विद्युत्-निर्मितीसाठीं कोळसा फार दूरवरून आणावा लागतो. ह्या परिस्थितींत पश्चिम घाटाचा प्रदेश जलविद्युत् निर्मितीसाठीं बराच सोयीचा आहे. तसेंच, भंडारदरा येथील पाण्याचा सांठा दुप्पट वाढवून वैतरणा धरणापाशीं पाण्याचा सांठा करून व फोंडा येथें राधानगरी धरणाच्या सांठविलेल्या पाण्याचा उपयोग करून वीजपुरवठा वाढवितां येणें शक्य आहे. महाराष्ट्रांतील सबंध ग्रामीण भागांत पुरेशा विजेच्या तारा बसविणें हें महाराष्ट्रांतील वीजपुरवठ्याच्या कार्यांतील महत्त्वाचें पाऊल ठरणार आहे. त्या दृष्टीनें सबंध ग्रामीण भागांत सर्वसाधारण ट्रान्स्मिशन ग्रिड बसविण्याच्या दृष्टीनें सरकार प्रयत्न करीत आहे.

विद्युत् उत्पादन आणि पुरवठा

औद्योगिक विकासासाठीं अतिशय आवश्यक असलेली गरज म्हणजे पुरेसें विद्युत् उत्पादन आणि योग्य तऱ्हेनें ग्रामीण भागांत वीज खेळविणें ही होय. कोयना योजना पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्राला होणाऱ्या वीजपुरवठ्यांत अतिशय वाढ होईल अशी अपेक्षा असून, त्यामुळें औद्योगिक विकासांतहि वाढ होईल. कोयनेची वीज उपलब्ध होणार असल्यानें अनेक मोठ्या औद्योगिक संस्थांचें त्याकडे लक्ष वेधलें असून, त्यामुळें चिपळूण येथें ॲल्युमीनियम् प्लँट आणि तुर्भे येथें रासायनिक खत कारखाना स्थापन होण्याचा संभव असून पनवेल – खारपाडा विभागांत वृत्त-पत्रांच्या कागदाचा कारखाना व कांहीं हेवी केमिकल्चे कारखाने स्थापन होण्याची शक्यता आहे. सध्याच्या विद्युत् उत्पादन युनिटांमध्यें वाढ केल्यामुळें व जादा भर घातल्यानें, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेरपर्यंत आणखी ६ लाख किलोवॅट विजेचा पुरवठा करतां येईल. ह्या विद्युत्क्षमतेपैकीं पुष्कळसा भाग उपयोग करण्यासाठीं १९६२ सालच्या अखेरपर्यंत उपलब्ध होईल. ह्या जादा विजेमुळें मोठ्या उद्योगधंद्यांची गरज भागेल, एवढेंच नव्हे तर मुंबई उपनगरांत आणि ग्रामीण विभागांत छोटे उद्योगधंदे स्थापन करण्यास उत्तेजन मिळेल.

उद्योगपतींना मार्गदर्शन

राज्याच्या डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीजमध्यें एका संपर्क अधिकाऱ्याची नेमणूक करण्यांत आली असून, हा अधिकारी उद्योगपतींना कामकाजाची रीत, राज्य व केंद्र सरकार यांचीं धोरणें,

उद्योगधंद्यांच्या जागा आणि उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं राज्य व केन्द्र सरकारें देत असलेल्या सवलती यांबाबत मार्गदर्शन करतो.

महाराष्ट्रांत मँगेनीज, कच्चें लोखंड, बॉक्साईट, चुनखडी, क्रोमाईट, इल्मेनाइट, अभ्रक, सिलिका वाळू, गेरू, चिकण माती, इमारतीचा दगड इत्यादि अमूल्य खनिज-संपत्तीचे सांठे आहेत.

कोळशाचा सांठा

महाराष्ट्रांत उत्कृष्ट दर्जाच्या व मध्यम दर्जाच्या कोळशाचा विपुल प्रमाणावर सांठा असलेले विभाग म्हणजे नागपूर विभाग आणि मराठवाड्याचा कांहीं भाग हे होत. वर्धा खोऱ्यांतील कोळशाच्या खाणीच्या क्षेत्रांत बंदार, वरोरा, माजरी, राजुर, चांदा, घुगुस, तिलवासा आणि बल्लारपूर विभागाचा समावेश होतो आणि मराठवाडा विभागांत राजुरा येथील कोळशाच्या खाणींचा समावेश होतो. तथापि, कोळशाचे प्रमुख सांठे नागपूर विभागांतील चांदा, नागपूर व यवतमाळ जिल्ह्यांत असून तेथें सध्या १० खाणींत काम चालू आहे. या भागांमध्यें सांपडणाऱ्या कोळशाच्या खाणींमध्यें वाळूचे दगड, कॉर्बोनेशस शेल, कोळसा आणि चिकण माती हीं खनिजेंहि मधूनमधून आढळतात. महाराष्ट्रांतील कोळशाच्या सांठ्याचा भूगर्भशास्त्रज्ञांच्या मतें तळ-गोंडवनपद्धतींतील बाराकार थरांत समावेश होतो.

बंदार खाण टेम्पा रेल्वे स्टेशनच्या पश्चिमेस २५ मैलांवर असून सुमारें १२ चौरस मैलांपर्यंत या खाणीचें क्षेत्र पसरलें आहे. या खाणींत ३ ते १७ फूट जाडीचे चार प्रकारचे थर आहेत. येथें सुमारें १०८ दशलक्ष टन सांठा असून अद्याप या खाणींतून कोळसा काढावयाचा आहे. वरोरा खाणीचें क्षेत्र २ चौरस मैल असून येथें २२ फूट जाडीचा थर आहे. येथें सुमारें ९ दशलक्ष टन सांठा आहे. या भागांतील एक जुनी खाण १९०६ मध्यें बंद पडली. या खाणींतून एकूण सांठ्याच्या $\frac{१}{४}$ कोळसा बाहेर काढला. माजरी भागांत १७ फूट जाडीचा थर असलेला सांठा सापडला असून दर महिन्यास सुमारें ५,००० टन कोळसा काढला जातो. घुगुस आणि तिलवासा येथील खाणींत मध्यम प्रतीचा कोळसा असून या दोन्ही खाणींत सुमारें १,०० दशलक्ष टन सांठा आहे.

चांदा येथील खाणी

चांदा जिल्ह्यांत दोन खाणी असून अलिकडेच चांदा–रय्यतवारी या तिसऱ्या खाणीचें संपूर्ण यांत्रिकीकरण केलें आहे. या खाणींत सुमारें १,००० दशलक्ष टन कोळशाचा सांठा आहे. बल्लारपूर खाणींत ४ ते ५ फूट जाडीचे अनेक थर आहेत. दोन ठिकाणाहून सध्या कोळसा काढण्यांत येत असून तेथें सुमारें २,००० दशलक्ष टन इतका सांठा आहे. राजूर (वणी) येथील खाण यवतमाळ जिल्ह्यांत असून तेथें १८ ते ३१ फूट जाडीचे तीन थर आहेत. सुमारें २४० दशलक्ष टन कोळशाचा सांठा तेथें आहे. या भागांत चालू असलेली खाण तात्पुरती बंद करण्यांत आली आहे. कामठी येथील खाण नागपूरच्या जवळ आणि कन्हानच्या पश्चिमेस आहे. सध्या एक खाण चालू असून २० फुटांपैकीं १२ फूट जाडीचा थर असलेल्या खाणींतून बऱ्या प्रतीचा कोळसा काढण्यांत येत आहे. या भागांत १७·५ दशलक्ष टन सांठा असल्याचा पूर्वी अंदाज केला होता.

कामठी येथील खाणी

नागपूर जिल्ह्यांत, भूगर्भ आणि खाणकामविषयक खात्यानें कोळसा शोधून काढण्याचें काम मोठ्या प्रमाणांत हातीं घेतलें आहे. कामठी कोलिअरीच्या पश्चिम भागांतील ६ चौरस मैल टापूंत ३५०

दशलक्ष कोळशाचा सांठा असल्याचें आतांपर्यंतच्या पाहणीवरून दिसून आलें आहे. पहाणीचें काम अजूनहि चालू आहे. पूर्वीच्या २१ फूट जाडीच्या पहिल्या थरांतून सध्यां कोळसा काढण्यांत येत असून आणखी अनेक कोळशाचे थर सांपडले आहेत. यापैकीं तिसऱ्या आणि चौथ्या थरांतील कोळसा पहिल्या प्रतीचा (फस्ट ग्रेड) आहे.

नागपूर शहराजवळ बोखारो आणि उमरेड या भागांत कोळशाच्या खाणीचा प्रथमच शोध लागला असून भूगर्भ आणि खाणीविषयक खात्याचें पाहणीचें काम तेथें चालू आहे. उमरेड भागांत कोळशाचे आठ थर असल्याचे माहीत झालें असून तळाच्या थरांतील कोळसा पहिल्या प्रतीचा आहे. या विभागांत पाहणीचें काम अजूनहि चालू आहे. कोळशाच्या खाणीचा शोध लागलेल्या आणि न लागलेल्या विभागांत २,००० दशलक्ष टनांपेक्षां अधिक सांठा असला पाहिजे असा अंदाज आहे.

१९५९ मध्यें महाराष्ट्रांत १,४६,९१,००० रु. किंमतीचा ६,८५,००० टन कोळसा काढण्यांत आला.

मँगनीज

नागपूर आणि भंडारा जिल्ह्यांत भारतांतील फार मोठे अशुद्ध मँगनीजचे सांठे आहेत. या दोन जिल्ह्यांत २०० हून अधिक खाणींतून मँगनीज काढण्यांत येतें. नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तहसिलींतील खापा येथून सुरू झालेल्या १५ मैल रुंदीच्या पट्ट्यांत मँगनीजचे सांठे आहेत. १५ मैल रुंदीचा हा पट्टा नंतर रामटेक आणि भंडारा तहसीलमधून शेवटीं मध्यप्रदेशच्या बालाघाट जिल्ह्यांत जातो.

गुमगांव, रामडोंगरी, कोडेगांव, मनसर, कांद्री, जुनेवाणी, साटक, बेलडोंगरी, गोगुलडोह, मांद्री, पारशिवनी, पाली, चिकला, डोंगरी बुजरूग, सीतासावंगी, एदुरबुची इत्यादि ठिकाणीं अशुद्ध मँगनीजचीं प्रमुख केंद्रें असून पुष्कळशा खाणींतून ओपन कास्ट कारींगपद्धतीनें आणि मजूर लावून काढला जातो. कांहीं थोड्या खाणींतूनच यंत्रसामुग्री बसविली आहे.

या विभागांत सापडणाऱ्या उच्च प्रतीच्या मँगनीजव्यतिरिक्त नागपूर जिल्ह्यांतील खापा आणि रामटेकच्या उत्तर आणि पश्चिमेस कन्हान आणि पेंच नद्यांच्या मध्यें असलेल्या जंगलांत हलक्या प्रतीचे मँगनीजचे सांठे आहेत. या साठ्यांमध्यें सिलीकाचें प्रमाण अधिक आणि मँगनीजचें प्रमाण कमी असल्यामुळें विशेष मँगनीज काढलें जात नाहीं.

मुंबई विभागांत रत्नागिरी जिल्ह्यांत अशुद्ध मँगनीज सापडतें. वेंगुर्ले आणि सावंतवाडी तालुक्यांतच मँगनीजचे सांठे आहेत. या विभागांतील प्राथमिक पाहणीचें काम पूर्ण झालें आहे. मँगनीजचें प्रमाण कमी असल्यामुळें आणि सिलीकाचें प्रमाण अधिक असल्यामुळें हें खनिज फार कनिष्ठ प्रकारचें आहे. हें खनिज पातळ भिंगासारखें परंतु लांबट दिसतें आणि त्यावर लोहमिश्रित मातीचें आवरण असतें. दिग्वे, पडवे, माजगांव, तळकत, मोरगांव, अडाळी, दिंगणा, गलेल, डोंगरपाल, कळने, नेतार्डा, फोंडिये, सासोली आणि पारहर या ठिकाणीं हें मँगनीज सापडतें.

१९५९ मध्यें महाराष्ट्रांत २,४१,४०,००० रु. किंमतीचें १,८८,९२७ टन मँगनीज काढलें.

लोखंड

महाराष्ट्रांतील अनेक जिल्ह्यांत अशुद्ध लोखंडाचे सांठे असल्याचें आढळून आलें आहे. त्यापैकीं

रत्नागिरी, चांदा, नागपूर व भंडारा हे प्रमुख होत. ह्या जिल्ह्यांतील अनेक क्षेत्रांत अशुद्ध लोखंड खाणींतून काढून निर्यात करण्यांत येतें.

चांदा जिल्हा

चांदा जिल्ह्यांत लोहारा, असोला, देवळगांव, विस्सी येथें व सिंदेवाही, मासेळी, चिखली, मान्हेगांव, आरमोरी, विठ्ठलगांव, वागळपेठ व फुसेर येथील सरकारी जंगलांत अशुद्ध लोखंड सापडतें.

लोहारा येथील सांठा सुमारें तीन फर्लांग लांब, २०० यार्ड रुंद व १०० ते २०० फूट उंच आहे. हा अशुद्ध लोखंडाचा पट्टा लोहाराच्या दक्षिण बाजूस असून तो आलेवाही या खेड्यांतून गेलेला आहे. हा सांठा सुमारें २१ दशलक्ष टन असावा असा अंदाज आहे. या अशुद्ध लोखंडांतील शुद्ध लोखंडाचें प्रमाण सरासरी ६९ टक्के आहे. असोला येथील सांठा ४०० यार्डांच्या पट्ट्यांत असून ४० ते ५० फूट जाडीचा थर आहे. हा सांठा अंदाजे ०.४ दशलक्ष टन असावा.

देवलगांव येथील खाणींतील अशुद्ध लोखंडांत शुद्ध लोखंडाचा अंश ६१ ते ६७ टक्के असून तेथील एकूण सांठा ०.२३ दशलक्ष टन असावा असा अंदाज आहे. विस्सी येथील सांठा खेड्याच्या पूर्व बाजूस एक मैल अंतरावर आहे. तेथील सांठ्यांत लोखंडाचा अंश सरासरी ६० टक्के आहे. पिंपळगांव येथील खाणींतील सांठा उत्तम प्रतीच्या हेमॅटाईटच्या स्वरूपांत असून त्यांत ७१ टक्के लोखंडाचा अंश आहे. हा सांठा सुमारें ०.२९ दशलक्ष टनाचा असावा असा अंदाज आहे.

भूगर्भशास्त्र व खाणकामखात्यानें फुसेर येथें केलेल्या पाहणीवरून असें आढळून आलें आहे कीं, सुमारें एक फर्लांग लांब व ५० फुटांपेक्षां अधिक रुंद असलेल्या टेकड्यांत हा अशुद्ध लोखंडाचा सांठा असून त्यांत ६९ टक्के लोखंडाचा अंश आहे. हा एकूण सांठा कित्येक दशलक्ष टन असावा असा अंदाज आहे. हा सांठा मूल रेल्वे स्टेशनापासून ३० मैलांवर आहे.

रत्नागिरी

रत्नागिरी जिल्ह्यांत अशुद्ध लोखंड वेंगुर्लें तालुक्यांतील रेडी, टाक, असोली, आजगांव, शिरोडें, नानोस व सावंतवाडी तालुक्यांतील तळोने, गुळदवें, किन्हाळा, कवठानी, सातारडा, सातेळी, आरोस, ठाकुरवाडी, मालेवाड, मातोंड, दाभोळी, तेंडोली व इतर जागीं सांपडतें. यांपैकीं रेडी, सातोळी, आरोस, तेंडोली व खानोली येथील सांठे महत्त्वाचे आहेत.

ह्या सांठ्यामध्यें तीन प्रकारचें अशुद्ध लोखंड आढळतें : (१) लॅटेरिटिक, (२) लॅमिनेटेड, (३) मॅसिव्ह. यांपैकीं लॅमिनेटेड ओरचें प्रमाण जास्त असून त्यांत ५५ ते ६० टक्के शुद्ध लोखंड आहे. राज्यसरकारच्या खात्यानें नुकत्याच केलेल्या भूगर्भविषयक पाहणींत, हे सांठे फार मोठे असून ते ७० ते १०० फूट खोल असल्याचें आढळून आलें आहे. एकूण सांठा २५ ते ४० दशलक्ष टन असावा असा अंदाज आहे.

भंडारा जिल्ह्यांत अशुद्ध लोखंडाचे सांठे गोंदियापासून १० मैल अंतरावर असलेल्या खुरसीपूर या गांवीं आढळले आहेत. या लोखंडामध्यें हेमॅटाइट कार्टझाईट व ऑल्टर्स ॲम्फीबोलाईटस् यांचें मिश्रण आहे. येथें असलेलें अशुद्ध लोखंड बव्हंशीं टायटनीफेरस आयर्न ओअरच्या स्वरूपांत आहे व त्यांत ५२ ते ५५ टक्के शुद्ध लोखंड आहे. ह्या खाणी गुडसा रेल्वेस्टेशनापासून सुमारें ३ मैलांवर आहेत.

नागपूर जिल्ह्यांत अशुद्ध लोखंडाचे सांठे भिवापूरच्या उत्तरेस २ मैलांवर आहेत. तथापि हा सांठा फार थोडा असून त्यांत शुद्ध लोखंडाचा अंश ५५ ते ५८ टक्के आहे.

१९५९ मध्यें महाराष्ट्रांत ४४,८५,००० रु. किंमतीचें ३१०.१४० टन लोखंडाचें उत्पादन करण्यांत आलें.

बॉक्साइटचे सांठे

बॉक्साईट हा ॲल्युमिनियम धातु तयार करण्यासाठीं लागणारा मुख्य खनिजपदार्थ असून तो कोल्हापूर, कुलाबा, सांगली, रत्नागिरी व ठाणें जिल्ह्यांत सापडतो. हे सांठे प्राथमिक स्वरूपांत असून ते हिंदुस्थानांत इतर ठिकाणीं सापडणाऱ्या सांठ्यासारखेच आहेत.

कोल्हापूर जिल्ह्यांतील या धातूचे मुख्य सांठे उदगिरी, धांगरवाडी, रांजेवाडी, राधानगरी, वाकी, गारगोटी, पन्हाळा, आजरा व विशाळगड या ठिकाणीं समुद्रसपाटीपासून ३००० फूट उंचीवर असलेल्या पठारांत असून तेथें निव्वळ बॉक्साईटचे १० ते १५ फूट खोल सांठे आहेत. हे सांठे मूळच्या बॅसॉल्टसारख्या अग्नियुक्त खडकांपासून बनले आहेत.

धांगरवाडी येथील पठारावर केलेल्या प्राथमिक पाहाणीवरून या ठिकाणीं बॉक्साईटचा १·५ दशलक्ष टन सांठा असावा असा अंदाज करण्यांत आला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यांतील बॉक्साईटचा सांठा अंदजे ५० दशलक्ष टन आहे·

रत्नागिरी जिल्ह्यांत, बॉक्साईटचे सांठे आंबोली घाटांत सापडले असून त्या ठिकाणीं सुमारें ५ दशलक्ष टन बॉक्साईट असावें असें प्राथमिक पाहणीवरून दिसून येतें.

कुलाबा जिल्ह्यांत बॉक्साईटचे सांठे पश्चिम किनाऱ्यावरील मुरुड, रोहा व श्रीवर्धन तालुक्यांत आढळतात. ह्या जिल्ह्यांत हे सांठे जंजिरा तालुक्यांतील सुपेगांव, काशिद, सावरोळी, उसरोळी, सारवे, देस्थे, दोहाणें, चिखलगांव, महालुर, बोरशिव, वांझोली, करमबाळीवाडी व मुरुड, रोहा तालुक्यांतील गोपाळवट, भालगांव, बोरहण, तांबेवाडी, केळघर व खापरी आणि श्रीवर्धन तालुक्यांतील वावें, भारखेड, पुनारोळी, खुजारे, देवकुळ, मणेरी, आडगांव, वेळा, वाकळघर, शेखाडी, कांदीवली व दांडगोरी या गावीं आहेत.

ठाणें जिल्ह्यांत तुंगार टेकड्या व बोरिवली, जोगेश्वरी व गोरेगांव यांच्या परिसरांत बॉक्साईट सापडतें. तुंगार टेकड्यांत चांगल्या प्रकारच्या बॉक्साईटचा ०·६ दशलक्ष टन सांठा असावा असा अंदाज आहे.

चुनखडीचे सांठे

चुनखडीचे सांठे निरनिराळ्या ठिकाणीं आणि निरनिराळ्या प्रकारच्या जमिनींत आढळतात. ह्यापैकीं यवतमाळ व चांदा जिल्ह्यांतील विंध्य पर्वताच्या रांगांमध्यें चुनखडीचे महत्त्वाचे सांठे आहेत. याखेरीज नांदेड जिल्ह्यांतील किनवत तालुक्यांत, तसेंच मिरज येथें अधूनमधून आढळणारे सांठेहि विचारांत घेण्यासारखे आहेत.

यवतमाळ व चांदा जिल्ह्यांत आढळणारे चुनखडीचे सांठे व्यापक प्रमाणांत असून ते वणीच्या पश्चिम व दक्षिण दिशेला पसरलेले आहेत. तेथील चुनखडी चांगल्या दर्जाची असून सिमेंट तयार

करण्यासाठीं, तसेंच धातुसाठीं वापरावयाच्या भट्टींतील मिश्रणासाठींहि ह्या चुनखडीचा चांगला उपयोग होऊं शकतो.

चांदा जिल्ह्यांत, वरोरा तालुक्यांत निलजी आणि बोरीजवळ तसेंच पुर्कैपार, खंडाळा आणि मर्धा येथें चुनखडी सापडते. विंध्य पर्वताच्या रांगांतून सापडणाऱ्या ह्या सांठ्याखेरीज, रामटेक व सावनेर तहसिलींत जेथें मँगनीज सापडतें अशा भूभागांत रेतीमिश्रित अशा चुनखडीचे सांठे आढळतात. ह्या सांठ्यापैकीं कान्द्री, पटगोवारी आणि देवलापूरजवळ सापडणारी चुनखडी बऱ्या दर्जाची असून सध्या ह्या सांठ्यांचा उपयोग करून घेण्यांत येत आहे.

मराठवाड्यांत चुनखडीचे मोठमोठे सांठे आहेत. मोहाडा भागांत (नांदेड जिल्ह्याचा किनवत तालुका) सर्व प्रकारच्या १०० लक्ष टनाच्या चुनखडीचे सांठे आहेत असे त्या भागांत अलिकडेच केलेल्या पहाणींत दिसून आलें आहे. पुणें जिल्ह्यांत, कोलार, नांदूर आणि खंडरवाडी अशासारख्या अनेक ठिकाणीं, तसेंच फलटण तालुक्यांत कित्येक ठिकाणीं चुनखडी सापडते. येथील सांठे फक्त १०,००० टनाचे असावेत असा अंदाज आहे आणि त्यामुळें एखाद्या मोठ्या धंद्यासाठीं त्यांचा उपयोग होऊं शकणार नाहीं. दक्षिण सातारा जिल्ह्यांत, मिरजेच्या आसपास नारवड, वड्डी, बेदग, आरग, बेलुंकी, कन्नडवाडी, सावळी, तानंग, कळंबी, कुपवाड, एरंडोली, सलगरे वगैरे ठिकाणीं खडकामधून चुनखडी सापडते. ह्या ठिकाणीं जी प्राथमिक पहाणी करण्यांत आली आहे त्यामध्यें येथील चुनखडीचा दर्जा चांगला आहे, असें आढळून आलें आहे.

१९५९ सालीं महाराष्ट्रांत ५७,३४४ रुपये किंमतीची ४९,०३५ टन चुनखडी काढण्यांत आली.

क्रोमाईट

क्रोमाईट रत्नागिरी जिल्ह्यांत, मुख्यतः कणकवली, जानोली आणि वाडगा येथें आणि भंडारा जिल्ह्यांत पवनी, किताडी, कसरंबोडी आणि गायडोंगरी ह्या ठिकाणीं सापडते.

रत्नागिरी जिल्ह्यांत सापडणाऱ्या क्रोमाईटमध्यें कणकवली येथील क्रोमाईटचे सांठे सर्वांत महत्त्वाचे आहेत. ह्या ठिकाणीं क्रोमाईट जमिनींतील तळखडकांत सापडते. कणकवलीच्या उत्तरेस अर्ध्या मैलावर जानोली येथें सापडणारा सांठाहि जमिनींतील तळखडकांत आढळतो. तथापि, त्याचें प्रमाण मर्यादित आहे.

कणकवलीच्या नैर्ऋत्येला वडगाजवळ जे क्रोमाईट सापडतें तेथील सांठा जानोली येथील सांठ्याहून मोठा असून त्याची लांबी साधारणपणें ३०० फूट व रुंदी जवळजवळ ५० फूट आहे. येथील सांठ्याचा दर्जा कणकवलीच्या सांठ्यासारखाच आहे.

भंडारा जिल्ह्यांत पवनी, तिताडी, कसरंबोडी आणि गायडोंगरी येथील सांठ्याचा व्याप मोठा असून ते जमिनींतील तळखडकांत आढळतात. त्यांतील वरच्या बाजूचें क्रोमाईट कांहींसें अशुद्ध स्वरूपांत असतें. ह्या सांठ्याची भूगर्भशास्त्रदृष्ट्या अद्याप तपशीलवार पहाणी झालेली नाहीं. तथापि, प्राथमिक पहाणीवरून असें दिसून आलें आहे. कीं व्यापाराच्या दृष्टीनें उपयोग करण्याइतके हे सांठे मोठे आहेत.

अभ्रक

राज्यांत अभ्रक अनेक ठिकाणीं सापडतें.

अभ्रकाचे प्रमुख सांठे रत्नागिरी जिल्ह्याच्या सावंतवाडी, कुडाळ, कणकवली व मालवण या तालुक्यांत आहेत. त्यांपैकीं कुडाळ तालुक्यांत कडावलजवळील सांठा सर्वांत महत्त्वाचा आहे.

इल्मेनाईट

रत्नागिरी जिल्ह्यांत इल्मेनाईटचे विस्तृत सांठे आहेत. हे सांठे पश्चिम किनाऱ्यावरील सुमारें २५ मैलांच्या क्षेत्रांत रत्नागिरीच्या उत्तरेस व दक्षिणेस मालगुंड, उरी, लुडी, तेवरी, जयगड, पानशाळ, दापोली, दाभोळ, जैतापूर व कुवेशी इत्यादि ठिकाणीं आहेत. त्यांत मालगुंड, उरी व तेवरी येथें असणारे सांठे सर्वांत महत्त्वाचे आहेत. किनाऱ्यावरील सर्व क्षेत्रांतील एकूण सांठा २ दशलक्ष टन असावा असा अंदाज आहे. तथापि, या साठ्यांतील धातु त्रावणकोरमध्यें सापडणाऱ्या इल्मेनाईट इतकी चांगल्या प्रतीची नाहीं.

सिलिका सँड व चिकण माती

सिलिका सँड अथवा कांचेची वाळू रत्नागिरी जिल्ह्यांत, दक्षिणेस गोव्याच्या सीमेपासून तों उत्तरेस देवगडपर्यंत वेंगुर्लें, मठ, वेतोरा, चिंदवण, वालावल, कावटणी, तेंडोली, आचरें, मिठबांव इत्यादि अनेक ठिकाणीं सापडते. या साठ्यांपैकीं सध्या फक्त वेतुरा, चिंदवण व वालावल येथील खाणींतून वाळू काढण्यांत येते. वेतुरा, वालावल, चिंदवण व इतर ठिकाणचे एकूण सांठे ७ दशलक्ष टनाचे असावेत असा अंदाज आहे. तथापि, या खाणींतील सर्व प्रतीचें वार्षिक उत्पादन १०,००० टनाचें आहे.

चिनी मातीचीं भांडीं, मातीचीं भांडीं, रिफ्रॅक्टरीज व विटा यांच्याकरितां लागणारी चिकण माती अनेक ठिकाणीं उपलब्ध आहे. चिकण मातीचे मुख्य सांठे नागपूर, चांदा, अमरावती, रत्नागिरी व ठाणें या जिल्ह्यांत आहेत.

गेरू

गेरू हा एक नैसर्गिक रंग असून तो नागपूर, चांदा, भंडारा, रत्नागिरी, कोल्हापूर व कुलाबा या जिल्ह्यांत सापडतो. बहुतेक ठिकाणीं सापडणारा गेरू पिवळ्या रंगाचा असून अशुद्ध स्वरूपांत आहे. पिवळ्या रंगाचा गेरू अनेक ठिकाणीं सापडत असला तरी तो अजून खाणींतून काढण्यांत येत नाहीं. रत्नागिरी जिल्ह्यांत पिवळ्या रंगाच्या निरनिराळ्या छटा असलेला गेरू सावंतवाडी, कुडाळ व वेंगुर्लें येथें सापडतो.

फेल्सपर व क्वॉर्ट्झ

फेल्सपर, क्वॉर्ट्झ व अभ्रक एकत्र असलेले सांठे राज्यांत अनेक ठिकाणीं आहेत. तथापि फेल्सपर व क्वॉर्ट्झ यांचें खाणकाम करण्याजोगे सांठे फक्त रत्नागिरी जिल्ह्यांतच कडावल व पानगड पट्ट्यांतच असून ते चिनी मातीचीं भांडीं तयार करण्याच्या कामीं उपयोगांत आणतां येतील. या भागांत फेल्सपर व अभ्रक काढीत असतांना क्वॉर्ट्झहि मिळूं शकेल व तो चिनी मातीचीं भांडीं तयार करतांना उपयोगांत आणतां येईल.

कामगारविषयक कायदे व कामगार कल्याण

महाराष्ट्र राज्यांतील कामगारविषयक कायद्यामध्यें औद्योगिक संबंध, वेतन, कामगार संघटना, औद्योगिक कामगारांचें कल्याण, त्यांच्यासंबंधीची आंकडेवारी वगैरे संबंधीच्या कायद्यांचा समावेश होतो. हे कायदे म्हणजे औद्योगिक कलह निवारण कायदा, मुंबई औद्योगिक संबंधीचा कायदा, औद्योगिक कामधंद्यासंबंधीचा (स्थायी आदेश) कायदा, श्रमिक पत्रकार कायदा आणि किमान वेतन कायदा आणि दुकानें व संस्थासंबंधीचा कायदा हे होत.

किंमती आणि वेतनें, कामाचे तास, औद्योगिक कलह वगैरेसंबंधीची आंकडेवारी तयार करण्याखेरीज लेबर गॅझेट व इंडस्ट्रिअल कोर्ट रिपोर्टर हीं दोन प्रकाशनेंहि सरकारतर्फे प्रकाशित केलीं जातात. लेबर गॅझेटमध्यें आंकडेवारीसंबंधीची व इतर माहिती आणि ग्राहकांचे किंमतींसंबंधीचे (इंडेक्स) निर्देशांक किरकोळ किंमती, औद्योगिक कलह, कामगारांच्या रोजगारांतील फेरफार तसेंच सुप्रीम कोर्ट, हायकोर्ट आणि लेबर कोर्ट ह्यांच्या निवडक निकालांचे सारांश असतात. औद्योगिक न्यायालयें आणि न्यायमंडळें यांचे निवडक निवाडे व आदेश वगैरे, तसेंच हायकोर्ट आणि सुप्रीम कोर्ट यांचे महत्त्वपूर्ण निकाल इंडस्ट्रियल कोर्ट रिपोर्टर या प्रकाशनांत प्रसिद्ध केले जातात.

१९४८ चा फॅक्टरीसंबंधीचा कायदा, वेतन देण्याबाबतचा कायदा, मुंबई प्रसूतिविषयक कायदा, कपाशीमधील सरकी काढून त्याचे गठ्ठे बांधणाऱ्या कारखान्यासंबंधीचा कायदा, तसेंच लहान मुलांच्या कामधंद्यासंबंधी कायदा, इंडियन बॉयलर्स ॲक्ट आणि मुंबईला धुरापासून होणाऱ्या त्रासाबाबतचा कायदा हेहि कायदे राज्यांत अंमलांत असून त्यांत नोकरांच्या कामाबद्दलच्या परिस्थितीचें नियमन करणाऱ्या तरतुदी आहेत.

औद्योगिक कामगारांच्या संघटना आणि कामगार संघटनांच्या नियमांतील दुरुस्ती भारतीय कामगार संघटनाबाबतच्या कायद्याखालीं नोंदविण्यांत येते. सध्यां ह्या कायद्याखालीं १४२६ कामगार संघटना नोंदविल्या गेल्या आहेत.

मुंबई औद्योगिक संबंध कायद्याखालीं आणि मुंबई कलहनिवारण कायद्याखालीं कमिशनर ऑफ लेबर, डेप्युटी कमिशनर ऑफ लेबर आणि असिस्टंट कमिशनर ऑफ लेबर ह्यांना तडजोड अधिकारी (कन्सीलिएटर्स) म्हणून अधिसूचित करण्यांत आले आहेत. सामुदायिक मागण्यासंबंधीचे झगडे ह्या अधिकाऱ्यांपुढें नेले जातात व अशा झगड्यांत मध्यस्थी करून तडजोड घडवून आणण्याची त्यांना विनंती करण्यांत येते. असे झगडे मिटविण्याच्या दृष्टीनें हे अधिकारी वरील दोन कायद्यांत नमूद केल्याप्रमाणें आपलें कर्तव्य पार पाडतात. तडजोड होत नसेल अशा बाबतींत हे अधिकारी सरकारला या बाबतचा अहवाल सादर करतात व अशीं प्रकरणें निवाड्याकरितां औद्योगिक न्यायमंडळाकडे अगर लवादाकडे सोपवावीत किंवा कसें यासंबंधीं निर्णय मागवितात. हे अधिकारी करार, तडजोडी आणि निवाडे यांचा भंग झाल्यासंबंधीच्या तक्रारी तसेंच या कायद्याच्या तरतुदीच्या भंगाबाबत चौकशी करतात.

मुंबई औद्योगिक संबंध कायद्यांत संघटना, तडजोडी, करार वगैरेंच्या नोंदणीचीहि तरतूद करण्यांत आली आहे. ह्या कायद्यानुसार एका असिस्टंट कमिशनर ऑफ लेबरला संघटनांचा रजिस्ट्रार म्हणून नेमण्यांत आलें आहे.

मालक-नोकर संबंध

औद्योगिक कामधंद्यासंबंधीच्या (स्थायी आदेश) कायद्यांत मालक व नोकर यांच्या संबंधाबाबत तरतूद आहे. मुंबई औद्योगिकसंबंध कायद्यांतहि अशाच स्वरूपाच्या तरतुदी आहेत. यापैकीं पहिल्याच्या बाबतींत कमिशनर ऑफ लेबर ह्यांना प्रमाणीकरण अधिकारी (सर्टिफाईंग ऑफिसर) म्हणून नेमण्यांत आलें असून ते मुंबई औद्योगिक संबंध कायदा आणि औद्योगिक रोजगार (स्थायी-आदेश) कायद्याच्या कक्षेंत येणाऱ्या धंद्यांचे स्थायी आदेश, सूचना मागवून किंवा आवश्यक वाटल्यास, मालक व नोकर यांच्या प्रतिनिधींचें म्हणणें ऐकून घेतल्यानंतर स्वतः प्रमाणित करतो. १९५९ मध्यें दुरुस्त्या व फेरबदल यांसह त्यांनीं १०३ स्थायी आदेशांचे आराखडे प्रमाणित केले. ह्या वर्षाच्या पहिल्या पांच महिन्यांत ही संख्या ३३ होती.

सरकारनें मुंबई दुकानें व संस्था कायद्यानुसार एक पर्यवेक्षण योजना सुरू केली आहे. एक असिस्टंट कमिशनर ऑफ लेबर लेबर ऑफिसरांच्या साहाय्यानें ह्या योजनेची अंमलबजावणी करतात. ह्या योजनेनुसार वरील कायद्याची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या बाबतींतील अडचणी जाणून घेण्याच्या व त्यांतून मार्ग सुचविण्याच्या उद्देशानें स्थानिक संस्थांचे (लोकल ॲथॉरिटींचे) अध्यक्ष व मुख्याधिकारी यांच्या बैठकी भरविण्यांत आल्या. मालकांच्या संघटनांच्याहि अशाच बैठकी भरविण्यांत आल्या. मालकांना कायद्याच्या तरतुदीची माहिती देण्यांत आली व त्या तरतुदीनुसार त्यांनीं वागलें पाहिजे ही गोष्ट त्यांना पटविण्यांत आली.

कामगारांच्या नोकरीबाबत व राहणीबाबतची परिस्थिति पाहणें, किमान वेतन कायद्यान्वयें पगाराचे किमान दर ठरविल्यामुळें होणारे परिणाम पाहणें, ग्राहकांचे किंमतींचे दर्शकांक तयार करण्याकरितां कौटुंबिक जमाखर्चासंबंधीं चौकशी करणें या उद्देशानें सामाजिक व आर्थिक चौकशी योजनेनुसार मोठ्या प्रमाणावर चौकशी केली जात आहे. १९६०–६१ मध्यें किमान वेतनाच्या

१०

परिणामांचा अभ्यास करण्याकरितां सात व्यवसायांत चौकशी करण्याचें आणि इतर चार व्यवसायांत तेथें किमान वेतन कायदा लागू करावा कीं नाहीं हें ठरविण्यासाठीं, प्रारंभिक पाहणी करण्याचें ठरविलें आहे. ह्या वर्षी सरकारला दोन अहवाल सादर केले जातील अशी अपेक्षा असून त्यांपैकीं एक सहा उद्योगधंद्यांबाबत आहे व दुसरा कामगार कुटुंबाच्या राहणीच्या पाहणीबाबत आहे.

प्रशिक्षणासाठीं कारखाने

राज्यसरकार मार्फत कुर्ला येथें एक व सोलापूर येथें एक असे दोन कारखाने चालविले जातात. ह्या कारखान्यांत औद्योगिक कामगारांना व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना सुतारकाम, सांचेकाम, लोहारकाम टर्निंग, फिटिंग, रंगकाम; शिवणकाम, वगैरे व्यवसायांचे विनामूल्य प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आहे. हे व्यवसाय शिकण्याकरितां प्रशिक्षार्थींना कांहींहि फी द्यावी लागत नाहीं. प्रशिक्षण समाधानकारकपणें पूर्ण झाल्यावर प्रशिक्षार्थी जर आवश्यक परीक्षेंत उत्तीर्ण झाले तर त्यांना प्रमाणपत्रें देण्यांत येतात. लादल्या गेलेल्या बेकारीच्या काळांत, औद्योगिक कामगारांना त्यांनीं ह्या कारखान्यांतून घेतलेल्या अन्य धंदेशिक्षणाचा उपजीविकेकरितां उपयोग करतां यावा हा हे कारखाने चालविण्याचा मुख्य उद्देश आहे. शिवाय त्यामुळें ते आपल्या विशिष्ट धंद्यांतील कुशल कारागीरहि होऊं शकतात.

कामगारक्षेत्रांतील व्यक्तींना विशिष्ट प्रकारचें प्रशिक्षण देण्याच्या उद्देशानें १९४७ मध्यें कामगार कल्याण कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देणारें एक विद्यालय स्थापन करण्यांत आलें होतें. हंसा मेहता समितीच्या शिफारशीवरून कामगार कल्याण अधिकाऱ्यांना कामगार कल्याण पदवीपत्र देणारा दोन वर्षांचा एक संपूर्ण अभ्यासक्रम १९५५ मध्यें सुरू करण्यांत आला. जुलै १९५९ पासून ह्या संस्थेचा दर्जा आणखी वाढविण्यांत आला असून, १९५३ च्या मुंबई विद्यापीठ कायद्यानुसार त्याला विशेष शिक्षण देणारी पदव्युत्तर संस्था म्हणून मान्यता मिळाली आहे. यायोगें विद्यापीठाचा 'डिप्लोमा इन लेबर वेलफेअर (डीएलडब्ल्यू)' हें पदवीपत्र दोन वर्षांत मिळूं शकतें. ह्या संस्थेस बॉम्बे लेबर इन्स्टिट्यूट असें संबोधण्यांत येत असून या संस्थेंत खालच्या व वरच्या वर्गांत ४० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. ह्या परीक्षेंत उत्तीर्ण होणारे विद्यार्थी फॅक्टरी कायद्यानुसार कल्याण अधिकारी म्हणून नियुक्त होण्याकरितां पात्र ठरतात.

कापडधंद्यांतील कामगारांकरितां पाळीपाळीनें काम देण्याबाबतची योजना (डिकॅज्युलायझेशन) १९५० मध्यें मुंबई व सोलापूर येथें प्रथम सुरू करण्यांत आली. कामगारांच्या भरतीचें नियमन करणें, मनुष्यबळाचा व्यय टाळणें, बेकार कापडकामगारांचा बेकारीचा काळ कमी करणें, कापडधंद्यांतील कामगाराची नेमणूक करतांना होणारी लांचलुचपत व वशीलेबाजी नाहींशी करणें आणि कामगाराच्या रोजगारांतील फेरफार कमी करून कार्यक्षमता व उत्पादनांत वाढ करणें हा या योजनेचा उद्देश आहे. ही योजना सध्या ऐच्छिक भूमिकेवरून मुंबईच्या गिरणीमालकांची असोसिएशन; मुंबईचे गिरणीमालक आणि कामगारांचे प्रतिनिधी ह्यांच्या सहकार्यानें अंमलांत आणण्यांत येत आहे.

कल्याणविषयक कार्य

कारखान्यांच्या बाहेरील कल्याणविषयक कार्य मुंबई कामगार कल्याण मंडळ नांवाच्या एका कायद्यान्वयें स्थापन झालेल्या मंडळाकडून चालविलें जातें. ह्या मंडळाचें कार्य पश्चिम महाराष्ट्रांत

चालू आहे. मात्र विदर्भ व मराठवाडा या भागांतील कामगार कल्याण कार्य खात्यातर्फें चालविलें जातें. विदर्भांत १० बहुउद्देशीय संस्था यापूर्वींच सुरू केल्या असून ह्या वर्षी आणखी सात संस्था सुरू करण्याचें योजिलें आहे. ह्या संस्थांतर्फें मैदानी तसेंच घरबैठ्या खेळांची सोय केली जाते. तसेंच ह्या संस्थांतून प्रौढ शिक्षण, हस्तव्यवसाय, नर्सरी तसेंच शारीरिक शिक्षण इत्यादींचे वर्ग चालविण्यांत येतात.

कामगारांत वाचनाबद्दल गोडी वाढविण्याच्या उद्देशानें या बहुउद्देशीय संस्थांना जोडूनच वाचनालयें चालविण्यांत येत आहेत. विदर्भांतील बहुतेक सर्व औद्योगिक शहरांमधून या संस्था उघडल्या जातील.

मराठवाडा विभागांत महत्त्वाच्या औद्योगिक केंद्रांतून आठ कल्याण केंद्रें उघडलीं आहेत. या केंद्रांतून कॅरम, बुद्धिबळ, रिंगबोर्ड वगैरेसारख्या बैठ्या खेळांची सोय केली आहे. याखेरीज कामगारांसाठीं व्हॉलीबॉल, फुटबॉल, टेनिकॉइट वगैरेसारखे मैदानी खेळांचीहि तेथें सोय आहे. ह्या कल्याण केंद्रांत डबलबार, उचलण्याची वजनें, चेस्ट एक्सपान्डर वगैरेसारखीं कसरतीच्या व्यायामाचीं साधनेंहि ठेवलीं आहेत. ह्या केंद्रांत एक छोटेसें वाचनालय असून त्यांत लोकप्रिय वृत्तपत्रें व नियत-कालिकें ठेवलीं जातात. कामगारांच्या करमणूकविषयक व सांस्कृतिक गरजांकडेहि तेथें लक्ष पुरविलें जातें. स्त्रीकामगारांकरितां शिवण व भरतकामाचे खास वर्ग चालविले जातात व मुलांकरितां केंद्रांतून खेळांची खास सामग्री ठेवली जाते.

नोकरवर्ग व्यवस्था सल्लागार योजना

उत्पादन आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्था यांच्या हिताच्या दृष्टीनें उद्योगधंद्यांत चांगल्या औद्योगिक संबंधांना किती महत्त्व आहे हें वेगळें सांगायला नको. सर्वसाधारणपणें कामगार कायद्यांमध्यें तंटा उद्भवला असतां सरकारी अधिकाऱ्यांनीं मध्यस्ती करण्याबाबत तरतूद असते. तथापि केवळ, एवढ्याच तरतुदीनें भागणार नाहीं आणि केवळ औद्योगिक तंटे टाळण्यासाठीं नव्हे, तर औद्योगिक संबंधहि ज्यांत अंतर्भूत आहेत असे धंद्यांतील मानवी संबंध अधिक सुधारले पाहिजेत असें वाटूं लागलें. शिवाय क्षुल्लक बाबींकडे जर सुरुवातीलाच लक्ष दिलें नाहीं तर त्या पुढें गंभीर स्वरूप धारण करतात व त्यांतून गंभीर औद्योगिक तंटे निर्माण होतात असा अनुभव आहे. कामगारविषयक कायद्यांची वाढ, गुंतागुंतीचे औद्योगिक संबंध आणि देशांतील औद्योगीकरण ह्यामुळें या प्रश्नांबाबत सरकारनें मानवतावादी दृष्टिकोन अंगिकारला आहे. म्हणून एक योजना सुरू करण्याची आवश्यकता भासूं लागली. ह्याच योजनेला नोकर-व्यवस्था सल्लागार योजना असें म्हटलें जातें. ह्या योजनेमुळें ज्या लहान लहान औद्योगिक संस्थांना एक खास विभाग किंवा पर्सनेल अधिकाऱ्यासारखा एखादा खास अधिकारी ठेवणें शक्य होत नाहीं त्यांची गरज भागते, अशी अपेक्षा आहे.

सरकारी लेबर ऑफिसरांनीं त्यांच्या नजरेस येणाऱ्या औद्योगिक संबंधांबाबतच्या सर्व प्रश्नांकडे लक्ष पुरवावें असें त्यांना सांगण्यांत आलें आहे. तसेंच कांहीं निवडक उद्योगधंद्यांना व व्यवसायांना भेटी देऊन तेथील कामगार व मालक यांचे संबंध चांगले आहेत कीं नाहीं हें पहावें, असेंहि त्यांना सांगण्यांत आलें आहे. जर त्यांना एखाद्या ठिकाणीं कांहीं प्रश्न निर्माण झाल्याचें आढळून आलें तर मालक व नोकर दोघांनाहि विश्वासांत घेऊन त्या प्रश्नाबाबत त्यांना सांगोपांग चौकशी करावी लागते. मालक किंवा नोकर यांना कामगारविषयक प्रश्नांबाबत कांहीं मार्गदर्शन किंवा सल्ला हवा असल्यास तोहि त्यांना ह्या अधिकाऱ्यांकडून मिळूं शकतो.

नोकर–व्यवस्था सल्लागार योजनेखालीं गेल्या एका वर्षांत १०० प्रकरणांची चौकशी करण्यांत आली. यांपैकीं ७० बाबतींत तंट्यांतील पक्षांना त्यांनीं अवलंबिलेला मार्ग बदलण्यास भाग पाडण्याबाबत व त्यामुळें संभाव्य तंटे टाळण्याबाबत चौकशी अधिकाऱ्यांच्या प्रयत्नांना यश आलें. या योजनेनें दोन्हीं बाजूंच्या दृष्टीनें चांगलें कार्य केलें आहे. एका बाजूला, संतुष्ट कामगारवर्ग हा धंद्याच्या दृष्टीनें मोठा आधार असतो हें मालकांना पटवून देऊन त्यांचेकडून अधिक सुधारणा करवून घेतल्या गेल्या तर, दुसऱ्या बाजूस, नोकरवर्गानें आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्यासाठीं कामांत विलंब करण्याच्या किंवा संपावर जाण्याच्या मार्गांचा त्याग करून परस्परांतील वाटाघाटीचा मार्ग अवलंबावा असा प्रयत्न करण्यांत आला.

उद्योगधंद्यांतील शिस्त

उद्योगधंद्यांतील शिस्तीच्या प्रश्नावर जुलै १९५७ मध्यें नवी दिल्ली येथें भरलेल्या इंडियन लेबर कॉन्फरन्सच्या १५ व्या अधिवेशनांत सर्वप्रथम चर्चा झाली आणि उद्योगधंद्यांत शांतता नांदावी म्हणून मालक व नोकर यांनीं पाळावयाचीं कांहीं मूलभूत तत्त्वें त्यावेळीं निश्चित करण्यांत आलीं. अधिवेशनांत मान्य केलेल्या तत्त्वांचा तपशील ठरविण्याकरितां व त्या तत्त्वांना निश्चित स्वरूप देण्याकरितां नंतर एक उप-समिति नेमण्यांत आली. या उपसमितीनें एका शिस्तसंहितेचा मसुदा तयार केला व तो ऑक्टोबर १९५७ मध्यें भरलेल्या स्टँडिंग लेबर कमिटीच्या १६ व्या अधिवेशनांत स्वीकारण्यांत आला. ह्या संहितेस मध्यवर्ती मालक व नोकर संघटनांच्या प्रतिनिधींनीं मे १९५८ मध्यें नैनीताल येथें भरलेल्या भारतीय कामगार परिषदेंत मान्यता दिली आणि ती १ जून १९५८ पासून अंमलांत आली.

उद्योगधंद्यांत शांतता राहावी म्हणून मालक व नोकर यांचेकरितां वागणुकीच्या कांहीं पद्धति निश्चित करणें हा ह्या संहितेचा मुख्य उद्देश आहे. सध्याच्या कायद्यांतील तरतुदी परिणामकारकपणें अंमलांत आणण्याकरितां आवश्यक ती यंत्रणा निर्माण करण्याची सरकारच्या जबाबदारीची जाणीवहि संहितेद्वारें देण्यांत आली आहे. या संहितेनुसार संप, टाळेबंदी व सूचनेशिवाय कारखाने बंद करणें या गोष्टींना बंदी करण्यांत आली आहे. कामगार व त्यांच्या संघटना यांनीं आपल्या अडचणी शांततापूर्ण वाटाघाटींनीं सोडवाव्या व आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यांकरितां कामांत विलंब करणें, दमदाटी करणें यांसारख्या अयोग्य गोष्टींचा अवलंब करूं नये अशी अपेक्षा संहितेंत व्यक्त केली आहे. मालकांनींहि तक्रारी सोडविण्याकरितां योग्य यंत्रणा निर्माण करावी, व कामगारांना कामावरून काढून टाकणें, त्यांच्या बाबतींत पक्षपात करणें व दडपशाहीच्या मार्गांचा अवलंब करणें असे मार्ग अवलंबूं नयेत. तसेंच संहितेंत दिलेल्या अटीं पूर्ण करणाऱ्या संघटनांना मान्यता द्यावी अशी अपेक्षा संहितेंत व्यक्त केली आहे.

स्टँडिंग लेबर कमिटीच्या ज्या आधींच्या अधिवेशनांत संहिता मंजूर करण्यांत आली होती, त्यांत असें ठरलें होतें कीं संहितेच्या तरतुदींच्या अंमलबजावणीबरोबरच करार, तडजोडी, निवाडे, निर्णय आदेश इत्यादींच्या योग्य अंमलबजावणीकरितां एक योग्य अशी यंत्रणा निर्माण करण्यांत यावी. यासाठीं केंद्रसरकार, राज्य सरकारचे मुख्य ठिकाण व स्थानिक ठिकाणें अशा तीन स्तरांवर त्रिपक्ष मंडळें निर्माण करण्याची व्यवस्था करण्याचें ठरविण्यांत आलें होतें. संहितेच्या भंगासंबंधींच्या आरोपांची चौकशी करणें व करार, तडजोडी, निवाडे, आदेश वगैरेंची योग्य अंमलबजावणी करणें हें समित्यांचें मुख्य काम आहे.

वरील शिफारशी प्रत्यक्षांत आणण्याकरितां संपूर्ण राज्यासाठीं एक अंमलबजावणी व मूल्यांकन अधिकारी नेमण्यांत आला आहे. राज्यानेंहि राज्यपातळीवर एका त्रिपक्ष समितीची स्थापना केली असून राज्य अंमलबजावणी व मूल्यांकन समिति असें तिचें नांव आहे. ही समिति यंदाच जूनच्या सुरुवातीला स्थापन करण्यांत आली. शिस्तसंहितेच्या भंगाबाबत करण्यांत आलेल्या तक्रारीबाबत समिति चौकशी करील, तसेंच राज्याच्या कक्षेंत येणारे करार, तडजोडी, निवाडे, आदेश वगैरेंच्या अंमलबजावणीवर लक्ष देईल.

संहिता कांहीं कायद्याच्या स्वरूपांत नाहीं. ती एक ऐच्छिक योजना आहे. म्हणूनच ती मंजूर करणाऱ्या पक्षांच्या ऐच्छिक सहकार्यावरच तिचें यश अवलंबून आहे.

औद्योगिक शांतता

राज्याच्या उद्घाटन प्रसंगीं मुख्य मंत्र्यांनीं केलेल्या धोरणविषयक निवेदनानुसार आद्योगिक तह घडवून आणण्यासाठीं विशिष्ट उपाययोजना अद्याप करण्यांत आलेली नसली तरी कामगार कायदे, निवाडे, करार इत्यादींची अंमलबजावणी न झाल्याबाबत येणाऱ्या तक्रारींची चौकशी व त्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून प्रयत्न करण्यासाठीं सरकारनें मालक, कामगार आणि सरकार ह्यांच्या प्रतिनिधींची एक त्रिपक्ष समिती नेमली आहे. ह्या समितीला शिस्तसंहितेच्या भंगाच्या प्रकरणांची चौकशी करावी लागेल आणि राज्याच्या उद्योगधंद्यांतून तिची परिणामकारक अंमलबजावणी करण्याकडे लक्ष पुरवावें लागेल.

वाहतुक आणि दळणवळण

१९४३ सालीं तयार करण्यांत आलेल्या नागपूर योजनेनुसार प्रत्येक जिल्ह्यांमधील वाहतुकींच्या गरजा लक्षांत घेऊन पुढील २० वर्षांसाठीं वेगवेगळ्या प्रकारच्या रस्त्यांचा अंदाज करण्यांत आला आहे. हा अंदाज क्षेत्रफळ, लोकसंख्या, शेती, व्यापार व उद्योगधंदे यांत होणारी संभाव्य वाढ व वाहतुकीचीं पर्यायी साधनें इत्यादि अनेक बाबींवर आधारण्यांत आला आहे. सदर योजनेचा उद्देश देशांतील जवळजवळ सर्व खेडीं बारमाही वाहतुकीस योग्य असलेल्या रस्त्याजवळ आणणें व विकसित भागांतील कोणतेंही खेडें मुख्य रस्त्यापासून ५ मैलांपेक्षां अधिक दूर न ठेवणें, हा आहे.

नागपूर योजनेनुसार सबंध भारतासाठीं १९६३ सालापर्यंत ३,३१,००० मैल रस्त्यांचा इष्टांक गांठण्याचें ठरविण्यांत आलें होतें. दुसऱ्या योजनेच्या अखेरपर्यंत या इष्टांकापलीकडे मजल गांठण्याची शक्यता आहे. महाराष्ट्राकरितां, नागपूर योजनेप्रमाणें ४७,१३४ मैलांचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें असलें तरी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं अदमासें २५,६२७ मैल लांबीचे रस्ते तयार होतील. म्हणजे उद्दिष्टाच्या मानानें बरेंच काम करावयाचें शिल्लक उरेल.

सुधारलेली योजना

नागपूर योजना ही उघडउघड माफक स्वरूपाची होती. या योजनेंत स्वातंत्र्य संपादनानंतर होणाऱ्या आर्थिक रचनेच्या विस्ताराची व विकासाच्या गतीची कल्पना करतां येणें शक्य नव्हतें. वाढत्या अर्थव्यवस्थेच्या गरजा व सध्यांच्या आर्थिक व तांत्रिक परिस्थितीनुसार व्यवहार्यता लक्षांत घेऊन ठरविलेल्या इष्टांकांत बदल करण्याची गरज वाटूं लागली. हें काम राज्यांतील चीफ इंजिनिअर्सनीं हातीं घेतलें व रस्त्यांची २० वर्षें मुदतीची (१९६०–६१ ते १९८०–८१) एक नवीन योजना, देशाच्या गरजा लक्षांत घेऊन तयार करण्यांत आली. या योजनेनुसार १९८१ सालापर्यंत ६,५७,००० मैल

लांबीच्या रस्त्यांचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. या योजनेप्रीत्यर्थ सबंध भारतासाठीं ५,२२० कोटि रुपये इतका खर्च येणार आहे. सदर योजनेचा उद्देश, विकसित व शेतकी क्षेत्रांतील प्रत्येक खेडें खडीच्या रस्त्यापासून ४ मैलांच्या व कोणत्याहि रस्त्यापासून १·५ मैलांच्या आंत आणून सोडणें, अर्ध–शेतकी क्षेत्रांतील खेडें हें खडीच्या रस्त्यापासून अदमासें ८ मैलांच्या व कोणत्याहि रस्त्यापासून ३ मैलांच्या आंत आणून सोडणें व बिनशेतकी क्षेत्रांतील प्रत्येक खेडें हें खडीच्या रस्त्यापासून १२ मैलांच्या व कोणत्याहि रस्त्यापासून ५ मैलांच्या टापूंत आणून सोडणें हा आहे.

मागासलेल्या प्रदेशांचा विकास

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्यें जुन्या मुंबई राज्याच्या महाराष्ट्र व गुजरात या विभागांसाठीं रस्त्यांच्या विकासाकरितां ११०२.२ लक्ष रुपयांची सुरवातीस तरतूद करण्यांत आली होती. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार महाराष्ट्राच्या वांट्यास ६९४ लक्ष रुपये येतात. विदर्भासाठीं याच कामाकरितां १८९.६८ लाख रुपये आणि मराठवाड्याकरितां १५७·३० लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली होती. तथापि, या विभागांची वाढती गरज लक्षांत घेतां, रस्त्यांसंबंधीच्या जादा कार्यक्रमासाठीं होणारा खर्च भागविण्यासाठीं आणखी रकमेची तरतूद करावी लागेल, असें आढळून आलें. तेव्हां विदर्भ विभागाची यासंबंधीची तरतूद २५० लाख रुपयांनीं आणि मराठवाड्यासाठीं १५० लाख रुपयांनीं वाढविण्यांत आली.

जुन्या मुंबई राज्यांतील महाराष्ट्र विभागाकरितां विशिष्ट गरजा भागविण्यासाठीं अधिक तरतूद करण्यांत आली. ऊंस पिकवणाऱ्या क्षेत्रामध्यें दळणवळणाच्या सोयी असमाधानकारक असल्याचें आढळून आलें. तेव्हां, उंसाच्या शेतांत खत नेण्यासाठीं तसेंच कारखान्यांमध्यें ऊंस नेण्यासाठीं वाहातुकीच्या रस्त्यांचा विकास करणें आवश्यक वाटलें, ह्यासाठीं १५० लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली. दख्खन विभागांत सुमारें ३०० लाख रुपये खर्चाचा रस्ते–विकासाचा एक कार्यक्रम हातीं घेण्यांत आला. कोंकण विकास कार्यक्रमासाठीं गेल्या वर्षी जे १ कोटि रुपये मंजूर केले त्यापैकीं दळणवळणाच्या बाबतींत मागासलेल्या कोंकण विभागांतील रस्त्यांचा विकास करण्यासाठीं ३५ लाख रुपये खर्च करण्यांत यावयाचे आहेत. त्यासाठीं सुमारें ७४·४६ लाख रुपये खर्चाचा एक खास कार्यक्रम आंखण्यांत आला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत, दक्षिण भागांत क्रॉस ड्रेनेज आणि पुलांच्या बांधकामासाठीं आणखी १२५ लाख रुपयांची तरतूद नुकतीच केली आहे. या कामासाठीं अंदाजें २६३.३० लाख रुपये खर्चाचा एक कार्यक्रम तयार करण्यांत आला व १९५९-६० सालीं तो हातीं घेण्यांत आला. त्याचप्रमाणें महाराष्ट्रांतील महत्त्वाच्या रस्त्यांवर डांबर टाकून ते आधुनिक बनविण्यासाठीं, १९५९-६० सालीं आणखी एक कार्यक्रम हातीं घेण्यांत आला. या कार्यक्रमासाठीं सुमारें २०२.४५ लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. तसेंच ठाण्याच्या खाडीवर पूल व रेक्लेमेशन यासाठीं १०० लाख रुपयांची तरतूदहि सरकारनें केली आहे.

विदर्भ विभागासाठीं रस्त्यांचा जादा कार्यक्रम

विदर्भ विभागांत रस्त्यांसंबंधीचा आणखी एक कार्यक्रम मंजूर करण्यांत आला आहे. ह्यासाठीं ५७·१० लाख रुपये खर्च करण्यांत येणार असून त्याची अंमलबजावणी दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत होईल. ह्या कार्यक्रमामध्यें वरील विभागांतील राजमार्ग आणि मोठे जिल्हामार्ग यांवर डांबर टाकून ते आधुनिक करण्याच्या कामाचा अंतर्भाव होतो.

वर उल्लेख केलेल्या, रस्त्यांसंबंधीच्या कार्यक्रमाशिवाय सार्वजनिक बांधकाम खात्यानें राष्ट्रीय राजमार्ग आणि मध्यवर्ति रस्तेनिधि याखालीं, रस्त्यांचीं कामेंहि चालू केलीं आहेत. वरील दोन्हीं

बाबतींवरील खर्च, योजनेंतील तरतुदीव्यतिरिक्त करण्यांत येतो. महाराष्ट्र राज्यांमध्यें रेल्वे वाहातुकीच्या सोयी मोठ्या प्रमाणांत उपलब्ध नाहींत. संपूर्ण कोंकण विभागांत एकहि रेल्वे नाहीं. घाटावरील जिल्ह्यांमध्यें सुद्धां कित्येक ठिकाणें रेल्वेला जोडलेली नाहींत. तथापि, सरकारनें राजमार्गांचें काम त्वरित पूर्ण करण्यासाठीं या रस्त्यांचें बांधकाम हातीं घेतलें आहे.

पश्चिम किनारा रस्ता :– हा रस्ता मुंबई – कोंकण – गोवा रस्ता म्हणूनहि ओळखला जातो. तो २८७ मैल इतका लांब असून ९६ मैल कुलाबा जिल्ह्यांतून व १९१ मैल रत्नागिरी जिल्ह्यांतून जातो. अतिशय पावसामुळें ह्या रस्त्यावरून पाणी जाऊन त्याची खराबी होते व दळणवळण बंद पडल्यानें या जिल्ह्यांतील कांहीं भाग अलग पडतात. हा रस्ता बारमाही करण्यासाठीं तो राजमार्गासारखा आधुनिक करण्याचें ठरविण्यांत आलें. ह्यामुळें हा सबंध रस्ता १२ फूट रुंदीचा सिमेंट कॉंक्रीटचा होईल व त्याशिवाय ५ फूट रुंदीचा अस्फाल्टचा राहील. ह्याशिवाय याचें सी. डी. वर्केहि मजबूत करण्यांत येईल. ह्या कामासाठीं सुमारे ५०० लाख रुपये खर्च येईल असा अंदाज आहे. कुलाबा जिल्ह्यामधून जाणाऱ्या या रस्त्याचें काम पुरें झालें असून रत्नागिरी जिल्ह्यांमधील रस्त्याच्या कामास ऑक्टोबर १९५९ मध्यें सुरुवात करण्यांत आली असून तें फेब्रुवारी १९६२ पर्यंत पुरें होईल अशी अपेक्षा आहे. मुंबई – ठाणें रस्त्यावरील वाहातुकीची गर्दी कमी करण्यासाठीं भारत सरकार आणि मुंबई महानगरपालिका यांच्या अनुमतीनें दोन एक्सप्रेस हायवेज बांधण्याचें ठरविण्यांत आलें. मुंबईतून बाहेर जाण्यास व मुंबईकडे येण्यास हा एकच रस्ता आतांपर्यन्त असल्यामुळें वरीलप्रमाणें उपाययोजना करण्यांत आली. वरील २ एक्सप्रेस हायवे पैकीं एक इस्टर्न एक्सप्रेस हायवे या नांवाचा असून तो मध्यरेल्वेच्या मुंबई–ठाणें या प्रमुख मार्गाच्या पूर्वेकडून सध्यांच्या मुंबई–ठाणें रस्त्यास समांतर असा जातो. दुसरा मार्ग वेस्टर्न एक्सप्रेस या नांवाचा असून तो पश्चिम रेल्वेच्या प्रमुख मार्गाच्या पूर्वेस वांद्रा – घोडबंदर रस्त्यास समांतर असा जातो. रस्त्यांच्या बांधकामाचा खर्च मध्यवर्ती व राज्य सरकारनें निम्मा सोसायचा असून मुंबई महानगरपालिकेच्या हद्दींत भारत सरकारनें $\frac{1}{3}$ व $\frac{2}{3}$ राज्य सरकारनें करावयाचा आहे.

ईस्टर्न एक्सप्रेस हायवे :- हा रस्ता अदमासें १९·५ मैल लांब असून तो शीव जंक्शन-पासून सुरू होतो व चेंबूर मानखुर्द रेल्वे लाईनच्या सांध्यावरून घाटकोपर महोल रोडबरोबर जातो. तो पुढें विक्रोळी-भांडूप मार्गें ठाणें येथील कोपरी–कॉलनीजवळ मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावरून ठाण्याच्या पश्चिमेकडील बाजूला मेंटल हॉस्पिटलच्या नजीक सध्याच्या मुंबई–ठाणें रस्त्याला २४|१ मैलावर मिळतो. सध्याच्या अंदाजाप्रमाणें रस्त्याला सुमारें २·५ कोटि रुपये खर्च येईल.

वेस्टर्न एक्सप्रेस हायवे :– हा रस्ता सुमारें १५ मैल लांब असून तो माहीम कॉजवे-पासून सुरू होतो. पश्चिम रेल्वेला वांद्रें येथें तो ओलांडून तो उत्तरेस वळतो आणि सांताक्रुझ विमान-तळाची नवीन इमारत व पश्चिम रेल्वे मार्ग यांच्यामधून जातो व अंधेरी, जोगेश्वरी, मालाड, कांदि-वली-बोरिवली या मार्गानें जाऊन अखेरीस तो सध्याच्या वांद्रें–घोडबंदर रस्त्यास मिळतो. सध्याच्या अंदाजाप्रमाणें या रस्त्यास २·९ कोटि रुपये खर्च येणार असून वरील दोन्ही राजमार्गांस एकूण ५·४० कोटि रुपये खर्च येईल.

या हायवेजच्या सर्व विभागांवर काम चालू असून ते, १९६१ सालच्या पूर्वार्धांत मोटारींच्या वाहातुकीसाठीं चालू करण्याच्या दृष्टीनें तयार करण्यांत येत आहेत.

नद्यांवरील पूल

धरमतर पूल :– अलिबाग धरमतर–खोपोली रोडवर मुख्य दुवा असलेला धरमतर खाडी-वरचा हा पूल १९५८ च्या जूनमध्यें वाहातुकीसाठीं खुला करण्यांत आला. या पुलाचें महत्त्व हें कीं,

तो बांधण्यापूर्वी कुलाबा जिल्ह्यांतील इतर तालुक्यांशीं कोणत्याहि प्रकारें प्रत्यक्ष संबंध ठेवतां येत नसे.

पैनगंगा पूल :– हा पूल मुंबई–आंध्र राज्याच्या सरहद्दीवर असून तो यवतमाळ जिल्ह्यांतील पिंपळखुटा नजीक राष्ट्रीय राजमार्ग नंबर ७ येथें आहे. या पुलाचें काम पूर्ण झाल्यावर विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशांत समाधानकारकरित्या दळणवळण होईल.

टोक येथील गोदावरी नदीवरील पूल :– गोदावरी नदीवरचा हा पूल औरंगाबाद–अहमदनगर रस्त्यावर असून तो औरंगाबादपासून २६ मैलांवर आणि अहमदनगरपासून ४६ मैलांवर आहे. दोन जिल्ह्यांच्या वरील ठिकाणांना जोडणाऱ्या या पुलाची गरज अतिशय तीव्रतेनें भासत होती. या पुलामुळें अजंठा व वेरूळ लेण्यांना भेट देण्यासाठीं येणाऱ्या प्रवाशांना जवळचा मार्ग उपलब्ध झाला.

आंतर–विभागीय रस्ते

राज्याच्या निरनिराळ्या विभागांना जोडणारे आंतर–विभागीय रस्ते बांधण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत करण्यांत आलेली तरतूद ही एक उल्लेखनीय गोष्ट आहे. उदाहरणार्थ अहमदनगर–औरंगाबाद रस्ता आणि अजंठा–पाडले रस्ता. महाराष्ट्रांतील घाटांतील रस्त्यांचीं महत्त्वाचीं कामें म्हणजे कोल्हापूर–गगनबावडा रस्ता आणि कोल्हापूर करुळ रस्ता आणि जळगांव–अहमदनगर मनमाड रस्त्याचें आधुनिकीकरण. डोंगराळ आणि मागासलेल्या भागांतील रस्त्यांची सुधारणा करण्यांत येणार असून त्यांत महाड–रायगड रस्ता, प्रतापगड किल्ल्याकडे जाणारा रस्ता आणि किनवट–माहूर रस्ता हीं कामें येतात. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार सर्व रस्त्यांची सुधारणा करण्यांत येणार असून जागजागीं वैतरणा, वैनगंगा, तानसा, वर्धा, गोदावरी या नद्यांवर आवश्यक ठिकाणीं पूल बांधण्यांत येतील. या कामांखेरीज केंद्र सरकारनें ठाणें जिल्ह्यांतील डोंगराळ भागांतील जव्हार मोरवाडा-त्रिंबक रस्त्याची सुधारणा करण्याच्या योजनेस मान्यता दिली आहे.

बंदरांचा विकास

बंदरें म्हणजे समुद्र, रेल्वे, रस्ते व अंतर्गत मार्ग यांना जोडणारा हा महत्त्वाचा दुवा आहे. आपल्या राज्याला अदमासें ३२० मैल लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून, या भागांत वाहातुकीला योग्य अशा खाड्या व बंदरें आहेत. मुंबई हें आंतरराष्ट्रीय महत्त्वाचें बंदर असून, तें मोठ्या जहाजांतून मालाची चढउतार करण्यासाठीं अतिशय सोयीचें आहे. याशिवाय या किनाऱ्यावर एकूण ४९ बंदरें आहेत. यांपैकीं कांहीं बंदरांत बोटी धक्क्यापर्यन्त येण्याच्या सोयी नाहींत, तसेंच त्या बंदरांतून २० ते २०० टन एवढ्या मालाची चढउतार करतां येते.

मोरा, करंजा, दाभोळ, जयगड, रत्नागिरी, मालवण व वेंगुर्लें हीं बंदरें मालाच्या वाहातुकीच्या दृष्टीनें महत्त्वाचीं आहेत. वेंगुर्लें या बंदरांतून सरासरी १ लक्ष टन मालाची वाहातूक होते. मोरा या बंदराचा क्रमांक त्यानंतर लागतो. या बंदरांतून ४६,००० टन मालाची वाहातुक केली जाते. इतर बंदरांतून साधारणतः २०,००० ते ३,००० टन या दरम्यान मालाची वाहातूक होत असते. जयगड व विजयदुर्ग हीं बंदरें बारमाही असून, त्यांत २०० टन एवढी मालवाहू जहाजें येऊं शकतात. तसेंच रत्नागिरी, देवगड, मालवण व वेंगुर्लें हीं महत्त्वाचीं बारमाही बंदरें आहेत.

दाभोळखाडी :– ही वाशिष्ठी नदी समुद्राला जेथें मिळते तेथपासून चिपळूणपर्यंन्त ३० मैल लांब आहे. सध्या, २७ मैलांवर असलेल्या गोवलकोट या गांवापर्यन्त १५०टनाचीं जहाजें येऊं शकतात. लहान बोटी मात्र चिपळूणपर्यंन्त जाऊं शकतात. कोयना योजनेच्या पहिल्या टप्प्याचें बांधकाम पूर्ण झाल्यानंतर नदीला फार मोठ्या प्रमाणांत चिपळूणपासून १२ मैलांवर असलेल्या पोफळी या गांवापासून पाण्याचा पुरवठा होईल. पाण्याचा सतत पुरवठा झाल्यामुळें, ही खाडी चिपळूणपर्यंत वर्षभर वाहातुकीला उपयोगी पडूं शकेल.

देवगड बंदर :– हें बंदर रत्नागिरीच्या दक्षिणेस ४० मैलांवर देवगड खाडीच्या मुखाशीं वसलेलें आहे. देवगडची खाडी ३५ मैल लांब असून देवगडनंतर ती निमूळती होत जाते. समुद्राला जेव्हां फार भरती येते तेव्हां या खाडीमध्यें १६ मैल दूर असलेल्या खर्डा या गांवापर्यंत लहान बोटी येऊं शकतात.

रेडी :– हें बंदर वेंगुर्ल्याच्या दक्षिणेस रेडी खाडीच्या मुखावर व मुंबई–गोवा यांच्या सरहद्दीवर वसलेलें आहे. येथील लोखंडाची निर्यात करण्यासाठीं नुकताच या लहान बंदरावर धक्का बांधण्यांत आला आहे.

कुलाबा व रत्नागिरी या जिल्ह्यांतील लहान लहान बंदरें हीं बंदरालगतच्या भागांना विशेष महत्त्वाचीं आहेत. कारण त्यांचा उपयोग मुंबईला मालाची व प्रवाश्यांची वाहातूक करण्यासाठीं होत असतो. या जिल्ह्यांमध्यें किनाऱ्याजवळून रेल्वेचा मार्ग जात नाहीं, आणि सडकांनीं प्रवास करणें गैरसोईचें व खर्चाचें आहे. या दृष्टीनें या लहान बंदरांच्या विकासाचे एक विशिष्ट महत्त्व आहे.

एकाच वेळीं ४९ बंदरांचा तेवढ्याच प्रमाणांत विकास होणें शक्य नाहीं, कारण बंदरांसाठीं लागणाऱ्या सामानाच्या किंमती वाढल्या आहेत. त्यामुळें कांहीं निवडक अशा बंदरांच्या विकासाचीं कामें हातीं घेणें शक्य आहे. या किनाऱ्यावरील दोन किंवा तीन बंदरांचा विकास करून त्यांना आपण मध्यम प्रतीच्या बंदरांचा दर्जा प्राप्त करून दिला व बाकीच्या बंदरांत अत्यंत आवश्यक असलेल्या थोड्या सोयी जरी उपलब्ध करून दिल्या तरी या बाबतींत आपण चांगली कामगिरी बजाविली असें होईल. या उद्देशानें सरकारनें गेल्या वर्षीच्या कोंकण विकासाच्या १ कोटि रुपये खर्चाच्या कामीं ४० लक्ष रु. ची जादा तरतूद केली होती. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अवधींत कार्यान्वित करण्यासाठीं ६२ लक्ष रु. खर्चाचा एक खास जादा कार्यक्रम आंखण्यांत आला होता.

रत्नागिरी हें कोंकणाचें महत्त्वाचें बंदर होय. अविकसित अवस्थेंत असतांनाहि या बंदरांत दररोज ५०० उतारूंची वाहातूक होत असते. बंदराच्या मानानें ही वाहातूक उल्लेखनीय असून सदर बंदरांतून प्रतिवर्षी २२,००० टन मालाचीहि वाहातूक होते. परंतु हें बारमाही बंदर नसल्यामुळें पावसाळ्यांत जहाजांची वाहातूक बंद पडते. मुंबईच्या दक्षिणेस मंगलोरपर्यंत (गोवा प्रदेश सोडून) एकही बारमाही बंदर नाहीं. रत्नागिरी बंदराला बारमाही बंदराचें स्वरूप प्राप्त करून देण्याबाबतच्या प्रश्नावर राज्य सरकार व भारत सरकार विचार करीत आहे.

कार्याची प्रगति

बंदराच्या विकासाच्या कार्यक्रमानुसार मालवण येथील आर. सी. सी. धक्का व श्रीवर्धन येथील धक्क्याचें काम पूर्ण झालें असून त्या कामाचा उल्लेखनीय कार्यामध्यें समावेश करतां येईल. एलिफंटा येथील धक्क्याचें बांधकाम, बोरिया येथील बोट धक्क्याचें बांधकाम, रत्नागिरी बंदरांत प्रवाश्यांना उतरण्याच्या सोयी उपलब्ध करण्याचें काम व रेवदंडा येथील निमूळत्या धक्क्याचें बांधकाम चालू आहे.

महाराष्ट्रांतील बंदरांच्या कार्याची प्रगति ही त्यांवर येणाऱ्या खर्चाच्या प्रमाणांवरून कळून
येईल. महाराष्ट्रांतील बंदरांच्या विकासार्थ पहिल्या पंचवार्षिक योजनेंत या ३ लक्ष रु. पेक्षां कमी खर्च
करण्यांत आला होता तर दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांच्या अवधीमध्यें ह्या
कामासाठीं ३० लक्ष रु. खर्च करण्यांत आला. बंदरांची सुधारणा आणि विकास करण्याच्या कार्याची
गति कायम ठेवण्यांत येईल. इतकेंच नव्हे तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ही गति वाढविण्याच्या
दृष्टीनें बंदरांच्या विकासासाठीं आणि अंतर्गत जलवाहातुकीच्या विकासासाठीं खास योजना आंखण्यांत
आल्या आहेत.

भारत सरकारनें मध्यम प्रतीच्या बंदरांचा मोठ्या प्रमाणांत विकास करण्यासाठीं विकास
समिति स्थापन केली आहे. यानुसार ह्या समितीनें आपल्या चौकशीच्या कार्यक्रमांत रत्नागिरी, रेडी,
इत्यादि ठिकाणांना भेट दिली आहे व समितीचा अहवाल लवकरच बाहेर पडेल. तसेंच, कोंकण
किनाऱ्यावरील बोट वाहातुकीच्या संपूर्ण समस्येची चौकशी करण्यासाठींहि भारत सरकारनें एक
समिति स्थापन केली आहे.

रेल्वेमार्ग

राज्यांत एकूण २६५६.१२ मैल लांबीचे रेल्वे रस्ते आहेत. यापैकीं सुमारें २/३ अथवा
१५५८.५६ मैल ब्रॉड गेजचे आहेत. हें प्रमाण दर शंभर चौरस मैलाचा २.२ असें पडतें. सोलापूर
जिल्ह्यांत सर्वांत जास्त म्हणजे २८०.६० मैल रेल्वे-रस्ते आहेत. रत्नागिरी जिल्ह्यांत मात्र एकही रेल्वे-रस्ता
नाहीं. मुंबई हें रेल्वेचें मुख्य केंद्र असून येथून उत्तर, पूर्व व दक्षिण दिशेला जाणारे मार्ग आहेत. कुलाबा
जिल्ह्यांतील दिवा ते दासगांव रेल्वेमार्ग बांधण्याचा निर्णय रेल्वे मंत्रालयानें नुकताच घेतला आहे.
या मार्गापैकीं सुरवातीला पनवेलपर्यंतच्या भागाचें काम हातीं घेण्यांत येणार आहे. उरण हें मासेमारीचें
प्रमुख केंद्रहि या रेल्वेमार्गानें जोडलें जाणार आहे. विदर्भांत ५१२ मैल लांबीचे ब्रॉड गेज रेल्वेमार्ग
असून त्यापैकीं २३० मैल दुहेरी मार्ग आहेत. खांडवा तें हिंगोली हा रेल्वेमार्ग तयार झाल्यानंतर १२३
मीटर गेज लाईनची भर पडेल. हा मार्ग १९६१ पर्यंत तयार होईल अशी अपेक्षा आहे. नागपूर हें
मुंबई – कलकत्ता व दिल्ली – मद्रास ग्रँड ट्रंकच्या मार्गावर असून येथून देशाच्या कोणत्याही भागांत
मालाची ने-आण करतां येते. मराठवाड्यांतील रेल्वेच्या सोयी फारच अपुऱ्या असून त्यांची वाढ होणें
जरूर आहे. बीड आणि उस्मानाबाद हीं जिल्ह्याचीं ठिकाणें सुद्धां जवळच्या रेल्वेमार्गापासून ६०
मैल दूर आहेत. राज्य सरकारनें मध्य सरकारला आणखी एकूण ६१७ मैल लांबीच्या रेल्वेमार्गाची
आवश्यकता आहे अशी शिफारस केली आहे. तसेंच रेल्वेच्या विकासकार्यक्रमांत ४०५ मैल जुन्या
रेल्वेमार्गाचें आधुनिकीकरण करण्याची शिफारस केली आहे. मुंबई–पुणें या ब्रॉडगेज रेल्वेमार्गावरील
तसेंच मुंबई–इगतपुरी मार्गावरील गाड्या विजेवर चालतात. पुणें ते मिरज हा भाग १६० मैलांचा
महत्त्वाचा मीटरगेज मार्ग आहे. मिरज–कोल्हापूर व सांगली हीं मीटरगेज मार्गानें जोडलीं असून
मिरज–लातूर, बारामती व दौंड हीं नॅरो-गेज रेल्वेमार्गानें जोडलीं आहेत.

विमानमार्ग

मुंबई हा आंतरराष्ट्रीय विमानतळ असून दिल्ली, कलकत्ता, मद्रास, हैद्राबाद, बंगलोर यांसारखीं
सर्व महत्त्वाचीं शहरें त्याच्याशीं जोडलीं आहेत. तसेंच राज्यांतील नागपूर, औरंगाबाद, पुणें हीं महत्त्वाचीं
शहरेंहि मुंबईशीं विमानमार्गानें जोडलीं आहेत. औरंगाबाद येथील चिकलठाणा विमानतळ राष्ट्रीय
विमानमार्गावर असून तो जवळ जवळ सर्व विमानमार्गांशीं जोडला आहे. मुंबईपासून औरंगाबाद १७३

मैल असून, अजंठा व वेरूळचीं लेणीं पाहण्यास जाणाऱ्या प्रवाश्यांसाठीं औरंगाबाद मार्गें रोज विमान-वाहातूक सुरू असते. नागपूर हें मुंबई, कलकत्ता, दिल्ली, भोपाळ, हैद्राबाद व मद्रास या शहरांशीं विमानमार्गानें जोडलें आहे. तसेंच तें रात्रीच्या टपाल-वाहतूक मार्गावरील महत्त्वाचें केंद्र आहे.

स्टेट ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन

या विभागाच्या विकासाच्या दृष्टीनें स्टेट ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशननें महत्त्वाचें कार्य बजाविलें आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस विदर्भामध्यें अदमासें $\frac{1}{3}$ एवढ्या मोटार वाहातुकीचें राष्ट्रीयकरण होऊं शकेल अशी अपेक्षा आहे आणि मराठवाड्यांतील रस्ता वाहातुकीच्या राष्ट्रीयकरणाचें काम ५० टक्क्यांहून अधिक प्रमाणांत पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे.

वाहनें योग्य स्थितींत राखण्याचें काम सेंट्रल वर्कशॉप पाहातें. दापोडी येथील सेंट्रल वर्कशॉपमध्यें २,००० कामगार आहेत. वाहनांचा सांगाडा, एंजिनें, फ्युएल पंप इत्यादि बिघडलीं असल्यास दुरुस्त करणें व संपूर्णतया नूतनीकरण करण्याची आवश्यकता असलेल्या बसगाड्यांचें नूतनीकरण करणें, हीं कामें ह्याच वर्कशॉप मध्यें करण्यांत येतात. दापोडी येथें दर आठवड्यास सात ते आठ बसेसचें नूतनीकरण करण्यांत येतें. याखेरीज दापोडी येथील सेंट्रल वर्कशॉपमध्यें दरमहा ४० बसेस याप्रमाणें बसचे सांगाडे बांधण्यांत येतात. ह्या सेंट्रल वर्कशॉपखालीं प्रत्येक विभागांमध्यें (डिव्हिजन) एक वर्कशॉप आहे.

१९५७–५८ सालीं, दापोडी येथील बॉम्बे रोड स्टेट ट्रान्सपोर्ट कार्पोरेशनच्या सेंट्रल वर्कशॉपनें सुटे भाग दुरुस्त केले व तसेंच त्यांचें उत्पादन केलें. नव्यानें म्हणून हेच सुटे भाग विकत घेतले असते तर कार्पोरेशनला २५ लक्ष रुपये खर्च आला असता. याशिवाय येथें एस. टी. च्या नोकरवर्गाचें तांत्रिक ज्ञान अद्यावत करण्यासाठीं एक शिक्षणकेंद्रहि उघडण्यांत आलें आहे.

शिक्षण

शिक्षणाच्या क्षेत्रांत आघाडीवर राहण्याच्या परंपरेचा वारसा नवीन राज्याला मिळालेला आहे. स्वातंत्र्यसंपादनानंतर सरकारी प्रयत्नांना विशेष गति मिळाली. हें विद्यार्थ्यांची संख्या व शिक्षणा-वरील खर्च तिपटीनें वाढला व शैक्षणिक संस्थांच्या संख्येंत दुपटीनें वाढ झाली आहे यावरून स्पष्ट होतें.

ही प्रगति केवळ संख्येपुरतीच मर्यादित नाहीं. शाळा, विद्यार्थी व त्यांवरील खर्च यांच्या वाढीबरोबरच अभ्यासक्रम, शिक्षकांचें प्रशिक्षण, शाळांच्या इमारतींचें बांधकाम यांतहि बऱ्याच सुधारणा घडून आल्या आहेत. प्राथमिक व माध्यमिक शाळांतील पुस्तकी शिक्षणाचें रूपांतर हें व्यावहारिक पद्धतींत झालें असून त्याचा संबंध मुलांच्या दैनंदिन जीवनाशीं व वातावरणाशीं येतो. मुलें व मुलीं यांच्या शिक्षणांतील अंतर झपाट्यानें दूर होत आहे. तसेंच शारीरिक शिक्षण, सार्वजनिक ग्रंथालयें, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना उत्तेजन व कलाविषयक आणि तांत्रिक शिक्षणाचा विकास यांकडे विशेष लक्ष देण्यांत येत आहे.

राज्याच्या शैक्षणिक विकासाच्या कार्यक्रमांत (१) प्राथमिक शिक्षणाचा विकास, (२) माध्यमिक शिक्षणांत विविधता निर्माण करणें, (३) औद्योगिक व तांत्रिक शिक्षणाच्या वाढत्या सोयी उपलब्ध करून देणें, व (४) उच्च पातळीवरील शिक्षणक्रमांत समन्वय घडवून आणणें ह्यांचा समावेश करण्यांत आला आहे. १९५६ सालीं जेव्हां द्वैभाषिक मुंबई राज्य स्थापन झालें तेव्हां राज्यांत समाविष्ट होणाऱ्या निरनिराळ्या प्रदेशांतील शिक्षणाची प्रगति वेगवेगळी असल्याचें तसेंच तेथील शिक्षणपद्धतीहि भिन्नभिन्न असल्याचें सरकारला आढळून आलें.

अशा वेगवेगळ्या शिक्षणपद्धतींमध्यें समन्वय घडवून आणणें प्रत्येक प्रदेशाचा प्रगतिशील शिक्षणपद्धतींतील चांगला भाग स्वीकारून आवश्यक होतें. समाविष्ट होणाऱ्या प्रदेशांतील विकासांच्या

योजना तशाच चालू ठेवून व चालू शिक्षणकार्याला बळकटी व गति आणण्यासाठीं व त्यांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं सबंध राज्याकरितां एक समान नि लवचिक अशी पद्धति निर्माण करणें आवश्यक होतें. तिसऱ्या योजनेच्या शेवटीं सबंध राज्यांत प्राथमिक शिक्षणाच्या बाबतींत एक समान दर्जा निर्माण होऊं शकेल अशा प्रकारें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत शिक्षणाचें नियोजन करावें लागेल.

हीं उद्दिष्टें लक्षांत ठेवून राज्याची पाहणी करण्यांत आली आणि शाळा नसलेल्या खेड्यांची शिरगणती करण्यांत आली. त्यामुळें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ६ ते ११ वर्षें वयाच्या गटांतील मुलांसाठीं सक्तीचें प्राथमिक शिक्षण देण्यासंबंधींची योजना तयार करणें शक्य झालें. प्राथमिक शाळांच्या इमारती बांधण्यासंबंधींचा कार्यक्रम द्रुतगतीनें कार्यान्वित करण्यांत आला. कारण त्यासाठीं सरकारी अनुदानाच्या रकमेइतक्याच देणग्या देण्याकरितां लोकांनींहि पुढाकार घेतला. परंतु केवळ इमारती बांधल्या म्हणजे शाळा होत नाहींत; त्यांकरितां इमारतींप्रमाणें शिक्षकांचीहि गरज असणार. पात्र व लायक असे शिक्षक मिळविण्याकरितां सरकारनें वेतनाचें प्रमाणहि वाढविलें.

मूलोद्योग शिक्षणावर भर

सर्वसामान्य प्राथमिक शाळांचें मूलोद्योग शाळांमध्यें प्रागतिक रूपांतर करण्याचें धोरण सरकारनें अंगिकारलें आहे. यामुळें प्राथमिक शाळांच्या शिक्षणाचा दर्जा वाढवितां येतो; परंतु, मूलोद्योग शिक्षणक्रमांत कारागिरी, शेती, सूतकताई, वीणकाम, सुतारकाम व परसांतील बागायत यांचा समावेश होतो. यासाठीं प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता असते. ही आवश्यकता लक्षांत घेऊन सरकारनें प्रशिक्षणाच्या अभ्यासक्रमाची फेरतपासणी केली, प्रशिक्षणाच्या सोयींची वाढ केली आणि प्राथमिक शिक्षकांच्या ह्या दृष्टीनें त्या कार्यासाठीं देण्यांत यावयाच्या अनुदानामध्यें वाढ केली.

पहिल्या योजनेच्या सुरुवातीला राज्यांत २८,५०० प्राथमिक शाळा होत्या व दुसऱ्या योजनेच्या प्रारंभीं ३५,००० प्राथमिक शाळा होत्या. राज्याच्या विभाजनाच्या वेळीं ६०,००० प्राथमिक शाळा असून त्यांमध्यें ५४,००,००० विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यांपैकीं महाराष्ट्र राज्यांत ३०,१५३ शाळा असून त्यांमध्यें ३४,६७,१४५ विद्यार्थी शिक्षण घेत होते. दुसऱ्या योजनेच्या अखेरीस राज्यामधील २०० किंवा त्याहून जास्त लोकसंख्या असलेल्या प्रत्येक खेड्यांत शिक्षणाची सोय उपलब्ध होईल अशी आशा वाटते. यामुळें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत राज्यभर ६-११ वर्षें वयाच्या मुलांसाठीं सक्तीचें प्राथमिक शिक्षण सुरू करण्याकरितां आवश्यक ती पार्श्वभूमि तयार होईल.

प्राथमिक व महाविद्यालयीन शिक्षणाला जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे माध्यमिक शिक्षण हा होय. युवावस्थेतील तरुणांना शैक्षणिक किंवा अंशतः शैक्षणिक व अंशतः धंदेवाईक अशा प्रकारचें शिक्षण माध्यमिक शाळांमध्यें देण्यांत येतें. शिक्षणाच्या या क्षेत्रांत सोयी वाढविण्या-व्यतिरिक्त प्रत्यक्ष व्यवहारोपयोगी असें विविध प्रकारचें शिक्षण देण्यांत यावें असा सरकारचा मानस आहे. खाजगी संस्थाना शिक्षणांचा प्रसार व विकास करण्यासाठीं आवश्यक साहाय्य करण्याच्या दृष्टीनें सरकारनें अशा संस्थांना शक्य तेवढें आर्थिक साहाय्य देण्याचें धोरण स्वीकारलें आहे.

माध्यमिक शाळांचें रूपांतर

सध्याच्या माध्यमिक शाळांचें विविधलक्षी व विविध शाखाविषयक शाळांमध्यें रूपांतर करणें ही एक महत्त्वाची योजना असून यामध्यें शेती, व्यापार, विज्ञान, गृहशास्त्र, व तांत्रिक

विषय यांचा समावेश होतो. निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासक्रमांच्या गरजा निश्चित करण्यासाठीं राज्यव्यापी पाहणी करण्यांत येत आहे.

शाळांना नकाशे, तक्ते, रेडिओसेट, प्रोजेक्टर्स, फिल्म स्ट्रिप हीं साधनें विनामूल्य पुरवून शिक्षणासाठीं दृक्‌श्राव्य माध्यमांचा वाढत्या प्रमाणावर उपयोग करण्याचा विचार आहे.

माध्यमिक शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टीनें शाळांच्या इमारतींचें बांधकाम व व्यवस्था यांबाबतच्या सवलतींचा दुसऱ्या एका योजनेंत समावेश करण्यांत आला आहे.

विशेषतः ग्रामीण विभागांतील माध्यमिक शाळांतील गरजू विद्यार्थ्यांना विद्यावेतनें, मोफत शिक्षण व कर्जाऊ शिष्यवृत्त्या या स्वरूपांत आर्थिक मदत देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

इतर योजनांनुसार कमर्शियल व सेक्रेटरिअल अभ्यासक्रमासाठीं एक संस्था, रिफ्रेशर कोर्स व परिसंवाद, ग्रंथालयांची सुधारणा व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना वसतिगृहांच्या सोयी यांची तरतूद करण्यांत आली आहे.

महाराष्ट्र राज्यांत कायद्यानें स्थापन झालेलीं विद्यापीठें पुढीलप्रमाणें आहेत :–मुंबई, नागपूर, पुणें, एस. एन्. डी. ठाकरसी विमेन्स युनिव्हर्सिटी व मराठवाडा विद्यापीठ. शेवटचें विद्यापीठ १९५८ सालीं स्थापन करण्यांत आलें आहे.

केंद्रसरकारनें स्थापन केलेल्या विद्यापीठ अनुदान मंडळातर्फे अनुदानें देऊन विद्यापीठांच्या विकासकार्यक्रमास मदत करण्यांत येतें. राज्यसरकार ठराविक प्रमाणांत अनुदान देतें.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत उच्चशिक्षणाच्या सर्व शाखांमध्यें अभ्यास करणाऱ्या गरीब व पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना देण्यांत येणाऱ्यां शिष्यवृत्त्यांमध्यें बरीच वाढ करण्यांत आली आहे. सरकारी आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेजांमध्यें वसतिगृहें, कँटीन, खेळ, राहण्याच्या जागा व ग्रंथालयें यांचीं तरतूद करण्यांत आली आहे. बिनसरकारी कॉलेजांनाहि त्यासाठीं अनुदान देण्यांत येतें. मुंबई येथील इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स येथें बायो-केमिस्ट्री, रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र व प्राणिशास्त्र या खात्यांमध्यें पदव्युत्तर अभ्यास व संशोधन याबाबतच्या जादा सोयींसाठीं ४ लाख रुपये राखून ठेवण्यांत आले आहेत. परभणी येथील शेतकी कॉलेज, औरंगाबाद येथील वैद्यकीय कॉलेज व नांदेडमधील आयुर्वेदिक कॉलेज यांचा संपूर्ण विकास करण्यांत यावयाचा आहे.

इतर योजना, कॉलेजांत जादा ट्युटोरियल्स सुरू करणें, कॉलेजमधील शिक्षकांचा पगार वाढविणें व पदव्युत्तर प्रशिक्षण व संशोधन यांचीं वाढ करणें यांसंबंधी आहेत.

तांत्रिक शिक्षण

तांत्रिक शिक्षणाचें एक वेगळें खातें असून हें खातें तांत्रिक शिक्षणाच्या प्रगतीची व्यवस्था पाहतें. राज्यांतील तांत्रिक संस्था सुसज्ज करणें व योजनांची अंमलबजावणी करण्यासाठीं लागणाऱ्या तांत्रिक नोकरवर्गाची भागविणें हा या क्षेत्रांतील कार्यक्रमाचा उद्देश असून यामध्यें

सध्याचीं इंजिनिअरिंग कॉलेजें, पॉलिटेक्निक्स व टेक्निकल हायस्कूल्स यांची वाढ करणें, पदवी, डिप्लोमा व सर्टिफिकेट अभ्यासक्रमाचें शिक्षण देणाऱ्या नवीन संस्था स्थापन करणें, शिष्यवृत्त्या व साहाय्यक अनुदानें देणें व कारागिरांचीं प्रशिक्षण केंद्रें स्थापन करणें यांचा समावेश होतो.

भारतांत प्रादेशिक इंजिनिअरिंग कॉलेजें स्थापन करण्याच्या केंद्र सरकारच्या योजनेनुसार नागपूर येथें एक केंद्र सरकार पुरस्कृत इंजिनिअरिंग कॉलेज नुकतेंच स्थापन करण्यांत आलें आहे व नागपूर येथील राज्य इंजिनिअरिंग कॉलेज औरंगाबाद येथें हलविण्यांत आलें आहे. पुण्याच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें वाढ करण्याचा कार्यक्रमहि हातीं घेण्यांत आला आहे. मुंबई येथील व्हिक्टोरिया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिट्यूटचें नुकतेंच संपूर्ण इंजिनिअरिंग कॉलेजमध्यें रूपांतर करण्यांत आलें असून त्यासाठीं सुमारें १७.७० लाख रुपये खर्च करून जादा इमारती व साधनसामुग्री पुरविण्यांत येणार आहे राज्यांतील बिनसरकारी इंजिनिअरिंग कॉलेजांना विकासविषयक अनुदानें उपलब्ध करून देण्यांत येत आहेत. कराड येथें नुकतेंच एक इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करण्यांत आलें आहे.

राज्यामध्यें सात पॉलिटेक्निक्स् आहेत. या संस्थांमध्यें बरीच वाढ करण्यासंबंधींचे कार्यक्रम हातीं घेण्यांत आले आहेत. मुंबईंत जून १९६० पासून आणखी एक पॉलिटेक्निक सुरू करण्यांत आलें आहे.

विविध कार्यकारी शाळांची वाढ

त्याचप्रमाणें विविध कार्यकारी शाळांचीहि राज्यांत सर्वत्र वाढ करण्यांत यावयाची आहे. राज्यांतील तांत्रिक शिक्षणाचें निरीक्षण व मार्गदर्शन करण्याकरितां लागणाऱ्या जादा नोकरवर्गासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत २,८१,६०० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. तांत्रिक विषयांमधील पार्ट टाईम शिक्षणाची पुरेशी सोय सध्यां अस्तित्वांत नाहीं. मुंबई, पुणें व सोलापूर येथील अशा प्रकारचें शिक्षण देणाऱ्या संस्थांसाठीं सुरुवातीस २३ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. मुद्रणशास्त्राचें शिक्षण देणाऱ्या शाळेसंबंधींच्या योजनेबाबतचें काम चालू आहे. सुमारें ९ लाख रुपये खर्चाची ही योजना आहे.

सर्वसाधारण शिक्षणपद्धतींत कलाशिक्षणालाहि योग्य तें स्थान देण्यांत आलें आहे. प्राथमिक शाळांत तसेंच माध्यामिक शाळांत ९ व्या इयत्तेपर्यंत हा विषय सक्तीचा करण्यांत आला आहे. एस्. एस्. सी. परीक्षेलाहि एक ऐच्छिक विषय म्हणून हा विषय घेतां येतो. यासंबंधींचें उच्च शिक्षण सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, सर जे. जे. इन्स्टिट्यूट ऑफ अप्लाइड आर्ट आणि सर जे. जे. कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथें देण्यांत येतें.

नाट्यकलेस उत्तेजन देण्यासंबंधींची एक योजनाहि सध्यां अंमलांत आहे. या योजनेंत पुढील गोष्टींची तरतूद करण्यांत आलेली आहे. (१) राज्याच्या प्रादेशिक भाषांतून मुलांसाठीं व प्रौढांकरितां लिहिलेल्या व प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट नाटकांस बक्षिसें ; (२) आंतरमहाविद्यालयीन व आंतरशालेय नाट्यस्पर्धा व त्यामधील सर्वोत्कृष्ट वैयक्तिक कलाकारांस फिरत्या ढाली व पदकें ; (३) नगरपालिकांना खुलीं नाट्यगृहें बांधण्यासाठीं साहाय्यक अनुदानें.

नवबौद्धांना सवलती

राज्याच्या उद्घाटनप्रसंगीं मुख्यमंत्र्यांनीं जाहीर केलेल्या धोरणविषयक मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्यांतील बर्गीकृत जातींपैकीं ज्यांनीं बुद्धधर्माचा स्वीकार केला असेल अशा नवबौद्धांना पूर्वीच्या

वर्गीकृत जातींना ज्या सवलती आणि सोयी देण्यांत येत होत्या, त्याच पुढें चालू ठेवण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे. अर्थात अस्पृश्यतानिवारणासारख्या कांहीं खास योजना आणि घटनेनुसार मिळणाऱ्या कांहीं तत्सम सवलतींचा फायदा, त्यांचें मूळ स्वरूपच पहातां, अहिंदूंना मिळणार नाहीं हें उघडच आहे. शैक्षणिक क्षेत्रांत त्यांना शिक्षणाची आणि परीक्षेची फी माफ करण्यांत आली असून शैक्षणिक संस्थांत वर्गीकृत जातींसाठीं राखून ठेवण्यांत आलेल्या जागा नवबौद्धांनाहि देण्यांत येतात.

ज्यांच्या पालकांचें वार्षिक उत्पन्न १,२०० रुपयांहून कमी असेल अशा विद्यार्थ्यांना, मग ते कोणत्याहि धर्माचे व जातीचे असोत, सर्व टप्प्यांतील शिक्षण मोफत देण्यांत येतें.

राज्यांतील एकूण लोकसंख्येच्या सुमारें १/८ लोक निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांतून शिक्षण घेतात. राज्याच्या महसुलापैकीं बराचसा खर्च शिक्षणावर करण्यांत येतो. त्यापैकीं निम्माअधिक प्राथमिक शिक्षणासाठीं देण्यांत येतो. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत प्राथमिक शिक्षणाच्या विकासावर विशेष भर देण्यांत येत आहे.

प्राथमिक शाळांचें मूलोद्योग शाळांत रूपांतर, शारीरिक शिक्षणावर भर, व्यावसायिक मार्ग-दर्शनाची सोय यांसारख्या निरनिराळ्या सुधारणांचा अवलंब करून, शिक्षणाच्या स्वरूपांत व दर्जामध्येंहि सतत सुधारणा करण्यांत येत आहे. शिक्षणास आर्थिक साहाय्य देण्यासंबंधींच्या पद्धतींत रूपांतर करण्यांत आलें आहे. यापूर्वीं शिक्षणसंस्थांना प्रत्यक्ष संबंध नसतांना आर्थिक साहाय्य देण्यांत येत असे. त्याऐवजीं आतां सरकार आणि स्थानिक शिक्षणसंस्था यांच्यामध्यें भागीदारी प्रस्थापित करून संयुक्तरीत्या आर्थिक साहाय्याची तरतूद करण्यांत येते.

आतां या क्षेत्रांत आणखी प्रयोग व वाढ करण्याचा टप्पा आला आहे. आपल्याला आतां शैक्षणिक उपयुक्ततेच्या वाढत्या क्षेत्रांत सहेतुक व नियोजनपूर्वक कार्य करतां येईल.

आरोग्य

सार्वजनिक आरोग्यखात्याचें अंदाजपत्रक सरासरी ७ कोटि रुपयांचें असून खर्चाच्या दृष्टीनें या खात्याचा क्रमांक राज्यामध्यें तिसरा लागतो. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत तरतूद करण्यांत आलेल्या एकूण १८ कोटि रुपयांपैकीं १०·२६ कोटि रुपये वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्य-विषयक एकूण १०५ योजनांवर खर्च करण्यांत आले.

सरकार, नगरपालिका, जिल्हा लोकल बोर्ड किंवा खाजगी संस्था यांनीं राज्यांत चालविलेल्या वैद्यक आणि सार्वजनिक आरोग्यविषयक संस्थांची संख्या सुमारें २,००० आहे.

आरोग्यविषयक कार्यक्रमांत आयुर्वेद व वैद्यक, सार्वजनिक आरोग्य आणि पाणीपुरवठा ह्या बाबींचा समावेश होतो.

प्रत्येक जिल्ह्यांत एक सिव्हिल हॉस्पिटल असून नाशिक, कोल्हापूर, अहमदनगर, दक्षिण सातारा आणि बीड या जिल्ह्यांत इस्पितळांसाठीं नवीन इमारती बांधण्यासाठीं मंजुरी देण्यांत आली आहे.

जे. जे. इस्पितळाच्या नवीन इमारतीचें बांधकाम चालू आहे. जे. जे. इस्पितळाच्या आवारांत पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठीं एक प्रयोगशाळा आणि एक पशुगृह बांधण्याचें कामहि जोरांत चालू आहे. या इस्पितळाच्या " आऊट-पेशंट डिपार्टमेंट "च्या वाढीचें काम पूर्ण झालें असून चाइल्ड गायडन्स क्लीनिक आणि पेडीआट्रीक केंद्राचें बांधकाम सुद्धा चालू आहे. सिव्हिल हॉस्पिटलांच्या वाढीच्या योजनेनुसार सांगली येथें नवीन सिव्हिल हॉस्पिटल बांधण्याचें काम सुरू केलें आहे. रत्नागिरी आणि सातारा येथील सिव्हिल हॉस्पिटलमध्यें कांहीं नवीन सुधारणा आणि इतर आवश्यक फेरबदल करण्याचें कामहि चालू आहे.

पूर्व खानदेश जिल्ह्यांत चोपडे येथें एक कुटिर इस्पितळ लवकरच उघडण्यांत येणार आहे. १९६०–६१ सालीं नासिक जिल्ह्यांत कळवण येथें एक कुटिर इस्पितळ उघडण्याची शक्यता आहे. कराड येथें कुटिर इस्पितळ बांधण्यास सरकारनें मंजुरी दिली आहे.

क्षयरोग्यांसाठीं मोफत उपचार

खाजगी क्षयरोग इस्पितळें आणि सॅनटोरियामध्यें सरकारी नोकर आणि गरीब क्षयरोग्यांसाठीं जादा खाटांची मोफत सोय करण्याचा सरकारचा विचार आहे. राज्य कामगार विमा योजनेखालीं येणाऱ्या बृहन्मुंबईतील कामगारांसाठीं सरकारनें आणखी २५० खाटा खाजगी इस्पितळांतून राखून ठेवल्या असून अशा खाटांची संख्या आतां ५०० झाली आहे. क्षयरोग्यांसाठीं, केंद्र सरकारच्या साहाय्यानें एक उपचार-केंद्र सुरू करण्याच्या प्रश्नावर राज्य सरकार विचार करीत आहे. पुण्याजवळ औंध येथें छातीच्या विकारासाठीं बांधलेल्या इस्पितळांत १७५ खाटा वाढविल्या असून आतां एकूण खाटांची संख्या ३०० झाली आहे. यांत क्षयरोग्यांसाठीं वाढविलेल्या ५० खाटांचाहि समावेश आहे. अकोला येथें क्षयरोग्यांसाठीं एक उपचार-केंद्र सुरू केलें आहे आणि चांदा येथें गुप्त रोगांसाठीं एक उपचार-केंद्र उघडलें आहे.

मोठ्या संख्येनें डॉक्टर्स तयार करण्याच्या दृष्टीनें सरकारी वैद्यक महाविद्यालयांत ५१० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. पूर्वी ४२० विद्यार्थ्यांनाच प्रवेश देण्यांत येत असे. १९६०–६१ सालीं सर्व सरकारी वैद्यक महाविद्यालयें आणि खाजगी महाविद्यालयें यांतून ६५२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सोय करण्यांत आली आहे. याशिवाय नगरपालिकेच्या वैद्यक महाविद्यालयांत आणखी ६४ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याची व्यवस्था होण्याची शक्यता आहे. म्हणजे राज्यांत ७१६ विद्यार्थ्यांना वैद्यक शिक्षण देतां येईल.

मुंबई येथील सेंट जॉर्ज इस्पितळाच्या आवारांत सर सी. इ. एम्. डेंटल कॉलेजची नवीन इमारत बांधण्यांत येत आहे.

सी. इ. एम्. डेंटल कॉलेजमध्यें प्रोस्थेटिक डेंटिस्ट्री, ऑर्थोडोन्शिआ आणि पेरीओडोन्शिआ या विषयांचा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यांत आला आहे. कॉलेजला जोडून असलेल्या दांतांच्या इस्पितळाचा फायदा असंख्य रोग्यांना होत आहे.

देशी उपचारपद्धतीचा विकास

आयुर्वेदासारख्या देशी उपचारपद्धतीच्या विकासाच्या ज्या कांहीं मोठ्या योजना आहेत त्यांत आयुर्वेद संग्रहालय, औषधी संशोधनविषयक प्रयोगशाळा, एम्. ए. पोदार इस्पितळासाठीं ग्रंथालय, आयुर्वेदिक शिक्षण संस्थांना अनुदानें, आयुर्वेदिक औषधी आणि वनस्पतींचा संग्रह आणि आयुर्वेदिक पाठ्यपुस्तकें तयार करणें या योजनांचा समावेश होतो.

सरकार आयुर्वेदिक शिक्षणसंस्थांच्या विकासासाठीं अनुदानें देत आलें आहे. युनिव्हर्सल हेल्थ इन्स्टिट्यूटमध्यें पंचकर्मावर संशोधन चालू आहे. नागपूर येथें १०० खाटांची सोय असलेलें एक आयुर्वेदिक इस्पितळ उघडण्याचें ठरविलें असून इस्पितळाचें बांधकाम जोरांत सुरू आहे.

शस्त्रक्रिया आणि वैद्यक उपचाराच्या सोयींत वाढ करण्याबरोबरच दुसऱ्या पंचवार्षिक

योजनेंतील आरोग्यविषक कार्यक्रमांत रोगप्रतिबंधक उपचार योजनांची तरतूद करण्यांत आली असून प्राथमिक आरोग्य केंद्रांतून ही सोय करण्यांत येते.

मलेरियाचें निर्मूलन

भारत सरकारनें घालून दिलेल्या धोरणानुसार सुरू करण्यांत आलेल्या राष्ट्रीय मलेरिया निर्मूलन कार्यक्रमाखालीं महाराष्ट्रांत २२ एंडेमिक व १० हायपो-एंडेमिक युनिट्स स्थापन करण्यांत आलीं. हीं सर्व ३२ युनिट्स पुढेंहि चालू राहतील आणि १९६०–६१ मध्यें ३२.७५ सर्व्हिलन्स युनिट्स स्थापन करण्यांत येतील. माणसांमध्यें मलेरियाचा अंश शिल्लक असल्यास तो समूळ नाहींसा करण्याच्या हेतूनें त्यांची तपासणी करणें हा ह्या सर्विलन्स संघटनेचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय फिलेरिया नियंत्रण कार्यक्रमाखालील सध्यां चालू असलेलीं ४½ युनिट्स तशींच पुढेंहि चालू राहतील. बी. सी. जी. लस टोंचण्याच्या कार्यक्रमाखालीं १५ बी. सी. जी. पथकें व तीन प्रसिद्धि पथकें कार्य करीत आहेत.

प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या कार्यक्रमाखालीं राज्य योजनेनुसार उघडण्यांत आलेलीं १९ केंद्रें पुढेंहि चालू राहतील. समाज विकास कार्यक्रमाखालीं १९६०–६१ मध्यें १४० केंद्रें उघडलीं जातील असा अंदाज आहे. म्हणजे ह्या केंद्रांची एकूण संख्या २५२ होईल.

कुटुंबनियोजन

कुटुंबनियोजनाच्या कार्यक्रमाखालीं १९६०–६१ मध्यें ग्रामीण विभागांत ६२ नवीन केंद्रें उघडण्यांत येतील. ८३ केंद्रें यापूर्वींच उघडण्यांत आलीं आहेत. पालघर, शिरूर, सावनेर येथील आरोग्यकेंद्रांमधील आणि पुणें, नागपूर, औरंगाबाद, मुंबई येथील वैद्यकीय कॉलेजांतील कुटुंब-नियोजन प्रशिक्षण केंद्रें, तसेंच पुणें व नागपूर येथील प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रें पुढें चालू राहतील.

प्रत्येक विभागासाठीं एक अशा चार फिरत्या कुटुंब-नियोजन पथकांना आर्थिक मदत देण्याचें केंद्र सरकारनें मान्य केलें आहे. कॉर्नियाचा सांठा करण्यासाठीं एक आय् बँक आणि लघवी व रक्त मोफत तपासून देण्यासाठीं मधुमेहचिकित्सा केंद्र सुरू करण्याचा राज्य सरकारचा विचार आहे.

प्रशिक्षण कार्यक्रम

प्रशिक्षणाच्या कार्यक्रमानुसार नागपूर येथील हेल्थ व्हिजिटर्स स्कूल पुढें चालू ठेवण्यांत येईल. पालघर, शिरूर आणि सावनेर येथील आरोग्य-प्रशिक्षण केंद्रांमध्यें सार्वजनिक आरोग्यासंबंधीचें प्रशिक्षण दिलें जातें. निरनिराळ्या प्राथमिक आरोग्य केंद्रामधून दायांना प्रशिक्षण देण्यासंबंधीची योजना चालू आहे. तसेंच पुणें व नागपूर येथें सॅनिटरी इन्स्पेक्टरांना प्रशिक्षण दिलें जातें. औरंगाबाद येथील वैद्यकीय महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना ग्रामीण आरोग्य आणि वैद्यक यासंबंधीचें प्रशिक्षण देण्यासाठीं खुल्दाबाद येथें एक आरोग्य केंद्र स्थापन करण्यांत येणार आहे. या केंद्राच्या इमारतीचें बांधकाम १९६०–६१ मध्यें हातीं घेण्यांत येईल. निरनिराळ्या सार्वजनिक आरोग्य प्रशिक्षण कार्यक्रमाची गरज भागविण्याकरतां नागपूर येथें एक सार्वजनिक आरोग्य संस्था स्थापन करण्यांत आली आहे. सध्यां ह्या संस्थेंत आरोग्य शिक्षणासंबंधीचें प्रशिक्षण, सॅनिटरी इन्स्पेक्टरांचें ट्रेनिंग

आणि पब्लिक हेल्थ ओरिएन्टेशनचें प्रशिक्षण देण्यांत येतें. १९६०-६१ मध्यें सार्वजनिक आरोग्या-
संबंधीच्या पदव्युत्तर डिप्लोमाचे वर्ग सुरू करण्यांत येतील.

नर्सिंग कॉलेज

लायक परिचारिकांची भासणारी उणीव भरून काढण्यासाठीं चार वर्षें पदवीचा अभ्यास-
क्रम असलेलें एक नर्सिंग कॉलेज नुकतेंच मुंबईत उघडण्यांत आलें. महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर
उघडलेलें अशा प्रकारचें हें पहिलेंच महाविद्यालय असून तें मुंबई विश्वविद्यालयाला जोडण्यांत आलें आहे.

पुणें जिल्ह्यांतील आरोग्य संघटणेची, रोगप्रतिबंधक उपचार आणि रोगोपचार यांचें एकसूत्री-
करण करण्याच्या उद्देशानें पुनर्रचना करण्यांत आली आहे. विदर्भाच्या आठ जिल्ह्यांत आणि
मराठवाड्याच्या चार जिल्ह्यांत राज्यांतील इतर ठिकाणच्या प्रमाणें जिल्हा आरोग्य योजना सुरू
करण्यांत आली आहे. मराठवाड्यांतील राहिलेल्या एका जिल्ह्याला ही योजना १९६०-६१ मध्यें
लागू करण्यांत येईल.

कुष्ठरोग नियंत्रण

कुष्ठरोग नियंत्रण योजनेनुसार सध्यां १७ कुष्ठरोग सहाय्यक केंद्रें आणि ६९ एस्. ई. टी. केंद्रें
सुरू आहेत. त्याशिवाय १९६०-६१ मध्यें पांच सहाय्यक केंद्रें आणि ६९ एस्. ई. टी. केंद्रें सुरू
करण्यांत येतील. नागपूर येथील वैद्यक महाविद्यालयांत कुष्ठरोगाचें प्रगत शिक्षण देण्याचीहि सोय
करण्यांत आली आहे.

जन्ममृत्यूच्या नोंदी

जागतिक आरोग्य संघटना, भारत सरकार, नागपूर म्युनिसिपल कॉर्पोरेशन, राज्य सरकार
यांच्या सहकार्यानें नागपूर येथें एका जन्ममृत्यूची आणि एपिडेमिऑलॉजी ब्युरोचें काम चालू आहे.
स्थानिक स्वराज्य संस्थांतील लोक आणि निरनिराळ्या राज्यसरकारांचे नोकर ह्यांना जन्ममृत्यूच्या
नोंदी दाखल करण्याच्या आणि त्या संग्रहित करण्याच्या शास्त्रीय आणि प्रगत पद्धतीचें शिक्षण
देण्याचें काम ब्युरोकडून केलें जातें.

पुणें व नागपूर येथें सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा आणि अमरावती येथें अन्नविषयक
प्रयोगशाळा स्थापन करण्यांत आली आहे. अन्नांत भेसळ करण्याला प्रतिबंध करण्यासाठीं पाणी व
अन्न यांच्या नमून्यांचें पृथक्करण करतां यावें म्हणून आवश्यक त्या प्रयोगशालेय सोयी ह्या
संस्थांमध्यें करण्यांत आल्या आहेत.

पाणीपुरवठा योजना

पाणीपुरवठा व गटारें ह्यांच्या योजना हातीं घेण्याकरितां म्युनिसिपालिट्यांना सरकारकडून
मदत देण्यांत येते. नगर विकास योजनाकरितांहि मदत देण्यांत येते. राज्याच्या ग्रामीण विभागांतील
पाणीपुरवठ्यासंबंधीच्या योजनांना सरकार आर्थिक मदत देते.

मराठवाडा विभागांत पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठीं विहिरी बांधण्याच्या पुढील तीन योजना
सुरू आहेत : (१) विहिरी बांधण्याची सर्वसाधारण योजना, (२) दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत
समाविष्ट असलेली विहिरी बांधण्याची योजना व (३) औरंगाबाद जिल्ह्याच्या अंबाड व पैठण या
तालुक्यांत विहिरी बांधण्याची योजना. चालू वर्षीं या योजनांवर खर्च करण्यासाठीं २१ लाख
रुपयांची तरतूद केली आहे.

विदर्भ विभागांत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठीं विहिरी बांधण्याच्या दोन योजना सुरू आहेत. याशिवाय जेथें मोठ्या जत्रा भरतात अशा ठिकाणीं नळाद्वारें पाणीपुरवठ्याची व्यवस्था करण्याच्या योजना हातीं घेण्याचें ठरविलें आहे. सध्या अशा ठिकाणीं फिरत्या टॅंकर्सद्वारें पाणीपुरवठा करण्यांत येतो. या सर्व कामांसाठीं १०·२५ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

जुन्या मुंबई राज्याच्या महाराष्ट्र विभागासाठीं पिण्याच्या पाण्याच्या विहिरी, बंधारे, तळीं वगैरे बांधण्यासाठीं ११·२७ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे.

पोषण

पोषणविषयक खातें जनतेचा पोषणविषयक दर्जा सुधारण्याबाबतचे प्रश्न हाताळतें. रोग्यांच्या पोषक आहारासंबंधी संशोधन, प्रयोगशाळेंतील संशोधन, मानवी आहारासंबंधीचे प्रयोग, रुग्णांसाठीं खास आहार तयार करणें, आणि निरनिराळ्या कामधंद्यांतील लोकांच्या आहारांचा अभ्यास करणें व त्यांची सुधारणा करणें, आहार व पोषणविषयक पाहणी व पोषणविषयक शिक्षणाचा कार्यक्रम इत्यादि सार्वजनिक आरोग्यपोषणाच्या विविध अंगांचा या खात्याच्या कार्यांत समावेश होतो. जनतेचें आरोग्य सुधारण्याच्या दृष्टीनें जनतेच्या पोषणविषयक सुधारणेवर मुख्य भर देण्यांत येतो. यासाठीं जनतेच्या निरनिराळ्या गटांच्या सद्यःस्थितीचा व अभ्यास करणें त्यांच्यासाठीं त्यांना खर्चाच्या दृष्टीनें परवडेल असा समतोल आहार निश्चित करणें आवश्यक ठरतें.

पोषणविषयक गुणधर्मांबाबत पुरेशी माहिती उपलब्ध नसल्यामुळें या खात्यानें राज्यांतील लोकांच्या आहारांत सामान्यतः उपयोगांत येण्याऱ्या कांहीं अन्नवस्तूंचें पृथक्करण करण्याचें कार्य हातीं घेतलें आहे. अशा प्रकारची माहिती, स्वस्त व पोषक अन्नपदार्थांची निवड करून कमी खर्चात योग्य आहार तयार करण्याच्या दृष्टीनें जनतेच्या निरनिराळ्या गटांना, विशेषतः ग्रामीण जनतेला, उपयुक्त ठरते. आतांपर्यंत सुमारें ६० अन्नपदार्थांचें पृथक्करण करण्यांत आलें आहे.

पोषणविषयक बाबींशीं संबंधित असणाऱ्या निरनिराळ्या खात्यांना विचारविनिमय करणें सोयीचें व्हावें म्हणून सरकारनें सरकारी व बिनसरकारी सदस्य असलेली एक कायम पोषण सल्लागार समिति नियुक्त केली आहे.

हाफकिन इन्स्टिटयूटमधील कार्य

या संस्थेंतील संशोधनाचें, त्याचप्रमाणें प्रॉफिलॅक्टिक सेरा, अँटिटॉक्सिन, सल्फा ड्रग्स, जीवनसत्त्वाच्या गोळ्या व पेरेन्टेरल सोल्युशन्स मोठ्या प्रमाणावर तयार करण्याचें कार्य चांगल्या प्रकारें चालू आहे. १९४० च्या औषधांच्या कायद्यानुसार ॲनेलेटिकल लेबॉरेटरी व स्टेट बॅक्टेरिऑलॉजिकल लेबॉरेटरी म्हणूनहि ही संस्था कार्य करते. औषधांतील मद्यार्कांचें प्रमाण ठरविण्यासाठीं त्यांचें पृथक्करण करण्याच्या बाबतींत दारूबंदी व अबकारी खात्याला या संस्थेची अतिशय मदत होते. विविध जीवनसत्वयुक्त गोळ्या, सल्फाडायाझीन व सल्फागीनीडाईन गोळ्या तयार करून त्या राज्य कामगार योजनेनुसार मान्यता दिलेल्या केमिस्टना पुरविण्यांत येतात.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सरकारनें खालील तीन योजना मंजूर केल्या आहेत:

(१) सर्पाच्या विषाचें जादा उत्पादन.

(२) हायपर्‌ईम्यून रॅबीज सीरम तयार करणें, वगैरे.

(३) ट्रिपल व्हॅक्सीन तयार करणें.

ही संस्था, संशोधनकार्य करण्याच्या हेतूनें अथवा आपल्या दैनंदिन कामांतील आवश्यकतेनुसार विविध तंत्रांचें शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या व्यक्तींना त्यासाठीं सोयी उपलब्ध करून देऊन शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करण्याच्या बाबतींत मोलाची कामगिरी बजावते.

समाजकल्याण योजना

समाजकल्याण योजनांसाठीं एकूण ११३ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली असून त्यांत दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सुधारविषयक (करेक्शनल) कल्याण कार्याचाहि समावेश करण्यांत आला आहे. कल्याणविस्तार प्रकल्प, सामाजिक संरक्षण अथवा तत्सम योजना, सामाजिक आणि नैतिक स्वास्थ्य, पश्चात् काळजीविषयक (आफ्टर केअर) कार्यक्रम, शारीरिक दृष्ट्या अपंग झालेल्यांचें कल्याण आणि इतर समाजकल्याण योजनांचा समावेश वरील योजनांत होतो.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत महत्त्वाच्या अशा ज्या कल्याणविषयक योजना आहेत त्यांत प्रमाणित (सर्टिफाईड) शाळा, रिमांड होम्स् आणि पश्चात् काळजीविषयक वसतिगृहें स्थापन करणें आणि त्यांना मदत करणें ही एक योजना आहे. प्रमाणित शाळा आणि रिमांड होम्स् स्थापण्या-व्यतिरिक्त खाजगी सर्टिफाईड शाळांना आणि रिमांड होम्स्ना इमारती बांधण्यासाठीं अनुदानाची तरतूद करण्यांत येते. विदर्भ आणि मराठवाडा विभागांतील संबंधित बालविषयक कायद्यांतील तरतूदींची अमलबजावणी केल्यानंतर ह्या योजनेखालीं वरील दोन विभागांत नवीन प्रमाणित शाळा उघडण्यांत आल्या आहेत. ह्या विभागांत बिगर-सरकारी संस्थामार्फत जेथें शक्य होतें तेथें रिमांड होम्स् स्थापण्यांत आले आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं चार नवीन प्रमाणित शाळा आणि सहा रिमांड होम्स् उघडण्यांत येतील.

सुमारें २० व्हॉलंटरी सर्टिफाईड शाळांना इमारतीसाठीं ३·५ लक्ष रु. चीं अनुदानें दिलीं असून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं अनुदानाची ही रक्कम ४ लक्ष रुपयांपर्यंत जाईल. रिमांड होम्स्च्या इमारतीबाबतची अनुदानाची वाढती मागणी लक्षांत घेतां योजनेंतील ह्या बाबतच्या तरतुदीचा आंकडा ह्यापूर्वींच ओलांडला आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटीं विदर्भ आणि

मराठवाड्यांतील रिमांड होम्स सोडून इतर बरेचसे रिमांड होम्स त्यांच्या स्वतःच्या इमारतीमध्यें हलविण्यांत येतील अशी अपेक्षा आहे.

भिकाऱ्यांचा प्रश्न

मुंबईतील भिकाऱ्यांना पकडण्यासाठीं नोव्हेंबर १९५७ मध्यें एक जोरदार मोहीम सुरू केली होती. अस्तित्वांत असलेल्या संस्थांमध्यें नव्यानें पकडलेल्या भिकाऱ्यांना सामावून घेणें शक्य नव्हतें. तरी पण ह्या संस्थांतून अधिकांत अधिक भिकाऱ्यांची सोय करण्यांत आली. कांहीं संस्थांतून तर पूर्वीच्या मानानें दुप्पट भिकाऱ्यांची सोय करण्यांत आली. ह्या जादा भिकाऱ्यांची राहाण्याची सोय करण्यासाठीं नवीन बेगर होम्स उघडणें आवश्यक झालें आणि ह्या वर्षी नंदुरबाद आणि चिंबळें येथें एक एक बेगर होम सुरूं केलें आहे. विसापूर आणि चेंबूर येथील बेगर होम्समध्यें अधिक भिकाऱ्यांची राहण्याची सोय करण्याबाबत उपाययोजना करण्यांत आली आहे.

सामाजिक आणि नैतिक आरोग्य आणि पश्चात्काळजीविषयक कार्यक्रमांसंबंधी आणखी एक योजना आहे. भारत सरकारनें पुरस्कारलेली ही योजना असून त्यासाठीं केंद्र सरकारकडून ५० टक्के आर्थिक मदत मिळते. ह्या योजनेखालील संस्थांची भौतिक उद्दिष्टें ह्यापूर्वीच गाठण्यांत आलीं आहेत. ही योजना डिसेंबर १९५७ मध्यें सुरू करण्यांत आली होती. आतांपर्यंत २७ संस्था स्थापण्यांत आल्या असून त्यांत ५ स्टेट होम्स्, १४ रिसेप्शन केंद्रें आणि ८ डिस्ट्रिक्ट शेल्टर्स आहेत. याशिवाय १९५६ च्या स्त्रिया आणि मुली यांचा अनैतिक व्यापार बंद करण्यासंबंधीच्या कायद्यानुसार मुंबई येथें लवकरच एक राज्य आश्रयालय (स्टेट होम) सुरू करण्यांत येणार आहे. यांपैकीं चार राज्य आश्रयालयें, चार जिल्हा आश्रयगृहें, आणि १० रिसेप्शन केंद्रें महाराष्ट्रांत उघडण्यांत येतील. नागपूर आणि औरंगाबाद येथील स्टेट होम्सना प्रशिक्षण–तथा–उत्पादन केंद्रें जोडलीं आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेअखेर राहिलेल्या दोन राज्य आश्रयालयांनाहि अशीं केंद्रें जोडण्यांत येतील अशी आशा आहे. प्रत्येक राज्य आश्रयालयांतून १०० जणांचीच सोय करण्याचें ठरविलें असून जिल्हा आश्रयगृहांत आणि रिसेप्शन केंद्रांत फक्त २५ जणांचीच सोय करण्यांत येणार आहे.

कल्याण विस्तार प्रकल्प

ग्रामीण भागांतील स्त्रिया आणि मुलींच्या कल्याणासाठीं कल्याण विस्तार योजना असून त्यांची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य समाजकल्याण सल्लागार मंडळामार्फत केली जाते. मंडळाच्या आणि समाजविकास गटाच्या कार्यांत समन्वय साधण्यासाठीं एक अट घातली असून ह्यानुसार मंडळ, समाजविकास गटांतच नवीन प्रकल्प सुरू करील. ह्या प्रकल्पामुळें ग्रामीण विभागांतील बालकांची काळजी घेण्याच्या दृष्टीनें आणि महिलांना हस्तकलेचें शिक्षण देण्याच्या दृष्टीनें फार उपयुक्त कार्य झालें आहे. ह्या केंद्रांतून बालकांची आणि गरोदर स्त्रियांची वैद्यकीय दृष्ट्या काळजी घेतली जाते.

बालक मार्गदर्शन केंद्रें

बालक मार्गदर्शन केंद्राच्या योजनेनुसार मुंबईसारख्या औद्योगिक शहरांतील गलिच्छ वस्त्यांतून करमणूक केंद्रें आणि युवक मंडळें स्थापण्यांत येतात. गुन्हेगारीकडे कल असणाऱ्या बालकांचें मनोरंजन करणें आणि त्यांच्या फुरसतीच्या वेळांत इतर कार्यक्रम ठेवणें हा अशीं केंद्रें स्थापण्या-

मागील प्रमुख उद्देश आहे. आतांपर्यंत १६ केंद्रें आणि ८ युवक मंडळें स्थापण्यासाठीं मंजुरी दिली आहे.

शाळा आणि महाविद्यालयाच्या बाहेर युवकांच्या शारीरिक विकासाकडे खास लक्ष देणें आणि उन्हाळी शिबिरें स्थापणें हें युवक कल्याणविषयक योजनेंत अभिप्रेत आहे. विदर्भांत ह्या दोन्ही योजनांची अंमलबजावणी करण्यांत येत आहे. पहिल्या योजनेंत, आखाडे स्थापण करणें, आखाड्यांना आर्थिक मदत देणें, सामने भरविण्यासाठीं जनपद सभांना मदत देणें, शारीरिक कल्याणविषयक कार्य करणाऱ्या संस्थाना मदत देणें, स्टेडियम बांधण्यासाठीं स्थानिक संस्थांना अनुदानें देणें आणि महिलांसाठीं करमणूककेंद्रें संघटित करणें या बाबींचा समावेश होतो. युवकांत नेतृत्व निर्माण करण्याच्या दृष्टीनें अनेक खेड्यांतून उन्हाळी शिबिरें स्थापण्यांत येत आहेत. अशीं शिबिरें स्थापल्यामुळें खेड्यांतून सामूहिक विकासाची वृत्ति निर्माण होईल आणि विविध विकासयोजना आणि समाजशिक्षणाच्या कार्यक्रमाबाबत जनतेंत उत्साह निर्माण होईल.

अपंगांचें कल्याण

महाराष्ट्रांत अंमलबजावणी करण्यांत येणाऱ्या अपंगांच्या कल्याण आणि शिक्षणविषयक योजनानुसार खासगी संस्थांतील या बाबतच्या सुखसोयींत सुधारणा करण्यासाठीं व शैक्षणिक आणि इतर तत्सम साधनसामग्रीची खरेदी करण्यासाठीं अनुदानें देण्यांत येतात. शिवाय अपंगांसाठीं शेल्टर्ड वर्कशॉप्स उघडतां यावेत म्हणून खासगी संस्थांना अनुदानाच्या स्वरूपांत मदत देण्यांत येते. शेल्टर्ड वर्कशॉपचें काम मोठें तांत्रिक आणि अवघड असल्यामुळें अपंगांसाठीं कार्य करणाऱ्या खाजगी संस्थांचेच अर्ज आले आहेत. फायदा होणाऱ्या संस्थांना दरमहा रु. ३० किंवा खर्चाच्या २/३ इतकी रक्कम (जी कमी असेल, ती) निर्वाहभत्ता म्हणून देण्यांत येते. साधनसामुग्री आणि इमारतीसाठीं प्रत्येकीं ५० टक्के अनावर्तक अनुदान देण्यांत येतें.

१.५६ लक्ष रुपये खर्च करून अपंगांसाठीं विदर्भांत नवीन शाळा उघडण्यांत येणार आहेत. ह्या योजनेन्वयें १९५७–५८ मध्यें आंधळ्यासाठीं आणि बहिऱ्यांसाठीं अनुक्रमें भंडारा आणि अकोला येथें शाळा उघडल्या. ह्या दोन्ही शाळांतून प्रत्येकीं ५० विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय आहे. अकोला येथें डे स्कॉलर्सनांहि प्रवेश देण्यांत येतो. १९६०–६१ मध्यें मराठवाड्यांत एक शाळा उघडण्यांत येणार आहे.

याशिवाय पंगु आणि मानसिक विकृति असणाऱ्या मुलांच्या सर्टिफाईड शाळांच्या इमारतींसाठीं सढळ आर्थिक मदत देण्याचें सरकारनें ठरविलें आहे.

पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट नसलेल्या कांहीं नवीन योजना हातीं घेण्यांत आल्या आहेत. यांत सर्टिफाईड शाळा आणि संस्थांतील १२ ते १६ वर्षें वयगटाच्या मुलांसाठीं हॉलीडे होम्स सुरू करणें, काम करणाऱ्या स्त्रियांसाठीं वसतिगृहें स्थापणें आणि सर्टिफाईड शाळांतून सुटलेल्या मुलांचें समाजांत

पुनर्वसन करण्यासाठीं त्यांना छोटे उद्योगधंदे सुरू करतां यावेत म्हणून कर्ज – तथा – आर्थिक साहाय्य (सब्सिडी) देणें, ह्या गोष्टींचा समावेश होतो.

सांस्कृतिक संस्थांना मदत

कलाकार आणि सांस्कृतिक संस्था यांना योग्य तें उत्तेजन देण्यासाठीं पूर्वीच्या मुंबई राज्यानें नाट्य, संगीत व नृत्यमहोत्सव आणि तमाशा यांसारख्या लोककलांचे महोत्सव अशा योजना मंजूर केल्या होत्या. हे महोत्सव दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहेत. सुमारें ७५ हून अधिक संस्था राज्य नाट्यमहोत्सवांतील मराठी नाट्यस्पर्धेत भाग घेतात. नाट्यमहोत्सव केवळ मराठीपुरताच मर्यादित नसून त्यांत गुजराती, हिंदी आणि संस्कृत नाटकें करण्यांत येतात. यशस्वी संस्थांना आणि नटांना राज्यातर्फे पारितोषिकें देण्यांत येतात.

यापूर्वी हे महोत्सव मुंबई आणि इतर महत्त्वाच्या शहरांत भरत असत. आतां ते छोट्या शहरींहि भरविण्यांत येतात. खेड्यापाड्यांतून राहणाऱ्या गरीब लोकांनाहि अल्प प्रवेशमूल्यांत करमणूक उपलब्ध करून देण्याचें सरकारचें धोरण आहे. याशिवाय ख्यातनाम नटांच्या जोडीला उदयोन्मुख कलाकारांनाहि महोत्सवांत भाग घेण्यासाठीं उत्तेजन देण्यांत येतें.

हे महोत्सव सादर करणाऱ्या रिक्रिएशन कमिटीतर्फे राज्यांतील जनतेची रंजनात्मक कार्यक्रमाची भूक भागविणाऱ्या विविध संस्थांना अनुदानें देण्यांत येतात. ज्यांनीं आपली हयात कलेच्या सेवेंत घालविली आहे अशा नामवंत कलावंतांना उतारवयांत विपरीत दिवस आले असल्यास त्यांनाहि आर्थिक मदत देण्यांत येते.

सांस्कृतिक कार्यक्रमांना जसा बहर येऊं लागला तशी राज्यांतील नाट्यगृहांची उणीव अधिकच भासूं लागली. नगरपालिका आणि इतर संस्था यांना नवीं नाट्यगृहें बांधण्यासाठीं आणि जुनीं दुरुस्त करण्यासाठीं मदत देण्यांत येते.

मुंबईमध्यें सरकारी मालकीचें रंगभवन नामक एक खुलें नाट्यगृह आहे. याशिवाय शहरांत लवकरच एक बालनाट्यगृह बांधलें जाईल आणि वरळी येथें महर्षि रवींद्रनाथ टागोरांच्या स्मृत्यर्थ एक बंदिस्त असें टागोर थिएटर उभारलें जाईल. तसेंच केवळ तमाशासाठींच बांधल्या जाणाऱ्या एका नाट्यगृहाची आंखणी तयार होत आहे. या नाट्यगृहाला सुमारें पन्नास हजार रुपये खर्च येणार असून तें कामगार विभागांतच बांधलें जाणार आहे.

मागासलेले वर्ग

महाराष्ट्रांतील मागासलेल्या वर्गांतील लोकांची ठोकळमानानें तीन प्रकारांत विभागणी होऊं शकते. ती येणेंप्रमाणें :– अनुसूचित जमाती किंवा आदिवासी, अनुसूचित जाती किंवा हरिजन आणि इतर मागासलेले वर्ग.

अनुसूचित जमाती किंवा आदिवासी हे प्राचीन काळचे जंगलांतील रहिवासी होत. पुरेशा दळणवळणाच्या सोयी उपलब्ध नसल्यामुळें ह्या आदिवासी लोकांचा सुसंस्कृत जनतेशीं संबंध येऊं शकला नाहीं व त्यामुळें ते फारच मागासलेल्या स्थितींत राहिले. महाराष्ट्रांत अशा प्रकारच्या ६१ जाती

आहेत व त्यांची लोकसंख्या २१·८५ लक्ष आहे. अनुसूचित जाती किंवा हरिजन या लोकांना अस्पृश्य समजण्यांत येत होतें व त्यामुळें ते मागासलेल्या परिस्थितींत राहिले. राज्यांत अशा प्रकारच्या ७७ जाती असून त्यांची एकूण लोकसंख्या ३८·७२ लक्ष आहे. १९५९–६० पर्यंत इतर मागासलेले वर्ग या नांवानें ओळखल्या जाणाऱ्या लोकांत, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्याप्रमाणें सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेल्या लोकांचा समावेश होता व म्हणून त्यांना राज्याच्या उत्पन्नांतून सहाय्य देणें जरूर होतें. पश्चिम महाराष्ट्र भागांत अशा १६० जाती होत्या व मराठवाड्यामध्यें ५७ जाती होत्या आणि त्यांची एकूण लोकसंख्या १९·४९ लक्ष होती. विदर्भांत या प्रकारच्या वर्गांचे लोक नव्हते.

नंतर सरकारनें जातीवर आधारलेल्या "इतर मागासलेले वर्ग" या वर्गीकरणाऐवजीं उत्पन्नावर आधारलेलें नवीन वर्गीकरण लागू केलें आहे. १२०० रु. पेक्षां ज्यांचें वार्षिक उत्पन्न कमी असेल ते आतां या नव्या वर्गांत मोडतात. अशा लोकांची संख्या अंदाजें १·७१ कोटी आहे.

ज्यांना सरकारकडून विशेष साहाय्याची गरज आहे अशा विमुक्त जाती व भटक्या जमाती यांचीही यादी महाराष्ट्र सरकारनें तयार केली आहे. विमुक्त जातीच्या यादींत १४ जातींचा समावेश असून त्यांची लोकसंख्या २·४५ लक्ष इतकी आहे. भटक्या जमातींच्या यादीमध्यें भटकणाऱ्या २७ जातींचा आणि निम-भटक्या ७३ जातींचा समावेश आहे. अशा जातींची लोकसंख्या ७·६६ लक्ष आहे.

अनेक अडचणी

मागासलेल्या वर्गांना अनेक अडचणींना तोंड द्यावें लागतें. अनुसूचित जमातींचा सुसंस्कृत लोकांत प्रवेश होऊं शकत नाहीं, ही त्यांच्या बाबतींतील अडचण होय. अनुसूचित जातींत अस्पृश्यतेचा कलंक लावण्यांत आला आहे आणि विमुक्त जातीचे लोक जन्मापासून गुन्हेगार असल्याचें समजण्यांत येतें. भटक्या जमातींना स्थिर जीवनाचा लाभ घेतां येत नाहीं. म्हणजे खरें पाहिलें असतां मागासलेल्या वर्गांच्या यादींत समाविष्ट असलेल्या प्रत्येक जातीची अथवा गटाची कोणत्या ना कोणत्या बाबतींत असहाय्य परिस्थिति आहेच.

सर्वसाधारण जनतेच्या हितासाठीं ज्या उपाययोजना लागू करण्यांत आल्या आहेत त्याचा मागासलेल्या वर्गांना अवश्यमेव फायदा घेतां आला पाहिजे असें सरकारचें जाहीर धोरण आहे; कारण मागसलेले लोक म्हणजे राज्याचा एक महत्त्वाचा घटक होत. त्याशिवाय त्यांचा मागासलेपणा लक्षांत घेऊन त्यांना अत्यंत अल्पावधींत बाकीच्या जातींच्या पातळीवर आणण्याकरितां खास उपाय योजणेंही आवश्यक आहे. या कामासाठीं १९३१ सालापासून राज्यसरकारतर्फे सुधारणेचा एक खास कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे. १९४२ मध्यें कमिशनरांच्या अस्थायी समितीनें अहवाल सादर केला व या कार्यक्रमाला जोरानें चालना मिळाली. १९४७ सालामध्यें या कार्याला आणखी जोरानें चालना मिळाली व ह्याच वर्षी सरकारनें मागासलेल्या वर्गांच्या कल्याणाकरितां १ कोटि रु. ची तरतूद केली होती. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत विशेषतः शिक्षणक्षेत्रामध्यें बरीच प्रगति झाल्याचें दिसून आलें. दुसऱ्या योजनेंत मागासलेल्या वर्गांच्या

सुधारणाकार्याला प्रमुख स्थान देण्यांत आलें व या प्रयत्नांना केंद्र सरकारनें केंद्र सरकार–पुरस्कृत योजनांची जोड दिली असून सदर योजनांसाठीं लागणारा पूर्ण खर्च केंद्र सरकार करीत आहे.

मागासलेल्या वर्गांना ठोकळमानानें सामाजिक, शिक्षणविषयक व आर्थिक क्षेत्रांमध्यें सवलती देण्यांत आलेल्या आहेत. १९५५ च्या अस्पृश्यता (गुन्हे) कायद्यानुसार कोणत्याही प्रकारची अस्पृश्यता मानणें हा पोलीसांनीं दखल घेण्याजोगा गुन्हा समजण्यांत आला आहे व त्याकरितां कडक शिक्षेची तरतूदही करण्यांत आली आहे. १९५६ च्या मुंबई सार्वजनिक पूजास्थळें (प्रवेशाधिकृत) कायद्यानुसार हिंदू जमातींतील सर्व वर्गांना हिंदूंच्या देवालयांत प्रवेश करण्यास परवानगी देण्यांत आली आहे. ऑगस्ट १९४९ मध्यें १९२४ चा गुन्हेगार जमातीसंबंधीचा कायदा या राज्याच्या बाबतींत रद्द करण्यांत आला. १९३५ च्या देवदासी संरक्षण कायद्यान्वयें कोणत्याही स्त्रीला अथवा मुलीला देवतेस अर्पण करणें हा पोलीसांनीं दखल घेण्याजोगा गुन्हा समजण्यांत आलेला आहे. ह्या कायद्यांची अंमलबजावणी कडक पद्धतीनें करण्यांत येत आहे.

जोराचा प्रचार

सरकार केवळ कायदे करूनच थांबलें नाहीं तर निरनिराळ्या वर्गांच्या लोकांत बंधुत्वाची भावना वृद्धिंगत व्हावी या उद्देशानें सरकारतर्फे जोराचा प्रचार करणेंही चालू आहे. सध्या या कार्यासाठीं स्वतः पुढाकार घेऊन काम करणाऱ्या संस्थांचे १८५ प्रचारक खेडेविभागांत दौरा करीत आहेत. २६ जिल्ह्यांपैकीं १२ जिल्ह्यांमध्यें अस्पृश्यतेचें समूळ उच्चाटन करण्याचें कार्य करण्यासाठीं जोराची मोहीम चालू आहे आणि चालू वर्षांत इतर आठ जिल्ह्यांमध्यें अशाच प्रकारची मोहीम सुरूं करण्याचा विचार आहे. आतांपर्यंत या मोहिमेचा परिणाम फार चांगला झाला असल्याचें प्रत्ययास आलें आहे. गेल्या चार वर्षांपासून हरिजन सप्ताह पाळण्यांत येत असून समाजाला लागलेला हा कलंक धुऊन काढण्याकरितां सदर सप्ताहांत राज्यामध्यें सर्वत्र सर्वंकष मोहीम चालविण्यांत येते.

शिक्षणक्षेत्राबाबत सांगावयाचें म्हणजे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील विद्यार्थ्यांना सर्व स्तरांवरील शिक्षण घेण्याकरितां फी-माफीची सवलत देण्यांत आलेली आहे. त्यांना परीक्षा-फी सुद्धा माफ करण्यांत आली आहे. याशिवाय पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. प्राथमिक इयत्तेंत शिकणाऱ्या अनुसूचित जमातींतील पहिल्या व दुसऱ्या इयत्तामधील विद्यार्थ्यांना दरवर्षी ३ रु. देण्यांत येतात व सदर जमातींतील तिसऱ्या व चौथ्या इयत्तेंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी ६ रु. देण्यांत येतात.

शैक्षणिक सवलती

अनुसूचित जमाती व अनुसूचित जातींतील जे विद्यार्थी ५ ते ७ या इयत्तांत शिक्षण घेतात त्यांना प्रतिवर्षी ३० रु. ची रक्कम देण्यांत येते आणि आठवी ते अकराव्या इयत्तेपर्यंत शिक्षण घेणाऱ्यांना दरवर्षी ६० रु. इतकी रक्कम देण्यांत येते. या प्रकारांत मोडणारे जे विद्यार्थी तांत्रिक शिक्षण

देणाऱ्या हायस्कुलांत व हायर टेक्निकल सेकंडरी स्कूल्समध्यें शिक्षण घेत असतील त्यांना दरवर्षी ९० रु. देण्यांत येतात, तर सरकारमान्य संस्थांमध्यें व्यवसायाचें शिक्षण घेणाऱ्यांना दरमहा २५ रु. देण्यांत येतात.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील सर्व विद्यार्थ्यांना एस्. एस्. सी. परीक्षेनंतरच्या अभ्यासक्रमाकरितां शिष्यवृत्त्या देण्यांत येतात. या शिष्यवृत्त्यांकरिता केंद्र सरकारकडून रक्कम देण्यांत येते. पूर्वीच्या इतर मागासलेल्या वर्गांत मोडणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना १९५८-५९ या वर्षांत शिक्षणविषयक सवलती मिळत होत्या, त्यांना त्यांचा प्राथमिक, माध्यमिक अथवा महाविद्यालयीन अभ्यासक्रम (त्यावर्षी ज्याचा जो अभ्यासक्रम चालू असेल त्यानुसार) पूर्ण होईपर्यंत पूर्वीप्रमाणेंच सवलती देण्यांत येत आहेत. नव्यानें केलेल्या इतर मागासलेले वर्ग या सदरांत मोडणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण-फी माफ करण्यांत आली आहे. त्यांना शिक्षणविषयक इतर सवलती देण्याच्या प्रश्नावर विचार करण्यांत येत आहे.

मागासलेल्या वर्गांतील ज्या विद्यार्थ्यांसाठीं त्यांच्या राहत्या गांवांत शिक्षणविषयक सोयी नाहींत, त्यांच्याकरितां वसतिगृहांच्या भरपूर सोयी उपलब्ध करण्यांत आल्या आहेत. पुणें, नागपूर व औरंगाबाद या ठिकाणीं सरकारतर्फे पांच वसतिगृहें चालविण्यांत येत असून त्यामुळें ५४० विद्यार्थ्यांची सोय झाली आहे. स्वेच्छेनें काम करणाऱ्या संस्थांकडून अंदाजें ४०० वसतिगृहें चालविण्यांत येतात व त्यामध्यें अंदाजें १०,००० विद्यार्थ्यांची सोय झाली आहे. याशिवाय, जिल्हा स्कूलबोर्डांकडून अशा प्रकारचीं ५० वसतिगृहें चालविण्यांत येतात व त्यांत १,००० विद्यार्थ्यांची सोय झालेली आहे.

याशिवाय, अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या वस्तीमध्यें बालवाड्या व संस्कारकेंद्रें चालविण्यांत येत आहेत. आश्रमशाळांमध्यें विद्यार्थी गृहपतींच्या मार्गदर्शनाखालीं राहत असून त्यांना मूलोद्योगी प्राथमिक शिक्षण देण्यांत येते. याप्रकारच्या अंदाजें २५ आश्रमशाळा आहेत.

दारूबंदीचे फायदे

आर्थिक क्षेत्रासंबंधीं सांगावयांचें तर दारूबंदीमुळें मागासलेल्या वर्गांचा फार मोठ्या प्रमाणावर फायदा झालेला आहे. पूर्वी त्यांचा जो पैसा दारूसाठीं खर्च होत असे तो आतां त्यांच्या मुलांचें शिक्षण, कौटुंबिक खरेदी, राहण्यासाठीं सुधारलेलीं घरें व राहणीचा दर्जा सुधारणें यांकरितां खर्च होत आहे. सरकारी पडीत जमिनी लागवडीसाठीं व घरें बांधण्यासाठीं देण्याच्या बाबतींत, मागासलेल्या वर्गांच्या लोकांना अग्रप्राधान्य देण्यांत आलें पाहिजे, असें धोरण १९४७ सालापासून सरकारनें जाहीर केलें आहे. आता मागासलेल्या वर्गांच्या लोकांना अशा जमिनी कायमच्या देण्यांत येतात व या जमिनी देतांना त्यांना प्राधान्यही देण्यांत येतें. या जमिनींची लागवड करणें फायदेशीर जावें या दृष्टीनें त्यांना बी-बियाणें, खतें, नांगरणीसाठीं बैल व अवजारें या रूपानें इतर सहाय्यही देण्यांत येतें. जमीन समपातळीवर आणणें, बांध घालणें व जमिनींतून तण काढणें, या जमीनविकासाच्या कामांसाठीं त्यांना दर एकरीं ५०० रु. ची सहाय्यक रक्कम देण्यांत येते. अविकसित विभागांतील अनुसूचित भागांमधील व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या वर्गांमधील वन्य

जमातीच्या लोकांना पाणीपुरवठ्याच्या विहिरी बांधण्याकरितांही अर्थसहाय्य देण्यांत येतें. अतिशय मागासलेल्या भागांतील वन्य जमातीच्या लोकांच्या राहणीचा दर्जा सुधारण्याकरितां तयार करण्यांत आलेल्या चार खास बहुमुखी योजनांचीं कामें फार समाधानकारकपणें चालू आहेत. दुर्गम अशा वन्य भागांमध्यें दळणवळण चालू करण्यासाठीं बरेच जोडरस्ते बांधण्यांत आले आहेत.

हरिजन व वन्य जमातींच्या वस्तीमध्यें शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्याच्या दृष्टीनें विहिरी बांधण्याचा मोठा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला आहे. त्याचप्रमाणें त्यांच्या घरांबाबतची विकट परिस्थिति सुधारण्यासाठीं निरनिराळ्या घरबांधणी योजना सहकारी, गटवार पद्धतीनें किंवा व्यक्तिशः कामें करण्याच्या पद्धतीनें सुरू करण्यांत आल्या असून त्या जोरानें अंमलांत आणण्यांत येत आहेत. राज्यांतील जंगल कामगारांच्या सहकारी संस्थांचीं कामें समाधानकारकपणानें पार पाडलीं जात आहेत आणि त्यांचा आदर्श इतर राज्यांनींहि समोर ठेवला आहे. भटक्या जमाती व अनुसूचित जमातींसारख्या मागासलेल्या वर्गांसाठीं मजूर कंत्राटें आणि औद्योगिक सहकारी संस्था फार मोठ्या प्रमाणांत सुरू करण्यांत आल्या आहेत आणि त्या त्यांच्या सदस्यांना उपयोगी ठरत आहेत. सरकारी नोकरींतील निरनिराळ्या श्रेणींमध्यें त्यांच्यासाठीं जागा राखून ठेवण्यांत आल्या आहेत आणि खाजगी उद्योगधंद्याचे चालक व स्थानिक संस्थांना अशाच सवलती देण्याबाबत सूचना करण्यांत आल्या आहेत. या सूचनांची योग्य ती अंमलबजावणी होते कीं नाहीं यावर लक्ष ठेवण्यांत येतें.

मागासलेल्या वर्गाच्या कल्याणविषयक कार्यक्रमासाठीं करण्यांत येणाऱ्या खर्चाचें प्रमाण दर-वर्षी सारखें वाढत आहे. राज्यातर्फे व केंद्रसरकारतर्फे पुरस्कार करण्यांत आलेल्या योजनांसाठीं, ४·४९ कोटि रु. व २·८६ कोटि रु. ची तरतूद करण्यांत आली आहे. गेल्या वर्षांत नवीन प्रकारांत मोडणाऱ्या इतर मागासलेल्या वर्गांसाठीं करण्यांत आलेला शिक्षण-फीसंबंधी खर्च ६२ लक्ष रु. होता. या वर्षी या संबंधांतील उत्पन्नाची मर्यादा ९०० रु. वरून १२०० रु. पर्यंत वाढविण्यांत आली आहे. या सवलतीमुळें या वर्षी १·२८ कोटि रु. खर्च येईल, असा अंदाज आहे.

घरबांधणी

महाराष्ट्रांत औद्योगिक कामगारांचें प्रमाण बरेंच मोठें असल्यामुळें व मुंबईसारखीं दाट लोकवस्तीचीं शहरें येथें असल्यामुळें घरबांधणीचा प्रश्न हा महाराष्ट्रासमोरील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. कमिशनर ऑफ लेबर यांनीं १९५८ मध्यें केलेल्या पाहणीनुसार औद्योगिक कामगारांसाठीं आज १,१०,००० गाळ्यांची जरूरी आहे. ही पाहणी फक्त २५० हून अधिक कामगार असलेल्या कारखान्यांतच करण्यांत अल्यामुळें, केवळ औद्योगिक कामगारांसाठींच आवश्यक असलेल्या गाळ्यांची वास्तविक संख्या १,७५,००० च्या घरांत जाऊं शकेल.

युद्धोत्तर कळांत घरबांधणीचा प्रश्न इतका विकट झाला कीं, खाजगी घरमालकांना ह्या प्रश्नाला तोंड देणें शक्य नव्हतें. म्हणून ह्या क्षेत्रांत प्रवेश करणें केंद्र व राज्य सरकारांना भाग पडलें. मुंबई शहराच्या उदाहरणावरून ह्या प्रश्नाची गंभीरता कळून येईल. या शहराच्या लोकसंख्येंत गेल्या शतकाअखेरच्या २५ वर्षांत १५० टक्क्यांनीं वाढ झालेली आहे, परंतु घरांची वाढ मात्र फक्त ३५ टक्के आहे. यामुळें साहजिकच अवास्तव गर्दी झाली आहे. बृहन्मुंबईची सध्याची लोकसंख्या सुमारें ४३ लाख आहे. सध्यांची येथील घरांची संख्या २८ लाख लोकांना पुरेल इतकीच आहे. याप्रमाणें

येथें सुमारें ३ लाख गाळ्यांची कमतरता भासते व ते बांधण्याकरितां अदमासें १८० कोटि रुपये लागतील. १९४६ मध्यें, युद्धोत्तर पुनर्रचनेच्या योजनेनुसार यासाठीं ५ कोटि रुपयांची रक्कम वेगळी काढून कार्याची सुरुवात करण्यांत आली. १९४७ मध्यें प्रांतिक घरबांधणी मंडळ स्थापन करण्यांत आलें व १९४९ मध्यें त्याचें कायदेनियुक्त गृहनिर्माण मंडळांत रूपांतर करण्यांत आलें. विदर्भ घरबांधणी मंडळाची स्थापना त्यानंतर करण्यांत आली. ह्या गृहनिर्माण मंडळांकडे मुख्यत्वें अर्थसहाय्य मिळणाऱ्या घरबांधणी-योजना, कमी उत्पन्नाच्या लोकांची घरबांधणी योजना व सरकारच्या जमीनविकास योजना अमलांत आणण्याचें कार्य सोपविण्यांत आलें होतें.

बांधकामांची प्रगति

मुंबईमध्यें औद्योगिक कामगारांसाठीं २०,९४६ गाळे बांधण्यांत आले. याकरितां ८६२.५६ लाख रुपये खर्च आला. कमी उत्पन्नाच्या लोकांकरितां ४,१०५ गाळे बांधण्यात आले व त्याकरितां १९२.९० लाख रुपये खर्च आला. निर्वासितांकरितां ३५,३४६ गाळे बांधण्यांत आले; त्याकरितां ९७८ लाख रुपये खर्च आला. हे आंकडे १ एप्रिल १९५९ पर्यंत झालेल्या कार्यासंबंधीं आहेत. याच अवधींत विदर्भांत ४६.५६ लाख रुपये खर्चून १,७८० गाळे बांधण्यांत आले. मराठवाड्यांत औद्योगिक कामगारांसाठीं १,४९० गाळे व कमी उत्पन्नाच्या लोकांकरितां २६६ गाळे बांधण्यांत आले. त्यांचा खर्च अनुक्रमें ५०.४९ लाख व १५.५८ लाख रुपये असा आहे. म्हणजे १ एप्रिल १९५९ पर्यंत एकूण २,१४६.९ लाख रुपये खर्चून ६३,९३३ गाळे बांधण्यांत आले.

याशिवाय, घरें बांधण्याच्या कार्याला उत्तेजन देण्याच्या हेतूनें खालील उपाययोजना करण्यांत आल्या:—

(१) सहकारी घरबांधणी संस्थांना घरें बांधण्यासाठीं कर्जें देणें.

(२) घरें बांधण्यासाठीं आवश्यक असलेल्या सीमेंट, लोखंड व पोलाद वगैरे साहित्याच्या किंमती व वांटप यांवर नियंत्रण.

(३) सरकारी व निमसरकारी योजनासाठीं १९४८ मध्यें असलेल्या किंमतीनें जागा ताब्यांत घेण्याची तरतूद.

(४) भावी भाडेकरूंकडून कांहीं अटींवर अनामत रक्कम घेण्याची घरमालकांना परवानगी व नवीन जागांना घर–नियंत्रणांतून सूट.

(५) कांहीं विशिष्ट क्षेत्रांत नवीन कारखाने सुरू करतांना अथवा जुन्या कारखान्यांची वाढ करतांना ४० टक्के कामगारांसाठीं घरें बांधण्याची कारखानदारांवर सक्ति.

कमी उत्पन्नाच्या गटांतील लोक, औद्योगिक कामगार, निर्वासित व मागासलेले वर्ग यांच्या सहकारी घरबांधणी संस्थांना एकूण ४.७ कोटि रुपयांचें कर्ज देण्यांत आलें. अशा संस्थांना उत्तेजन देण्यासाठीं सरकारनें १९५२ मध्यें मुंबई सहकारी घरबांधणी भांडवलपुरवठा संस्थेची (बॉम्बे कोऑपरेटिव्ह हाउसिंग फायनान्स सोसायटी) स्थापना केली. ही संस्था कमी उत्पन्नाच्या लोकांकरितां असलेल्या घरबांधणी योजनानुसार तसेंच सरकारच्या सर्वसामान्य योजनानुसार कर्जें देण्याचें काम करते. या संस्थेच्या भाग-भांडवलांत सरकारनें ५० टक्के रक्कम गुंतविली आहे. या

संस्थेनें नवीन घरें बांधण्यासाठीं एकूण ४४,२७,००० रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत. या संस्थेनें जीवन विमा कॉर्पोरेशनकडून ५० लाख रुपयांचें कर्ज मिळविण्याची व्यवस्था केली असून सरकारनें ह्या कर्जांची हमी घेण्याचें कबूल केलें आहे. सहकारी पद्धतीनें घरें बांधणाच्या कार्याला यामुळें उत्तेजन मिळेल अशी अपेक्षा आहे.

औद्योगिक कामगारांसाठीं घरें

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत राज्य सरकारनें ४१२.२० लाख रुपयांची तरतूद केली होती. या योजनेच्या कालावधींत केंद्र सरकारनें सहाय्य देण्यांत येणारी औद्योगिक घरबांधणी योजना कार्यान्वित केली. ही योजना, १९४८ च्या कारखान्यांच्या कायद्याखालीं येणाऱ्या औद्योगिक कामगारांना लागू होती. या योजनेखालीं राज्यसरकार व स्थानिक संस्था, कारखानदार व औद्योगिक कामगारांच्या सहकारी घरबांधणी संस्थांना अर्थसहाय्य व कर्ज देण्यांत येतें. हें कर्ज व सहाय्य, राज्यसरकारांना अनुक्रमें ५० टक्के व ५० टक्के, कारखानदारांना ५० टक्के व २५ टक्के व औद्योगिक कामगारांच्या सहकारी घरबांधणी संस्थांना ६५ टक्के व २५ टक्के या प्रमाणांत मिळतें. या योजनेचें कार्य द्रुतगतीनें व्हावें म्हणून केंद्रसरकारनें राज्यसरकारांना, कारखानदारांच्या व औद्योगिक कामगारांच्या सहकारी संस्थांच्या योजना मंजूर करण्याचे अधिकार दिले आहेत.

अल्प मिळकतीच्या लोकांसाठीं घरबांधणी योजना

ही योजना १९५४ च्या अखेरपासून सुरूं करण्यांत आलेली असून, ज्यांचें वार्षिक उत्पन्न ६००० रु. हून अधिक नाहीं अशा लोकांना घरें बांधण्याकरितां दीर्घ मुदतीचीं कर्जें देण्याची तरतूद या योजनेंत आहेत.

ही कर्जें व्यक्तिशः, स्थानिक संस्था, धार्मिक संस्था, रुग्णालयें इत्यादींना घरें बांधण्याकरितां देण्यांत येतात. जमिनीचा खर्च धरून एकूण खर्चाच्या ८० टक्के इतकी रक्कम देण्यांत येते. प्रत्येक गाळ्यामागें जास्तींत जास्त ८००० रु. देण्यांत येतात.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत केंद्र सरकारनें निरनिराळ्या घरबांधणी योजनांसाठीं ८४ कोटि रुपयांची तरतूद केली होती. दुसऱ्या योजनाकालांत १९५६ ते ६१ पर्यंत शहरविभागांत १·९ दशलक्ष गाळें बांधण्याचें उद्दिष्ट होतें. पहिल्या योजनेंत हें उद्दिष्ट १·३ दशलक्ष गाळे असें होतें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत भूतपूर्व मुंबई राज्याकरितां अर्थसाह्य मिळणाऱ्या औद्योगिक कामगार घरबांधणी योजनेसाठीं ७९६·९८ लाख रुपयांची व कमी उत्पन्नाच्या लोकांच्या घरबांधणी योजनासाठीं ४६७·९१ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली होती व त्यापैकीं बहुतेक रक्कम सध्यांच्या महाराष्ट्रांत घरें बांधण्यासाठीं निश्चित केली होती.

गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटनाचा कार्यक्रम

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधींत मंजूर केलेली दुसरी महत्त्वाची योजना म्हणजे गलिच्छ वस्त्यांचें उच्चाटन करण्याची योजना ही होय. ही योजना या राज्यांत महानगरपालिका, बरो म्युनिसिपालिट्या व स्थानिक संस्था ह्यांच्याद्वारें अंमलांत आणण्यांत येते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत राज्यसरकारनें यासाठीं ४२९ लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. या योजनेखालीं भारत सरकारकडून खर्चाच्या ३७½ टक्के कर्ज व ३७½ टक्के अर्थसहाय्य देण्यांत येतें. बाकीच्या २५ टक्क्यां-बाबतींत, राज्यसरकार महापालिकांना १२½ टक्के व बरो म्युनिसिपालट्या व स्थानिक संस्था यांना १५ टक्के याप्रमाणें अर्थसहाय्य देतें व उरलेली रक्कम संबंधित संस्थेला भरावी लागते. या योजनेचें

एक वैशिष्ट्य म्हणजे गलिच्छ झोपड्यांत राहणाऱ्या लोकांची फारसी गैरसोय न होऊं देतां त्यांना राहण्यासाठीं दुसरी जागा पुरविण्यांत येते. गलिच्छ वस्त्यांत राहणाऱ्या लोकांकरितां, त्यांना परवडतील अशा भाड्याचीं घरें बांधण्याचेहि प्रयत्न करण्यांत येत आहेत. भारत सरकारनें, महाराष्ट्राच्या बाबतींत ही योजना फक्त मुंबई शहरालाच लागू करण्याचें ठरविलें आहे.

मध्यम उत्पन्नाच्या लोकांकरितां घरें

भारत सरकारनें मध्यम उत्पन्नाच्या लोकांकरितां घरबांधणी योजना योजना सुरू करण्याचें नुकतेंच घोषित केलें असून, या योजनेखालीं ज्यांचें उत्पन्न दरमहा ५०० ते १००० रुपयांपर्यंत आहे, अशा लोकांना घरें बांधण्यासाठीं एकूण खर्चाच्या ८० टक्के इतकें कर्ज मिळूं शकेल. हे कर्ज प्रत्येक घरामागें जास्तींत जास्त २००० रुपयांपर्यंत मिळेल. राज्यसरकारनें सध्यां ही योजना मध्यम उत्पन्नाच्या लोकांकरितां या राज्यांतील महत्त्वाच्या शहरांत सरकारतर्फे घरें बांधून अमलांत आणण्याचें ठरविलें आहे. मध्यम उत्पन्नाच्या गटांतील व्यक्ति व त्यांच्या सहकारी संस्था यांना ही योजना सध्या लागू करण्याचा सरकारचा विचार नाहीं.

जमीन विकास

भारत सरकारनें, जमीन ताब्यांत घेऊन तिचा विकास करण्याबाबतची एक योजना नुकतीच जाहीर केली आहे. या योजनेनुसार राज्य सरकारांना निवडक ठिकाणीं विस्तृत जमिनी ताब्यांत घेऊन त्यांचा आधींच विकास करण्याकरितां कर्जें देण्यांत येतील. या योजनेखालीं घरें बांधणाऱ्यांना योग्य किंमतींत जमिनी उपलब्ध करून देण्यांत येणार असल्यामुळें, जमिनीच्या किंमती स्थिर होतील व भाड्यांत होणारी वाढही थांबेल अशी अपेक्षा आहे. या योजनेमुळें आवश्यक सोयींनीं युक्त अशी घरांची तरतूद पुरेशा प्रमाणांत करतां येईल व समाजाच्या सर्व वर्गांतील लोकांना राहण्यासाठीं वसाहती तयार होतील अशी आशा आहे. विद्यमान शहरांत अथवा त्यापासून दूर अशा ठिकाणीं सुनियोजित आणि नवीन वस्त्या उभारण्यासाठीं या योजनेचा उपयोग करून घेण्याचा विचार आहे. तथापि प्रत्येक वस्तीसाठीं लागणारें भांडवल व जमीन घरबांधणीयोग्य करण्याचा खर्च यांवर ही गोष्ट अवलंबून राहील. राज्य सरकार या योजनेंत भाग घेत असून या बाबतींतल्या आपल्या गरजांबद्दल भारत सरकारला आधींच कळविण्यांत आलें आहे.

याशिवाय मुंबईंत होणाऱ्या जोराच्या पावसामुळें दरवर्षी तेथील सुमारें १०० घरें कोसळतात व अदमासें ५०० कुटुंबें निराधार बनतात व अशा कुटुंबांना राहण्यासाठीं दुसरी जागा मिळणें जवळ जवळ अशक्य बनतें. म्हणून राज्य सरकारनें, घरें कोसळल्यामुळें निराधार झालेल्या कुटुंबांसाठीं बृहन्मुंबईंत दरवर्षी सुमारें २०० घरें बांधण्याचें ठरविलें आहे. हीं घरें त्यांना राहण्यासाठीं योग्य भाड्यानें देण्यांत येतील.

झोंपड्यांत राहणाऱ्यांकरितां योजना

मुंबई शहर व त्याचीं उपनगरें यांत महानगरपालिकेच्या अगर सरकारच्या जमिनीवर अनधिकृतपणें उभारलेल्या झोंपड्यांत २५,००० कुटुंबें राहतात असा अंदाज आहे. या कुटुंबांची राहण्याची परिस्थिती, शहरांत गलिच्छ वस्त्यांतून राहणाऱ्या लोकांसारखीच आहे. परंतु हे लोक गलिच्छ वस्त्यांच्या उच्चाटनांबाबतच्या भारतसरकारच्या योजनानुसार आकारण्यांत येणाऱ्या भाड्याइतकेंहि भाडें देऊं शकत नाहींत. तथापि, या लोकांना या जागांवरील

अनधिकृत झोंपड्यांत अनिश्चित काळपर्यंत राहूं देतां येणार नाहीं. पण त्याचबरोबर त्यांना या जागांवरून हुसकावून लावण्यापूर्वी, त्यांच्यासाठीं ते देऊं शकतील इतक्या स्वस्त भाड्याच्या जागांची सोय करावी लागेल. या उद्देशानेंच राज्य सरकारनें ‘ झोपड्यांत राहणाऱ्यांची योजना ’ म्हणून एक योजना आंखली आहे. या योजनेखालीं २५,००० स्वस्त पद्धतीचे गाळे बांधण्याचें ठरलें आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यांत ५,९६६ गाळे बांधण्याचें काम हातीं घेण्याचें ठरविलें असून तें ३१ मार्च १९६१ पर्यंत पूर्ण करण्यांत यायचें आहे. बाकीचे सुमारें १९,००० गाळे तिसऱ्या पंचवार्षिक योजनाकालांत टप्प्याटप्प्यानीं हाती घेण्यांत येतील.

पहिल्या टप्प्यांत बांधावयाच्या ५,९६६ गाळ्यांपैकीं २,९६६ गाळे गोरेगांव येथें सुमारें १०० एकर जागेंत बांधण्यांचें ठरलें असून या कॉलनीची पायाभरणी समारंभ दि. २० मार्च १९६० रोजीं मुख्यमंत्री श्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्तें करण्यांत आला. बाकीचे ३,००० गाळे विक्रोळी रेल्वेस्टेशन जवळील जागेवर बांधण्यांचें ठरलें आहे. २९६६ गाळे बांधण्याचा खर्च १,०३,८१,००० रुपये व विक्रोळी येथील गाळे बांधण्याचा खर्च १,०५,००,००० रुपये येईल असा अंदाज आहे. याप्रमाणें या योजनेखालीं बांधण्यांत येणाऱ्या एकूण ५,९६६ गाळ्यांचा अंदाजित खर्च २,०८,८१,००० रुपये आहे.

ह्या योजनेच्या अंमलबजावणीचें काम महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाकडे सोपविण्यांत येईल. हे गाळे तळमजल्याच्या स्वरूपाचे राहतील व त्यांत एक राहण्याची खोली (९½ × १३ फूट), एक स्वयंपाकाची खोली (९½ फूट × ९½ फूट,) एक न्हाणीघर (४·३ फूट × ४ फूट) व संडास (४ फूट × ३ फूट) राहील. प्रत्येक ब्लॉकमध्यें आठ गाळे राहतील. नळ सामूहिक राहील. या कॉलनीमध्यें मुख्य रस्ते ६० फूट रुंदीचे व इतर रस्ते कमी रुंदीचे राहतील. तसेंच तेथें बाग, क्रीडांगण, दवाखाना, सभागृह व दुकानें इ. सोयीहि राहतील. हे गाळे बांधतांना पोलादाचा वापर शक्यतों करण्यांत येणार नसल्यानें प्रत्येक गाळ्याचा खर्च ३,५०० रुपयांच्या आसपास येईल. ही योजना भारत सरकारच्या, गलिच्छ वस्त्यांचें उच्चाटन करण्याच्या योजनेनुसार अंमलांत आणण्यांत येणार असल्यामुळें यासाठीं राज्यसरकारला भारतसरकारकडून ३७½ टक्के कर्ज व ३७½ टक्के खर्च अर्थसहाय्य मिळूं शकेल. बाकीच्या २५ टक्के खर्चापैकीं १२½ टक्के खर्च राज्यसरकार देईल व उरलेला मुंबई महानगरपालिकेकडून रस्ते, रस्त्यावरील विजेचे दिवे, गटारें इत्यादि आवश्यक सोयींच्या रूपानें देण्यांत येईल. या योजनेसाठीं बऱ्याच मोठ्या प्रमाणांत अर्थसाहाय्य मिळणार असल्यानें प्रत्येक गाळ्याचें मासिक भाडें फक्त १३ रुपयांपर्यंत ठेवणें शक्य होईल अशी आशा आहे. भाडे-करूंना या भाड्याखेरीज, पाणी व इतर सोयीबद्दल सर्व्हिस चार्जेस म्हणून आणखी कांहीं रक्कम द्यावी लागेल.

प्रश्नाची सोडवणूक

राज्यांतील घरांच्या कमतरतेचा प्रश्न सोडविण्याच्या कामीं, सरकारनें हातीं घेतलेल्या निरनिराळ्या योजनांचा बराच उपयोग झाला आहे यांत शंका नाहीं. तथापि, घरांच्या टंचाईचा प्रश्न अजूनहि बिकटच आहे. ह्या प्रश्नाचें गांभीर्य ध्यानांत घेऊन व या बाबतींत काय करतां येणें शक्य आहे हें जाणून घेण्याच्या हेतूनें राज्यसरकारनें १९५७ मध्यें राज्यांतील घरटंचाईच्या समस्येचा अभ्यास करण्यासाठीं मंत्रिमंडळाची एक उपसमिति नियुक्त केली होती. या उपसमितीनें घरबांधणीशीं संबंध असलेल्या सर्व प्रश्नांची तपासणी करून या समस्येचा सर्वांगीण विचार केला. या बाबतींत

सरकार काय करूं शकेल, तसेंच मालकवर्ग (सरकार, निमसरकारी संस्था व खाजगी) काय करूं शकेल याचाहि यां उपसमितीनें विचार केला व घरबांधणीच्या प्रश्नांबाबत सर्वांगीण शिफारसी केल्या. या शिफारसी शक्य तेथें अमलांत आणण्यांत येत आहेत.

सरकारनें, बृहन्मुंबईतील घरटंचाईच्या प्रश्नाचा अभ्यास करण्याकरितांहि एका खास अभ्यास गटाची नेमणूक केली. ह्या अभ्यास गटानें आपला अहवाल प्रसिद्ध केला असून, एका उच्च पातळीवरील समन्वय मंडळ या गटानें केलेल्या शिफारसी शक्य तों लवकर अमलांत आणण्याचा प्रयत्न करीत आहे.

या अभ्यासगटानें, तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टें कोणतीं असावींत याचाहि विचार केला आहे. हीं उद्दिष्टें दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील उद्दिष्टांच्या कमींत कमी दीडपट तरी असावींत असें मत व्यक्त करण्यांत आलें आहे.

सहकारी चळवळ

सहकारी चळवळीच्या कक्षेत महाराष्ट्रांतील ८५ टक्के खेडीं आणि २५·६८ टक्के ग्रामीण जनता आली आहे. सबंध भारतांत हें प्रमाण अनुक्रमें ६०·०८ टक्के आणि १९·०३ टक्के इतकें आहे. भारतीय संघराज्यांतील ग्रामीण पतपेढ्यांचा कर्जव्यवहार सुमारें १२५ कोटि रुपयांचा आहे, तर महाराष्ट्रांतील हा व्यवहार २५ कोटि रुपयांहून अधिक आहे. भारतांत एका सभासदास सरासरी रु. १०५ कर्ज मिळतें तर महाराष्ट्रांत रु. २२८ कर्ज मिळतें. वरील आंकडेवारीवरून महाराष्ट्रराज्य सहकारी चळवळीच्या आघाडीवर असल्याचें दिसून येईल.

ग्रामीण पतपेढ्या

सहकारी चळवळ ही मुख्यतः कर्जपुरवठ्याची चळवळ आहे असें म्हटलें जातें. शेतकऱ्यांना उत्पादक कामांसाठीं कर्ज पुरविण्याच्या उद्देशानें ही चळवळ जन्माला आली. ह्या बाबतींत इतर राज्यांच्या मानानें महाराष्ट्र राज्य आघाडीवर आहे. गेल्या १० वर्षांत सहकारी संस्थांनीं पीकस्पर्धा योजना सुरू करून कर्जपुरवठ्याला उत्पादक आणि शास्त्रीय स्वरूप आणलें आहे. पूर्वी शेतकऱ्याची मालमत्ता व जमीन पहावयाची व त्या तारणावर कर्ज द्यावयाचें अशी प्रथा होती. त्यामुळें उत्पादनाचा व पिकाचा कांहींच मेळ बसत नसे. शिवाय पिकाची खात्री असल्याशिवाय कर्जफेडीची शाश्वती देतां येत नव्हती. उत्पादनासाठीं कर्जपुरवठा करतांना पिकांना लगणारा खर्च अजमावून त्याप्रमाणे कर्जपुरवठा करणें हा पश्चिम महाराष्ट्रांतील पीक कर्जयोजनेचा मुख्य भाग आहे. मराठवाड्यांत शेतसाऱ्याच्या १२ पट कर्ज देण्याची योजना होती, तर विदर्भांत दर एकरीं २० रु. याप्रमाणें कर्ज देण्याची योजना होती. आतां मराठवाडा आणि विदर्भांत पीककर्ज योजना लागू करण्यांत येत आहे. ह्या योजनेमुळें कर्जपुरवठ्याच्या रकमेंत वाढ झाली असून ग्रामीण पतपेढ्यांची

आणि शेतकऱ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या कामी मदत झाली आहे. याचा परिणाम म्हणजे शेतकऱ्यांची कर्जे फेडण्याची ताकद वाढली आहे.

सहकारी चळवळींत ग्रामीण पतपेढ्यांना महत्त्वाचें स्थान आहे हें वरील विवेचनावरून स्पष्ट होईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सर्व खेडीं आणि ७५ टक्के जमीन कसणारी जनता सहकाराच्या कक्षेंत आणण्याचें ठरविलें आहे.

१९५८–५९ सालची ग्रामीण पतपेढ्यासंबंधीची महत्त्वाची आंकडेवारी पुढीलप्रमाणें आहे :

शेतकी पतपेढ्यांची संख्या :	१४,७३०
सभासद :	११,८६,२६२
भाग भांडवल :	६,९४,०४,०००
भाग भांडवलांतील सरकारची रक्कम :	५८,०६,०००
राखीव आणि इतर निधी :	२,५५,९४,०००
सभासदांना दिलेल्या खर्चाची रक्कम :	२४,९६,११,०००

विदर्भ व मराठवाडा विभागांत सभासद संख्येंत गेल्या चार वर्षांत कशी वाढ होत गेली हें विदर्भातील सभासद संख्या १९५६-५७ मध्यें २०,००० होती ती १९५९-६० मध्यें ८३,००० झाली व मराठवाड्यांत त्याच अवधींत ती १०,००० वरून ६९,००० पर्यंत वाढली यावरून स्पष्ट होईल.

दीर्घ मुदतीच्या कर्जाचा पुरवठा

भू-तारण बँकातर्फे दीर्घ मुदतीच्या कर्जाचा पुरवठा केला जातो. मुंबई भू-तारण बँक देश, कोंकण आणि मराठवाडा या विभागांत आणि विदर्भ केंद्रीय बँक विदर्भ-विभागांत दीर्घ मुदतीची कर्जें देण्याचें काम करते. भू–तारण बँका कर्जरोखे काढून दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या पुरवठ्यासाठीं लागणारें भांडवल गोळा करतात. योजनेंत तरतूद केलेल्या रकमेव्यतिरिक्त कर्जरोख्याद्वारे बाहेरून रकमेचा पुरवठा होऊं शकतो हें ह्या योजनेचें एक वैशिष्टय आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानें उपलब्ध करून दिलेल्या रकमेच्या आधारें केंद्रीय अर्थपुरवठा संस्था (सेंट्रल फायनान्सिंग एजन्सीज) दीर्घ आणि मध्यम मुदतीचीं कर्जें देतात. दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या व्यवहारासाठीं भूतारण बँकांना रिझर्व्ह बँकेकडून कर्ज मिळत नाहीं. ही गरज भू-तारण बँकांना कर्जरोखे काढून भागवावी लागते. कर्जरोख्या द्वारें उभारलेल्या रकमेच्या परतफेडीची आणि त्या रकमेवरील व्याजाची हमी राज्य सरकार घेते.

पूर्वी विहिरी, पंपिंग सेटस् इत्यादींसाठीं सरकार तगाईवर कर्जें देत असे. आतां हें काम भू-तारण बँकाकडे दिलें आहे. महाराष्ट्र राज्यांत पाटबंधाऱ्याखालीं भिजणाऱ्या जमिनीचें क्षेत्र टक्के ५ टक्के आहे. नवीन पाटबंधाऱ्याच्या योजना पूर्ण झाल्या तरी लागवडीखालील पुष्कळशी जमीन कोरड-वाहूच राहेल. तेव्हां अधिक जमीन पाण्याखालीं आणण्यासाठीं विहिरी खोदण्याचें काम हातीं घेतलें पाहिजे. विहिरी खोदण्याच्या योजनेची शीघ्रगतीने अंमलबजावणी करण्याच्या कामीं भू-तारण बँकांची मदत मिळूं शकते. म्हणून सरकारनें हें काम अशा बँकांकडे सोपविलें आहे. शेतकऱ्यांना मिळणारें कर्ज कमी व्याजाच्या दरानें मिळावें म्हणून सरकार, बँकेचा व्याजाचा दर आणि सरकारी तगाई कर्जावरील व्याजाचा दर ह्यांमधील फरकाइतकी आर्थिक मदत (सबूसिडी) देते.

सावकारी नियंत्रण कायदा १९४६ सालीं अमलांत आला. परवान्याशिवाय सावकारी व्यवहारास बंदी, कर्जव्यवहाराचा योग्य हिशेब ठेवणें, व्याजाच्या दरावर नियंत्रण, कागदपत्रें, व पावत्या चोख ठेवणें, वसूलीसाठीं अयोग्य मार्गांचा अवलंब करण्यावर निर्बंध घालणें, इत्यादि बाबींची तरतूद ह्या कायद्यांत केली आहे. ह्या कायद्याच्या अंमलबजावणीमुळें शेतकऱ्यांची बऱ्याच अंशीं पिळवणूक कमी झाली. तसेंच शास्त्रीय पद्धतीवर सहकारी कर्ज पुरवण्याची योजना कार्यान्वित केल्यामुळें शेतकऱ्यांची सावकारी पाशांतून मुक्तता झाली.

माल-विक्री आणि प्रक्रिया संस्था

महाराष्ट्र राज्यांत एक राज्य माल विक्री (मार्केटिंग) संस्था, ९ जिल्हा माल-विक्री संस्था, १७५ तालुका सहकारी खरेदी–विक्री संघ, २४ कापूसविक्री संस्था, २४ फळ-विक्री संस्था, ६ कॉटन जिंनिंग आणि प्रेसिंग संस्था आणि इतर प्रकारच्या २९ संस्था आहेत. वरील २६७ संस्था आपलें कार्य कार्यक्षमरीत्या पार पाडीत आहेत. या संस्था, प्रामुख्यानें सभासदांचा मालाची योग्य भावाने विक्री करून देतात, तर कांहीं मालाच्या विक्रींतून प्राथमिक सहकारी पतपेढ्यांच्या कर्जांची वसूली करतात. याशिवाय शेतकऱ्यांना रासायनिक खतें, सुधारलेलें बियाणें, शेतीची अवजारें आणि यंत्रें पुरविण्याचें कार्य सुद्धां या संस्था करतात. सहकारी खरेदी-विक्री संस्था प्राथमिक सहकारी पतपेढ्या व मध्यवर्ति बँका यामधील दुवा असून त्यांच्यामार्फत मालाच्या स्वरूपांत कर्जाचा पुरवठा करण्याचें आणि मालाच्या विक्रींतून कर्जाची वसुली करण्याचें काम या संस्थांकडे सोपविलें आहे. शेतमालाची विक्री आणि कर्जपुरवठा यांची सांगड अशा तऱ्हेनें घातली आहे. या संस्थांच्या सभासद संस्थांची संख्या ९७,३४२ आहे आणि व्यक्तिगत सभासदांची संख्या ८,४६० इतकी आहे. शेतमालाला चांगला भाव येण्यासाठीं मालाचा साठा करण्याची सोय असणें जरूरीचें असतें. त्यासाठीं प्राथमिक शेतकी संस्था आणि खरेदी – विक्री संघ यांना लहान, मध्यम आणि मोठ्या आकाराचीं गोदामें बांधण्यासाठीं कर्ज आणि सबूसिडीच्या रूपानें सरकारनें आर्थिक साहाय्य दिलें आहे.

अन्नधान्याचें वांटप

अन्नधान्य आणि इतर शेतीसाठीं उपयुक्त वस्तूंच्या वांटपाच्या क्षेत्रांत सहकारी संस्थांनीं उल्लेखनीय प्रगति केली आहे. ग्राम बहुउद्देशीय संस्था आणि तालुका व जिल्हा पातळीवर कार्य करणाऱ्या माल – विक्री संस्था अन्नधान्यें, साखर, लोखंड, पोलाद आणि सिमेंट आदींच्या वांटपाचें काम करतात. पूर्वीच्या मुंबई राज्यांतील प्रदेशांत ६०० हून अधिक अशा प्रकारच्या संस्था वांटपाचें काम करीत आहेत मुंबई येथील दि बॉम्बे कंझ्युमर्स सोसायटीज् फेडरेशननें ७० लक्ष रुपये किंमतीच्या गव्हाचें आणि तांदळाचें वांटप केलें. मुंबईत अलीकडेच स्थापन केलेल्या सर्वोच्च मालविक्री संस्थेनें या क्षेत्रांत प्रशंसनीय कार्य केलें आहे. बहुउद्देशीय संस्था आणि माल-विक्री संस्था यांना आपला व्यवहार कार्यक्षमतेनें करतां यावा आणि धान्य साठविण्याच्या सोयी त्यांना उपलब्ध व्हाव्यात म्हणून सरकारनें त्या संस्थांना आर्थिक सहाय्य दिलें आहे. कांहीं पात्र संस्थांना सरकार खेळतें (वर्किंग) भांडवल देतें.

नियंत्रित बाजार

शेतमालाच्या विक्रीपद्धतींतील प्रचलित गैरव्यवहार दूर करणें शेतमालाच्या नियंत्रित बाजाराचा मुख्य उद्देश आहे.

जुन्या मुंबई राज्याची पुनर्रचना होण्यापूर्वी २९४ शेतमाल विक्री समित्या होत्या. ह्यांपैकीं १९७ समित्या पश्चिम महाराष्ट्रांत कार्य करीत आहेत. मराठवाडा आणि विदर्भ भागांत बाजार नियंत्रणासंबंधीचे स्वतंत्र कायदे आहेत. सबंध राज्यांत बाजारपेठासंबंधीचा समान कायदा लागू करण्यासाठीं आवश्यक ते उपाय योजण्यांत येत असून लवकरच त्यासंबंधीं कायदा करण्यांत येणार आहे.

विक्री समितीचे स्वतःचें असें सर्व साधनांनीं सज्ज असें मार्केट यार्ड असल्या-शिवाय तिला परिणामकारक काम करतां येणार नाहीं. यासाठीं गरजू विक्री समित्यांना कर्ज व सबसिडीच्या स्वरूपांत सरकारी आर्थिक मदत देण्याची तरतूद करण्यांत आली आहे.

राज्यांतील निरनिराळ्या बाजारपेठांतील बाजारभावाची माहिती अखिल भारतीय आकाशवाणी रेडिओ केंद्रावरून देण्याची व्यवस्था केली आहे. ही व्यवस्था डिसेंबर, १९५७ पासून करण्यांत आली असून या योजनेनुसार निवडक ४६ बाजारपेठांतील निवडक ६० शेतमालाचे भाव अखिल भारतीय रेडिओच्या मुंबई, पुणें आणि नागपूर केंद्रावरून ध्वनिक्षेपित करण्यांत येतात. याशिवाय मुंबई येथील मार्केटिंग रिसर्च अधिकारी साप्ताहिक आणि मासिक बाजारभावाचे तक्ते प्रसिद्ध करतो. यांत मुख्यतः भावाचे चढउतार आणि आयात व निर्यातविषयक माहिती असते.

सहकारी साखर कारखाने

सहकारी तत्त्वानुसार शेतमालावर प्रक्रिया करण्याच्या क्षेत्रांत सहकारी साखर कारखान्यांचा विशेष उल्लेख केला पाहिजे. यासंबंधांत महाराष्ट्र सर्वांच्या आघाडीवर आहे. राज्यांतील एकूण साखर कारखान्यांपैकीं १५ कारखाने सहकारी पद्धतीवर चालतात. या कारखान्यांतून फार मोठ्या प्रमाणावर साखरेचें उत्पादन होत आहे. यांतील १३ कारखान्यांनीं साखरेच्या प्रत्यक्ष उत्पादनास सुरुवात केली आहे. उरलेल्या दोन साखर कारखान्यांत, एकदोन वर्षांत उत्पादनास सुरुवात होईल. या साखर कारखान्यांचे एकूण भाग भांडवल १५० लक्ष रुपयांचें आहे. या कारखान्यांनीं इंडस्ट्रिअल फायनान्स कॉर्पोरेशनकडून ६९७·५० लक्ष रुपयांचें दीर्घ मुदतीचें कर्ज घेतलें आहे. मुंबई राज्य सहकारी बँकेनें, हंगामी खर्चाकरितां ८४५ लक्ष रुपये आणि भांडवली खर्चाकरितां मध्यम मुदतीचें ३४९·४९ लक्ष रु. कर्ज दिलें आहे. साखर कारखान्यांनीं घेतलेल्या कर्जाची आवश्यक ती हमी केंद्र आणि राज्य सरकारांनीं घेतली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील सहकारी साखर कारखान्याबाबतचें लक्ष आपण गांठलें असून सहकारी तत्त्वावर अधिक साखर कारखाने उभारण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत आहे.

सहकारी शेती

शेतीवरील भार कमी करण्याच्या आणि तुकडेबंदी करण्याच्या दृष्टीनें सरकारनें सहकारी शेतीचा पुरस्कार केला आहे.

शेती संस्थांचे चार प्रकार आहेत :—

(१) सहकारी सुधारलेली शेती संस्था,
(२) खंडकरी शेती संस्था,
(३) संयुक्त शेती संस्था,
(४) सामुदायिक शेती संस्था.

यांपैकीं पहिल्या दोन संस्थांचें कार्य खेडोपाडीं स्थापन करण्यांत येत असलेल्या सेवा सहकारी संस्थांमार्फत करून घेतां येत असल्यामुळें अशा प्रकारच्या संस्था संघटित करण्यास प्रोत्साहन न देण्याचें सध्याचें धोरण आहे. शेतजमिनीचे तुकडे एकत्रित करून, संयुक्त प्रयत्नाद्वारें शेतीचें उत्पादन वाढविणें हा संयुक्त शेतीचा उद्देश आहे. अशा प्रकारच्या संस्थेंत जमिनीच्या मालकी हक्काला बाध येत नाहीं. एकत्र जमिनींतील एकाद्या सभासदानें दिलेल्या जमिनीची किंमत संस्थेची व्यवस्थापकीय समिती ठरविते आणि जमिनीच्या किंमतीच्या प्रमाणांत त्या सभासदास मालमत्तेचें उत्पन्न देण्यांत येतें.

सामुदायिक शेती संस्थेमध्यें ज्यांना मालकीची जमीन नाहीं असे लोक एकत्र येतात आणि सोसायटीच्या नांवें एकाद्या जमिनदाराची किंवा सरकारची जमीन भाडेपट्ट्यानें कसण्यास घेतात. सर्व सभासद श्रम आणि साधनें एकत्र करून सामुदायिकरीत्या शेती करतात आणि श्रम व साधनांच्या प्रमाणांत उत्पन्न वांटून घेतात.

३० जून १९५९ रोजीं ६३ संयुक्त शेती संस्था, ४५ खंडकरी संस्था आणि १४६ सामुदायिक शेती संस्था अशा एकूण २५४ संस्था होत्या. ह्या संस्थांची सभासद संख्या ८,१२४ होती आणि ५१,४९६ एकरांपैकीं ३३,२९५ एकर जमीन लागवडीखालीं आणली गेली. त्या वर्षी १७·०४ लक्ष रुपये किंमतीचा माल झाला. या संस्थांना सरकारी कर्ज आणि आर्थिक मदत या रूपानें अनुक्रमें १०·७० लक्ष आणि ४·१६ लक्ष रुपये देण्यांत आले.

सहकारी पाणीपुरवठा संस्था

निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतीचा धोका लक्षांत घेतां शेतमालाचें उत्पादन वाढविण्याच्या दृष्टीनें शेतीस पाणीपुरवठा करणाऱ्या संस्थेचें अत्यंत महत्त्व आहे. या संस्थांना सहाय्य करण्याच्या योजनेनुसार सरकार पाणीपुरवठ्याच्या योजनेच्या भांडवली खर्चाच्या ५० टक्के कर्ज आणि २५ टक्के आर्थिक मदत (सबसिडी) देते. याशिवाय योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या १५ टक्क्यापर्यंत सरकारी कर्ज देण्याची तरतूद असून हें जादा कर्ज योजना पूर्ण झाल्यानंतर ती कार्यान्वित करण्यासाठीं येणाऱ्या खर्चाच्या (ऑपरेशनल कॉस्ट) तोंडमिळवणीसाठीं देण्यांत येते. त्याचप्रमाणें सेक्रेटरी-तथा-ड्रायव्हर यांच्या खर्चासाठीं, पहिल्या वर्षी ९०० रु. आणि त्यानंतरच्या दोन वर्षांसाठीं दरसाल ४५० रु. याप्रमाणें १८०० रु. पर्यंत या संस्थांना आर्थिक मदत घेतां येते. राज्यांत एकूण १३० पाणीपुरवठ्याच्या संस्था (लिफ्ट इरिगेशन सोसायटीज्) असून त्यांच्या सभासदांची संख्या १२,४४० आहे. या संस्थांचे भाग भांडवल २७·२ लक्ष रु. आहे. सरकारनें १२३ संस्थांना १·०२ कोटि रुपयांची आर्थिक मदत दिली आहे. यापैकीं ६० संस्थांनीं आपल्या योजना पूर्ण केल्या असून पाणीपुरवठा करण्यास सुरुवात पण केली आहे. पाण्याखालीं येऊं शकणाऱ्या एकूण ५६,२०० एकरांपैकीं १४,६९० एकर जमीन पाण्याखालीं आणली आहे.

डिझल ऑईल एंजिनांपेक्षां विजेवर चालणाऱ्या पंपाच्या सहाय्यानें पाणीपुरवठा केल्यास योजनेवरील खर्च कमी होतो असें आढळून आल्यामुळें ऑईल एंजिनांऐवजीं विजेवर चालणाऱ्या यंत्रसामुग्रीचा उपयोग करण्याचें ठरविलें आहे. यामुळें एकूण खर्चांत २७५ रु. वरून १७५ रु. पर्यंत कपात करतां येते.

दूधपुरवठा आणि मच्छिमारी

शेतकऱ्यांना जोडधंदा मिळवून देण्याच्या दृष्टीनें दूधपुरवठा संस्था फार उपयुक्त ठरल्या आहेत. या राज्यांत, जून १९५९ अखेर ८ दूधपुरवठा संघ (युनियन्स) आणि ११२ प्राथमिक

दूध उत्पादक संस्था होत्या. या संस्थांची सभासद संख्या ५,०९४ होती, आणि त्यांचे भाग आणि खेळतें भांडवल अनुक्रमें ४·९५ लक्ष आणि १३·०१ लक्ष रुपये होतें. या संस्थांना सरकारकडून मोठ्या प्रमाणांत आर्थिक सहाय्य मिळालें आहे.

मच्छीमार संस्थांच्या विकासास पुष्कळ वाव आहे. शेतकी प्राथमिक संस्थांच्या योजनांच्या धर्तीवर या संस्थाच्या वाढीसाठीं पुरेशा सवलती देण्याचे प्रयत्न चालू आहेत. ३० जून, १९५९ रोजीं राज्यांत २५,४१६ सदस्य असलेल्या ९५ संस्था कार्य करीत होत्या. या संस्थांचें खेळतें भांडवल २७ लक्ष रुपयांचें आहे. या संस्थांनीं २३·४३ लक्ष रुपयांची मासळी विकली.

मागासलेल्या वर्गासाठीं कल्याणकारी योजना

मागासलेल्या वर्गासाठीं (१) मागासलेल्या वर्गासाठीं घरें, (२) सहकारी शेती संस्था, व (३) ग्रेन डेपोची योजना अशा तीन योजना कार्यवाहींत आहेत. जून, १९५९ अखेर मागासलेल्या वर्गासाठीं ३०७ घरबांधणी संस्था होत्या. या संस्थांना ३६·९४ लक्ष रुपये कर्ज आणि १·१३ लक्ष रुपये आर्थिक मदत मिळाली. या संस्थांनीं १,५०९ गाळे बांधून १५०९ कुटुंबांची सोय केली आहे. गत वर्षी १२० सहकारी शेती संस्थांना २·७३ लक्ष रुपये कर्ज आणि १·०५ लक्ष रुपये आर्थिक मदत मिळाली. ग्रेन डेपोच्या योजनेखालीं ग्रेन डेपोंना ५·१ लक्ष रुपये कर्ज देण्यांत आलें.

नागरी बँका आणि गृहनिर्माण

नागरी विभागांत बँका, नागरी कर्जपुरवठा संस्था, गृहनिर्माण संस्था आणि ग्राहक स्टोअस या संस्था उपयुक्त कार्य करीत आहेत. ३० जून, १९५९ रोजीं नागरी कर्जपुरवठा संस्थांची आणि त्यांच्या सभासदांची संख्या अनुक्रमें ९२८ आणि ३,६४,८५२ होती. या संस्थांनीं आपल्या सदस्यांना १३·१२ कोटि रुपयांचें कर्ज दिलें. महाराष्ट्रांतील प्रमुख नगरांच्या वाढत्या औद्योगीकरणाबरोबर नागरी बँकांचे व्यवहार झपाट्यानें वाढत गेल्यानें बँकांतील ठेवींतहि वाढ होत गेली. अशा तऱ्हेनें झालेल्या वाढीचा फायदा शेवटीं मध्यवर्ति अर्थपुरवठा संस्थांतर्फे शेतकी पतपेढ्यांना होतो.

राज्यांत एकूण १,०१९ ग्राहक स्टोअर्स असून त्यांच्या सभासदांची संख्या २·०९ लक्ष आहे. या संस्थांचें खेळतें भांडवल १·२५ कोटि रुपयांचें आहे. अन्नधान्यें, साखर इत्यादि मालाच्या वांटपाचें काम या संस्थांकडे सोपविण्याच्या सरकारच्या अलिकडील धोरणामुळें ग्राहक संस्थांच्या कार्यास चांगलीच चालना मिळाली.

नागरी गृहनिर्माणाच्या क्षेत्रांत निरनिराळ्या संस्था कार्य करीत आहेत. या संस्था म्हणजे सर्व-साधारण गृहनिर्माण संस्था, कमी उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण संस्था, आणि औद्योगिक कामगारांसाठीं असलेल्या गृहनिर्माण संस्था या होत. ३० जून, १९५९ रोजीं एकूण १,०२१ संस्था होत्या आणि त्यांच्या सभासदांची संख्या ५७,४३४ होती. या संस्थांना सरकारकडून १३५·९३ लक्ष रुपये कर्ज आणि १·९८ लक्ष रुपये आर्थिक मदत मिळाली. या संस्थांनीं ११०८६ गाळे बांधले असून आणखी ९५९ गाळ्यांचें बांधकाम चालू आहे. राज्यांतील संस्थांना कर्ज देण्यासाठीं मुंबई येथें बॉम्बे को–ऑपरेटिव्ह हाउसिंग फायनान्स सोसायटी ही मध्यवर्ति संस्था म्हणून कार्य करते. ह्या संस्थेचे ३७३ सभासद असून तिचें भाग भांडवल आणि रिझर्व्ह व इतर निधी अनुक्रमें ७२·४२ लक्ष रुपये आणि ४·७९ लक्ष रुपये आहेत. या संस्थेनें जून १९५९ अखेरपर्यंत २१३·४८ लक्ष रुपये कर्जवांटप केलें.

सघन भातशेती

राज्यांत, जपानी पद्धतीनें मशागत करून भाताचे उत्पादन वाढविण्याची योजना गेल्या ४–५ वर्षांपासून सुरू करण्यांत आली आहे. सघन भातशेतीची मोहीम सहकारी आणि शेतकी खात्यांकडून

संयुक्तरीत्या अंमलांत आणली जात आहे. जपानी पद्धतीनें भाताच्या एकरी उत्पादनांत निश्चित वाढ होते हें सिद्ध झालें आहे. पूर्वी भाताच्या पिकाचें एकरीं उत्पादन १० ते १५ मण होतें, तर सघन भातशेतीच्या पद्धतीमुळें तें आतां १५ ते ३० मण इतकें होत आहे. १९५७-५८ आणि १९५८-५९ सालीं अनुक्रमें ४·६० लक्ष आणि १५·५३ लक्ष बंगाली मण जादा उत्पादन झालें. या योजनेची अंमलबजावणी यशस्वीरीत्या होत असून विदर्भ आणि मराठवाडा विभागांतहि ती लागू करण्यांत येत आहे.

या योजनेचीं प्रमुख वैशिष्ट्यें खालीलप्रमाणें आहेत :

(१) पत असलेल्या आणि पत नसलेल्या शेतकऱ्यांस कर्जपुरवठा करणें,

(२) रासायनिक खतांचा पुरवठा करणें,

(३) शेतकीविषयक माहिती पुरविणें.

सेवा सहकारी संस्था

राष्ट्रीय विकास मंडळाच्या धोरणविषयक ठरावानुसार सेवा सहकारी संस्था स्थापण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. शेतीच्या कामासाठीं कर्जपुरवठा करणें, कच्च्या मालाची खरेदी करणें, सभासदांचा शेतमाल एकत्रित करून ज्यांच्याशीं त्या संलग्न आहेत अशा विक्री-संस्था द्वारा त्यांची विक्री करणें, हा या संस्थांचा उद्देश राहील. बियाणें, खतें, जंतुनाशकें, इत्यादींच्या वाटपाचे आणि ग्रामीण जनतेच्या घरगुती गरजा भागविण्याचें काम या संस्था हातीं घेतील. अशा प्रकारच्या संस्था या राज्यांत नवीन नाहींत. जवळजवळ असाच उद्देश असलेल्या बहुउद्देशीय संस्था गेल्या २० वर्षां-पासून राज्यांत कार्य करीत आहेत.

१९५९-६० मध्यें नवीन २,६३० सेवा सहकारी संस्था नव्यानें स्थापण्यांत आल्या आणि ४,५२१ शेतकी संस्थांचे सेवा सहकारी संस्थांत रूपांतर करण्यांत आलें. सेवा सहकारी संस्था स्थापण्यापूर्वी राज्यांत १,३४२ मोठ्या आकाराच्या आणि ३,९०३ लहान आकारच्या बहुउद्देशीय संस्था होत्या.

सेक्रेटरीअल खर्चासाठीं म्हणून प्रत्येक संस्थेला पांच वर्षांकरितां एकूण रु. ९०० आर्थिक मदत देण्याची शिफारस भारत सरकारनें केली होती. परंतु राज्य सरकारनें वरील कालावधीसाठीं द्यावयाची रक्कम वाढवून १२०० रु. केली आणि त्याप्रमाणें आर्थिक मदत देण्यासाठीं सरकारनें हुकूमहि काढले आहेत.

जिल्हा बँका

कुलाबा जिल्हा सोडल्यास सर्व जिल्ह्यांत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. सर्वोच्च आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या ५७ शाखा उघडण्याचे लक्ष होतें. यापैकीं प्रमुख ठिकाणीं ५२ शाखा उघडण्यांत आल्या आहेत. कर्जासाठीं आलेल्या अर्जांची दखल घेण्याचें काम सुकर व्हावें म्हणून या शाखा काढण्यांत आल्या आहेत. प्राथमिक संस्थांच्या सभासदांची संख्या २,८९,००० नीं वाढली. सहकारी चळवळीच्या कक्षेंत ८५·५ टक्के खेडीं आणि ३० टक्के लोकसंख्या आली आहे.

सहकारी संस्थांमार्फत सुमारें २५ कोटि रुपयांचें अल्प मुदतीचें कर्ज वाटण्यांत आलें. याबाबतचा इष्टांक ३१·६५ कोटि रुपयांचा होता. येत्या वर्षात राहिलेली रक्कम वाटण्यांत येईल अशी अपेक्षा आहे.

सहकारी शिक्षण

सहकारी चळवळीच्या सुरुवातीपासूनच सहकारी शिक्षण आणि प्रचार यांचें महत्त्व जाणवूं लागलें होतें आणि याचा परिणाम म्हणजे १९१८ मध्यें मुंबई राज्य सहकारी संघ या नांवाची एक स्वतंत्र संस्था नोंदविण्यांत आली. या संस्थेचें कार्यक्षेत्र सबंध महाराष्ट्र राज्यभर असून तिचें कार्य विभागीय आणि जिल्हा सहकारी मंडळांमार्फत चालतें.

सहकारी शिक्षणाच्या मध्यवर्ती समितीच्या सल्ल्यानुसार दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत सहकारी शिक्षण, ट्रेनिंग आणि प्रचार याबाबतची योजना समाविष्ट करण्यांत आली आहे. या योजनेनुसार संघानें पुणें, कोल्हापूर, जळगांव, औरंगाबाद, नागपूर आणि अमरावती येथें शाळा चालविल्या असून पुणें येथें एक कॉलेजहि चालविलें आहे. या संस्थांतून सहकारी खात्यांतील आणि सहकारी संस्थांतील अधिकाऱ्यांच्या शिक्षणाची सोय केली आहे. जिल्हा सहकारी मंडळांकडून सेक्रेटरी आणि संस्थांच्या व्यवस्थापकीय मंडळाचें सदस्य यांच्यासाठीं वर्ग चालविण्यांत येतात.

मुंबई सहकारी संस्थांचा कायदा व त्याखालीं तयार करण्यांत आलेल्या नियमानुसार ४ टक्के डेव्हिडंड जाहीर करणाऱ्या संस्थांनीं संघाच्या शिक्षणनिधीचा वाटा उचलला पाहिजे. प्राथमिक आणि सहकारी संस्थांच्या व्यवस्थापकीय समितीच्या सदस्यांना व सेक्रेटरींना प्रशिक्षण देण्याबाबतच्या कार्यक्रमास चालना देण्यासाठीं, या योजनेखालीं, प्रत्येक जिल्ह्यासाठीं दोन सहकारी ट्रेनिंग इन्स्पेक्टर नेमले आहेत. प्रत्येक जिल्ह्यांत सेक्रेटरीच्या ट्रेनिंगसाठीं ३ आणि सभासदांसाठीं ३६ वर्ग घेण्यांत येतात आणि ४५ सेक्रेटरी आणि १,४४० सभासदांना प्रशिक्षण देण्यांत येतें.

या योजनेशिवाय संघ, ग्रामसेवकांसाठीं सहकाराचे खास वर्ग घेतो आणि औद्योगिक सहकारी संस्था आणि सहकारी शेती संस्थांचे सभासद इत्यादींसाठीं ट्रेनिंगचे वर्ग चालवितो.

औद्योगिक सहकारी संस्था

महाराष्ट्रांत २६ जिल्ह्यांपैकीं २२ जिल्ह्यांत जिल्हा औद्योगिक सहकारी संघ आहेत. उरलेल्या जिल्ह्यांतून असे संघ स्थापण्याच्या दृष्टीनें प्रयत्न चालू आहेत. औद्योगिक संस्थांना तांत्रिक साहाय्य देणें, प्राथमिक संस्थांचे सेक्रेटरी आणि अकाउंटंटचे कामासाठीं आणि संलग्न संस्थांचें काम पाहाण्यासाठीं ट्रेन्ड नोकरवर्गाचा पुरवठा करणें, तसेंच स्वस्त दरानें कच्च्या मालाचा पुरवठा करणें आणि नाममात्र (नॉमिनल) कमिशन घेऊन प्राथमिक संस्थांचा तयार माल विकणें ही जिल्हा औद्योगिक सहकारी संघ स्थापण्यामागील कल्पना आहे.

जिल्हा औद्योगिक सहकारी संघाना आणि त्यांच्या संलग्न प्राथमिक संस्थांना त्यांच्या कामांत मार्गदर्शन करण्यासाठीं राज्य पातळीवर औद्योगिक सहकारी संघ स्थापण्यांत आला आहे. संघाचे

भाग भांडवल २,२६,१८० रु. असून तें संलग्न जिल्हा संघ आणि प्राथमिक संस्थांकडून गोळा करण्यांत आलें आहे. सरकारनें भाग भांडवलासाठीं २,२८,४३० रु. दिले आहेत. संघाने मुंबईत विक्री केंद्रें उघडलीं आहेत. हातमागाचें कापड तयार करण्यासाठीं एक केंद्रहि संघानें चालविलें असून या संस्थेमार्फत मोठ्या प्रमाणावर चामड्याचे बूट तयार करून पुरविले जातात.

राज्यांत सोलापूर येथें एक जिल्हा औद्योगिक सहकारी बँक आहे. घरगुती आणि छोट्या उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीनें ही बँक औद्योगिक संस्थांना आणि वैयक्तिक कारागिरांना पैसा पुरविते. या बँकेनें २,०२,१०० रु. चे भाग भांडवल गोळा केलें असून सरकारनें बँकेचे १,२५,००० रु. चे शेअर्स विकत घेतले आहेत.

खादी आणि ग्रामोद्योग

घरगुती उद्योगधंद्यांचा विकास आणि वाढ करण्याच्या दृष्टीनें आणि बेकार कारागिरांना काम मिळवून देण्याच्या दृष्टीनें भारत सरकारनें, कायद्यान्वयें, अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग मंडळ स्थापन केलें आहे.

मंडळानें खालील उद्योगधंद्यांचा जोमदार विकास करण्याचें काम हातीं घेतलें आहे :

(१) मधमाशा-पालन, (२) काड्यांच्या पेट्या तयार करण्याचा धंदा, (३) कुक्कुटादि पालन, (४) साबण तयार करण्याचा धंदा, (५) चर्मोद्योग, (६) तेल घाणी, (७) हात-कागद तयार करण्याचा धंदा, (८) नीरा आणि ताडगुळ, (९) हात-सडणीचा धंदा, (१०) तंतु उद्योग, (११) गुळ आणि खांडसरी, (१२) लोहारकाम आणि सुतारकामाचा धंदा, (१३) पिठाच्या चक्क्या, (१४) खादी.

खादी आणि ग्रामोद्योग मंडळामार्फत वरील निरनिराळ्या औद्योगिक संस्थांना अवजारें आणि साधनसामुग्रीच्या खरेदीसाठीं, गोदामें बांधण्यासाठीं आणि भाग भांडवलासाठीं आर्थिक मदत दिली जाते. मंडळ नसलेल्या ठिकाणीं खात्यामार्फत आर्थिक सहाय्य केलें जातें.

हातमागाचा धंदा

राज्यांतील हातमाग धंद्याच्या विकासयोजनांमध्यें खालील चार प्रमुख बाबींचा समावेश करण्यांत आला आहे :

(१) विणकर सहकारी संस्था स्थापणें.

(२) विणकर सहकारी संस्थांना कर्ज व आर्थिक मदत, तसेंच हातमाग कापडाच्या विक्रीवर रिबेटच्या स्वरूपांत आर्थिक सहाय्य देऊन त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणणें.

(३) हातमाग कापडाचा दर्जा आणि उत्पादन वाढवून कापडाच्या विक्रीची व्यवस्था करणें.

(४) विणकरांची सामाजिक आणि आर्थिक सुधारणा घडवून आणणें.

महाराष्ट्र राज्यांत ६५० विणकर सहकारी संस्था असून त्यांच्या कक्षेंत ८०,००० हातमाग आले आहेत. या संस्थामुळें ७८,००० विणकरांना रोजगार मिळतो.

जंगल कामगार सहकारी संस्था

जंगल कामगार हे बव्हंशी आदिवासी आहेत. त्यांच्या कामाबद्दल त्यांना पूर्ण वेतन मिळावें आणि धंद्यांतील नफा त्यांच्या पदरांत पडावा एवढाच केवळ उद्देश जंगल कामकार सहकारी संस्थांच्या विकास योजनेच्या मुळाशीं नसून सांघिक, शारीरिक आणि बौद्धिक प्रयत्नांच्या जोरावर व्यवहार चालविण्याची जबाबदारी पार पाडण्याचें शिक्षण त्यांना मिळावें हें पण एक मुख्य उद्दिष्ट आहे. वन्य जमातीचें राहणीचें मान उंचवावें व त्यांची सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक सुधारणा घडवून आणावी हा योजनेचा दुसरा एक हेतु आहे.

१९४७ सालीं केवळ ११ जंगल सहकारी संस्था नोंदण्यांत आल्या होत्या. १९५८ साल अखेर ही संख्या १७६ झाली. या संस्थांमुळें २०,००० हून अधिक जंगल कामगारांचा फायदा झाला. गेल्या कांहीं वर्षांपासून या लोकांच्या उन्नतीसाठीं कांहीं समाजिक संस्था कार्य करीत असून त्यांना सरकारनें मान्यता दिली आहे. या संस्थांचीं नांवे अशीं आहेत : आदिवासी सेवा मंडळ, मुंबई; डांग सेवा मंडळ, नाशिक; भिल्ल सेवा मंडळ, प. खानदेश. याशिवाय सर्वोदय केंद्रें आणि कांहीं जिल्हा औद्योगिक सहकारी संघांनाहि मान्यता दिली आहे. जंगल कामगार सहकारी संस्थांना जंगलांतील कुपें तसेंच इतर किरकोळ जंगल मालाची म्हणजे हिरडा, शिकेकाई, डिंक, आपटा, टेंभुर्णीचीं पानें इत्यादि गोळा करण्याचे मक्ते देण्यांत येतात.

या चळवळीचें योग्य मार्गदर्शन करण्यासाठीं आणि चळवळीबाबतच्या प्रश्नांसंबंधी सरकारला सल्ला देण्यासाठीं राज्य पातळीवर सरकारी आणि बिनसरकारी सदस्यांची एक नियोजन समिति नेमली आहे. प्रत्येक जिल्ह्यांत जंगल कामगार संस्थांच्या प्रतिनिधींची एक समन्वय समिति असून त्यांच्या तांतडीच्या तक्रारी दूर करण्यासाठीं तिचा उपयोग होतो.

कूप कामासाठीं बऱ्याच पैशाची गरज असते. जंगल कामगार सहकारी संस्था ह्या मुख्यतः वन्य जमातीच्या लोकांच्या असल्यामुळें त्यांना पैशाची अधिक गरज भासते. त्यांची ही गरज मध्यवर्ति अर्थपुरवठा संस्था भागविते. व्याजाचा दर केवळ २½ टक्के ठेवला आहे. अशा तऱ्हेनें दिलेल्या मदतीचा उपयोग संस्थेच्या खेळत्या भांडवलासाठीं केला जातो. याशिवाय सरकारतर्फें खालील-प्रमाणें मदत केली जाते :

१) शेअर भांडवलांतील वाटा,	रु. ३,०००
२) प्रत्येक वर्षी कल्याण कार्यांसाठीं अनुदान, (पहिल्या तीन वर्षांसाठीं)	रु. १,५००
३) प्रत्येक वर्षी व्यवस्थापकीय खर्चासाठीं अनुदान, (पहिल्या दोन वर्षांसाठीं)	रु. १,२००

कुटिरोद्योग आणि ग्रामोद्योग

राज्यांत २,००० वर औद्योगिक सहकारी संस्था असून त्यांच्या सभासदांची संख्या १·५० लक्ष आहे. या संस्थांचें खेळतें भांडवल ५ कोटि रुपयांचें आहे. या संस्थांच्या कार्यामुळें २ लक्ष लोकांना

कामधंदा मिळाला. यापैकीं १.५० लक्ष सभासद आहेत. या औद्योगिक सहकारी संस्थांच्या स्थापने-
मुळें हातमाग, चर्मोद्योग, कूप काम, कत्रांट इत्यादि धंद्यांतील कारागिरांना चांगलें वेतन मिळविणें
शक्य झालें आहे.

औद्योगिक सहकारी संस्था आपल्या कार्याचा व्याप वाढवीत आहेत, हें पुढें दिलेल्या
गोष्टींवरून सिद्ध होईल. अहमदनगर जिल्ह्यांत यंत्राचे सुटे भाग तयार करणारी एक सहकारी
संस्था नोंदण्यांत आली असून पुणें येथें बॉल बेअरिंग्स् तयार करणारी एक आणि
रेडिओचे भाग तयार करणारी एक अशा दोन संस्था स्थापन करण्यांत आल्या आहेत. अखिल
भारतीय हातमाग मंडळ आणि रिझर्व बँक ऑफ इंडियाकडून मिळालेल्या आर्थिक
मदतीनें हातमाग विणकर सहकारी संस्थांनीं चांगली प्रगति केली आहे. मराठवाडा विभागांतील
हिमरू विणकाम व बिद्रीकाम, येवला व पैठन येथील रेशमी कापड, नागपूर साड्या, चामड्याच्या
वस्तु, चांदीच्या कलापूर्ण वस्तु, काथ्याच्या वस्तु या सर्व वैशिष्ट्यपूर्ण व प्रसिद्ध अशा
उद्योगधंद्यांची ज्या भागांत वाढ करणें शक्य आहे अशा भागांत या धंद्यांच्या सहकारी संस्था
स्थापण्यांत आल्या आहेत.

सरकारनें वेळोवेळीं नेमलेल्या तज्ज्ञ समित्यांनीं केलेल्या शिफारशींचा विचार करून या
धंद्यांचा विकास करण्याच्या दृष्टीनें पावलें टाकण्यांत आलीं आहेत. तांत्रिक शिक्षण देण्यासाठीं
फिरत्या शाळांची योजना ही या अनेक योजनांपैकीं एक योजना आहे. राज्यांत सध्यां अशा २८०
शाळा निरनिराळ्या उद्योगधंद्यांचें तांत्रिक शिक्षण देत आहेत. विणकाम, चामडें कमाविणें,
चामड्याच्या वस्तु तयार करणें, काथ्याचें काम, रंगकाम आणि छपाईकाम, लोहारकाम,
इ. धंद्यांबद्दलचें शिक्षण या शाळांमधून देण्यांत येतें. या शाळांमध्यें प्रवेश दिल्या गेलेल्या विद्यार्थ्यांना
शिक्षणक्रमाच्या काळांत विद्यावेतन दिलें जातें. तसेंच हे उद्योगधंदे वैयक्तिकरीत्या किंवा सहकारी
संस्था स्थापून चालू करण्यासाठीं त्यांना जरूर ती आर्थिक व तांत्रिक मदतहि देण्यांत येते. या
शाळांतून दरवर्षी सुमारें २,००० विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडतात. आतांपर्यंत २,०००० हून
अधिक लोकांना शिक्षण देण्यांत आलें आहे. अशा तऱ्हेनें शिक्षण घेऊन बाहेर पडलेले कारागिर
त्यांना दिलेल्या शिक्षणाचा उपयोग प्रत्यक्ष कामासाठीं कितपत करतात हें अजमावण्यासाठीं आणि
मालाचा दर्जा आणि प्रमाण वाढविण्यासाठीं त्यांना मदत करण्याकरितां निरनिराळे मार्ग शोधून
काढण्यांत येत आहेत.

आर्थिक पाहाणी

महाराष्ट्र राज्याचीं उत्पन्नाचीं साधनें म्हणजे केंद्रीय करांतील राज्याचा वांटा, राज्य कर, केंद्राकडून मिळणारीं अनुदानें व सहाय्य व जमीन आणि जंगल यांपासून मिळणारें उत्पन्न हीं होत. महसुलाच्या हिशेबांतील खर्चाची मुख्य सदरें शेती, नागरी कामें, पोलिसासारखीं संरक्षक कामें, सर्वसामान्य प्रशासन आणि शिक्षण, वैद्यकीय सोयी व सार्वजनिक आरोग्य यांसारखीं सामाजिक कार्यें हीं आहेत. राज्याच्या एकूण कर्जांमध्यें, कायमचें कर्ज, खेळतें कर्ज, केंद्र सरकारकडून घेतलेलीं कर्जें, सरकारनें उभारलेलीं इतर कर्जें आणि प्रॉव्हिडंट फंडाची बाकी इत्यादींचा समावेश होतो. भांडवली सदरांतील जमा आणि खर्च यांत, जमेच्या बाजूला खुल्या बाजारांतून घेतलेलें कर्ज, केंद्र सरकारकडून घेतलेलें कर्ज, कर्जांतील जमा रकमा, ठेवी, राज्य सरकारनें दिलेल्या कर्जांची व आगाऊ रकमांची वसुली इत्यादींच्या व खर्चाचा बाजूला योजनांतर्गत व तदितर योजनांवरील भांडवली खर्च, केंद्र सरकारच्या व इतर कर्जांची परतफेड व राज्य सरकारकडून देण्यांत येणारीं कर्जें व आगाऊ रकमा यांचा समावेश होतो.

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मूलाधार

भौतिक साधनसंपत्ति व सामाजिक व आर्थिक सेवा यांच्या विकासाच्या दृष्टीनें सध्या उद्योग-धंद्यांवर भर असला तरी, शेती हाच ग्रामीण अर्थव्यवस्थेचा मूलाधार आहे. भारतांतील ६९·८३ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे, तर महाराष्ट्रांतील ६३·९७ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत. पिकाखालीं ५७·९२ टक्के जमीन असून झाडांपासून मिळणारीं पिकें, कुरणें, चराईच्या जमिनी व पडित जमिनी यांच्याखालीं १३·३४ टक्के क्षेत्र आहे व लागवडीयोग्य पडित जमीन ३·०१ टक्के

आहे. बाकीच्या २५·७३ टक्के क्षेत्रांत जंगल (१७·४९ टक्के), लागवडीस निरुपयोगी पडित जमीन (६·०३) किंवा बिगर शेतीच्या कामांसाठीं उपयोगांत आणलेली जमीन (२·२१ टक्के) आहे.

म्हणून, सघन शेतीचा अवलंब करून उत्पादन वाढविणें जरूर आहे. राज्यांतील ७० टक्क्यापेक्षां अधिक लोक खेड्यांत राहात असतांना शेतीविषयक सुधारणांचें—कूळवहिवाट कायम करून शेतक-ऱ्याला जमिनीचे मालक बनविण्याचें व अशा प्रकारें जुनोपुराणी जमीनदारी पद्धति नष्ट करण्याचें—महत्त्व कोणीहि नाकारणार नाहीं. याशिवाय, लक्ष देण्यासारख्या इतर बाबी म्हणजे जमिनीचे तुकडे करण्याला आळा घालणें, शेतकऱ्यांची क्रयशक्ति वाढविणें आणि ग्रामीण अर्थव्यवस्था लोकशाहीच्या पायावर उभी करणें, ह्या होत. कूळवहिवाट, तुकडेबंदी, शेतमालासाठीं गुदामें इत्यादि बाबतींतील उपाययोजनांचा हीं उद्दिष्टें साध्य करण्याच्या कामीं बराच उपयोग झालेला आहे. तसेंच ग्रामीण अर्थ-व्यवस्थेला लोकशाहीचें अधिष्ठान प्राप्त करून देण्याचा उद्देश शक्य तितक्या अधिक ग्रामपंचायती स्थापन करून साध्य करावयाचा आहे. महाराष्ट्रांत सध्या एकूण ७८ टक्क्यापेक्षां अधिक लोकसंख्या असलेल्या १३,००० खेड्यांत ग्रामपंचायती आहेत. १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत कायद्यानें ग्रामपंचायतींकडे अधिक कामें व अधिकार सोपविण्यांत आले आहेत. कार्यकारी व न्यायविषयक कामांशिवाय सध्या ग्रामपंचायती शेती, जंगलें, गुरांची पैदास व जोपासना, ग्रामीण उद्योगधंदे, आरोग्य व स्वच्छता आणि खेड्यांतील जनतेचें सर्वसाधारण कल्याण यासंबंधीच्या बाबीहि हाताळतात. ग्रामपंचायती ह्या लोकशाहीच्या तत्त्वावर स्थापन करण्यांत आलेल्या असल्यामुळें त्या कालांतरानें शासनाचे विकेंद्रित घटक म्हणून कार्य करतील व आपलीं उद्दिष्टें साध्य करण्यासाठीं आवश्यक ते अधिकार व साधनें त्यांना उपलब्ध होतील अशी अपेक्षा आहे.

समृद्धीचा मूलमंत्र

जमीन संरक्षण, अधिक सघन शेती, सुधारलेल्या बियाणांचा वापर, रासायनिक खतें, अधिक चांगलीं अवजारें, कीड व रोगांचें नियंत्रण आणि विशेष म्हणजे मोठ्या, मध्यम व छोट्या पाणीपुरवठ्याच्या योजना याद्वारें शेतकी उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. शास्त्रीय संशोधन व प्रत्यक्ष शेती यांचा दुवा साधण्यासाठीं अनेक संशोधन केंद्रें व संस्था स्थापन करण्यांत आल्या असून त्यांची वाढ करण्यांत येत आहे. शास्त्रीय पद्धतीचा अवलंब हा भावी समृद्धीचा मूलमंत्र आहे ही गोष्ट आतां लोकांना पटत चालली असून शेतीच्या कामीं आधुनिक ज्ञानाचा अवलंब करतांना येणारे परंपरागत अडथळे आतां झपाट्यानें दूर होत आहेत. या व अशाच इतर कार्यांचा अंतर्भाव असलेल्या समाजविकास कार्यक्रमाद्वारें ग्रामीण जीवनाचा एकसूत्रित विकास साध-ण्यांत येत आहे. ग्रामीण जनतेच्या दृष्टिकोनांत बदल घडून यावा व आपणच आपला विकास केला पाहिजे अशी उत्कट भावना त्यांच्या मनांत निर्माण व्हावी, हें या कार्यक्रमाचें उद्दिष्ट आहे. आतां-पर्यंत २२,६०० खेडीं समाजविकास योजनांखालीं आणण्यांत आलीं आहेत.

महाराष्ट्रांतील अन्नधान्यांचें एकूण उत्पादन सुमारें ६२ लाख टन म्हणजे दररोज माणशीं १६.६ औंस इतकें आहे. बिगर अन्नपिकांमध्यें कापूस व भुईमूग यांचें उत्पन्न बरेंच आहे. तें भारतांतील एकूण उत्पादनाच्या अनुक्रमें २६ टक्के व १८ टक्के आहे. उसाचें पीकहि येथें चांगलें होतें. शेती उत्पादनाच्या कार्यक्रमांत पशुविकास व मासेमारी यांचाहि समावेश आहे. गुरें व कोंबड्या इत्यादींचें संरक्षण व सुधारण करण्यासाठीं पशुवैद्यकीय सोयींत वाढ करण्यांत येत आहे. यांत्रिक

होड्या व इतर सुधारलेल्या पद्धतींचा अवलंब केल्यामुळें मत्स्योत्पादनांत वाढ होईल, तसेंच समुद्रावरील मासेमारीचाहि विस्तार करतां येईल अशी अपेक्षा आहे. शार्क लिव्हर ऑईल, माल्ट एक्स्ट्रॅक्ट, फिश मील इत्यादि पर्थोच्या उत्पादनाची वाढ करण्याच्या दृष्टीनें उपाययोजना करण्यांत आल्या आहेत.

सहकार व बँका

सहकारी चळवळीनें, शेतीसाठीं कर्जें, शेतमालावरील प्रक्रिया, माल-विक्री, धान्याची सांठवण, लिफ्ट इरिगेशन, शेती व पशुपैदास, मासेमारी, दूध व दुधाचा धंदा इत्यादि अनेक आर्थिक क्षेत्रांत प्रवेश केला आहे. मध्यस्थांकडून होणारी पिळवणूक थांबवावी व नफ्याचा जास्तींत जास्त हिस्सा प्राथमिक उत्पादकाच्या पदरांत पडावा हा या संस्थांचा उद्देश आहे. महत्त्वाच्या बाजारपेठांच्या ठिकाणीं राज्य गुदाम कॉर्पोरेशनकडून गुदामें बांधण्यांत येत आहेत. मोठ्या बाजारपेठांसाठीं भारत सरकारच्या मध्यवर्ती गुदाम कॉर्पोरेशनकडून मोठीं गुदामें बांधण्यांत येणार आहेत. महाराष्ट्रांत एकूण २५,००० सहकारी संस्था असून त्यांची एकूण सदस्यसंख्या ३२,६८,००० आहे.

महाराष्ट्रांत ८०० वर बँका आहेत. प्रत्येक बँकेचा सुमारें ४०,००० लोक फायदा घेतात. जॉइंट स्टॉक कंपन्यांची संख्या ४,००० चे वर असून त्यांचें वसूल भांडवल रु. ३१४ कोटि आहे. यापैकीं १/३ पेक्षां अधिक कंपन्या व्यापारासंबंधीच्या आहेत व सुमारें १/५ मालावर प्रक्रिया करणाऱ्या व धातु, रसायनें व त्यांचे पदार्थ तयार करणाऱ्या आहेत.

पाटबंधारे व विद्युत

पिकांखालीं असलेल्या एकूण ४६३·८० लाख एकरांपैकीं २६ लाख एकरांस किंवा ५ टक्के जमिनीस पाणीपुरवठा करण्यांत येतो. पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक योजनांनुसार हातीं घेण्यांत आलेल्या मोठ्या, मध्यम व छोट्या पाणीपुरवठ्याच्या योजनांमुळें आणखी सुमारें १० लाख एकर जमीन पाण्याखालीं येईल अशी अपेक्षा आहे. ५०,००० हून अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व ठिकाणीं विजेची सोय आहे. जलविद्युत्‌निर्मितीच्या साधनांच्या बाबतींत महाराष्ट्र समृद्ध आहे. वीज कमी खर्चांत दूरवर नेतां येत असल्यामुळें, उद्योगधंद्यासाठीं लागणारी शक्ति म्हणून तिला विशेष महत्त्व आहे. विजेमुळें उद्योगधंद्यांचें विकेंद्रीकरणहि आतां शक्य झालें आहे. पाणीपुरवठ्याच्या कामींहि विजेचा उपयोग होतो आणि खेडेविभागांत वीज पुरवठ्याची सोय करण्यांत आल्यास पुरेशी मागणी असलेल्या ठिकाणीं वीज पुरवण्यांत येऊन ती शेतीच्या कामीं राबविण्याची शक्यताहि निर्माण होईल. मुंबई, ठाणें, कुलाबा, नासिक, पुणें, अहमदनगर, सातारा, सोलापूर, कोल्हापूर व रत्नागिरी ह्या जिल्ह्यांचा समावेश होत असलेल्या राज्याच्या नैर्ऋत्य भागाला २,७९,८०० कि. वॅ. विद्युत् निर्माण करणाऱ्या पांच जलविद्युत् केंद्रांतून विजेचा पुरवठा होत आहे. यापैकीं एका केंद्रांची (भिरा) उत्पादन शक्ति ६०,००० कि. वॅ. नें वाढवून एकूण उत्पादन ३,३९,८०० कि. वॅ. पर्यंत नेणें शक्य आहे. तरीहि, विशेषतः मुंबई भागांत, विजेची तीव्र कमतरता आहे. कोयना जलविद्युत् केंद्राचें काम आतां जोरानें सुरू आहे. याखेरीज नैर्ऋत्य भागांत भंडारदरा व मुळा आणि विदर्भ व मराठवाड्याचा समावेश होत असलेल्या पूर्वभागांत पूर्णा व पेंच यासारखे विद्युत् उत्पादनाचे सुमारें १२ एक मार्ग उपलब्ध

आहेत. राज्याचा पूर्वभाग जलविद्युत् निर्मितीच्या साधनांच्या बाबतींत फारसा समृद्ध नाहीं. तथापि, विदर्भातील कोळशाच्या खाणींमुळें औष्णिक (थर्मल) वीजनिर्मितीची सोय तेथें मोठ्या प्रमाणावर होऊं शकते.

उद्योगधंदे

राज्याच्या सर्व भागांत औद्योगीकरण घडवून आणण्यासाठीं एक मास्टर प्लॅन तयार करण्यांत आला आहे. उत्पादनाच्या बाबतींत एकत्रित प्रगतीबरोबर त्यापासून होणारा फायदा मालक, कामगार व गिऱ्हाईक यांच्यामध्यें न्याय्य प्रमाणांत वाटला जावा हें सुद्धा मास्टर प्लॅनचें ध्येय आहे. त्याचप्रमाणें वाढत्या लोकसंख्येला लागणाऱ्या दैनंदिन वस्तूंचा पुरवठा वाढविण्यासाठीं हस्तव्यवसाय, ग्रामीण उद्योगधंदे व लहान उद्योगधंदे यांवरहि बराच भर देण्यांत आला आहे.

सुती कापड, जनरल व इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, रासायनिक पदार्थ, साखर, वनस्पति तेलें व हायड्रोजनेटेड ऑईल, कागद व पुठ्ठा आणि साबण तयार करणें हे महाराष्ट्रांतील प्रमुख उद्योगधंदे आहेत. राज्यांत नोंदण्यांत आलेले ८,०००वर कारखाने असून त्यांत सुमारें ७ लाख कामगार काम करतात. सुमारें १९७ कोटि रुपयांच्या उत्पादक भांडवलापैकीं एकट्या सुती कापडधंद्यांतच जवळजवळ ९७ कोटि रुपयांचें म्हणजेच सुमारें ५० टक्के भांडवल गुंतलेलें आहे. ग्रामोद्योग व लघु उद्योगांत हातमागाचें विणकाम, काथ्याचें काम, चीनीमातीचीं भांडीं, वेताचें व बांबूचें काम, चामडी कमावणें व चामड्याच्या वस्तु तयार करणें, तेल घाणी व शेतीशीं संबंधित असणारें उद्योगधंदे यांचा समावेश होतो.

जंगलें व खनिज संपत्ति

महाराष्ट्रांत एकूण १५७·१५ लाख एकर किंवा एकूण क्षेत्रफळाच्या १/५ जंगल आहे. राज्यांतील सर्वच जिल्ह्यांत जंगलक्षेत्र आहे; पण चांदा, अमरावती, यवतमाळ, भंडारा, नागपूर, पश्चिम खानदेश, ठाणें व नासिक ह्या जिल्ह्यांत दाट व मोठीं जंगलें आहेत. या जंगलांत निरनिराळ्या प्रकारचें इमारती लाकूड, साग व इतर उत्पादन भरपूर प्रमाणांत होतें. राज्याला जंगलांपासून मिळणारें वार्षिक उत्पन्न ५ कोटि रुपयांच्या जवळपास आहे.

हें राज्य मँगेनीज व मीठ यांसारख्या खनिज पदार्थांच्या बाबतींत समृद्ध आहे. समुद्रकिनाऱ्या-वरील जिल्ह्यांत मिठाचें उत्पादन होतें, तर विदर्भातील जिल्हे व कांहीं प्रमाणांत रत्नागिरी जिल्हा या भागांत मँगेनीजच्या खाणी आहेत. विदर्भांत व कांहीं प्रमाणांत मराठवाड्यांत चिनी माती, चुनखडी व कोळशाचे साठे आहेत. एकूण खनिज उत्पादन सुमारें ५ कोटि रु. चें असून त्यापैकीं मँगेनीज व मीठ यांचें उत्पादन अनुक्रमें ३ कोटि व १ कोटि रुपयांचें आहे.

दळणवळण व वाहतूक

राज्यांत १ लाख लोकसंख्येला सुमारें ६५ मैल असें रस्त्यांचें प्रमाण पडतें. नगरपालिकांचे एकूण २०,८१४ मैलांचे रस्ते आहेत. मराठवाड्यांत व कांहीं प्रमाणांत विदर्भांत रस्ते फारच कमी आहेत. रेल्वे रस्ते एकूण ३,०७०.१२ मैलांचे असून त्यापैकीं २/३ म्हणजे १,७१०.५६ मैल ब्रॉडगेज आहेत.

राष्ट्रीयीकरण करण्यांत आलेली सरकारी मोटर वाहतूक एकूण ४७,३०० मैलांच्या १,४०० मार्गांवर चालू असून रोज सुमारें ४,१०,००० उतारूंची वाहतूक करण्यांत येते. अहमदनगर–औरंगाबाद रस्ता व संपूर्ण कोंकणपट्टींतून जाणारा पश्चिम किनाऱ्यावरील बारमाही रस्ता या दोन महत्त्वाच्या रस्त्यांचें बांधकाम दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत हातांत घेण्यांत आलें आहे.

रोजगाराच्या सोयी

महाराष्ट्र राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमुळें सुमारें ५ लाख लोकांना रोजगार मिळेल अशी अपेक्षा आहे. बेकारी कमी करणें हा राष्ट्रीय पुनर्रचनेचा, विशेषतः दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा, एक महत्त्वाचा उद्देश असला तरी हा एक दीर्घकालीन प्रश्न आहे व ताबडतोब सुटणार नाहीं ही गोष्ट मान्य केली पाहिजे. तथापि, पाटबंधाऱ्यांच्या सोयींची तरतूद, जमिनी लागवडीखालीं आणणें, शेतीच्या आणि जंगलाच्या वाढीच्या व विकासाच्या योजना, लघु उद्योग व ग्रामोद्योग यांची वाढ करण्याच्या योजना यांमुळें रोजगाराची कमतरता दूर होऊन कांहीं प्रमाणांत बेकारीस आळा बसेल यांत शंका नाहीं. द्रुतगतीनें औद्योगीकरण करण्याचें धोरण अवलंबिलें तरच हा प्रश्न सरतेशेवटीं परिणामकारकपणें सुटूं शकेल. शिक्षित बेकारांच्या बाबतींतहि हीच परिस्थिति आहे. दरम्यानच्या काळांत, कल्याण कार्याच्या वाढीमुळें बहुसंख्य लोकांचें जीवनमान सुधारेल. शैक्षणिक व वैद्यकीय सोयी, त्याचप्रमाणें औद्योगिक कामगार, मागासलेले व इतर वर्ग यांच्या विकासावर देण्यांत येत असलेला भर यांमुळें अधिक प्रमाणांत समान संधि मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी आशा आहे.

योजनेची प्रगती

महाराष्ट्राच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेसाठीं एकूण २०४.४१ कोटि रुपयांची तरतूद असून त्यापैकीं १४७.२८ कोटि म्हणजे सुमारें ७२ टक्के रक्कम योजनेच्या पहिल्या चार वर्षांत खर्च झाली आहे. १९६०-६१ सालासाठीं, म्हणजे योजनेच्या पांचव्या व शेवटच्या वर्षासाठीं उरलेली रक्कम ५७.२० कोटि रु. इतकी असली तरी या वर्षासाठीं असलेल्या विकास कार्यक्रमास ६६·७७ कोटि रु. खर्च येणार आहे. याचाच अर्थ असा कीं, महाराष्ट्राच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा खर्च ९·५७ कोटि रु. नी वाढणार आहे. कायदेमंडळाचे सदस्य, अर्थशास्त्रांतील तज्ज्ञ व्यक्ति व सामाजिक कार्यकर्ते यांचा समावेश असलेली प्रमुख बिनसरकारी इसमांची एक परामर्ष समिति मुख्य मंत्र्यांच्या अध्यक्षत्वाखालीं नियुक्त करण्यांत आली असून ती तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्याबाबत सरकारला सल्ला देईल.

प्रेक्षणीय स्थळें

महाराष्ट्र म्हणजे जणु एक छोटा भारतच ! परदेशीय अथवा भारतीय प्रवाश्याला देशांत जें जें कांहीं प्रेक्षणीय आहे, त्यांपैकीं बहुतेकाचें दर्शन महाराष्ट्र घडवितो. देशाच्या प्रातिनिधिक समजल्या जाणाऱ्या जवळजवळ सर्व गोष्टी–त्याची प्राचीन संस्कृति, त्यांतील प्राचीन स्मारकांचा वारसा व लोक–या राज्यांत आढळतात. याखेरीज उत्तुंग झाडें, भव्य पर्वत, दृष्टि स्तिमित करणारें सृष्टिसौंदर्य व चांगलें हवामान यांमुळें हा प्रदेश प्रवाश्यांचा स्वर्ग बनला आहे. येथील जंगलांत शिकारीचीं जनावरें भरपूर असून कितीहि चोखंदळ शिकारी असला तरी त्याचें समाधान येथें होऊं शकेल. वाघ, गवा, हरणें वगैरे सर्व प्राणी, शिकारीच्या शोधांत असणाऱ्यांना जंगलांत येण्याचें आमंत्रण देत आहेत.

सर्वांत विशेष म्हणजे या नवीन राज्याची भूमि राष्ट्रपित्याच्या जीवनाशीं व कार्याशीं निकटचा संबंध येऊन पवित्र बनली आहे. कारण वर्ध्याजवळील सेवाग्राम येथें ते राहात होते. येथेंच त्यांना विचार स्फुरले, त्यांनीं चिंतन केलें व भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचें मार्गदर्शन केलें.

सेवाग्राम हें पूर्वी केवळ हरिजनांची वस्ती असणारें एक खेडें होतें. वर्ध्यापासून तें ३ मैलांवर आहे. तेथें मातीच्या अनेक झोंपड्या आहेत. ज्या झोंपडींत महात्माजी राहात होते ती बाहेरून ४२ फूट ९ इंच लांब व २१ फूट रुंद आहे. साधेपणा हें तिचें वैशिष्ट्य आहे. भिंतीवर मातीच्या अनेक उठावदार आकृत्या आहेत. बाहेरील भिंतीवर खिडकीजवळ काढलेली चरख्याची आकृति विशेष उद्बोधक आहे. गांधीजींचें कार्यालय व झोंपडीतील इतर सर्व खोल्या गांधीजींच्या हयातींत जशा होत्या तशाच ठेवण्यांत आल्या आहेत.

प्रसिद्ध स्मृतिचिन्ह

गांधीजी आपलें बहुतेक काम एका चटईवर बसूनच करीत असत. गांधीजींच्या बसण्याच्या जागेसमोर असलेल्या लहानशा मेजावर तीन हस्तिदंती माकडें कोरलेलें एक प्रसिद्ध स्मृतिचिह्न ठेवलें आहे. त्यांतील एका माकडानें आपल्या हातानें आपले डोळे झांकले आहेत, दुसऱ्यानें कानांत बोटें घातलीं आहेत व तिसऱ्यानें आपला हात आपल्या ओंठावर घट्ट धरला आहे. हीं माकडें म्हणजे गांधीजींच्या, 'मी वाईट पाहणार नाहीं, मी वाईट ऐकणार नाहीं, मी वाईट बोलणार नाहीं' या शिकवणुकीचें प्रतीक आहे. मेजावर नीबसहित एक टाक आहे. आवडतें फाऊंटन पेन हरविल्यानंतर त्यांनीं या साध्या टाकानेंच आपलें लेखन केलें.

सेवाग्रामपासून दोन मैलांवर पवनार हें लहानसें खेडें आहे. येथें महात्माजींचे सच्छिष्य व भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांचा आश्रम आहे. हा आश्रम नदीच्या कांठीं असलेल्या लहानशा टेकडीवर असून आजूबाजूचा देखावा फार सुंदर आहे.

वर्धा येथील मगनवाडी(महात्मा गांधींचे आवडते पुतणे मगनलाल गांधी यांच्या स्मृतिनिमित्त हें नांव दिलें आहे) येथें अखिल भारतीय ग्रामोद्योग संस्थेचें मुख्य कार्यालय आहे. खेड्यांत कुटीरोद्योग सुरू करण्यास उत्तेजन देणें व त्यांची सुधारणा घडवून आणणें हें या संस्थेचें ध्येय असून या बाबतींत तिनें बरेंच संशोधन कार्य केलें आहे. बजाजवाडींत कै. शेठ जमनालाल बजाज यांचें घर आहे. जमनालाल बजाज हे एक दानशूर धनिक गृहस्थ व महात्माजींचे मित्र होते. इंडिअन नॅशनल कॉंग्रेसच्या कार्यकारिणीच्या अनेक महत्त्वाच्या विषयांवरील चर्चा या ठिकाणीं झाल्या आहेत. बजाजवाडीच्या समोरच गांधी ज्ञानमंदिर आहे. या सुंदर इमारतीचें उद्‌घाटन १९५४ सालीं पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्तें झालें.

प्राचीन स्मारकांचा वारसा

या प्रदेशांतील कला आणि शिल्प यांच्या विकासाचे टप्पे दर्शविणाऱ्या अनेक उत्तमोत्तम स्मारकांचा वारसा महाराष्ट्राकडे आला आहे. यांत गुंफा व इमारती यांचा समावेश होतो. अशोकानें इ. स. पूर्वी तिसऱ्या शतकांत सुरू केलेली, खडकावरील शिल्पकला इ. स. पूर्वी दुसऱ्या शतकापासून विकसित होऊन तिनें परिणामकारक व लोकप्रिय शैलीचें रूप धारण केलें. नैसर्गिक खडकांत निरनिराळ्या शैलींत कोरलेले भारतीय शिल्पकलेचे कांहीं सुंदर नमुने पश्चिम भारतांत आहेत हें त्याचें भाग्य होय. जगप्रसिद्ध अजंठा व वेरूळचीं लेणीं या राज्यांतील मराठवाडा विभागांत आहेत.

सुरुवातीची बौद्धकालीन स्थापत्यकला इ. स. पूर्वीच्या दुसऱ्या शतकापासून इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत मोडते. पश्चिम भारतांतील शिल्पकलेच्या पहिल्या टप्प्यांत बौद्ध धर्माचें सुरुवातीचें स्वरूप दृष्टीस पडत असून बुद्धाचें अस्तित्व प्रतीकात्मक रीतीनें चित्रित केलेलें आढळतें. या काळांत चैत्यकक्ष अथवा प्रार्थनाकक्ष व विहार तयार करण्यांत आले. बौद्धकालीन शिल्पकलेच्या या सुरुवातीच्या शैलीचीं उदाहरणें कार्ला, कान्हेरी, नाशिक, भाजा, बेडसा व अजंठा या ठिकाणीं अजूनहि पाहावयास सांपडतात.

पश्चिम भारतांतील कोरीव शिल्पकलेच्या दुसऱ्या टप्प्यास ५ व्या शतकांत सुरुवात झाली. बुद्धाच्या भव्य व उत्कृष्ट मूर्ति हें या काळांतील लेण्यांचें वैशिष्ट्य आहे.

बौद्ध धर्मानंतरच्या हिंदु व जैन कलावंतांनीं बौद्ध शिल्पकलेचींच तत्त्वें अंगिकारलीं. तथापि, त्यांनीं आपापल्या धर्मास अनुसरून आणखी कांहीं गोष्टींचें अनुसरण केलें.

जातक कथांतील दृश्यें

अजंठ्याच्या लेण्यांमध्यें स्थापत्यकला, शिल्पकला व चित्रकला या कलांचा त्रिवेणी संगम दृष्टीस पडतो. या लेण्यांतील बुद्धजन्माच्या जातक कथा चित्रित केलेलीं भित्तिचित्रें जगाच्या सर्व प्रवाश्यांचें एक मोठें आकर्षण ठरलीं आहेत.

वेरूळ येथील लेण्यांत प्राचीन शिल्पकलेच्या तिन्ही शैली आढळून येतात. इतर बाबतींतही हीं लेणीं वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या तीन शैली म्हणजे बौद्ध शैली, ब्राह्मण शैली व जैन शैली ह्या होत. इ. स. ३६० व इ. स. ७०० च्या दरम्यान कोरण्यांत आलेलीं लेणीं बौद्धधर्माच्या आस्तिक कालांतील आहेत.

वेरूळच्या लेण्यांतील भगवान शिवाचें कैलास मंदिर ही प्राचीन हिंदूंची अत्युच्च व भव्य कामगिरी समजण्यांत येते. भगवान शिवाच्या निवासस्थानाची प्रतिकृति समजण्यांत येणारें हें कैलास मंदिर एका अखंड खडकांत कोरलेलें जगांतील सर्वांत मोठें मंदिर असावें.

ब्राह्मण काळांतील पुनरुत्थानाचे अवशेष

मुंबई बंदरापासून कांहीं मैलांवर असलेल्या बेटावर असलेली घारापुरीचीं लेणींहि प्रसिद्ध आहेत. या ठिकाणीं खडकांत कोरलेला भव्य हत्ती सांपडल्यामुळें पोर्तुगीजांनीं या बेटाला एलिफन्टा असें नांव दिलें. म्हणून हें मूळ घारापुरी नांव असलेलें बेट एलिफन्टा या नांवानें ओळखलें जातें. हा हत्ती सध्यां मुंबई नगरपालिकेच्या 'राणीच्या बागें'त ठेवलेला आहे. त्रिमूर्ति हें जगांतील एक सर्वांत भव्य शिल्प या ठिकाणीं आहे.

राज्यांतील इतर महत्त्वाच्या लेण्यांमध्यें कान्हेरीच्या लेण्यांचा समावेश होतो. या लेण्यांवरून बौद्धांची वसाहत त्या ठिकाणीं असावी असें अनुमान काढण्यास बळकट पुरावा प्राप्त होतो. इसवी सनापूर्वी १०० ते इसवी सनाच्या ५० वर्षांपर्यंतच्या कालांत कोरलेलीं हीं लेणीं मुंबई शहरापासून १९ मैलांवर आहेत.

कार्ला येथील लेणीं हें प्रवाश्यांचें आणखी एक आकर्षण आहे. हीं लेणीं पुण्यापासून सुमारें ३० मैलांवर आहेत. यांत चैतन्य लेणीं असून तीं सर्वांत मोठीं व भारतांतील या प्रकारच्या लेण्यां-मध्यें सर्वांत चांगल्या प्रकारें राखण्यांत आलेलीं लेणीं आहेत. ह्या लेण्यांत एक मुख्य खिडकी असून तें प्रकाशाच्या व्यवस्थेचें एक आश्चर्यजनक उदाहरण आहे. हीं लेणीं बौद्धशिल्पकलेच्या सुरवातीच्या

कालांतील आहेत. औरंगाबाद जिल्ह्यांत भोकरदान येथेंहि भुयारांत कोरलेलीं लेणीं आहेत. हीं लेणीं वैष्णव पंथाची असून त्यांत दालनें, मूर्ति व चतुष्कोणी प्रांगणाच्या समोरील व्हरांडा आहे.

ज्योतिर्लिंगें

भारतांतील १२ ज्योतिर्लिंगांपैकीं ५ ज्योतिर्लिंगें महाराष्ट्रांत आहेत. ज्योतिर्लिंगें शिवलिंगाचीं प्रतीकें असून तीं स्वयंभू व स्वयंप्रकाशित समजण्यांत येतात. असें एक ज्योतिर्लिंग अहिल्याबाईनें वेरूळ येथें १३ व्या शतकांत बांधलेल्या घृष्णेश्वराच्या एका देवळांत आहे. तसेंच, बीड जिल्ह्यांतील परळी, परभणी जिल्ह्यांतील औंढा, पुणें जिल्ह्यांतील भीमाशंकर व नाशिक जिल्ह्यांतील त्र्यंबकेश्वर हीं ठिकाणेंहि ज्योतिर्लिंगांबद्दल प्रसिद्ध आहेत.

मराठवाडा विभागांतसुद्धां अनेक ऐतिहासिक व पौराणिक स्थळें आहेत. यापैकीं उस्मानाबाद जिल्ह्यांतील तुळजापूर हें भवानीदेवीच्या देवळांसाठीं प्रसिद्ध आहे. भवानी हें छत्रपती शिवाजी-महाराजाचें कुलदैवत होतें. उस्मानाबाद जिल्ह्यांतील तेर हें गांव गोराकुंभार या प्रख्यात संताचें जन्मस्थळ म्हणून ओळखलें जातें. त्याच्याविषयीं अनेक आख्यायिका आहेत. नांदेड जिल्ह्यांतील माहूर हें गांव परशुरामाची माता रेणुकादेवी हिच्या मंदिरासाठीं प्रसिद्ध आहे. हें ठिकाण महानुभाव पंथाचें एक महत्त्वाचें केंद्र होतें. १३ व्या शतकांमध्यें या पंथाचा उदय झाला. त्याचप्रमाणें मध्ययुगामध्यें मत्स्येंद्रनाथ आणि गोरखनाथ पंथाच्या नाथपंथी गोसाव्यांमार्फत तसेंच गुरुचरित्र या लोकप्रिय ग्रंथाच्या लेखकाद्वारें दत्तात्रय पंथासहि या काळांत चालना मिळाली. माहूर या गांवांतच गेल्या आठ शतकांमध्यें या पंथाची चांगलीच भरभराट झाली. प्राचीन मराठी कवि मुकुंदराज यांची समाधि बीड जिल्ह्यांतील आंबेजोगाई येथें आहे. याच ठिकाणीं १६ व्या शतकांतदासोपंतहि होऊन गेले.

नागपूरपासून ३० मैलांवरील एका टेकडीवर रामटेक येथें मंदिरें बांधण्यांत आलेलीं आहेत. रामटेक शहरापासून ५०० फूट उंचीवर तीं बांधण्यात आलेलीं आहेत. यापैकीं प्रमुख देवळें म्हणजे राम, सीता, लक्ष्मण यांची असून तीं मध्ययुगीन ब्राह्मणी पद्धतीनें बांधण्यात आलेलीं आहेत. विदर्भांतील सर्वांत जुनें गांव लोणार येथील देऊळ हें या विभागांतील प्राचीन हिंदु संस्कृतीचा एक सर्वोत्कृष्ट नमुना आहे. तें हेमाडपंती वर्गांतील आहे. शिरपूर हें दोन जैन देवळांसाठीं प्रसिद्ध आहे. त्यांपैकीं एक दिगंबर जैन समाजाचें आंतरिक्ष पार्श्वनाथाचें अतिशय जुनें मंदिर आहे.

कोल्हापूर, पंढरपूर, आळंदी आणि देहू हीं सुद्धां महाराष्ट्र संस्कृतीचीं महत्त्वाचीं ठिकाणें आहेत. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास आणि असेच इतर महान् संतकवि आणि तत्त्वज्ञानी यांच्या जीवनाशीं हीं ठिकाणें निगडित झालीं आहेत.

ऐतिहासिक अवशेष

राज्याच्या जवळजवळ सर्व भागांत अनेक किल्ले बांधलेले आहेत. हे किल्ले लष्करी आणि मोक्याच्या दृष्टीनें महत्त्वाचे असून त्या काळीं ते परकीयांच्या दृष्टीनें दुर्गम असे होते. १९४२ सालीं अखिल भारतीय काँग्रेस कमिटीनें आपल्या मुंबई येथील अधिवेशनांत "भारत छोडो" ठराव मंजूर केल्यानंतर, अहमदनगर येथील प्रसिद्ध किल्ल्यांत श्री. जवाहरलाल नेहरू वगैरे राजकीय

पुढाऱ्यांना स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें होते. १७३९ सालीं चिमाजीअप्पानें पोर्तुगीजांकडून जिंकून घेतलेला वसईचा किल्ला मुंबईजवळच आहे. वेरूळच्या वाटेवरील दौलताबाद किल्ला सुप्रसिद्ध यादव घराण्यांतील एका राजानें ११८७ सालीं बांधला. पुणें जिल्ह्यांतील खंडाळ्याजवळील लोहगड हा किल्ला दख्खनमधील सर्व किल्ल्यांमध्यें अतिशय भक्कम आणि प्रसिद्ध असा आहे.

उत्तर सातारा जिल्ह्यांतील सज्जनगडावर महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध संतकवि स्वामी रामदास यांचे कांहीं काळ वास्तव्य होतें. प्रतापगडाची आंखणी छत्रपति शिवाजीमहाराजांनीं १६५६ सालीं केली. मराठी साम्राज्याच्या संस्थापकाचे, या किल्ल्यावर कांहीं काळ वास्तव्य होतें. रायगड ही शिवाजीमहाराजांच्या राज्याची राजधानी होती, तर शिवनेरी हें त्यांचें जन्मठिकाण होतें. पुण्याजवळील सिंहगड हें, शिवाजीमहाराजांचा एक अतिशय विश्वासू सेनापति तानाजी याच्या सर्वोच्च त्यागाचें प्रतीक आहे. पुरंदर किल्ल्यावरून १८ व्या शतकाच्या शेवटच्या सुमारास मराठ्यांनीं आपला राज्यकारभार चालविला. विशाळगड हा कोल्हापूर जवळ आहे. अमरावती जवळील गाविलगड हा किल्ला बहामनी घराण्यांतील अहमदशा वली यानें १४२५ च्या सुमारास बांधला. इतिहासकालांत या किल्ल्यास घालण्यांत आलेल्या अनेक वेढ्यांपैकीं शेवटचा वेढा ब्रिटिशांनीं १८०३ सालीं वेलस्ली याच्या नेतृत्वाखालीं घातला.

अकोल्याजवळील बाळापूर किल्ला हें मोंगलाचें एलिचपूर नंतर प्रमुख लष्करी ठाणें होतें. या ठिकाणीं निझाम व मोंगल यांच्यामध्यें अनेक लढाया झाल्या. बाळापूर येथील छत्री २५ फूट चौरस आणि ३३ फूट उंच असून ती आलमगीरचा एक सेनापति सवाई जयसिंग यानें बांधली. अकोल्याजवळील नरनाळा किल्ला हें या जिल्ह्यांतील एक प्राचीन व अतिशय मोठें स्मारक आहे.

औरंगाबाद जवळील आंदूर किल्ल्याच्या खांबावर आणि त्यामधील एका मशिदींत लेख कोरलेले आहेत. हा किल्ला १६ व्या शतकांत निझामशाहीच्या आमदानींत बांधण्यांत आला. तेथें बीडच्या महमद तघलूखनें बांधलेली एक शाही कबरहि आहे.

दौलताबाद जवळील खुलदाबाद हें अनेक कबरी व मशिदी यांचें शहर आहे. या ठिकाणीं अनेक साधु-बैरागी, राजे व त्यांचे सरदार चिरनिद्रा घेत आहेत.

भारताचें प्रवेशद्वार

“ भारताचें प्रवेशद्वार ” असें यथार्थ वर्णन करण्यांत येणाऱ्या मुंबई शहरास एकाद्या प्रवाशानें भेट दिली व त्यांतील कांहीं भागांत फेरफटका मारला तर या शहराच्या सौंदर्याची त्याच्यावर चटकन् छाप पडते. मुंबई शहरांतील ह्या निरनिराळ्या ठिकाणांमध्यें बंदर, विद्यापीठाचें राजाबाई क्लॉक टॉवर, मलबारहिल, हँगिंग गार्डन, कमला नेहरु पार्क, चौपाटी सी फेस, मरिन ड्राईव्ह (रेक्लमेशन विभाग सुद्धां), हॉर्नबी वेलार्ड, आशियांतील सर्वांत मोठे महालक्ष्मी रेसकोर्स, प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम्, व्हिक्टोरिया गार्डन आणि अल्बर्ट म्युझियम्, क्रॉफर्ड मार्केट, खादी ग्रामोद्योग भवन, बॉम्बे कॉटेज इंडस्ट्रीज एम्पोरियम्, काश्मिर आर्ट एम्पोरियम्, तारापोरवाला ॲक्वेरियम आणि आरे दूध वसाहत यांचा समावेश होतो.

मुंबई हें एक बहुरंगी शहर असून, तेथें राहणारें सर्व देशाचे, सर्व वंशाचे आणि जातीचें लोक हें एकमेकांच्या खांद्याला खांदा लावून वावरतात. येथें प्रत्येकजण स्वतःचें व्यक्तिमत्व कायम

राखण्याचा प्रयत्न करीत असला तरी इतरांसंबंधीं सर्वसाधारण बंधुभावना ठेवण्याबद्दल देखील त्याची तितकीच इच्छा असते.

पुण्यामध्यें अनेक ऐतिहासिक किल्ले, देवळें आणि आधुनिक शैक्षणिक संस्था आहेत. या शहराच्या नैऋत्येस खडकवासल्याच्या रस्त्यावर पर्वतीचें देऊळ आहे. सिंहगड किल्ला पुण्यापासून १५ मैलांवर खडकवासल्याच्या पुढें आहे. पुरंदर किल्ला पुण्याच्या आग्नेयेस २४ मैलांवर असून तें एक ऐतिहासिक स्थान आहे. पुण्यापासून ११ मैलांवर खडकवासला येथें नॅशनल डिफेन्स ॲकाडमी आहे. अशा प्रकारची जगांतील ही एकमेव संस्था असून तेथें लष्कर, नाविकदल आणि वैमानिक दल यांतील कॅडेटना संयुक्तरीत्या शिक्षण देण्यांत येतें. १९५० सालीं चालू करण्यांत आलेली नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ही पुण्यापासून सुमारें पांच मैलांवर आहे. खुद्द पुण्यामध्यें शनिवारवाडा असून त्याचें प्रवेशद्वार १८ व्या शतकांतील भव्य असें प्रवेशद्वार आहे. या प्रवेशद्वारावर, ते हत्तींनी फोडतां येऊं नये म्हणून जागोजागीं खिळे मारलेले आहेत. हें प्रवेशद्वार, त्यावरील गची, शिबंदीची जागा आणि नगारखाना हे सर्व मराठ्यांच्या जुन्या शनिवारवाड्याचे अवशेष आहेत.

संत्र्यांचें शहर

नागपूर हें भौगोलिकदृष्ट्या भारताच्या बरोबर मध्यवर्ति ठिकाणीं येते. मुंबई – कलकत्ता आणि मद्रास – दिल्ली हें रेल्वेमार्ग नागपूरवरून जातात.

पूर्वीच्या मध्यप्रदेश राज्याची राजधानी असलेल्या नागपूर शहराचें नांव नाग नदीवरून पडलें. या शहरांजवळून ही नदी वहात जाते. नागपूर हें एक महत्त्वाचें औद्योगिक केंद्र आहे. येथें अनेक कापड गिरण्या आहेत. याच्या आसपासचा ग्रामीण भाग मधुर संत्र्यांकरितां प्रसिद्ध आहे. सुमारें अर्धा डझन तलावांमुळें नागपुरचें सौंदर्य वाढलेलें आहे. शहराच्या मध्यभागीं म्युझियमच्या पश्चिमेस आधुनिक पद्धतीनें बांधलेली भव्य अशी इमारत असून तेथें पूर्वीच्या मध्यप्रदेश सरकारचें सेक्रेटरीएट होतें.

औरंगाबाद शहराची अनेक वैशिष्टयें आहेत. त्यापैकीं एक म्हणजे या शहराचा संस्थापक मलिक अंबर यानें १६१० सालीं बांधलेली पाणीपुरवठ्याची पद्धत अद्वितीय अशी असून त्यावेळची पवनचक्की अजून अस्तित्वांत आहे.

औरंगाबाद शहराच्या परिसरांत मोंगल बादशहा औरंगजेब याची पत्नी रबिया दुराणी हिचें बिबीका मकबरा या नांवाचें थडगें आहे. आग्रा येथील ताजमहालच्या धर्तीवर ही कबर बांधली असून ती इसवी सन १६५० ते १६५७ या दरम्यान बांधण्यांत आली. बिबीका मकबरा हा एका सुंदर उद्यानांत उभारण्यांत आला असून त्या उद्यानांत फवारे व सुरूचीं झाडें आहेत. कबरीवरचा भाग स्वच्छ अशा संगमरवर दगडांनीं बांधलेला असून, उर्वरित शिल्पास उत्कृष्ट प्रकारचें प्लॅस्टर लावलेलें आहे. औरंगजेबाची कबर औरंगाबादपासून १४ मैलांवर वेरूळ लेण्यांकडे जाण्याच्या मार्गावरील रावझा या गांवीं आहे.

औरंगाबादच्या दक्षिणेस ३५ मैलांवर पैठण असून तें येण्याजाण्यास अतिशय सोयीचें आहे. पैठण हें गोदावरी नदीच्या उत्तर किनाऱ्यावर वसलें असून, तें हिंदूचें एक पवित्र स्थान

मानण्यांत येतें. टॉलेमीच्या मतें, आंध्र घराण्यांतील दुसरा पुलुमायी (इ. स. पूर्वी १३८–७०) याची ती राजधानी असून, व्यापारासाठीं ती विशेष प्रसिद्ध होती. १५ व्या शतकांत कृष्णाच्या उपासनेला वाहिलेल्या महानुभाव पंथाची स्थापना पैठण येथें झाली.

दौलताबादचा किल्ला दौलताबाद रेल्वेस्टेशनपासून अदमासें १ मैल दूर आहे. वेरूळ लेण्यांकडे जाणाऱ्या रस्त्यानें सहल केल्यास, औरंगाबाद येथून दौलताबादच्या किल्ल्यास सोयीस्करपणें जातां येतें. हा किल्ला समुद्रसपाटीपासून टेकडीच्या माथ्यावर २,२५० फूट उंचीवर बांधण्यांत आला आहे. या शहराचें पूर्वीचें नांव देवगिरी अथवा देवगीर असून हें शहर प्रसिद्ध अशा यादवांनीं ११८७ सालीं वसविलें व येथें त्यांनीं एका शतकांहून अधिक काल राज्य केलें.

दौलताबाद येथील लक्ष वेधून घेणारें असें स्मारक म्हणजे चांदमिनार अथवा जयस्तंभ हें आहे. हें स्मारक १३ व्या अथवा १४ व्या शतकांत उभारण्यांत आलें. या स्मारकाचा पाया १५ फूट उंच असून मिनाराची उंची ९० फूट आहे आणि हा मिनार निमुळता असून त्यावर शिखर आहे.

नांदेड हें गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर वायव्य दिशेस १७० मैलांवर असून येथील गुरुद्वार हें उत्तर भारतांत जीं शिखांचीं प्रसिद्ध गुरुद्वारें आहेत त्यांत हें तेवढेंच प्रसिद्ध आहे. हें गुरुद्वार शिखांचा शेवटचा गुरु, गुरु गोविंदसिंगाच्या स्मरणार्थ बांधण्यांत आलें. येथें देशांतील ठिकठिकाणचे यात्रेकरू येतात.

सफरींना उत्तेजन

राज्यांतील महत्त्वाच्या प्रेक्षणीय स्थळांना सर्वसामान्य नागरिकांना भेट देणें सुलभ व्हावें, तसेंच थंड हवेच्या ठिकाणीं अल्पखर्चांत राहातां यावें याकरितां राज्यसरकारनें निरनिराळ्या योजना अंमलांत आणल्या आहेत. थंड हवेच्या ठिकाणीं आणि समुद्रकाठीं अल्पमिळकतीच्या लोकांच्या सोयीसाठी सरकारनें जे हॉलीडे कँप्स् उघडले आहेत, ते फार लोकप्रिय झाले आहेत. त्यांतील कांहीं कँप वाढविले जात असून कांहीं ठिकाणीं ते नव्यानेंच उघडण्यांत येत आहेत. आणखी एक महत्त्वाची योजना म्हणजे शनिवार-रविवारीं सबंध दिवस किंवा अर्धा दिवस मुदतीच्या जवळपासच्या ठिकाणच्या सहली काढणें. यांत शहरांतील प्रमुख ठिकाणें दाखविण्याचीहि सोय करण्यांत आली आहे.

याशिवाय राष्ट्रीय उद्यानांची वाढ, शिकारीच्या सोयी उपलब्ध करून देणें, निसर्गरम्य स्थळांची वाढ, गरम पाण्याचे झरे असणाऱ्या ठिकाणांची वाढ, उपहारगृहें आणि विश्रांतिगृहे यांच्यांत सुधारणा करणें, प्रवासी लोकांना उपयुक्त असें वाङ्मय प्रसिद्ध करणें, त्यांच्यासाठीं सांस्कृतिक कार्यक्रम आंखणें, शिवाय कोयना आणि इतर ठिकाणीं शैक्षणिक सहलींची व्यवस्था करणें, विद्यार्थी आणि शेतकरी यांचे दौरे आंखणें, प्रेक्षणीय स्थळीं मार्गदर्शकांची सोय करणें, आणि प्रवासी माहिती केंद्र स्थापन करणें आणि त्यांना प्रवासाबाबत मार्गदर्शन करणें इत्यादि योजना अंमलांत आणल्या जावयाच्या आहेत.

राज्यसरकारच्या वरील सर्व योजना अंमलांत आणण्यासाठीं राज्यपातळीवर डायरेक्टोरेट ऑफ टूरिझमची स्थापना करण्यांत आली असून हें खातें केंद्र सरकारच्या टूरिस्ट डिपार्टमेंटशीं निकट संबंध जोडून या योजना कार्यान्वित करील.

थंड हवेचीं ठिकाणें

मुंबईच्या दृष्टीनें सोयीस्कर अशीं थंड हवेचीं अनेक ठिकाणें आहेत. या ठिकाणीं उन्हाळ्याच्या सुट्या अथवा आठवड्याच्या अखेरच्या सुट्या शांतपणें घालवितां येऊं शकतात.

महाबळेश्वर हें आदर्श व लोकप्रिय असें थंड हवेचें ठिकाण आहे. येथें उत्कृष्ट रस्ते आहेत. येथें चांगलीं फळें व भाज्या मिळतात व येथून पश्चिम घाटाचें भव्य दृश्य दिसतें. या पठारावर अनेक रमणीय अशीं निसर्गस्थळें आहेत. महाबळेश्वर हें समुद्रसपाटीपासून ४,५०० फूट उंचीवर असून येथें पुण्यावरून सडकमार्गें जातां येतें. पुण्याहून महाबळेश्वर हें ७५ मैल दूर आहे.

पांचगणीचें पुण्यापासूनचें अंतर महाबळेश्वरपेक्षां १२ मैल कमी असून येथील हवामान महाबळेश्वरपेक्षां अधिक कोरडें आहे. हें सुटी घालविण्यासाठीं उत्कृष्ट असें ठिकाण आहे.

माथेरान मुंबईच्या जवळपास असल्यामुळें आठवड्यांतील सुटीचे दिवस घालविण्याच्या दृष्टीनें तें सोयीचें ठिकाण आहे. माथेरानला आगगाडीनें चार तासांतच जातां येतें. येथें भाजीपाला विपुल प्रमाणांत मिळत असून, रस्तेहि गर्द छायेचे आहेत. माथेरानच्या डोंगरावर अनेक रमणीय अशीं निसर्गस्थानें असून तेथून पश्चिम घाटाची व लहान लहान सरोवरांचीं रमणीय दृश्यें दिसतात. खंडाळा व लोणावळा हीं दोन्हीं ठिकाणें परस्परांपासून दोन मैलांच्या अंतरावर असून, आठवड्यांतील सुटी शांतपणें घालविण्याच्या दृष्टीनें हीं आदर्श होत.

सुटींतील विश्रामस्थानें

थंड हवेच्या ठिकाणाप्रमाणेंच मुंबईपासून ४० मैल अंतरावर वज्रेश्वरीसारख्या ठिकाणीं गरम पाण्याचे झरे आहेत. राज्यांत अनेक ठिकाणीं सर्व वर्गांतील लोकांना विश्रामस्थानांचा फायदा घेतां येण्याच्या दृष्टीनें तेथें सुटीच्या शिबिरांची व्यवस्था करण्यांत येत आहे. उदाहरणार्थ, भंडारदरा हें देशांतील सर्वांत मोठें व अतिशय उत्कृष्ट असें सरोवर असून हें राज्यांत ५,६०० फूट अशा सर्वांत अधिक उंचीच्या कळसुबाई शिखराच्या पायथ्याशीं आहे. येथें विल्सन धरणहि बांधण्यांत आलें आहे.

पन्हाळा हें कोल्हापूरजवळ असून त्याचें रूपांतर द्रुतगतीनें थंड हवेच्या ठिकाणांत व विश्रांतिस्थानांत करण्यांत येत आहे. या व्यतिरिक्त नागपूरजवळील चिखलदरा, पुणेंनजीक कार्ला, औरंगाबाद जिल्ह्यांत महिसमल व रत्नागिरी जिल्ह्यांत आंबोली हीं विश्रांतिस्थानें आहेत.

प्रवाश्यांच्या दृष्टीनें आकर्षक अशीं सर्व स्थळें रस्त्यांनीं जोडलेलीं आहेत. वाहनांची चांगली सोय असून उपहारगृहें, विश्रामस्थानें व प्रवाश्यांसाठीं उतरण्याच्या सोयी या सर्व ठिकाणीं उपलब्ध आहेत.